PRGI NO-MAHMAR/2023/86554


समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

मे २०२६ वर्ष तिसरे : अंक ९



## मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशनचा

# तळागाळातील गरजूंना मदतीचा हात






जिल्हा परिषद शाळा घोडपापड शाळेतील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म वाटप.



बोअरवेल भूमीपूजन सोहळा.



फौंडेशनच्या सौजन्याने अंबीसत्ते हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ता. वाडा, जि. पालघर यांना साऊंड सिस्टीम व क्रीडा साहित्य पुरविले.




फौंडेशनच्या वतीने तालुक्यातील पाच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.



जिल्हा परिषद शाळा घोडपापड येथील शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी नवीन बोअरवेल लोकार्पण समारंभ.



फौंडेशनच्या वतीने वर्षभर पुरेल एवढी वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, चित्रकला साहित्य. स्कूल बॅग व रेनकोट वाटप.

* संत गाडगेबाबा ट्रस्ट या संस्थेतील गरजूंना अल्पोपहार व दोन्ही वेळचे जेवण मोफत देण्यात आले.
* मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन आणि जीवन विद्यामिशन, मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्ग व अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर, तसेच व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी केले जाते.

**- मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन**

**प्रकाशक, संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे
राजेंद्र साठे, सुजय शास्त्री, सायली परांजपे

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ**
अमेरिकी शिल्पकर्ती बॉबी कार्लाइलच्या
सेल्फ मेड मॅन शिल्पाची प्रतिमा

**अंकातील छायाचित्रे**
इंटरनेटवरून साभार

**अंक मांडणी, सजावट**
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)

**व्यवस्थापक**
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

---

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly
Publication owned by Vivek Dattatrey Korde
Printed at Jagruti Printers,Trimurti 91,
Gharpure Path, Giragaon
Mumbai 400004 and Published at
Room No. 46, First Floor,
SakharamBalaji Pawar Marg,
Currey Road Naka, Delisle Road,
Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com
(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग

✶ अंतराळ विवेकाने व्यापावा!
– संपादकीय २

✶ बंडखोरीचे अढळ 'आशा'स्थान!
– गायत्री चंदावरकर ४

✶ सीता शोधार्थ... सोन्याच्या लंकेत!
– राजा पटवर्धन ९

✶ नागरिकत्वाची व्यापक व्याख्या
– श्रीरंजन आवटे १३

✶ सरकारची मनमानी आणि घोंगडी पांघरलेली माकडे!
– डॉ. विवेक कोरडे १७

✶ जातीसंदर्भात मार्क्सवादाबद्दलचे गैरसमज आणि आक्षेप
– डॉ. प्रमोद चाफळकर २१

✶ अदृश्य होत चाललेल्या श्रमकेंद्री शहराचा कवडसा
– योगेश पवार २५

✶ इराण आणि इस्रायल : धर्मवेड्यांचे थैमान
– डॉ. मोहन द्रविड २८

✶ तो काळ जागल्यांचा!
– रवि आमले ३५

✶ जॉन बर्ट्राण्ड गुरडन : नियमांना खणखणीत अपवाद
– सायली परांजपे ३९

✶ क्रीडा महासत्तेचे बहुमोल धडे
– गजानन जोशी ४४

✶ खुल्लम खुल्ला प्यार करेंगे...!
– प्रा. श्रीनिवास हेमाडे ४८

✶ जैन दर्शन : एक अर्धनास्तिक दर्शन
– जगदीश काबरे ५३

✶ मेल्टिंग पॉट की सॅलड बोल?
– आशय गुणे ५७

✶ वॅन गॉफ : एक सर्जन शोध
– डॉ. आनंद जोशी ६२


✶ गाणं कुठं सुरू आहे का?
– गणेश मनोहर कुलकर्णी ६७

✶ अस्वस्थतेचा हुंकार!
– डॉ. नेहा सावंत ७२

✶ वेश्याद्वार मृत्तिका
इंद्रनील सान्याल; अनुवाद : सुमती जोशी ७८

✶ आयुर्वेदिक औषध हे अन्नद्रव्य नव्हे!
– डॉ. श्रीराम सावरीकर ८३

✶ 'आजचा सुधारक'चे आवाहन
– आशिष महाबळ ८६



# अंतराळ विवेकाने व्यापावा!

**संपादकीय**




**एका बाजूला महाबलाढ्य अमेरिका खोटीनाटी कथानके रचून इस्रायलच्या बहकाव्यात इराणवर युद्ध लादत होती, हजारो निरपराध माणसे त्यात मारली जात होती, जगाचा पट विस्कटत होता, देशोदेशींच्या अर्थव्यवस्था जेरीस आलेल्या होत्या, तेव्हा दुसऱ्या बाजूला शस्त्रास्त्र उद्योगातही महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या 'नासा'ने आखलेली आर्टेमिस-२ ही चांद्रमोहीम यशस्वी ठरली होती आणि जग आपल्या टाचेखाली आणू पाहणारा ट्रम्पनामक राष्ट्रप्रमुख या चांद्रमोहिमेच्या यशात स्वतःला मिरवून घेत होता. म्हणजेच, एकीकडे पृथ्वीवर नरसंहार सुरू होता आणि दुसरीकडे अंतराळातला अज्ञाताचा प्रदेश ओलांडत विज्ञान नवी झेप घेत होते. मानवी जगण्यातली विसंगती पुन्हा एकदा अधोरेखित झाली होती.**

अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या गरजेतून विकसित मेंदूच्या माणसाने नवनवीन शोध लावले. पण उद्देश फक्त टिकून राहण्यापुरता मर्यादित कधीच नव्हता. कारण, पृथ्वीवरच्या साधनसंपत्तीवर, नैसर्गिक स्रोतांवर ताबा मिळवण्यातून आलेली वर्चस्वाची भावना त्याच्यात नेहमीच चढ्या प्रमाणात राहिली आहे. आधुनिक काळातले कितीतरी शोध याच वर्चस्वाच्या भावनेतून, लष्करी सामर्थ्य (ठळक उदाहरण अणुबॉम्बचे) वाढवत जाण्याच्या गरजेतून लागले आहेत. किंबहुना, अंतराळात झेप घेण्याची ऊर्मी त्यांच्यात शतकांपासून होतीच परंतु, शीतयुद्धाच्या राजकारणाने **(या संबंधाने ज्येष्ठ संपादक कुमार केतकर यांनी दै. दिव्य मराठीच्या रसिक पुरवणीत 'अथांगयात्रेमागील विश्वकारण' या शीर्षकांतर्गत लेख लिहिला होता. हा लेख वाचण्यासाठी जिज्ञासूंनी प्रस्तुत लेखासोबतचा क्यूआर कोड स्कॅन करावा.)** अंतराळ मोहिमांना धग दिली होती. त्यातूनच माणसाने अनेक अपयशी प्रयत्नांनंतर अपोलो-११ मोहीम आखून चंद्रावर पहिले पाऊल ठेवले होते.

त्या अर्थाने, गेल्या महिन्यात यशस्वीपणे पार पडलेली आर्टेमिस - टू मोहीमसुद्धा शीतयुद्धोत्तर वर्चस्ववादी राजकारणातून उद्भवलेली आहे. ही मोहीम आजवरची सगळ्यात लांबच्या अंतराची, मुख्यतः चंद्रावरच्या अस्पर्शित दक्षिण भागाचा अगदी जवळून फेरफटका मारण्यासाठी होती. 'मून जॉय' असेही याचे वर्णन केले गेले. २००२ मधल्या आर्टेमिस-वन मोहिमेच्या यशानंतर जतन मेहता यांनी 'ॲन ऑड टु अवर मून' या कवितेत, अवकाशात धाडलेल्या यानामुळे उमटलेल्या ज्वाळेच्या

मार्गपट्ट्याचे वर्णन 'ग्लिमर ऑफ होप'–आशेचा किरण असे केले होते. प्रगतीच्या इंजिनांसाठी हा मार्ग चमचमता ठेवूया असा आशावादही व्यक्त केला होता. त्याच चमचमत्या मार्गावरून आर्टेमिस– टू चंद्राकडे झेपावले आणि कार्यभाग आटोपल्यानंतर नियोजित वेळेत समुद्राच्या पाण्यावर थाप मारत पृथ्वीला स्पर्श करते झाले.

या निरीक्षणयात्रेत चंद्रावर पहिलेवहिले अंतराळ केंद्र उभारण्याचे, मंगळावरच्या मोहिमेसाठीची नवी पायरी रचण्याचे उद्दिष्ट होते, ज्यामुळे भविष्यातले मंगळावर पहिले मानवी पाऊल ठेवण्याचे, नैसर्गिक खनिजांचा शोध लावण्याचे यश प्रत्यक्षात येऊ शकणार आहे. अर्थातच ही केवळ जॉय राइड नाहीच, ती महासत्तांमधली तीव्र स्पर्धासुद्धा आहे. पृथ्वीबरोबरच परग्रहावरच्या नैसर्गिक स्रोतांवर ताबा मिळवण्याची. म्हणूनच चीनने २०३० पर्यंत चांद्रपृष्ठीय भागावर अवकाश संशोधकांना धाडण्याचे आणि तिथे कायमस्वरुपी अवकाश केंद्र उभारण्याचे नियोजन जाहीर केले आहे. या स्पर्धेपोटीच आजवर अवकाशात मानवनिर्मित कचऱ्याची समस्या उग्र रुप धारण करू पाहते आहे. म्हणूनच, चंद्र हा सगळ्यांचा आहे, केवळ ज्यांची ऐपत आहे, अशा मोजक्यांचा नाही, असा सूर मोरिबा जाह सारख्या विज्ञानवादी लेखकाने लावलेला आहे. याच संदर्भाने जाह यांनी 'नेचर' मासिकात एक लेखही लिहिलेला आहे. त्यात त्यांनी १९६९ ते ७२ या कालावधीत मानवाने अवकाशात तब्बल ९६ मोठाल्या बॅगा भरून मानवी मलमूत्रादी घाण मागे ठेवल्याचे म्हटले आहे. जेह यांचे म्हणणे हा प्रकार चंद्राच्या पृष्ठभागावर जैविक संसर्गाची शक्यता निर्माण करणारा, 'अम्बिशन विदाऊट अकाउंटेबिलिटी'चा म्हणजेच, उत्तरदायीत्वाविना आकांक्षा जोपासणारा आहे.

'नासा'चे नियंत्रक जेरेड आयझॅकमन यांच्या मते, पुढील दहा वर्षात चंद्रकक्षेतला पृष्ठभाग 'जंक यार्ड' बनून जाणार आहे. चंद्राच्या दक्षिण भागावरच्या विवरांमध्ये गोठलेले पाणी आहे, ते एकदा शोषून घेतले वा संसर्गित बनले, तर ते साठवणूकक्षम नसणार आहे. उत्तरदायीत्वाच्या भावनेतून आर्टेमिस सहमतीपत्रावर केवळ ६१ देशांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत, यात चीन आणि रशिया या अमेरिकेला घाम फोडणाऱ्या पाठोपाठच्या महाशक्तींच्या स्वाक्षऱ्या नाहीत. मुख्य म्हणजे, सहमतीचा हा मसुदा कुणावरही बंधनकारक नाही. महासत्तांनी आजवर आपल्या ताकदीच्या बळावर शोषण केले आहे, अशा देशांकडे अवकाश मोहिमेची क्षमता नसली तरीही, रात्रीच्या नभांगणावर या शोषित देशांचा सारखाच हक्क आहे, याचीही आठवण आयझॅकमन यांनी करून दिली आहे. आयझॅकमन यांचा हा हस्तक्षेप मानवविरहीत अंतराळाच्याही वसाहतीकरणाच्या संभाव्य धोक्याकडे लक्ष वेधून घेणारा आहे.

हे सारे पाहता, यापुढेही विलक्षण मानवी प्रज्ञेच्या बळावर आखण्यात येणाऱ्या अवकाश यात्रेतून आपल्याला काय मिळवायचे हे तर महाशक्तींना कळलेले आहे, मात्र ते किती प्रमाणात मिळवायचे, ते मिळवल्यानंतर तरी मानवी मन शांतावणार आहे का, याचे उत्तर सध्याची अवकाश स्पर्धा आणि त्यातला खाजगी कंपन्यांचा वाढता सहभाग पाहता, प्रत्येकाकडे व्यवहाराच्या अंगाने वेगवेगळे असणार आहे, परंतु कवी मनोहर महादेव उर्फ म.म.देशपांडे यांनी, 'अंतरिक्ष फिरलो, पण गेली न उदासी, गेली न उदासी!... लागले न हाताला काही अविनाशी, काही अविनाशी!' असे म्हणून स्वतःपुरते तात्विक अंगाने याचे उत्तर फार आधीच देऊन ठेवले आहे. (संदर्भः अंतरिक्ष फिरलो पण... म.म.देशपांडे यांची निवडक कविता, प्रकाशक–पद्मगंधा प्रकाशन, पुणे.) यात नकारात्मकतेपेक्षा विवेक, संयम आणि आत्मभानाचे आवाहन दडले आहे. जे आजच्या विस्कटलेल्या जागतिक पटलावर व्यवहाराइतकेच महत्त्वाचे आहे.

**– कार्यकारी संपादक**

# बंडखोरीचे अढळ ‘आशा’स्थान!



गायत्री चंदावरकर

जीवनगाणे



*छायाचित्र साभार : प्रसाद महाडकर आणि ‘जीवनगाणी’प्रस्तुत ‘चेहरे’*

प्रखर सांगीतिक बुद्धिमत्ता आणि प्रतिभा असलेले आशा भोसले हे नाव कधीही काळाच्या मागे पडले नाही, भूतकाळ बनले नाही. मैं जिंदगी का साथ निभाता चला गया... या चालीवर आयुष्य जगल्याने त्यांचे असणे नेहमीच कालसुसंगत ठरले. त्यांच्या आवाजाला प्रस्थापित, अभिजन, विशेषाधिकासंपन्नांचे वावडे नव्हते, पण त्यांचा आवाज सर्वाधिक आर्ततेने खुलला तो जगण्याने नाकारलेल्यांसाठी, समाजाच्या नजरेतल्या दुय्यमांसाठी... रुढी–परंपरांनी ठोकून बसवलेल्या चौकटींची मोडतोड करणाऱ्या बंडखोरांसाठी... आशा भोसले जाहीर न करताच आपल्या गाण्यातून स्त्रीवादाची कड घेत राहिल्या... जाहीर न करताच जगण्याचा प्रगतीशील मार्ग अवलंबत राहिल्या... आणि जाहीर न करताच नव्या जगाची प्रस्थापितविरोधी सांगीतिक भाषाही बोलत राहिल्या...

आशा मंगेशकर. तेव्हाचे वय जेमतेम १५. शरीर – मनात खळबळ माजवणारा हा काळ. भावनांच्या उद्रेकाला धरबंध नसलेला, ज्योतीवर झेप घेऊन स्वतःला संपवण्याची बेफिकिरी असलेला. या अडनिड्या वयात खरी–खोटी स्वप्ने दाखवणारा पुरुष भेटणे, हा ट्रिगर पॉईंट ठरू शकतो, बंडखोरीचा. तसा तो ठरला. त्या वयात कौटुंबिक परिस्थितीची जाण थोडीफार असेलही, रूढी–परंपरांच्या बेड्या वारशात मिळाल्याही असतील. आपण कोण आहोत, आपली हैसियत काय हे कधी कोणी जवळच्याने ऐकवले असेलही. पण वयाच्या बेफिकिरीने हे सारे झुगारून दिले, थोरल्या बहिणीच्या आपल्यापेक्षा वयाने थोराड असलेल्या सेक्रेटरी पुरुषाबरोबर संसार मांडण्यासाठी एका धुंदीत मंगेशकरांचे घर सोडले आणि भोसलेंचे घर आपले मानले. मंगेशकरांकडचे ते पहिले लग्न. तेही कुटुंबाचा तोल बिघडवणारे. भावंडांत काही काळापुरती का होईना, नामुष्कीची भावना देणारे, कटुता निर्माण करणारे.

पित्याकडून आलेला वारसा गात्या गळ्याचा होता. थोरली तो वारसा चालवून वडिलांच्या पश्चात संसाराला कसाबसा हातभार लावत होती आणि आशा मंगेशकर ही तिच्या नंतरची मुलगी, आपल्याला काय करायचं आहे, पुढे काय करणार आहोत, पित्याच्या वारशाचं काय, कुटुंबाच्या प्रतिष्ठेचे काय, या कशाचीही फिकीर न करता बंडखोरीचे निशाण फडकवून, कुटुंबाला लाथाडून निघून गेली होती, तेव्हाच आशा मंगेशकरची आशा भोसले झाली होती.

त्यानंतर तब्बल ७७ वर्षांनी वयाच्या ९२व्या वर्षी (१२ एप्रिल २०२६) अखेरचा श्वास घेतला, तेव्हा ज्योतीवर झेप घेऊन आत्मनाशाची धुंदी असलेला हा एकेकाळचा पतंग, काळाने घडवलेला पार्श्वगायनातला लिजंड होऊन गेला होता. चैतन्याचा झरा त्या आवाजातून अखंडपणे पाझरत होता. जणू लिजंड होण्याची बीजं पंधराव्या वर्षी कुटुंबाला, जगाला, लाथाडून आगीत उडी घेण्याच्या त्या कृतीत दडली होती. सांगीतिक वारशाचे वेळीच आलेले भान आणि परिस्थितीचा असह्य रेटा या दबावातून आशा भोसले नावाचे रसायन पुढे प्रत्येक पिढीला चैतन्याची, जीवनरसाची मात्रा पुरवणारे ठरले होते.

कधीतरी कोणीतरी त्यांना त्यांच्या अलौकिक गायकीबद्दल प्रश्न विचारला होता, पण आशाबाई तुम्हाला हे सगळे जमले कसे? त्यावर आशाबाई चेहऱ्यावर स्मितहास्य आणून म्हणाल्या होत्या, ती माझी अपरिहार्यता होती...

**चौकटीत राहून चौकटीची मोडतोड**

आशाबाईंचा जन्म झाला, तो काळ १९३० च्या दशकाचा. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यानच्या अस्थिर अवकाशाचा, दुसऱ्या महायुद्धाची बीजे पडण्याचाही. भारतात सुरू असलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीला वेग येण्याचा, आदर्शांची नवी मांडणी होण्याचाही काळ तोच. आशाबाईंना वयाचे पंधरावे वर्षं लागले, तेव्हा देशाला स्वातंत्र्य नुकतेच मिळालेले होते. भारताने समाजवादी, धर्मनिरपेक्ष नि उदारमतवादी प्रागतिक विचारांची वाट धरली होती. या मूल्यांचे प्रतिबिंब चित्रपटांतही उमटत होते नि चित्रपटांतल्या पात्रांच्या तोंडी असलेल्या गाण्यांतही उमटत होते.

सुरुवातीला लता मंगेशकरांच्या आवाजाशी मिळताजुळता, मात्र वेगळा पोत असलेला, तरीही त्या काळी शिष्टसंमत असलेली बहुतेक सगळी गाणी लताबाईंना आणि शिष्टसंमत नसणारी गाणी आशाबाईंना मिळत गेली. हेही एकप्रकारचे राजकारणच. पण काळ झपाट्याने सरत होता. जुने आदर्श कोसळू लागले होते. मूल्यव्यवस्था ढासळू लागली होती. जगण्यातली फसफस पृष्ठभागावर येऊ लागली होती. १९६३–६४ विशेषतः पं. नेहरूंच्या अस्तानंतर आदर्शवादाचे इमले गतीने ढासळू लागले होते.

सत्तरीच्या दशकात तर समाजस्वास्थ्यात कमालीचा बिघाड होऊ लागला होता, असंतोष, अस्थिरता, अस्वस्थता येत सारे उलटेपालटे होऊन त्याचे प्रतिबिंब चित्रपटांत उमटू लागले होते. असंतोष, अस्थिरतेची जी काही एक्स्प्रेशन्स होती, ती सारी गाण्याच्या माध्यमातून आशा भोसलेंच्या वाट्याला आली होती. चित्रपट अधिकाधिक नाट्यमय (मेलोड्रॅमॅटिक) होऊ लागले होते आणि साहजिकच त्यात खलनायक, खलनायिका (व्हॅम्प) तसेच अभिसारिकांचा, खुलेआम शृंगारिक हावभाव करणाऱ्या, बोलणाऱ्या ''त्या दुसऱ्या स्त्री''चा प्रवेश झाला होता. त्यांच्यासाठीही गाणी लिहिली जाऊ लागली होती. हेलन, बिंदू यांच्यासारख्या अनेक खलनायिका हिंदी चित्रपट सृष्टी गाजवू लागल्या होत्या.

त्यांच्या मुखी असलेली सगळी गाणी सुरुवातीच्या काळात आशाबाईंना मिळू लागली. मात्र, या सगळ्या शिष्टसंमत नसणाऱ्या भावभावनांना आशाबाईंनी अशा ताकदीने जिवंत आणि लोकप्रिय केले, की त्यामुळे त्या नट्या आणि आशाबाईंची बंडखोर अशी प्रतिमा आकारास आली. मात्र त्या



*चौकटबद्ध आयुष्य नाकारून कधी टोकाचे दुःख, टोकाचा आनंद, टोकाचे नाकारलेपण आणि टोकाचे यश आशा भोसलेंच्या वाट्याला आले. पण या चढउतारात जीवनावरची त्यांची श्रद्धा कधी ढळली नाही...*

***छायाचित्र साभार : 'जीवनगाणी'प्रस्तुत 'चेहरे'***

सगळ्या जणींना मोडू लागलेल्या या चौकटीत एक वेगळे का होईना, पण स्थान मिळत गेले.

आशाबाईंनी आणि या सगळ्या 'खलनायिकां'नी पितृसत्ताक संस्कृतीत असणाऱ्या ''सोज्ज्वळ, शालीन, घरंदाज स्त्रियांच्या'' प्रतिमेला तडे दिले आणि काही अंशी भंजनदेखील केले. हे करत असताना, आधुनिक स्त्री ही न-नायिका आहे, ''हृदयी पान्हा आणि नयनी पाणी'' अशी ती नाही आणि व्यवस्थेच्या सगळ्या मर्यादा न मानणारी-पाळणारी असण्याच्या प्रक्रियेची सुरुवात करून दिली आहे, हे फारच मोलाचे आहे.

**बंडखोरीचा अवकाश ताकदीने व्यापला**

मंगेशकरांच्या घरातील अस्फुट पातळीवरचे कुटुंबकारण, गायनातली भावंडातील स्पर्धा आणि टोकाचा पितृसत्ताक असणारा भारतीय चित्रपट उद्योग या अशा मोठ्या आव्हानात्मक वातावरणात, आशाबाईंनी जी मिळाली ती गाणी गायली, असेही एका पातळीवर म्हणता येते. अनेकांनी पाणउतारा केला, पैसे बुडवले, अपमानास्पद वागणूक दिली. घरी नवरा छळ करीत असे. शेवटी विभक्त झाल्या. उतारवयात त्यांना मुलीने आत्महत्या करणे आणि कॅन्सरग्रस्त मुलाचा मृत्यू या सारखी भयंकर दुःखे त्यांना सोसावी लागली. मात्र कोणत्याही प्रसंगात आशाबाईंनी कर्तव्यनिष्ठतेशी तडजोड केली नाही, ना नित्याच्या व्यवसायातर्गंत राजकारणाचा, हेव्यादाव्यांचा त्यांनी मनावर परिणाम होऊ दिला. सहनसिद्धीच्या आणि आंतरिक ऊर्जेच्या बळाने, नव्या क्षणांचे आनंदाने स्वागत करत त्या गात राहिल्या. सतत नवेनवे शिकत राहिल्या आणि जिथे जिथे शक्य होते, तिथे तिथे मूल्यवर्धन करत राहिल्या.

खरे पाहता, बंडखोरीचा अवकाश आशाबाईंनी मोठ्या ताकदीने व्यापला होता. म्हणजे, सत्तरच्या दशकातल्या उफाळून आलेल्या बंडखोरीला 'पिया तू अब तो आजा' म्हणत त्यांनीच आवाज दिला आणि २००० च्या दशकात 'बचके तू रहना... ए खल्लास...' म्हणत आपल्या ठसकेबाज आवाजात त्यांनी नव्यांनाही चकित केले... नवनवीन प्रयोग करू पाहणाऱ्यांना आशाबाईंच्या आवाजाने साथ दिली. यातही खय्याम, आरडी, हृदयनाथ मंगेशकर आणि नंतरच्या पिढीतल्या ए. आर. रहमान सारख्यांना काही अस्सल काही खणखणीत द्यायचे होते, त्यांनीही आशाबाईंच्या दमदार आवाजावर विश्वास दाखवला होता.

परंतु, यासंबंधात नव्वदीच्या दशकातील एक बोचरी आठवण इथे उद्धृत करायला हवी. पत्रकार राजू भारतन आणि हरीश भिमाणी यांच्यापैकी एक जण गीतकार मजरुह सुलतानपुरी यांच्याशी लताबाई आणि आशाबाई यांच्याबद्दल चर्चा करत होते. त्यावेळी जराशा तिरस्कायुक्त सुरात मजरुह म्हणाले की, ''आशा की आवाजसे बाजारूपन आजतक नही गया...'' हे छापायचे नव्हते, पण छापून आले आणि आशाबाई ते वाचून खूप दुःखी झाल्या होत्या. आशाबाईंना स्वतःचे स्थान आणि वेगळी ओळख निर्माण करताना चित्रपटसृष्टीतल्या राजकारणाचा, अपमानाचा, श्रेय नाकारणाऱ्या प्रस्थापितांशी सामना करावा लागला, त्यांच्याशी हरघडी फार मोठा संघर्ष करावा लागला, याची बोचरी आठवण करून देणारा असा हा प्रसंग होता. मात्र, आशाबाई सगळ्या आव्हानांना पुरून उरल्या. पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीतच राहूनच त्यांनी ही चौकट मोडण्याची बंडखोरी केली. आणि इथेच त्यांच्या जिनिअस असण्याचा पहिला आयाम अधोरेखित झाला.

**स्त्रीत्वाचा कर्णमधुर जागर आणि ऊर्जस्वल**

आशाबाईंच्या जिनिअस असण्याचा दुसरा आयाम आहे, त्यांनी जाहीर न करता केलेल्या स्त्रीत्वाच्या जागराचा! १९५७ साली आलेल्या 'नया दौर' या चित्रपटातील ''उडे जब जब जुल्फे तेरी कवारीयों का दिल मचले'' असे लडिवाळपणे नवतरुणींच्या मनातील असोशी, घालमेल इतक्या मधाळ आणि खट्याळ आवाजात आशाबाईंनी व्यक्त केली. मग पुढे येणाऱ्या प्रत्येक दशकांत स्त्री मनाचे गूज, इच्छा, कामना आणि गुपितांना मदभऱ्या आवाजाने जिवंत करण्याचे सामाजिक-

सांस्कृतिकदृष्ट्या मोलाचे काम आशाताईंनी अत्यंत ताकदीने आणि सातत्याने केले.

किंबहुना, असेही म्हणता येते की, १९६०, ७० आणि ८० या स्त्री मुक्तीची सेकंड इनिंग मानल्या गेलेल्या दशकांत आशाबाईंनी स्त्रियांच्या नाजूक, अस्फुट, अस्पष्ट आणि दबलेल्या किंवा दाबल्या गेलेल्या सर्व भाव-भावनांना सुरेल अन् मखमली आवाज दिला. त्यात केवळ वात्सल्य भावना नव्हती, प्रेम, आनंद, दुःख, उत्स्फूर्तता, बहार, मौज, रोमान्स, मिलनाची ओढ, व्याकुळता, विरह, असोशी, रती भाव आणि क्लब मधील उच्छृंखल किंवा अगदी छचोर भावनांचा पटच त्यांनी अतिशय उत्कटपणे उलगडून अजरामर केला होता.

'तरुण आहे रात्र अजुनी' म्हणणाऱ्या प्रेम विव्हळ आतुर तरुणीचे मदभरे आर्जव असो किंवा 'मलमली तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे' असे रतिभाव जागृत करणारं शृंगारिक गाणं असो किंवा अगदी 'चुरा लिया है तुमने जो दिलको,' अशी प्रेमाची कबुली देणारे तरुणाईचे आवडते गाणे असो किंवा आर्त सुरांत 'कतरा कतरा मिलती हैं, जिंदगी हैं... प्यासी हूं मैं प्यासी रहने दो' म्हणत जगण्याची व मिलनाची कर्णमधुर असोशी गात आशाबाईंनी तरुण-तरुणी आणि मध्यमवयीन ते ज्येष्ठ अशा सगळ्यांच्या आयुष्यातील रोमान्स आणि त्याची कोवळीक गाण्यांतून कायम ठेवली. आपल्या प्रत्येक गाण्यातून आशाबाईंनी स्त्रीत्वाचा सोहळा साजरा केला आहे, हेही नोंदवणे आवश्यक आहे.

एरवी, ८ मार्चला ज्याप्रकारे स्त्रीत्वाचे गोडवे गायले जातात आणि त्याच्या अतिरेकाने बेगडीपणाचा संताप येऊ लागतो, तसल्या प्रकारचा खोटा, नावापुरता स्त्रीत्वाचा जागर त्यांनी केलेला नाही हे देखील इथे अधोरेखित केले पाहिजे.

**पहिल्या वाहिल्या रॉकस्टार**

आशाताईंच्या जिनिअस व्यक्तिमत्वाचा तिसरा आयाम हा त्यांना प्रत्येक दशकातल्या गाण्याच्या शैलीतील बदलेला बॉल गेम कळणे, त्याबरहुकूम स्वतःच्या शैलीत बदल करणे आणि यश मिळवण्यासाठी लागणाऱ्या उत्तम पार्टनरशिप्स अर्थात भागीदाऱ्या करणे हा आहे. हा शैलीतला बदल आपल्याला, 'अच्छा जी मैं हारी, चलो मान जाओ ना'मधील लडिवाळ चढ उतार, मुरके त्यांनी पडद्यावर दिसणाऱ्या मधुबालासाठी घेतले, तेव्हा जाणवला. असाच खास अंदाज आणि सूरस्पर्श त्यांनी झीनत अमान, रेखा, श्रीदेवी, माधुरी, काजोल अशा अनेक नट्यांच्या गाण्यांना दिला. आशाबाईंना आदरांजली वाहताना झीनत अमान म्हणाल्यादेखील, की आशाबाईंनी 'दम मारो दम' या गाण्यात एका तरुण मुलीची अस्वस्थता आणि मुक्त संचार असा काही व्यक्त केला होता, की झीनत यांना फक्त पडद्यावर त्यांच्या विद्रोही सुरांना न्याय द्यायचा होता.

काळाशी सुसंगत असणाऱ्या आशाबाईंनी ओ. पी. नय्यर व आर.डी. बर्मन हे संगीतकार आणि मो. रफी व किशोर कुमार हे गायक यांच्या बरोबर दीर्घकाळ युगुलगीते गायिली. ती सगळी गाणी म्हणजे सांगीतिक आनंद देणारा खजिनाच म्हटला पाहिजे. नव्वदीच्या दशकात खुद्द ए. आर. रहमान यांनी आशाताईंना, 'हो जा रंगीला रे', 'तनहा तनहा', 'मुझे रंग दे', 'राधा कैसे न जले', 'कम्बख्त इश्क' अशी अत्यंत वेगळ्या नि आधुनिक धाटणीची गाणी दिली आणि प्रेक्षकांना या गाण्यांनी अक्षरश: वेड लावले.

कॉन्सर्टमध्ये पार्श्वगायन करायचे नसते, तर तिथे मनोरंजनात्मक परफॉर्मन्स द्यायचा असतो, याची त्यांना नेमकी जाण होती. त्यामुळे त्यांचे अत्यंत उत्स्फूर्त, उत्फुल्ल, अतिशय ऊर्जाप्रवाही आणि बहारदार व्यक्तिमत्व झळाळून उठे. खरे तर आशाबाईंनी जसे कॉन्सर्ट्स सुरू केले, तसे स्वतःचे अधिकच व्यक्तिमत्व खुलवत नेले. उत्तम साड्या, गजरे किंवा मॅचिंग फुले असे 'पॉवर ड्रेसिंग' सुरू केले. प्रेक्षकांना जे ऐकायचे आहे, त्यांची उत्सुकता, त्यांची ऊर्जा आपल्याकडे वळवून कैकपटीने ती परत देऊन, वातावरण निर्मिती करण्यात त्या माहीर होत्या. म्हणूनही त्या पहिल्या महिला भारतीय रॉकस्टार होत्या. पुरुष गायकात अर्थातच पहिले रॉकस्टार होते, किशोर कुमार!

**नवनवी क्षितिजे धुंडाळली**

आशाबाईंनी फक्त भारतीय भाषा आणि संगीतातच रमण्याऐवजी विदेशी संगीतकार आणि गायक यांच्याबरोबर कॉन्सर्ट केले, भागीदाऱ्या केल्या, जुगलबंदी पेश केल्या. हा त्यांच्या जिनिअस असण्याचा चौथा आयाम आहे. नवनवी क्षितिजे धुंडाळणे हा त्यांचा जणू स्थायीभावच होता. आशाबाई प्रयोगशील तर होत्याच. त्यामुळेच त्यांनी अगदी बॉय जॉर्ज, मायकेल स्टाइप, कोड रेड, ब्रेट लीपासून ते क्रोनॉस क्वाटेट ते गोरिलाझ या व्हर्चुअल बँड बरोबर गाणी आणि संगीताचे अगदी आनंदाने, नवनवीन प्रयोग केले. कोण काय म्हणेल, आपल्या अस्तित्वाला धक्का लागेल याची भीती तमा न बाळगता त्यांनी हे प्रयोग केले.

गायनातून रस निष्पत्ती करणाऱ्या आशाबाई पाक कौशल्यात देखील निपुण होत्या, हेही एक ओपन सिक्रेटच होते. खाणे

आणि खिलवणे याची अत्यंत आवड असणाऱ्या आशाबाईंनी 'आशाज्' नावाने दुबई, इंग्लंड आणि इतर काही देशात रेस्टॉरंट्स काढली. त्यात त्यांनी गाण्याइतकाच रस घेतला.

'आशा भोसले' नामक मदभरा, सगळे रस किंवा भावभावनांचा परिपोष करणारा आवाज, विलक्षण हुन्नर असणारी गायिका अशी ओळख आणि ७० वर्षांपेक्षा अधिकची सांगीतिक कारकीर्द असलेल्या आशाबाईंच्या चिरकालीन ठरणाऱ्या वारशाची तुलना दुसऱ्या एका भुरळ घालणाऱ्या व्यक्तिमत्वाशी होऊ शकते, ती म्हणजे मर्लिन मन्रो! दोघींमध्ये अनेक साधर्म्ये आहेत. जसे की, सौंदर्य, निरागसता, मादकता, कलात्मकता, करिष्मा आणि तीव्र बुद्धी, जिनिअस दडवून ठेवण्याचे कसब! दोघींमधले वैधर्म्य असे, की मर्लिनने स्वतःला पस्तिशीतच संपवून टाकले आणि आशाबाई मात्र सगळी दुःखे सोसत, आव्हाने पेलत, स्वतः कला आणि कामगिरी अधिकच धारदार करत गात राहिल्या– जणू आकाशातला एक अढळतारा त्यांचा मार्गदर्शक वाटाड्या होता. म्हणूनच आशाबाई जिवंतपणीच एक लिजंड आणि आयकॉन बनल्या!

मर्लिनचा आयक्यू अर्थात बुद्धांक १६५–१६८ च्या मध्ये होता, असे म्हणतात. आशाबाईंचा आयक्यू कुणी काढला नसावा. मात्र त्यांचाही आयक्यू १६० च्या जवळ असणार. तसेच त्यांचा ईक्यू (इमोशनल कोशंट–भावनांक) देखील मोठा असणार, याचे कारण प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याचा त्यांचा चिवटपणा, सतत नवे करण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी त्यांच्यात टिकून राहिलेली उर्मी. याचमुळे त्यांचे गाणे अखेरच्या श्वासापर्यंत थांबले नाही. संपले नाही. ऐंशीच्या वयात देखील आवाजातील माधुर्य, कोवळीक, नजाकत, निरागसता टिकवण्याची किमया त्यांनी साधली. त्यांच्या स्वभावातील आनंद, निरागसता, जगण्यावरील प्रेम आणि सगळ्या मानवी भावभावना समरसून जगण्याची विलक्षण हातोटी यामुळे ते शक्य झाले.


आशाबाई नेहमी म्हणे, की त्या तासन्तास रियाझ करत, रेकॉर्डिंग स्टुडिओत थांबत, एकदा का गाणे रेकॉर्ड झाले की त्या तिथून तडक निघून जात. कुणाशी बोलणे नाही की काही सांगणे नाही. त्यांचा लगाव, ठहराव आणि तन–मन बांधिलकी होती ती सुरांशी! त्यामुळेच त्या फक्त गात राहिल्या, निर्व्याज आनंदाने. या मौलिक बंडखोरीची, समृद्ध करणाऱ्या मुशाफिरीची आणि आधुनिक मूल्यांच्या स्वीकाराची त्यांनी कधीच वाच्यता केली नाही. त्यांच्या सांगीतिक कर्तृत्वाचा सतत चढणारा आलेख आणि त्यांची १२ हजारांहून सुरेल गाणी, असंख्य राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी नावाजलेली दीर्घ कारकीर्द आणि सांगीतिक वारसा मात्र असंख्य पुस्तकं – विश्लेषणं अनेक पिढ्या करतील, हे मात्र नक्की. 'चांदोबा चांदोबा भागलास का' या पंडित भास्कर चंदावरकरांच्या गाण्यातून लहान मुलांना आशाबाई भेटत राहतील. 'चुरा लिया'सारख्या असंख्य रोमँटिक गाण्यांतून तरुणाईचा रोमान्स अधिकच खुलवत राहतील आणि आनंद, उन्मेष आणि गहिऱ्या भावनांनी समस्त लहानथोरांना रिझवत राहतील...

वयाच्या पंधराव्या वर्षी आशा मंगेशकरच्या, आशा भोसले काय झाल्या. सुरांच्या दुनियेत बंडखोरीलाही एक आशास्थान मिळाले!

**गायत्री चंदावरकर समाज, संस्कृती आणि साहित्याच्या आस्वादक आहेत. त्या सध्या संत साहित्यावर पीएच. डी. करीत आहेत. संपर्क : ९९२०६ ९३३३८**



**कुणबी, गाव आणि वेळीप यांची वास्तविकता**
प्रतापसिंह वेळीप काणकर
किंमत २५०/–



**काळीज उसवलां**
उदय नरसिंह म्हांबरो
अनुवाद : पौर्णिमा केरकर
किंमत २००/–


**आरशातल्या आरशात**
डॉ. सुधीर देवरे
किंमत २२५/–



**दक्षिणायन**
किशोर अर्जुन
किंमत : २५०/–


**नामदेव साळुबाई ढसाळ**
मोतीराम कटारे
किंमत २२५/–


**यांगोन यात्रा**
डॉ. मिलिंद जोशी
किंमत २००/–

आपली प्रत आजच नोंदवा
७०३० ९९००८१
९९६० ३७४७३९
साहित
@SAHITPRAKASHAN

# सीता शोधार्थ... सोन्याच्या लंकेत!



राजा पटवर्धन

**पुनर्शोध रामायणाचा**



जटायू बंधू संपातीने आशीर्वाद दिला, 'तुम्ही सीतेचा कसून शोध करा. यशस्वीच व्हाल' वानरांचा आनंद द्विगुणित झाला. उत्साह ओसंडू लागला. दक्षिण दिशेला निघण्यापूर्वी त्यांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. उड्या मारल्या. दक्षिण समुद्रतीर गाठला. समोर महाविशाल सागर होता. पडाव तिथेच पडला. सागराचे अतिभव्य रूप पाहून उड्या मारणारे वानर एकदम गप्प झाले. त्यांचे चेहरे विषण्ण झाले. टीमचा कॅप्टन होता, वालीपुत्र अंगद. ''वीर वानरांनो, असा धीर खचून कसे चालेल? विषादाने कधीच पुरुषार्थ साध्य नसतो. सागरतीरी रात्रभर विश्रांती झाल्यावर अंगद सर्वांना उद्देशून म्हणाला, ''तुमच्यापैकी कोणता वीर पुढे येणार बोला! कोणता वीर सुग्रीवाची प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी सागर ओलांडायला तयार आहे? शतयोजने उड्डाण करून समस्त वानरांची चिंता दूर करून आपले मनोरथ पूर्ण करणारा कोण? राम लक्ष्मण सुग्रीव यांना भेटून आपापल्या स्त्री-पुत्रांना भेटायचे आहे ना, चला बोला...!

''बाप दाखव! नाहीतर श्राद्ध कर'' असाच हा पेच होता. वालीपुत्र अंगद म्हणाला, ''आपण सर्व शुद्ध वानर कुळात जन्मलेले आहोत. एकेकाने आपापली क्षमता सांगण्यास सुरुवात करा.'' गवाक्ष म्हणाला, ''मी जेमतेम २० योजने जाईन.'' शरभाने ३०, ऋषभाने ४०, गंधमादन ५०, मैद वानर ६०, सुषेणाची मजलही फक्त ८० योजनांची. वृद्ध जांबुवंताकडे सर्वांनी मोठ्या अपेक्षेने पाहिले. ''तरुणपणचे सामर्थ्य आता या वयात उरले नाही. मी उड्डाण करणारा राहिलेलो नाही. महान कार्य लक्षात घेता मी नव्वद योजनेच जाईन.'' आपली तर गरज आहे, शंभर योजने दूरवर उड्डाण करण्याची. कुणीच धजावत नाही म्हणून कर्णधार अंगदच म्हणाला, ''मी शंभर योजने जाईन खरा, पण परत कसा येऊ?'' जांबुवंत म्हणाला, ''हे युवराजा! तू शत योजनेच काय? लक्ष योजनेही उड्डाण करशील. तो धोका आम्ही पत्करायला तयार नाही. तू आमचा स्वामी आहेस. तू मुख्य सूत्रधार आहेस.'' ''ते ठीक आहे. पण आपले कार्य कसे होणार, ते सांगा.'' अंगद सर्वांकडे पाहून बोलला, ''नाहीतर इथेच उपोषण करुन जीवन संपवूया. हात हलवीत परत गेलो तर सुग्रीव काका कोणती शिक्षा करील ते आपण जाणतोच. काहीही करा. मृत्यू आ वासून उभा आहे.'' ''अंगदा, मी अशा वीराला प्रेरणा देतो, की तुझे कार्य हमखास सिद्धीस जाईल.''

हा संवाद सुरू असताना हनुमान दूर बसलेला होता. ''महावीर हनुमाना! शास्त्रवेत्ता, तू गप्प का? तेज आणि बलात तू राम लक्ष्मण व सुग्रीवाइतकाच पराक्रमी आहेस. काकणभर अधिकच. तुझी गती गरुडासारखीच आहे. गरूडाचे पंख आणि तुझे बाहू यांचे सामर्थ्य मी जाणतो. तूच पुढाकार घे. तू केसरीचा पुत्र, देवांगना पुंजिकस्थला म्हणजेच तुझी माता अंजनी. इच्छेनुसार रुप प्राप्त करण्याची क्षमता तुझ्या मातेकडूनच तुला मिळाली आहे. ती तरुण असताना लावण्यवतीचे रुप घेऊन स्वच्छंदपणे पर्वत शिखरांवरून आनंदाने फिरत होती. तिच्या रुपाने  वायुदेव काम मोहित झाला. त्याने तिला आपल्या विशाल बाहूत घेतले. तुझी व्रती माता अंजनी घाबरणे साहजिकच होते. ती ओरडून म्हणाली, ''माझे पावित्र्य विटाळणारा तू कोण आहेस? दूर हो.'' वायुदेव उत्तरला, ''हे सुंदरी, तू पवित्र पतिव्रता आहेस, तशीच राहाशील. मी मनोदेहाने केवळ मानसिक स्तरावर तुला मिठी मारली आहे. हा शारीरिक समागम नव्हे. माझ्या मन:स्पर्शाने तुला महाबली, पराक्रमी, बुद्धिमंतात श्रेष्ठ असा पुत्र होईल. तो सत्वशील तेजस्वी तर होईलच, त्याचबरोबर हा केसरीपुत्र मनोवांछित उड्डाणक्षम होईल.''

**चिरंजिवी हनुमान**

''हे हनुमंता! अंजनीच्या पोटी एका पर्वतगुहेत तू जन्माला आलास. (मारुतीचा जन्म ज्या गुहेत झाला तीच 'ही' गुहा असा दावा महाराष्ट्र, बिहार, कर्नाटकात केला जातो. अंजनीमातेची देवळेही तिथे आहेत.) सूर्योदयालाच तुझा जन्म झाला. त्या सूर्यबिंबाला रसरशीत फळ समजून अकस्मात गगनात तू उड्डाण केलेस. हे महाकपे, तू तीनशे योजने (सुमारे ३६०० कि.मी.) उंचावर गेल्यावरही सूर्याच्या कडक उन्हात दमला नाहीस. तू अधिकाधिक सूर्याजवळ जाऊ लागलास, तेव्हा देवेंद्राने आपल्या वज्राने तुझ्यावर प्रहार केला. तुझ्या हनुवटीला जो डावीकडे एक व्रण (खूण) आहे, तीच ही वज्रखूण आहे. हनुवटीवर जखम पडली म्हणून, तू हनुमान (मान म्हणजेही खूणच) आपल्या पुत्रावर या इंद्राने वज्राचा प्रहार केला म्हणून हे, वीरा तुझा पिता (वायुदेव) रागावला. त्याने तिन्ही लोकातला आपला वाहता संचारच बंद केला.'' (जणू होर्मुझची खाडीच बंद झाली.)

आता देवांसह सर्वांची हवा 'टाइट'झाली! स्वर्गाने असा प्रसंग पूर्वी कधीच अनुभवला नव्हता. ना श्वास घेता येई, ना नाकाने सोडता येई. ही चक्क नाकबंदी होती. नाकाला चाप लावून आवळावे तसे झाले (हवेची घनताच वायूने कमी केली) छाती धडधडायला लागली. तोंडाने जोरजोरात श्वास घेऊनही घुसमट वाढू लागली. देवांनाही ऑक्सिजनची (सिलिंडर) टंचाई भासू लागल्याने धाप लागली... देवांनी वायुदेवाची मनधरणी केल्यावर वायुदेवाने संचार पुन्हा सुरू केला. देवांच्या जिवात जीव आला. जांबुवंताचे कथन सुरूच होते. ''त्यावेळी हे हनुमंता, तुला विधात्या ब्रह्मदेवाने वर दिला. तू न मागताही!'' ब्रह्मदेव म्हणाला होता, ''या अंजनीसुताला कोणत्याही शस्त्र वा अस्त्राने मृत्यू येणार नाही.'' ब्रह्मदेव इतका खूश झालेला पाहून इंद्राला आपण केलेला वज्रप्रहार हा गुन्हाच होता, हे पटले. तो राक्षस नसून नवजात वानर बालक होता, आपण त्यावर वज्रप्रहार करूनही फक्त एक जखमच झाली? माझे गर्वहरण एका नवजात वानराने केले. मीच त्याला सर्वप्रथम वर द्यायला हवा होता. हनुमंता इंद्रानेही तुला वर देऊन पापक्षालन केले. इंद्राच्या वराने तू इच्छामरणी चिरंजीव झालास.

**विराट रुप प्रकटले**

''हे हनुमंता! वायुसुता! अंजनीपुत्रा! तू आकाशमार्गे कितीही दूर उडाण भरू शकतोस. आता तूच आमचा तारणहार आहेस. तू तुझ्या बळाचा विस्तार कर. आम्ही तुझा पराक्रम पाहायला आतुर झालो आहोत. हे वानर श्रेष्ठा! हताश वानरांना



*रामायणात मुख्य पात्र रामाचे, मुख्य कथासुद्धा त्याच्याचभोवती गुंफलेली, पण या कथेत एकनिष्ठा आणि समर्पणाचे मूल्य रुजवणारी उपकथानकेही मुबलक. ही दोन मूल्ये आजही सामान्यांवर प्रभाव टाकतात...*

तू धैर्य दे.'' या जांबुवंताने दिलेल्या उत्तेजनाने हनुमंताची सुप्त प्रेरणा जागृत झाली. बालपणी व्रात्यपणा करताना, हनुमानाने मतंग ऋषींना त्रस्त केले होते. तोच त्या टोळीचा म्होरक्या होता. तेव्हा, ऋषी मतंग म्हणाले, ''तुला तुझ्या बळाचा फार गर्व वाटतोय ना? मला विनाकारण त्रास देतोस? दीर्घ काळपर्यंत तुला तुझ्या जन्मजात प्रचंड शक्तीचा विसर पडेल. एका घटनेने तुझी ती स्मृती जागृत होईल. हाच तो दिवस!''

हनुमंताने मनोमनी मतंग ऋषींची माफी मागून त्यांना वंदन केले. हनुमानाला एकदम स्फुरण चढले. आपण महारुद्रच (शंकराचाच अंश) आहोत, असे जाणवले. बघता बघता तो भीमकाय झाला. त्याचे विराट रुप पाहून समस्त वानर खूश झाले. ना विषाद उरला, ना निराशा उरली. ''हनुमान! हनुमान! (२०१४ पासून संसदेत आणि निवडणूक प्रचारसभांमध्ये होणारी गर्जना रामायणातील वानरांची नक्कल आहे!) अशा वानर गर्जनांनी आसमंत दणाणला. वानरांची गर्जना जशी जोरजोरात सुरू झाली, तसा हनुमान मारुती मोठा मोठा होऊ लागला. विस्तारला. अवाढव्य झालेल्या मारुतीने आपले पुच्छ गरगरा घुमवले. (मारुतीचे शेपूट वज्रपुच्छ झाले. ब्रह्मांडा भोवती वेढे वज्रपुच्छ करू शके!) मारुतीने आपले बाहू पसरले, ते पर्वतशिखरांना भिडतील असे वाटले. सर्व उपस्थित वानरांना त्याने प्रणाम केला. ''मी शीघ्रगामी सामर्थ्यवान वायुपुत्र आहे. मी मेरु पर्वताला सहस्त्र प्रदक्षिणा काही क्षणात घालू शकेन. समुद्राच्या पाण्याने संपूर्ण पृथ्वी भिजवून टाकीन. गरुडही माझ्या वेगाने उडू शकणार नाही. सूर्योदय ते सूर्यास्त या वेळेत मी सूर्याला स्पर्श करून परत पृथ्वीवर येईन. संपूर्ण सागर जल शोषून टाकीन. पर्वतांचा चुराडा करीन. वानरमित्रांनो, हा माझा पराक्रम तुम्ही आज पहाणार आहात. मी सीतेला पाहीनच पाहीन, अशी खात्री देतो. मनात आणलं तर अख्खी लंकानगरी उखडून उचलून आणीन. ब्रह्मदेवाकडून अमृत घेऊन येईन.'' पुन्हा हनुमान! हनुमान! अशा गर्जना झाल्या.

''हनुमाना! सर्व वानरांचा उत्साह शतपट वाढला आहे. आम्हा सर्वांच्या शुभेच्छा तुला प्राप्त झाल्या आहेत. तू काम फत्ते करून येईपर्यंत आम्ही एका पायावरच उभे राहू.'' मारुतीचाही उत्साह वाढला. तो म्हणाला, ''या घडीला माझ्याइतका वेग कुणाचाही नाही. वृक्षराजीने भरलेल्या महेंद्रगिरी वरूनच मी उड्डाण करीन.'' (गजपती जिल्हा ओडिशा, आंध्रप्रदेश सीमेपासून जवळ, की तामिळनाडूमधील गंधमादन पर्वत असाही समज – वाद आहे.)

**दैवदुर्लभ उड्डाण**

सगळ्यांचा उत्साह वाढवल्यानंतर त्याने डोळे मिटून एकाग्रतेने चिंतन केले. चारण (चारण, हे सिद्ध गंधर्वांसारखे स्वर्गनिवासी) ज्या आकाश मार्गाने जातात, तोच मार्ग हनुमानाने निश्चित केला. विविध धातूंनी भरलेला तो पर्वत असल्यामुळे चमकतच होता. पर्वतावरील एक सपाटी त्याने निवडली. सर्व देवतांना वंदन केले. खास पूर्वेकडे वळून त्याने प्राणदात्या वायुदेवाचे स्मरण केले. अति विशाल शरीर धारण केले. एक पाय इतका जोराने दाबून बघितला, तेव्हा पर्वतातून झरे वाहू लागले. नागांनी दगड–धोंड्यांनाही दंश केला. कित्येक शिळांचे तुकडे झाले. विद्याधरांना वाटले, की पर्वतावरील भुतेच पिसाळली आहेत. अशा प्रसंगी महाज्ञानी विद्याधरही स्त्रियांसह आपली सर्व सामग्री सोडून घाबरून उडून गेले. आकाशात महर्षी सिद्ध चारणांना खात्री पटली, की हे देव आणि दैव दुर्लभ उड्डाण पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. हा हनुमान रामाचे आणि वानर जातीचे महान कार्य करण्यासाठी समुद्र उल्लंघून एकटाच जाणार आहे. अर्थातच त्या क्षणी वज्रपुच्छी हनुमान अग्निसारखा तेजस्वी भासला. त्याने भुभु:कार करुन वानरांचे लक्ष्य वेधले, ''पाहा, राघवाच्या बाणाच्या वेगाने मी जाणार आहे. लंकेत गेल्यावर जर सीतेचा शोध लागला नाही, तर रावणाच्या मुस्क्या बांधून, बंदी करून लंकेलाच उपटून आणीन'' (हे हनुमान रचित स्तोत्र आहे. आत्मस्तुतीने परिपूर्ण.)

हनुमानाने प्रथम उंच गरूड झेप घेतली. पर्वतच उड्डाण करीत

आहे, असा भास झाला. काही वृक्षांनी त्याला निरोप देण्यासाठी थोडी साथही दिली. ते वृक्ष समुद्रात पडले. नंतर हनुमान समुद्राला समांतर उड्डाण करू लागला. (उल्लंघन). भर समुद्रात अचानक उंचच उंच लाटा उसळल्या. समुद्री प्राण्यांना वाटले, की अनेक गरुडच आपल्याला खाण्यासाठी येत आहेत. ते नाहीसे झाले. आकाशात विविधरंगी ढग जमा झाले होते. त्या ढगातून हनुमान बाहेर पडत असताना आकाशातून पुष्पवृष्टी सुरू झाली. रामाचे कार्य करणाऱ्या हनुमानाला त्रास होऊ नये, म्हणून सूर्याने ताप आणि वायुने वेग कमी केला. ऋषी मुनीही गंधर्वाना साथ देऊन गाऊ लागले. समुद्रानेही हनुमानाला मदत व्हावी, म्हणून बुडलेल्या 'मैनार्क' पर्वताला वर उंच वाढण्याची विनंती केली. ''तू वर जाऊन हनुमानाला विनंती करुन थोडा दम घ्यायला सांग. तो महान कार्याला निघाला आहे, त्याला थोडी विश्रांती मिळू दे.''

इकडे, हनुमंताला समुद्रातून सुवर्ण शिखरे वर येताना दिसली. (पर्वतांचे पंख इंद्राने छाटून, पाताळातून वर येणाऱ्या राक्षसांचे प्रवेश द्वार पर्वताद्वारे बंद करून टाकले होते) मैनार्क आपल्या शिखरावर मनुष्याच्या रुपाने उभा राहून हनुमानाला म्हणाला, ''समुद्राच्या आज्ञेने मी तुमच्या दुष्कर कार्याला शुभेच्छा देण्यासाठी उभा आहे. थोडी विश्रांती घेऊन पुढे जावे. तुमची पूजा केली की वायुदेवाच्या पूजेचे पुण्य मिळेल. तुमच्या पित्याच्या कृपेने सत्य युगापासून माझे हे पंख शिल्लक आहेत. इंद्र, पर्वतांचे पंख छाटीत छाटीत माझ्याजवळ आला, तेव्हा तुझ्या वायुदेव पित्याने मला समुद्रात पंखासह बुडवले. मला हे ऋण फेडू द्या.'' ''मैनार्का! मी तुझा सत्कार स्वीकारला आहे, पूजा झाली नाही, तरी चिंता करू नकोस. दिवस मावळण्यापूर्वी मला लंकेत पोहोचायचे आहे, तेही न थांबता. मैनार्काला स्पर्शून हनुमानाने उड्डाण सुरू ठेवले. अधिक उंच उडाला. इंद्र, सागर, मैनार्क असे सर्वच खूश झाले.

**हनुमानाची कठोर परीक्षा**

देवांना हनुमानाची आणखी एक परीक्षा घ्यायची होती. त्यासाठी सुरमा या नागमातेची निवड झाली. महाराक्षसी रूप घेऊन, जबडा पसरून तिने हनुमानाचा आकाश मार्ग अडवला. ''हे कपिश्रेष्ठा! देवांच्या आज्ञेने तू माझे भक्ष्य म्हणून समोर आला आहेस. मी तुला खाणारच.'' न भिता हसत हसत हनुमानाने त्याच्या उड्डाणाचे प्रयोजन सांगितले. ''मलाही रामाने दिलेलेच कार्य करायचे आहे. ते उरकून मी परत येताना मला खुशाल खाऊन टाक. माझे वचन प्रतिज्ञा समज.'' सुरमाने हनुमानाला ब्रम्हदेवाच्या वराची कल्पना दिली. ''तू माझ्या तोंडात शिरुन जिवंत सुटलास तरच पुढे जाऊ शकशील.'' तिने आपला जबडा अधिक मोठा केला. हनुमानाने आपले शरीर अधिक मोठे केले. सुरमेने आणखी मोठा आ करून जबडा अधिक मोठा केला. मोजपट्टी होती योजनांची. ही स्पर्धा सुरु असताना सुरमेचा जबडा शंभर योजने होताच, हनुमान अंगठ्या एवढा लहान होऊन तिचा जबडा बंद व्हायच्या आतच बाहेरही आला. ''हे दक्ष कन्ये सुरमे! तुला नमस्कार! तुझा वर खरा ठरला, तू मला गिळलेस. आता मला रजा दे.'' त्यावर सुरमा म्हणाली, ''सीतेची व रामचंद्रांची भेट घडवून आण. यशस्वी हो''

सुरमेच्या संकटातून हनुमान सही सलामत सुटला, तरी वायुवेगाने जात असता सिंहिका राक्षसीने हनुमानाची सावली सागरावर पसरलेली पाहिली. ती सावलीला खेचत खेचत हनुमानापर्यंत येऊन तिचे भोजन करणार होती. हनुमानाला आपणाला कुणीतरी मागे खेचतेय, असे जाणवले. वेगही मंदावला. समुद्रातून कुणीतरी भव्य प्राणी प्रकट होतो आहे, असे दिसले. सुग्रीवाने अशी वर्णने ऐकवली होती. त्यातलाच हा जलचर असावा. बघता बघता ती राक्षसी आकाशापर्यंत तोंड उघडून उभी ठाकलीही. आपला देह सूक्ष्म करून तिच्या तोंडात घुसून हनुमानाने तिला ओरबाडले. ठार केले. आकाशगामी पक्षी म्हणाले, ''आता तू लंकेत जा. या पुढील प्रवासात लंका येईपर्यंत विघ्न येणार नाही.'' हनुमान वायुवेगाने जात असता त्याला एक द्वीप दिसले. समुद्र किनारा दिसला. आपला देह त्याने मूळ स्वरूपात आणला. रुप आणखीही लहान केले. एका उंच पर्वतावर वसलेली नगरी पाहिली. ती वैभवशाली अशी जणू दुसरी अमरावतीच होती. त्रिकूट पर्वतावरून तो लंकेचे दर्शन घेऊ लागला. शंभर योजने दूर लंकेत आपण खरेच आलो आहोत. आपण केलेल्या आत्मस्तुती पैकी एक टप्पा पार केला, याचे समाधान मारुतीला झाले. ही आत्मस्तुती वानरांचे नैराश्य दूर करुन त्यांचा उत्साह वृद्धिंगत व्हावा, या हेतूनेच केलेली होती. जांबुवंताच्या वयाचा आणि पराक्रमाचाही तो सन्मान होता...

**(पूर्वार्ध)**

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क :** ९८२००७१९७५

# नागरिकत्वाची व्यापक व्याख्या



श्रीरंजन आवटे

मर्म संविधानाचे




**को**णत्याही देशात राज्यसंस्था आणि नागरिक यांचे नाते निर्धारित करणे महत्त्वाचे असते. नागरिक म्हणून कोणाला मान्यता दिली जाते आणि त्यांचे त्यानुसार हक्क काय आहेत, हे ठरवावे लागते. आज नागरिकत्वाच्या व्याख्येलाच प्रश्नांकित केले जात असल्याने याबाबतचा इतिहास अभ्यासणे महत्त्वाचे...

भारताच्या संदर्भाने सर्वप्रथम ब्रिटिशांनी नागरिकत्वाबाबतची कायदेशीर मांडणी केली. ब्रिटिश वसाहतवादाच्या पहिल्या टप्प्यात भारताच्या भूभागात राहणाऱ्या लोकांचा कायद्याच्या दृष्टीने निश्चित दर्जा नव्हता. इस्ट इंडिया कंपनीच्या हाती कारभार होता. त्या आधी तर विविध संस्थानांमध्ये प्रजेच्या रुपातच लोक राहत होते. इस्ट इंडिया कंपनीच्या जागी ब्रिटिशांनी अधिकृतपणे ताबा घेतला. १९१४ मध्ये त्यांनी 'द ब्रिटिश नॅशनॅलिटी ॲण्ड स्टेटस ऑफ एलियन्स ॲक्ट' असा कायदाच आणला. या कायद्यानुसार ब्रिटनमध्ये जन्मलेल्या लोकांचा आणि इतर वसाहतींमध्ये जन्मलेल्या लोकांचा दर्जा ठरवण्यात आला. मूळ ब्रिटनमध्ये जन्मलेल्या लोकांना प्रथम दर्जाचे नागरिकत्व तर वसाहतींमध्ये जन्मलेल्या लोकांना दुय्यम नागरिकत्व देण्याची ही योजना होती. स्वातंत्र्य मिळेपर्यंत साधारण अशीच अवस्था होती.

स्वतंत्र भारताच्या संविधानसभेसमोर नागरिकत्वाबाबत तरतुदी करण्याचे मोठे आव्हान होते. नागरिकत्व जन्माच्या आधारे दिले गेले, तर त्यास 'jus soli' असे म्हणतात. एखाद्या भूमीत जन्माला आल्यास त्या व्यक्तीस नागरिकत्व प्राप्त होते. 'jus sanguinis' म्हणजे पालकांच्या राष्ट्रीय नागरिकत्वानुसार पाल्याला नागरिकत्व मिळते. उदाहरणार्थ, या तत्त्वानुसार भारतीय नागरिक असलेल्या जोडप्याला अमेरिकेत वास्तव्यास असताना मूल झाले तरी त्यास भारतीय नागरिकत्व प्राप्त होऊ शकते. याउलट, jus soli तत्त्वानुसार पालकांचे नागरिकत्व भिन्न असले तरी त्यांच्या अपत्याचा जन्म भारतीय संघराज्याच्या कार्यक्षेत्रात झाल्यास त्या अपत्यास नागरिकत्व प्राप्त होते. यापैकी कोणते तत्त्व स्वीकारावे, हा वादाचा विषय होता.

या वादाची गुंतागुंत वाढली फाळणीमुळे. फाळणीमुळे अनेक मुस्लिमांना इच्छा नसतानाही पाकिस्तानात ढकलले गेले होते. त्यात पाकिस्तानातली आर्थिक दुर्दशा वाढत चालली होती. या साऱ्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर भारतात मुस्लिम परत येत होते. त्यांच्या नागरिकत्वाबाबत संवेदनशीलतेने निर्णय घेणे भाग होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जन्माच्या आधारे नागरिकत्व देण्याचा आग्रह धरला, तेव्हा पंजाबराव देशमुखांनी विरोध केला. देशमुखांच्या मते, इतके उदार धोरण ठेवले तर परदेशी जोडप्याला मुंबई विमानतळावर मूल झाले, तरी त्याला नागरिकत्व द्यावे लागेल. इतकी उदार भूमिका ठेवता कामा नये. पुढे बोलताना त्यांनी जगातल्या सर्व हिंदू आणि शीख धर्मीय व्यक्तींना नागरिकत्व देण्याबाबत प्राधान्य देण्याची सूचना केली, तेव्हा जवाहरलाल नेहरुंनी देशमुखांना विरोध केला. नागरिकत्व निर्धारित करताना धर्मनिरपेक्ष तत्त्वांचे पालन केले पाहिजे, याची आठवण नेहरुंनी करुन दिली. त्यानुसार संविधान लागू होत असतानाचे नागरिकत्व अनुच्छेद ५ नुसार दिले गेले.

संविधानाच्या अनुच्छेद ५ नुसार भारतीय नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी तीन अटी होत्या : अ) ज्याचा जन्म भारताच्या संघराज्याच्या क्षेत्रात झाला; किंवा ब) ज्यांच्या पालकांपैकी एकाचा जन्म भारताच्या प्रदेशात झाला आहे; किंवा क) ही तरतूद लागू होताना ज्यांचे किमान ५ वर्षे भारतात वास्तव्य आहे त्या व्यक्तीस भारताच्या नागरिकत्वाचा दर्जा देता येईल.

या तरतुदीवरही वाद झाला. १९३५ च्या भारत सरकार कायद्याचा संदर्भही दिला गेला. मात्र या सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, धर्माच्या आधारावर प्राधान्य देऊन नागरिकत्व देता कामा नये किंवा कोणालाही धार्मिक आधारावर वगळता कामा नये, याचे भान तेव्हाच्या संविधानकर्त्यांना आणि राज्यकर्त्यांना होते. 'वसुधैव कुटुंबकम्' असे केवळ म्हणून सर्वसमावेशकता येत नसते, तर ती प्रत्यक्षात आणावी लागते. तसेच केवळ कागदावर मांडून कायदेशीर नागरिकत्व देता येऊ शकते; मात्र जेव्हा दैनंदिन व्यवहारात सर्वांना सामावून घेतले जाते तेव्हा त्या नागरिकत्वाला खरा अर्थ प्राप्त होतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

संविधानाच्या दुसऱ्या भागात नागरिकत्वाच्या बाबत तरतुदी करुन सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न झाला. फाळणीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाकिस्तानातून भारतात स्थलांतरित लोकांना नागरिकत्वाचा दर्जा देण्याच्या संदर्भाने तरतुदी या भागात केलेल्या आहेत. परदेशी नागरिकत्व स्वीकारल्यास भारतीय नागरिकत्व रद्द होऊ शकते, याबाबतही संविधानात भाष्य केलेले आहे. तसेच नागरिकत्व दर्जा टिकून राहण्याबाबतचे काही तपशीलही मांडलेले आहेत. मुख्य म्हणजे, या विभागाने संसदेला नागरिकत्वाविषयी कायदे करण्याचे आणि नियमन करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.

त्यामुळे या देशाचे नागरिक कोण, हे ठरवण्याचा अधिकार संसदेला आहे. त्यानुसार १९५५ साली नागरिकत्व कायदा अस्तित्वात आला. संविधानाच्या दुसऱ्या भागातील तरतुदी आणि हा कायदा हे नागरिकत्वाबाबतचे दोन महत्त्वाचे अधिकृत स्रोत आहेत. या कायद्याने नागरिकत्व प्राप्त करण्याचे मार्ग



*कोणाला नागरिकत्वाचा दर्जा द्यायचा, त्याचे निकष काय ठेवायचे, यासाठी आज अत्यंत चलाखीने धर्माची फुटपट्टी सर्रास वापरली जातेय, मात्र संविधानकर्त्यांनी देश एकसंध ठेवण्याच्या उद्देशाने धर्माऐवजी माणूस आणि त्याचे मूलभूत हक्क आणि अधिकार केंद्रस्थानी ठेवले होते...*

सांगितले. पहिला मार्ग भारतात जन्म झालेला असल्यास त्या व्यक्तीला नागरिकत्व प्राप्त होऊ शकते. २६ जानेवारी १९५० नंतर भारतात जन्मलेली व्यक्ती ही भारतीय नागरिक असेल, असे हा कायदा सांगतो. दुसरा मार्ग आहे, तो वांशिकतेतून नागरिकत्व मिळवण्याचा. व्यक्तीचा जन्म भारतात झालेला नसेल मात्र तिचे एक पालक भारताचे नागरिक असतील तर तिला भारताचे नागरिक होता येते. आणखी एक मार्ग आहे तो नोंदणीचा. नोंदणीद्वारे नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी किमान ७ वर्षे भारतात अस्तित्व असले पाहिजे, अशी एक अट आहे. तसाच एक मार्ग आहे नागरिकीकरण किंवा स्वागरिकीकरणाचा (नॅचरलायझेशनचा). परदेशी व्यक्तीही याद्वारे भारताचे नागरिक होऊ शकते. त्यासाठीच्या काही अटी, शर्ती या कायद्याने निर्धारित केलेल्या आहेत. नोंदणी किंवा नागरिकत्वाची मागणी करुन भारतीय नागरिक होता येते. उदाहरणार्थ, प्रख्यात अर्थतज्ज्ञ ज्याँ द्रेझ हे मूळचे बेल्जियमचे. त्यांनी बेल्जियम नागरिकत्व सोडले आणि २३ वर्षे भारतात राहिल्यावर २००२ साली भारतीय नागरिकत्व स्वीकारले. शेवटचा मार्ग म्हणजे, भारत सरकारने एखादा प्रदेश स्वतःच्या ताब्यात घेतला तर त्या तारखेपासून नागरिकत्वाबाबतची अधिसूचना जारी केली जाते आणि त्यानुसार त्या प्रदेशातील व्यक्तीही भारताची नागरिक होऊ शकते.

वेगवेगळ्या प्रकारचे हे मार्ग या कायद्यात सांगितलेले असले तरी एकेरी नागरिकत्वाचे तत्त्व भारताने स्वीकारले. त्यामुळेच घटकराज्यांचे वेगळे नागरिकत्व व्यक्तीला मिळत नाही. तसेच इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारल्यावर भारताचे नागरिकत्व सोडून द्यावे लागते. मुळात नागरिकत्व संपादनाचे मार्ग जसे आहेत तसेच तीन कारणांमुळे नागरिकत्व संपुष्टात येऊ शकते : १. एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारले तर तिचे नागरिकत्व संपुष्टात येऊ शकते. २. एखाद्या व्यक्तीने स्वतःहून नागरिकत्वाचा त्याग केला, तर तिचे नागरिकत्व रद्द होते. ३. पुढीलपैकी कोणतीही एक बाब घडल्यास :

अ) नागरिक सलग ७ वर्षांहून अधिक काळ परदेशी राहत असेल तर ब) व्यक्तीने अवैधरित्या नागरिकत्व प्राप्त केले असेल तर क) व्यक्ती देशविरोधी कारवायांमध्ये सामील असेल तर ड) एखादी व्यक्ती भारतीय संविधानाचा अनादर करत असल्यास.

नागरिकत्व कायदा, १९५५ या नागरिकत्वाच्या अनुषंगाने असलेल्या पायाभूत कायद्यामध्ये २०१९ साली दुरुस्ती केली गेली. ११ मार्च २०२४ रोजी अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने अधिसूचना जारी केली. यातून नागरिकत्वाचा अवकाश बदलला. हा दुरुस्तीचा कायदा अत्यंत वादग्रस्त ठरला आणि या कायद्याच्या विरोधात देशभर आंदोलने झाली.

सुरुवातीच्या नागरिकत्व कायद्याने (१९५५) नागरिक असण्याचे निकष ठरवले. या कायद्यामध्ये 'बेकायदेशीर स्थलांतरित' असा शब्द वापरला होता. या बेकायदेशीर स्थलांतरितांना नागरिकत्व देण्याच्या संबंधात कठोर नियम होते. २०१९ साली केलेल्या या दुरुस्तीने नागरिकत्व मिळवण्यासाठीची प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ करण्यासाठी आहे, असे सांगितले गेले. या तरतुदीनुसार, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेश यांपैकी कुठल्याही देशामधील, हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी किंवा ख्रिश्चन यांपैकी कुठल्याही धर्माची व्यक्ती ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेली असेल तर काही विशिष्ट सरकारी नियमांतर्गत त्या व्यक्तीला बेकायदेशीर स्थलांतरित न मानता, रीतसर नावनोंदणी करून भारताच्या नागरिकत्वासाठी अर्ज करता येईल.

हा कायदा करताना संसदेत चर्चा झाली. त्यावेळी सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांमध्ये अल्पसंख्य धार्मिक समूहांचा छळ होत असल्याने या कायद्याद्वारे आपण त्यांना विशेष सवलत देत आहोत. आता गंमत म्हणजे, हा मूळ उद्देश आहे, असे सांगितलेले असले तरी मूळ कायद्यामध्ये धार्मिक छळाचा उल्लेख नाही, हे विशेष. या कायद्याविषयीचे आक्षेप विरोधकांनी नोंदवले : १. या तीन देशांची निवडः नागरिकत्व

दुरुस्ती कायद्यामध्ये हे तीन देश का निवडले याचा तर्क स्पष्ट होत नाही. ही निवड वाजवी नाही. २. धार्मिक छळः धार्मिक छळ झाला आहे, असे अल्पसंख्य समूह निवडले आहेत असे तोंडी म्हटले असले तरी लेखी कायद्यात समावेश नाही. ३. धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांशी विसंगतः धार्मिक छळाचा उल्लेख नसला तरी धार्मिक समूहांचा उल्लेख या कायद्यात केलेला आहे. यामध्ये सर्व धर्मांचा उल्लेख केलेला नाही. तीन समूहांना वगळलेले आहे : अ) मुस्लिम ब) ज्यू क) नास्तिक. या तीन समूहांना वगळण्याचा कोणताही तर्क दिलेला नाही. भारताचे नागरिकत्व धर्मनिरपेक्ष तत्त्वांना अनुसरून आहे. म्हणजेच नागरिकत्व देताना धर्माच्या आधारावर भेदभाव होणार नाही, हे मूलभूत तत्त्व आहे.

भारताच्या नागरिकांवर धर्माच्या आधारे भेदभाव होणार नाही, हे संविधानाच्या अनुच्छेद १५ मध्ये म्हटले आहे; मात्र मुद्दा स्थलांतरितांचा आहे, असा युक्तिवाद केला जातो. त्यामुळे एक प्रकारे स्थलांतरितांमध्ये भेदभाव केला जाऊ शकतो; मात्र हे सोयीस्करपणे विसरले जाते की, संविधानाचे अनुच्छेद १४ सांगते की, राज्यसंस्थेसमोर सर्वजण समान आहेत आणि राज्यसंस्था सर्वांना समान वागणूक देईल. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, अनुच्छेद १४ मध्ये 'नागरिक' म्हटलेले नाही. भारतीय संघराज्याच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक दिली जाईल, असा या अनुच्छेदाचा अर्थ आहे. त्यामुळे स्वाभाविकच संविधानाच्या धर्मनिरपेक्षतेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असा हा कायदा आहे, अशी टीका सुजाण नागरिकांनी आणि अभ्यासू विरोधकांनी केली. त्यामुळेच या कायद्याच्या संवैधानिक वैधतेसमोर प्रश्नचिन्ह आहे. २०१९ सालच्या या कायद्याच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात हा खटला एप्रिल २०२६ पर्यंत प्रलंबित आहे. या दुरुस्तीला जोडूनच 'नागरिकांची राष्ट्रीय नोंदवही' (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स) राबवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या माध्यमातून सर्वांना पुन्हा कागदपत्रे दाखवून नागरिक असल्याचे सिद्ध करायला भाग पाडले जात आहे. अनेकांकडे ही कागदपत्रे नसल्याने त्यांना नागरिक म्हणूनच वगळले जाण्याची शक्यता आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि नागरिकांची राष्ट्रीय नोंदवही या दोन्हींच्या माध्यमातून मुस्लिमांना, अल्पसंख्यांकांना तसेच भटक्या विमुक्त जमातींना वगळण्याचे कारस्थान आखले जात आहे.




*आपले विचार मान्य नसलेल्या समूहांना जेरीस आणण्यासाठी कायद्यांची मोडतोड करणे आणि मुख्य म्हणजे, संविधानाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणे सुरू असल्याने नागरिकांना रस्त्यावर उतरण्यावाचून पर्याय राहिलेला नाही...*

या दुरुस्तीसह विशेष गहन पुनर्निरीक्षण (स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन) ही निवडणूक आयोगाची योजना अत्यंत वादग्रस्त आहे. नागरिकांना ऐन निवडणुकीच्या तोंडावर आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करणारी ही योजना केवळ मतदारांच्या यादींमध्ये सुधारणा करण्यासाठीची आहे, असे वरपांगी भासवले गेले असले, तरीही अप्रत्यक्षपणे नागरिकत्व निर्धारित करण्याचा त्यातून प्रयत्न होतो आहे, हे पं.बंगाल विधानसभा निवडणुकीच्या काळात दिसले आहे. निवडणूक आयोगाने अप्रत्यक्षपणे नागरिकत्व निर्धारित करण्याचा प्रयत्न म्हणजे, नागरिकांची राष्ट्रीय नोंदवही तयार करण्यासारखे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये म्हटले.

एकूणात, नागरिकत्वाला धर्माशी जोडणे आणि राजकीय प्रक्रियेतून नागरिकांना वगळण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करणे यातून आज भारतीय संघराज्याच्या मूलभूत तत्त्वालाच हरताळ फासला जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना धर्मनिरपेक्षतेचे, समतेचे आणि पारदर्शकतेचे तत्त्व अधोरेखित करत आपल्या हक्कांसाठी संघर्ष करणे अपरिहार्य आहे कारण हा नागरिकांचे प्रजेमध्ये रूपांतर करण्याचा प्रकल्प आहे.

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानाधारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**

**संपर्क** : poetshriranjan@gmail.com

# सरकारची मनमानी आणि घोंगडी पांघरलेली माकडे!



डॉ. विवेक कोरडे

**विरोधी बाकावरून**




*एआयनिर्मित प्रातिनिधिक छायाचित्र*

**लोकशाही संस्थांचा संकोच होत असल्याचे दिसत असूनही त्या विरोधात रस्त्यावर उतरणे सोडाच, पण साधा एकजुटीने विरोध करण्यासही आजचा मध्यमवर्ग तयार नाही. म्हणूनच सरकारची लोकशाही दडपून टाकण्याची हिंमत वाढली आहे. साऱ्या स्वायत्त संविधानिक संस्था शासनाधीन असाव्यात, शासनाच्या चुकीच्या धोरणाला विरोध करण्याची क्षमताच अशा संस्थांमध्ये राहू नये, या उद्देशाने गेल्या दहा–बारा वर्षांत अनेक निर्णय घेण्यात आले. वैद्यकीय व्यवसायाचे आणि शिक्षणाचे नियंत्रण करणाऱ्या परिषदांचे (Councils) परिवर्तन आयोगात करणे हा आणखी एक हुकूमशाही मार्ग सरकारने अवलंबिला आहे...**

“दोज हु गिव्ह अप एसेन्शियल लिबर्टी, टू पर्चेस अ लिटिल टेम्परारी सेफ्टी, डिझर्व नायदर  लिबर्टी नॉर सेफ्टी.’’

बेंजामिन फ्रँकलिन, यांनी १७२५ मध्ये उच्चारलेलं हे वाक्य आजही अनेक वेळा उद्‌धृत केलं जातं. या उद्धरणाचा भर खऱ्या स्वातंत्र्यासाठी सुरक्षित असणाऱ्या सोन्याच्या पिंजऱ्यापेक्षा जोखीम स्वीकारण्याची आवश्यकता स्पष्ट करण्यावर आहे. कोणत्याही सुविधेसाठी आणि सुरक्षिततेसाठी स्वातंत्र्याची तडजोड करता कामा नये, याची सक्त ताकीद हे वाक्य देतं. आता या उद्धरणाला चारशे वर्षं उलटली आहेत. या काळात अनेक राजेशाही राजवटी, इतकंच नव्हे तर वासाहतिक राजवटी नष्ट वा कमजोर झाल्या आहेत. मर्यादित स्वरूपात का असेना, कागदावर का असेना पण काही मूलभूत अधिकार सर्वसामान्य जनतेला मिळाले आहेत. हे होत असतानाच बऱ्याच उजव्या आणि फॅसिस्ट विचारांच्या संघटित  शक्तींनी त्यांचा जाहीर व छुपा अजेंडा राबवत लोकशाही आणि नागरिकांच्या अधिकारांना कमकुवत करण्याचे योजनाबद्ध प्रयत्न सुरू केले आहेत.

कोणत्याही राजवटीची जगाने त्यांना हुकूमशाही राजवट संबोधावे अशी इच्छा नसते. म्हणून अशा राजवटी लोकशाहीचा ठेंभा मिरवत सर्वात पुढे उभ्या ठाकलेल्या दिसतात. हुकूमशाहीतील अपकीर्ती टाळून हुकूमशाही पद्धतीने राज्य करण्याचा मार्ग अवलंबितात.

याला हिटलरचाही अपवाद नव्हता. हिटलर लोकशाही प्रक्रियेतून निवडून आला होता, राईश्टॅगपुढे (जर्मन संसद) नाटकीपणे नतमस्तकही झाला होता. कारण त्यालाही हुकूमशहा म्हणवून घेणे आवडणारे नव्हते. अशी सोंगे अनेक हुकूमशहा निभावत असतात.

योगायोग असा, की आपल्या देशानेही पंतप्रधानांना संसद भवनाच्या पायऱ्यांवर नतमस्तक होताना आपण पाहिले आहे आणि गेली बारा वर्षं ते ज्या पद्धतीने भारतीय लोकशाही राबवत आहेत, तेही आपण पाहत आहोत. तरीही आपण लोकशाहीचे सर्वात मोठे पुरस्कर्ते आहोत आणि भारतीय लोकशाही आपल्याच हाती सुरक्षित आहे, असा दावा ते न चुकता करत आहेत.

लोकशाहीतील गैरसोयी टाळायच्या असतील तर देशातील स्वायत्त संविधानिक संस्था ताब्यात ठेवणे गरजेचे असते. अशा संस्थांवर आपल्या मर्जीतील, आपल्या विचारसरणीशी सहमत असणारी व मिंधी बनतील अशी माणसे नेमून या स्वायत्त संस्थांवर ताबा मिळवता येतो. कुलगुरूंपासून विविध पदांवर आपलीच माणसे नेमणे ही तर आता नित्याचीच गोष्ट झाली आहे. अगदी निवडणूक आयोगासारख्या आयोगावर अशीच मंडळी नेमली जातात व त्यांनी सुरक्षितपणे सरकारची सेवा करावी, निवडणूक प्रक्रियेची ‘ऐसी की तैसी’ करावी म्हणून त्यांना कायद्यापासून संरक्षणही दिले जाते. इतका निर्लज्ज व्यवहार करूनही पुन्हा लोकशाहीचा टेंभा सतत मिरवण्याचे कसबही आत्मसात केले जाते. सरकारनियुक्त ही मंडळी इनामाला इतकी जागणारी निवडली जातात, की लोकशाही वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यकता असल्यास ते मतदार यादीत लाखो नावे वाढवू शकतात वा सोयीप्रमाणे कमीही करू शकतात. ‘लोकशाही वृद्धिंगत’ करण्याचे हे प्रयोग निर्लज्जपणे आणि अनिर्बंधपणे बिनबोभाट सुरू असतात. अशा गोष्टींना प्रतिबंध करू शकणाऱ्या संघटनाही प्रतिबंध करत असल्याची नाटकी भूमिका निभावण्यात धन्यता मानतात. आणि लोकशाहीची ‘ऐसी की तैसी’ करण्याला हातभार लावण्याचे पुण्य पदरी पाडून घेतात.

**मध्यमवर्ग नावाचा थंड बस्ता**

अशावेळी लोकांची विशेषतः मध्यमवर्गीयांची भूमिका महत्त्वाची असते. दुर्दैवाने, आता देशात खऱ्या अर्थाने मूल्यकेंद्री मध्यमवर्ग शिल्लक राहिलेला नाही, तो उच्च मध्यम वर्गात वा श्रीमंत वर्गात गेला आहे. त्यामुळे देशात गरीब वा दरिद्री, उच्च मध्यम वा श्रीमंत आणि गडंगज श्रीमंत असे तीन वर्ग निर्माण झाले आहेत. भारत जगातील तिसऱ्या की चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे, ही वल्गना (एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात भारताची अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावर घसरल्याचे वृत्त आले. पण नारीशक्ती वंदन विधेयकाच्या आडून रचलेल्या कारस्थानाच्या गदारोळात ही ‘प्रगती’ चलाखीने दाबली गेली.) केली जात असतानाच देशातील ८० कोटी जनता पाच किलो मोफत धान्यासाठी रांगेत उभी राहते याचा अर्थ तोच आहे.

मध्यम वर्गाच्या आजच्या स्थितीशी ३०-४० वर्षांपूर्वीच्या स्थितीशी तुलना करता मध्यमवर्ग सुस्थितीत आला आहे. त्याने एक प्रकारची आर्थिक सुरक्षितता मिळवली आहे. असे झाले असल्यानेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, न्याय इत्यादी मूल्यांसाठीच्या संघर्षपासून या वर्गाने जवळजवळ फारकत घेतली आहे. मध्यमवर्ग कमालीचा आत्मकेंद्रित, आत्मसंतुष्ट



*एकामागोमाग एक संस्था ताब्यात घेत सुटलेल्या विद्यमान सत्ताधाऱ्यांची सर्वंकष सत्तेची भूक आता वैद्यकीय क्षेत्रातल्या नियमित लोकशाही प्रक्रियेवरही दबाव आणू पाहत आहे. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या निवडणुका रद्द करून त्याऐवजी सरकारनियुक्त प्रतिनिधी निवडण्याचा मार्ग खचितच लोकशाहीवादी नाही...*

आणि समाजविन्मुख बनला असून, या समाजाने स्वतःला आर्थिक सुरक्षाकवचात बंदिस्त केले आहे. सामाजिक न्यायासाठी, लोकशाही अधिकारांसाठी लढण्याची क्षमता असलेला हा मध्यम वर्ग आपल्या आर्थिक सुरक्षेला अबाधित ठेवण्यासाठी स्वातंत्र्याशी तडजोडी करण्यात धन्यता मानू लागला असल्याने हुकूमशाही फॅसिस्ट राजवटींचा छुपा अजेंडा आता बेशरमपणे ५६ इंची छाती काढत मोकाट सुटला आहे. लोकशाही संस्थांचा संकोच होत असल्याचे दिसत असूनही त्या विरोधात रस्त्यावर उतरणे सोडाच, पण साधा एकजुटीने विरोध करण्यासही हा मध्यम वर्ग तयार नाही.

**नियंत्रकांवर सरकारी नियंत्रण**

म्हणूनच सरकारची लोकशाही दडपून टाकण्याची हिंमत वाढली आहे. साऱ्या स्वायत्त संविधानिक संस्था शासनाधीन असाव्यात, शासनाच्या चुकीच्या धोरणाला विरोध करण्याची क्षमताच अशा संस्थांमध्ये राहू नये या उद्देशाने गेल्या दहा-बारा वर्षात अनेक निर्णय घेण्यात आले. वैद्यकीय व्यवसायाचे आणि शिक्षणाचे नियंत्रण करणाऱ्या परिषदांचे (Councils) परिवर्तन आयोगात करणे हा आणखी एक मार्ग सरकारने अवलंबिला आहे. अशा संस्थांवर काही प्रतिनिधी सरकारनियुक्त असतात. उर्वरित प्रतिनिधी संलग्न सदस्यांमधून निवडून आलेले असतात. अशा निवडणुकीतून निवडून आलेल्या सदस्यांमधूनच त्या संस्थेचा अध्यक्ष निवडला जातो. तसेच सरकार नियुक्त सदस्यांपेक्षा निवडणुकीने आलेल्या सदस्यांची संख्या नेहमी जास्त असते व ज्या सदस्यांसाठी या संस्था काम करतात त्या सदस्यांच्या विचारांचे प्रतिनिधित्व अशा संस्थांमध्ये केले जाईल आणि त्यानुसार संस्था कार्य करतील अशी लोकशाही प्रणालीला अनुरूप कार्यपद्धती अंगीकारली जाते.

काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने इंडियन मेडिकल कौन्सिल व सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन या दोन्ही संविधानिक संस्थांचे स्वरूप बदलून त्यांचे रूपांतर आयोगात केले आहे. अर्थात आता या दोन्ही संस्थांवर लोकनियुक्त प्रतिनिधींची जागा सरकार नियुक्त प्रतिनिधींनी म्हणजेच सरकारच्या मर्जीतील लोकांनी घेतली आहे. त्यामुळे या सरकारचा कारभार त्या संस्थेशी संलग्न असणाऱ्या सदस्यांच्या विचाराने न चालता सरकारी विचाराने चालवला जात आहे. या दोन्ही संस्था ज्या वैद्यकीय व्यावसायिकांचे, शिक्षणाचे नियंत्रण करतात आणि त्यांच्याच प्रतिनिधींना डावलणे आहे ही गोष्ट लोकशाहीशी विसंगत आणि सरकारच्या मनमानी कारभाराला अधोरेखित करणारी आहे. शासनाच्या या निर्णयाला डॉक्टर मंडळींनी विरोध केला नाही असे नाही, पण तो अगदीच क्षीण होता त्यामुळे या संस्थांची स्वायत्तता आता केंद्र सरकारकडे गहाण पडली आहे.

**सुधारणेच्या नावाखाली मेडिकल कौन्सिलवरही ताबा**

आता केंद्राचे धोरण राज्यांनी चालवले नाही, तर आपल्या मातृसंस्थेने अंगात मुरवलेले 'एकचालकानुवर्तित्व' धोक्यात येईल, याची जाणीव ठेवून महाराष्ट्र राज्याने 'महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल'च्या नियमात बदल करून कौन्सिलवरील सदस्यांची नेमणूक यापुढे निवडणुकीऐवजी राज्य सरकारला नामनिर्देशन पद्धतीने करता येईल, असा निर्णय घेतला आहे. सरकार या निर्णयाला नियमातील सुधारणा असे संबोधते, पण हा बदल ही सुधारणा नसून लोकशाही संस्थांचा संकोच करून त्यावर शासनाचा संपूर्ण ताबा मिळवण्याचा प्रयत्न आहे. तसेच ही परिषद ज्या हेतूने निर्माण केली आहे, त्या हेतूवरच घाला घालणारा आहे, म्हणूनच तो निषेधार्ह आहे. हा निषेध केवळ वैद्यकीय संघटना आणि वैद्यकीय व्यावसायिक यांच्याकडूनच नव्हे तर समाजाच्या सर्वच वर्गातून तीव्रपणे व्हायला हवा. (सर्वोच्च न्यायालयाने तांत्रिक मुद्द्यावर या निर्णयाला स्थगिती दिल्याने ही निवडणूक पार पडली.)

अशा संविधानिक संस्थांना अर्ध-न्यायिक व नियमन करण्याचे अधिकार असतात. त्या निर्णयाचा परिणाम थेटपणे

समाजावर होत असतो. म्हणूनच या संस्था लोकांना जबाबदार असणे आवश्यक असते. त्यासाठीच निवडणुकीद्वारे नेमणुकीची तरतूद केलेली असते. ही तरतूदच नष्ट करणे म्हणजे या संस्थांचे लोकांना असलेले उत्तरदायित्व नष्ट करणे होय.

लोकनियुक्त प्रतिनिधी मतदारांच्या अपेक्षा आणि गरजांचे प्रतिनिधित्व करत असतात. अशा संस्थांवरचे प्रतिनिधी लोकनियुक्त नसतील आणि सरकारने नियुक्त केलेले असतील तर ते सदस्य सरकारच्या अपेक्षांचे आणि गरजांचे प्रतिनिधित्व करण्यात धन्यता मानतील. लोकशाहीवर विश्वास नसलेल्या सरकारला नेमके हेच करणे अपेक्षित असल्याने सरकार अशाच सरकारधर्जिण्या प्रतिनिधींची नेमणूक करेल व या संस्थांची स्वायत्तता सरकाराधीन होऊन बसेल.

अर्थात निवडून आलेले सदस्यही वाईट असू शकतात, चुकीचे निर्णय घेणारे स्वार्थाने प्रेरित होऊन लाचखोरी करणारे किंवा त्या पदावर बसण्यास लायक नसलेले असू शकतात. पण अशा सदस्यांना त्यांचा कालावधी संपल्यावर बदलण्याचा हक्क लोकांना दिलेला असतो. सरकार जेव्हा नियुक्ती करते, तेव्हा हे सदस्य लोकांना जबाबदार नसतात. तसे राहण्याची गरजच उरलेली नसते. तेव्हा त्यांना घालवणे हे ते ज्यांच्यासाठी कार्य करतात त्यांच्या हाती नसते, कारण त्यांच्यावर सरकारचा वरदहस्त असतो व ते सदस्यही सरकारी कृपेला जागून इनामाचे इमान प्रामाणिकपणे सरकारला अर्पण करत राहतात. अर्थात सरकारी मर्जी राखताना ही मंडळी ज्यांच्यासाठी नियुक्त झालेली असतात त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याऐवजी सरकारी अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी तत्पर राहतात. नुकसान सदस्यांचे होते.

**सुरक्षिततेचे घोंगडे**

असे करण्याची हिंमत सरकार करते, कारण ज्या वर्गाच्या आकांक्षा आणि गरजांच्या पूर्तीसाठी या संस्था बनवल्या आहेत, त्या वर्गाच्या लोकांनी सुरक्षिततेचे घोंगडे डोक्यापासून पायापर्यंत पांघरले असल्याने हा वर्ग ते घोंगडे बाजूला सारून काय घडतंय याकडे पाहणारच नाही, याची सरकारला खात्री आहे. या वर्गातले काही लोक निषेध नोंदवतील. बहुसंख्य तर तेही करायचे कष्ट घेणार नाहीत, कारण घोंगडीत सुरक्षित राहण्यासाठी या मंडळींनी सुप्रसिद्ध तीन माकडांप्रमाणे डोळे, कान आणि तोंड बंद करण्याचा ठाम निर्धार केला आहे. त्या बिचाऱ्या तीन माकडांनी वाईट पाहू नये, वाईट ऐकू नये, वाईट बोलू नये, यासाठी डोळे कान आणि तोंड बंद करून घेतले होते. या वर्गाने मात्र ज्याने सुरक्षितता संपेल असे न पाहण्याचा, न ऐकण्याचा आणि न बोलण्याचा निर्णय घेऊन सुरक्षित राहण्याचे ठरविले आहे.

अशावेळी सुरुवातीस उद्धृत केलेले बेंजामिन फ्रँकलिन यांचे वचन या घोंगडी पांगरलेल्या समाजाच्या कानीकपाळी ओरडून सांगण्याची गरज आहे. अर्थात हे काम कठीण आहे. कारण, झोपलेल्याला जागे करता येते, जागेपणी जी माणसे झोपेचे सोंग घेतात त्यांना जागे करायला महात्मा जन्माला यावा लागतो. तो महात्मा जन्माला येईपर्यंत, आपण आवाज उठवण्याचे काम सुरू ठेवूया.


**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**
**ई मेल :** drvivekkordeg@mail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी **मुक्त-संवाद** पत्रिका


**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी–सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, गणेश मनोहर कुलकर्णी, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ.मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे, वासुदेव (काका) खानोलकर, नेहा आसगावकर.**

# जातीसंदर्भात मार्क्सवादाबद्दलचे गैरसमज आणि आक्षेप



डॉ. प्रमोद चाफळकर

**कार्ल मार्क्स जन्मदिन विशेष**



**जा**तिअंताच्या लढाईमध्ये विविध विचारांच्या समतावादी, परिवर्तनवादी संघटना आणि व्यक्ती (मार्क्सवादी आणि कम्युनिस्ट सकट) सामील आहेत. मात्र त्या विचारभिन्नतेमुळे त्यांच्यात फूट पडलेली आहे. विशेषतः गैर–मार्क्सवादी आणि मार्क्सवादी अशी ती फूट आहे. सर्वांनी मार्क्सवादी असावे असे नाही. कारण प्रत्येकाची विचारसरणी ही काही एक तत्त्वज्ञानाने तयार होते. त्यामुळे प्रत्येकाला आपलीच विचारसरणी योग्य आणि सत्य आहे, परंतु इतरांची तशी नाही असे वाटणे साहजिक आहे. मात्र विचारसरणी तथ्यांवर आधारित असावी आणि इतरांच्याबद्दल अज्ञान आणि गैरसमज यावर आधारित नसावी, ही अपेक्षा सर्वमान्य व्हावी. अज्ञान आणि गैरसमज यातून होणारे अंतर्गत घर्षण कमी असावे म्हणून कार्ल मार्क्सच्या जयंतीनिमित्त (५ मे) जातीसंदर्भात मार्क्सवादाबद्दलचे गैरसमज आणि आक्षेप यांच्या निराकरणाचा हा प्रयत्न आहे...

जाती अंताच्या लढाईत विचारभिन्नता असली तरी अंतर्गत संघर्ष न करता जातिअंत या सामायिक ध्येयाने सर्वांनी एकत्र असावे, अशी अपेक्षा करणे चूक ठरू नये. याच संदर्भाने जातींच्या संदर्भात मार्क्सवादाचा काहीच उपयोग नाही यासारखे अतिरेकी गैरसमज सोडून मार्क्सवादाबद्दलच्या प्रमुख गैरसमजांची आणि आक्षेपांची चर्चा इथे अपेक्षित आहे. ते आक्षेप म्हणजे – मार्क्सवाद जातींचा विचार करत नाही, मार्क्सवाद फक्त अर्थवादी आहे, आर्थिक पाया आणि वैचारिक इमला, जातिसंस्थेचे स्वरूप, आपोआपवाद, वर्गसंघर्ष की जातिसंघर्ष प्राथमिक असा दिशाहीन वाद इत्यादी इत्यादी.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९२५ ला झाली. सुरुवातीला त्याचा भर वासाहतिक लढा आणि वर्ग लढा यावर होता. त्या काळात आणि स्वातंत्र्यानंतरही काही काळ कम्युनिस्ट पक्षाच्या जातीविषयी आकलनाच्या खूप चुका झाल्या. जातिलढ्याला वर्गलढ्याबरोबर न घेणे ही सर्वात मोठी चूक होती. (त्याची पुढे त्रोटकपणे चर्चा केली आहे.) कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणात्मक चुकाही झाल्या. त्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबरचे संबंध खूप ताणले गेले. त्यावर उद्धव कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात[१] एक अख्खं प्रकरण लिहिले आहे. ते म्हणतात, ''कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाबद्दल दलितांच्या मनात कायम साशंकता व तेढ राहिली आहे. त्याला जशा भारतीय मार्क्सवाद्यांच्या अनेक चुका, त्यांनी भारतीय जातिव्यवस्था, अस्पृश्यता याबद्दल घेतलेल्या भूमिका कारणीभूत आहेत; तसेच त्याला बाबासाहेबांना भारतीय मार्क्सवाद्यांचा अनुभव, त्यांनी कार्ल मार्क्सवर आणि मार्क्सवादावर केलेली टीकाही कारणीभूत आहे.'' इथे कांबळे यांना बाबासाहेबांच्या Buddha or Karl Marx या पुस्तकातील मार्क्सवर आणि कम्युनिस्टांवर केलेल्या टीका अभिप्रेत आहे. बाबासाहेबांच्या या टीकेला उद्धव कांबळे यांनी याच पुस्तकात[२] त्यांना समर्पक उत्तरे दिली आहेत. जिज्ञासूंनी ही दोन्ही प्रकरणे वाचावीत.

मात्र ही गोष्ट फार जुनी झाली आहे. कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी बदलत राहतात. त्यांचे आकलन विस्तृत होत जाते, जुन्या चुका सुधारल्या जातात. यावर पुढे चर्चा केली आहे. सर्व कम्युनिस्ट पक्षांनी जातिलढ्याला वर्गलढ्याच्या बरोबरीने महत्त्व दिले आहे. इंटरनेटवर आणि युट्युबवर communism and caste शोधले तर खूप माहिती मिळेल. उदाहरणार्थ; CPI(M)ची जात या विषयाला वाहिलेली वेबसाइट बघा[३]. काही मार्क्सवादी बाबासाहेबांबरोबर एकसामायिक जमीन शोधात आहेत[४]. इतिहासातील बदललेल्या गोष्टी उगाळत बसण्यात काही हशील नाही.

**मार्क्सवाद फक्त आर्थिक ?**

राजू अडागळे म्हणतात[५], ''मार्क्सवाद हा *आर्थिक* पायावर माणसामाणसामधील सामाजिक व्यवहारांचे विश्लेषण करतो. माणसांच्या सामाजिक कृतीमागे *आर्थिक* व्यवहार दडलेले असतात.'' मार्क्सवादाला आर्थिक तत्त्वज्ञान म्हणणारे टीकाकार खूप आहेत. व्यवहारात आर्थिक या शब्दाचे अर्थ फायनान्स, पैसे, मिळकत, पैशाचे व्यवहार, संपत्ती इत्यादी गोष्टींशी संबंधित आहेत. हाच अर्थ घेऊन राजू अडागळे पुढे म्हणतात की, ''तसे असते तर आजही एकाच पदावर काम करत असलेले दलित प्राध्यापक आणि ब्राम्हण प्राध्यापक यांच्यामध्ये आर्थिक समता असूनही जातीय उतरंड दिसून आली नसती.'' त्याच बरोबर बऱ्याचवेळा म्हटले जाते की, ''कम्युनिस्ट म्हणतात की आर्थिक समानता आली की सामाजिक समता येईल.'' मार्क्सवादी अशी भांडवलशाहीपूरक हास्यास्पद विधाने कधीही करणार नाहीत. कारण मार्क्सवादात *आर्थिक* शब्दाचा अर्थ वेगळा आहे. तो उत्पादन व्यवस्थेशी निगडित आहे.

मार्क्सवादात उत्पादन व्यवस्था ही अत्यंत महत्त्वाची आणि केंद्रीय संकल्पना आहे. उत्पादन व्यवस्थेचे दोन भाग आहेत – उत्पादन तंत्र आणि उत्पादन संबंध. मार्क्सवादात आर्थिक व्यवस्था म्हणजेच उत्पादन व्यवस्था. मानव उत्क्रांत झाल्यापासून ते आजपर्यंतच्या इतिहासात जशी उत्पादन तंत्रे बदलत गेली, तसे आपल्याला बदलत जाणारे वैशिष्ट्यपूर्ण कालखंड दिसतात. उदाहरणार्थ; धातूंचा वापर, शेतीचे बदलते तंत्रज्ञान, यंत्रांचा वापर इत्यादी. त्या कालखंडाशी निगडित उत्पादन संबंध असतात, उदाहरणार्थ; खाजगी मालकी, दास किंवा गुलामीची प्रथा, शेतातली कुळे, जमीनदार, कामगार, भांडवलदार इत्यादी. त्याचबरोबर कालखंडाशी निगडित खाजगी मालमत्ता असणारे आणि नसणारे वर्ग येतात. यातून सामाजिक संबंध येतात, उदाहरणार्थ; वर्ण, जाती, नाते गोती, स्वतंत्र व्यक्ती इत्यादी. हे कायदेशीर आणि 'सर्वसंमत' करायला शासन येते. वर्ग आणि खाजगी मालमत्ता यांचे सातत्य राखण्यासाठी म्हणजेच सामाजिक पुनरुत्पादनासाठी कुटुंब येते. हे सर्व कालखंड त्यांच्या वैशिष्ट्यांप्रमाणे अनुरूप विचारांना, सामाजिक जाणिवांना जन्म


देतात. यात धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, कला इत्यादी येतात. जेव्हा नवीन उत्पादन तंत्र विकसित होते, तेव्हा जुने उत्पादन संबंध हे विकसित उत्पादन तंत्रासह उत्पादकता वाढण्यात अडथळा आणतात. अशा वेळी नवीन तंत्रज्ञानाची मालकी मिळवणारा वर्ग जर जुने तंत्रज्ञानाची मालकी असलेल्या वर्गाला हरवून शासक वर्ग बनला तर क्रांती होते आणि समाज हा पुढच्या कालखंडात संक्रमित होतो. म्हणून मार्क्सवादात वर्ग संघर्षाला समाजाचे इंजिन म्हटले आहे. नवीन समाज आणण्यासाठी जे काही संघर्ष (उदाहरणार्थ; स्त्रीवाद, जातिवाद यासाठी) आपण करू त्याला वर्ग संघर्षाची जोड द्यावी लागेल.

हे मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचे अत्यंत थोडक्यात वर्णन आहे. एक लक्षात ठेवले पाहिजे, की ऐतिहासिक भौतिकवाद हा आर्थिक (म्हणजे उत्पादन) व्यवस्थेवरून कालखंड दाखवतो. मात्र समाजातील बदल आणि घटना या मार्क्सवादाच्या द्वंद्वात्मक भौतिकवादी पद्धतीने दाखवता येतात, भाकिते करता येऊ शकतात. त्याबद्दल इथे विस्तारभयास्तव चर्चा करणे शक्य नाही. यात घटनेची सर्व अंगे विचारात घेतली जातात, उदाहरणार्थ; आर्थिक व्यवस्था, राजकीय निर्णय, राजकारण, धर्म, तत्त्वज्ञान, विचारसरणी इत्यादी. त्यामुळे मार्क्सवाद म्हणजे आर्थिक अंगाने मांडणी करणारी विचारसरणी आहे, असे समजणे चुकीचे आहे.

**जातीचा गुंता**

रावसाहेब कसबे म्हणतात[६], ''भारतातील दलित चळवळीतील कार्यकर्त्यांचा असा समज आहे, की भारतातील जातिसंस्थेबद्दल कार्ल मार्क्सने मुळीच विचार केला नाही.'' मार्क्सने मुळीच विचार केला नाही, हे सत्य नसले तरी मार्क्सने जातींवर फारच थोडे लिखाण केले आहे आणि तेही फार सखोल नाही, हे सत्य आहे. परंतु मार्क्सवाद म्हणजे फक्त मार्क्स आणि एंगल्सचे लिखाण नाही. तर मार्क्सवादी पद्धती वापरून जे नवनवीन संशोधन आणि विचार मांडले जातात, ते मार्क्सवादाचा भाग बनतात. डी. डी. कोसंबी, रामशरण शर्मा, रोमिला थापर, इरफान हबीब सारख्या मार्क्सवादी इतिहासकारांनी; सुवीरा जयस्वाल, हिरा सिंग सारख्या मार्क्सवादी समाजशास्त्रज्ञांनी; कॉम्रेड नवीन बाबू, कॉम्रेड अनुराधा गांधी, साथी अभिनव सिन्हा सारख्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी जातींवर संशोधन करून सिद्धांत मांडण्याचे प्रयत्न केले आहेत[७]. त्यामुळे कम्युनिस्ट जातींचा विचार करत नाही, असा समज चुकीचा आहे.

जाती म्हणजे केवळ धार्मिक आधारावर असलेली कमीजास्त



*कम्युनिस्टांनी वर्ग लढ्यासोबतच जातविरोधी लढासुद्धा महत्त्वाचा मानला. नव्हे, एकात्मिक दृष्टिकोनातून आपले आकलन काळानुरुप विस्तारत नेले, हे वास्तव आहे...*

शुद्धता-अशुद्धता, विषम दर्जा असलेली समाजातील विभागणी नव्हे. त्याचबरोबर ती एका विशिष्ट उत्पादन पद्धतीच्या काळात निर्माण झालेली जमिनीची कमीजास्त जन्मजात मालकी असलेली/नसलेली, संसाधनाच्या वापराचा कमीजास्त जन्मजात हक्क (access) असलेली/नसलेली विभागणी सुद्धा आहे. जातींचे हे दुहेरी स्वरूप लक्षात न घेता कम्युनिस्टांवर टीका करताना सुरज येंगडे म्हणतात[८], ''भारतीय संदर्भातील सामाजिक संबंध हे प्रामुख्याने जातीय शक्तींनी प्रेरित आणि निर्धारित झालेले असतात, आर्थिक शक्तींनी नव्हे.'' इथे येंगडे यांनी आर्थिक म्हणजे, उत्पादन पद्धती हा मार्क्सवादी अर्थ घेतलेला दिसत नाही.

मार्क्सवादाच्या वर्ग मांडणीवर कितीही टीका केली, तरी जेव्हा खाजगी मालकी असते, तेव्हा वर्ग हे असतातच. जातींच्या निर्मितीवेळी जातिसंबंध आणि वर्गसंबंध हे एकरूप होते. त्यानंतर आर्थिक-राजकीय घटनांमुळे ही एकरूपता कमी होत गेली. भारतात भांडवलशाही आल्यानंतर जातिसंबंध आणि वर्गसंबंध यातील एकमेकांवरचे पसरणे (overlap) कमी झाले असले, तरी ते बऱ्याच प्रमाणात अजून टिकून आहे, हा कम्युनिस्टांच्या टीकाकारांचा युक्तिवाद मला ग्राह्य वाटतो. भांडवलशाही उत्पादनव्यवस्था आल्यावर जातिसंबंध क्षीण होतील, असे सुरुवातीस कम्युनिस्टांना वाटले, तसे झाले नाहीये. खाजगी मालमत्तांचे सातत्य जसे पितृसत्ताक कुटुंब राखते, तसेच जातींचे सातत्य हे कुटुंबातील अंतर्गत विवाह आणि त्यामुळे तयार होणारे नातेगोते संबंध (kinship) राखतात. भांडवलशाही उत्पादन व्यवस्था विकसत होऊनही जातीव्यवस्था अजूनही टिकून आहे, याचे कारण नातेगोते संबंधांबरोबर जमिनीचे वंशपरंपरागत मालकी

हक्क अजूनही शाबूत आहेत. ते समाजवाद आणल्याशिवाय जाऊ शकत नाहीत. हा मार्क्सवादी दृष्टिकोन गैर-मार्क्सवादी कधीही लक्षात घेत नाहीत.

अशा तऱ्हेने जात आणि वर्ग हे एकमेकांत गुंफले आहेत. त्यामुळे जातिसंघर्ष आणि वर्गसंघर्ष असे वेगळे करता येत नाहीत. एक दुसऱ्याशिवाय शक्य नाही. दोघांना एकत्र घेऊन एकात्मिक दृष्टिकोन (integral strategy) हा कम्युनिस्टांचा मार्ग आहे[९]. मात्र जेव्हा सुरज येंगडे सारखे विचारवंत म्हणतात[१०], ''कम्युनिस्टांनी जातिव्यवस्था निर्मूलन हे एक प्राथमिक उद्दिष्ट म्हणून अधोरेखित करणारा एक ठराव मांडावा. हे उद्दिष्टच त्यांच्या इन्किलाबच्या लढ्याचा मूलमंत्र ठरेल.'' तेव्हा ते बाबासाहेबांच्या म्हणण्याचा चुकीचा अर्थ लावतात, असे वाटते. मुळात, कम्युनिस्ट हे भांडवलशाही विरुद्धचा लढा कधीही दुय्यम होऊ देणार नाहीत. जातिसंघर्ष आणि वर्गसंघर्ष यात प्राथमिक आणि दुय्यम काय हा व्यर्थ वाद आहे. दोघांना सारखे महत्त्व आहे.

**पाया आणि इमला आणि आपोआपवाद**

मार्क्स बऱ्याचवेळा अलंकारिक भाषेत विचार मांडतो. वर मांडलेला ऐतिहासिक भौतिकवाद सांगताना, विचार हे उत्पादन पद्धतीतून निर्माण होतात, या कार्यकारण संबंधाला (causal relationship) मार्क्सने पाया आणि इमला (base and superstructure) ही उपमा वापरली. उत्पादन पद्धतीच्या (म्हणजे आर्थिक व्यवस्थेच्या) पायावर वैचारिक इमला बांधला जातो. ही फक्त उपमा आहे. हे काही समाज कसा असतो, याचे प्रारूप (working model) नाही. म्हणून ही उपमा खूप ताणून असा गैरसमज झाला, की जसा प्रत्यक्षात पाया खोदला की वरचा इमला कोसळून पडतो, तसा जुनी उत्पादन पद्धती नष्ट झाली की त्यावरचा वैचारिक इमला आपोआप नष्ट होईल, हा अत्यंत चुकीचा निष्कर्ष आहे.

रावसाहेब जसा आरोप करतात की[११], ''कम्युनिस्टांनी जात हा इमला मानला आणि समाजाचा आर्थिक पाया बदलला की इमला आपोआप तुटेल असे साधे सैद्धांतिक गणित मांडले. त्यांच्या या गणिताची आकडेमोड त्यांच्या भाषणांत आणि मुलाखतीत वारंवार दिसते.'' जर हा आपोआपवादाचा आरोप खरा असेल तर कम्युनिस्टांचे त्या काळात चुकले. मात्र आजकालचे मार्क्सवादी असा आपोआपवाद मांडणार नाहीत. राजू अडागळे पुढे म्हणतात[१२], ''तो आर्थिक व्यवहार सामाजिक व्यवहारांचा पाया आहे. जात, धर्म, संस्कृती हे सर्व त्यादृष्टीने इमल्याचा भाग आहेत. एकदा आर्थिक समता प्रस्थापित झाली तर इमल्याचा भाग आपोआप गळून पडेल. तेव्हा त्यात मार्क्सवादात जात, जातिअंताविषयी सरळसरळ विचार केला दिसत नाही.'' अडागळे यांनी समाजवाद म्हणजे फक्त आर्थिक समता असा संकुचित अर्थ घेतलेला दिसतो. तो चुकीचा आहे. शिवाय मार्क्सवादात जात, जातिअंताविषयी सरळसरळ विचार केलेला दिसत नाही, असे म्हणणेही चुकीचे आहे, हे आपण पाहिले आहे.

**समारोप**

मार्क्सवाद म्हणजे, फक्त मार्क्स आणि एंगल्सचे लिखाण नाही. तर मार्क्सवादी पद्धती वापरून जे नवनवीन संशोधन आणि विचार मांडले जातात, ते मार्क्सवादाचा भाग बनतात.कित्येक मार्क्सवादी इतिहासकारांनी, मार्क्सवादी समाजशात्रज्ञांनी आणि कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी जातींवर संशोधन करून सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केले आहेत. त्यामुळे कम्युनिस्ट जातींचा विचार करत नाही, असा समज चुकीचा आहे. सुरुवातीस कम्युनिस्ट पक्षाच्या जातीविषयी आकलनाच्या खूप चुका झाल्या. जातिलढ्याला वर्गलढ्याबरोबर न घेणे ही सर्वात मोठी चूक होती. कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणात्मक चुकाही झाल्या. मात्र कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी बदलत राहतात. त्यांचे आकलन विस्तृत होत जाते, जुन्या चुका सुधारल्या जातात. जात आणि वर्ग हे एकमेकांत गुंफले आहेत. त्यामुळे जातिसंघर्ष आणि वर्गसंघर्ष असे वेगळे करता येत नाहीत. दोघांना एकत्र घेऊन एकात्मिक दृष्टिकोन हाच कम्युनिस्टांचा मार्ग आहे.

**लेखाला उपयुक्त ठरलेली संदर्भसूची वाचण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.**

**डॉ. प्रमोद चाफळकर हे मूळचे मेकॅनिकल इंजिनियर आहेत. समाजशास्त्र, जाती आणि मार्क्सवाद या विषयांचा अभ्यास ते करीत आहेत.**

**संपर्क :** independent.free.thinker@gmail.com
Pramod.Chaphalkar@gmail.com

# अदृश्य होत चाललेल्या श्रमकेंद्री शहराचा कवडसा



योगेश पवार

समाज–चित्र

आंतरराष्ट्रीय कामगार दिन विशेष





*'साचा: द लूम' या लघुपटाचा चेहरा आणि लघुपट कर्ते अंजली मोंटेरो–के.पी. जयशंकर...*

**प्रख्यात वास्तुविशारद चार्ल्स कोरिया यांनी मुंबईबद्दल एकदा म्हटले होते: ''मुंबई हे अद्‌भुत शहर आहे, पण राहण्यासाठी भयंकर ठिकाणही आहे.'' या एका वाक्यात त्यांनी शहराचे विसंगत रूप अचूक पकडले होते. एरवी, मुंबई तिच्या असामान्य ऊर्जेमुळे, अनपेक्षित ऐक्यभावामुळे आणि स्वप्नांचा पाठलाग करत इथवर पोहोचणाऱ्या कोट्यवधी स्थलांतरितांना सामावून घेण्याच्या अफाट क्षमतेमुळे चकित करत असते. पण त्याच वेळी ती दमवते–थकवते, निष्ठूर होत अनेकांना उघड्यावर पाडते, गतकाळातल्या आठवणी पुसून टाकते आणि प्रसंगी लोकांना गिळूनही टाकते. एकाच वेळी तिच्यात अद्भुतता आणि क्रौर्य असे दोन्हीही वास करत असते. किंबहुना, या दोन टोकांदरम्यान मुंबईची खरी कहाणी दडलेली असते. अंजली मोंटेरो आणि के. पी. जयशंकर दिग्दर्शित साचा: द लूम (२००१) हा नोंदपट या दोन टोकांदरम्यानच्या कहाणीला विलक्षण संवेदनशीलतेने स्पर्श करतो. त्याचीच ही साक्षेपी नोंद...**

अलीकडेच मुंबईत अंजली मोंटेरो व के. पी. जयशंकर दिग्दर्शित 'साचा: द लूम' या चित्रपटाचे प्रदर्शन झाले. कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य पाहता हा कार्यक्रम सर्वार्थाने समयोचित ठरला. प्रदर्शनानंतर दिग्दर्शकांशी 'डायव्हर सिटी' या सहकार्यात्मक डिजिटल अभिलेख प्रकल्पावर चर्चाही झाली. त्या संध्याकाळी हा चित्रपट केवळ भूतकाळातील दस्तऐवज न वाटता, शहराच्या सामूहिक विवेकाची आठवण करून देत वर्तमानाच्या संदर्भाने अत्यंत मोलाचा अनुभव देणारा ठरला. गिरणगावातील कामगार जीवनातून घडलेला आणि अविरत संघर्षातून परिपक्व झालेला सुर्वे यांचा आवाज त्यांच्या कवितांमधून पुन्हा एकदा त्या शहरात घुमत होता, आज त्यांच्या कवितांमध्ये उमटलेले जग मोठ्या प्रमाणात पुसून टाकण्यात आले आहे. त्यामुळे हा चित्रपट अनुभवताना असे वाटत होते, जणू चित्रपट आणि कवी काळाच्या पलीकडून एकमेकांशी संवाद साधत आहेत…

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या अनेकांसाठी या संध्याकाळला एक वैयक्तिक अर्थही होता. अंजली मोंटेरो आणि के. पी. जयशंकर हे टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या माध्यम व सांस्कृतिक अभ्यास शाळेत माझे शिक्षक होते. त्यांनी आम्हाला शहराकडे पाहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि कथा सांगण्याची नवी दृष्टी दिली होती. त्या दिवशी त्यांच्यासोबतच आणखी एक प्रिय प्रोफेसर, स्त्री अभ्यास क्षेत्रातील अग्रणी संशोधक छाया दातार यांची उपस्थिती अनेक आठवणी जाग्या करणारी ठरली होती.

पण या चित्रपटाने केवळ जुन्या आठवणीच जाग्या केल्या नाहीत. तर याची देखील जाणीव करून दिली की, आज आपण ज्या शहरात राहतो, त्याची पायाभरणी एका वेगळ्याच मुंबईने केली होती आणि त्या मुंबईची स्मृती अत्यंत वेगाने लोप पावत आहे.

**कामगारांनी विणलेले शहर**

'साचा: द लूम' समजून घेण्यासाठी आपल्याला गत काळातल्या मुंबईकडे पाहावे लागेल. शंभराहून अधिक वर्षे मुंबईतील कापड गिरण्या या शहराचे धडधडते हृदय होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून कोकण, दख्खनचे पठार, गुजरात आणि देशाच्या इतर भागांतून हजारो कामगार मुंबईत आले आणि गिरण्यांमध्ये काम करू लागले. या कामगारांनी आपल्या गिरण्यांच्या आसपास वसाहती उभारल्या कालांतराने परळ, लालबाग, भायखळा, शिवडी, करीरोड, वरळी इथल्या वस्त्या पुढे औद्योगिक कामगारवर्गाची ओळख बनल्या. ही केवळ कारखाने आणि कामगारांच्या चाळींची मांडणी नव्हती. ही एक संपूर्ण जीवनपद्धती होती. त्या जीवनपद्धतीतून चाळींच्या अरुंद जागांमध्ये, पाळीपाळीने चालणाऱ्या कामाच्या वेळापत्रकातून, कामगार संघटनांच्या एकजुटीतून आणि स्थलांतरितांच्या सामूहिक जगण्यातून एक वेगळी नागरी संस्कृती घडत गेली. याच जडणघडणीच्या काळात, कामगार वस्त्यांमधल्या रस्त्यांवर नाट्यप्रयोग होत, सभांमध्ये कविता म्हटल्या जात, शाहीर मंडळी संघर्षाची गाणी गात आणि संघटनांच्या कार्यक्रमांमधून सांस्कृतिक चळवळी फुलत. या घडमोडींमुळे मुंबई अनेक अर्थांनी देशातील कामगार चळवळीचे केंद्र बनली. इथल्या गिरण्या फक्त रोजगाराची ठिकाणे नव्हत्या. त्या समुदायांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू होत्या.

जेव्हा अंजली मोंटेरो आणि के. पी. जयशंकर यांनी २००० साली 'साचा' या चित्रपटावर काम सुरू केले, तेव्हा त्यांना स्पष्ट जाणवत होते, की कामगारांनी घडवलेले हे जग निसटत चालले आहे. मोंटेरो म्हणाल्या, आम्ही 'साचा' वर काम सुरू केले, तेव्हा ऐतिहासिक गिरणी संपाला काही वर्षे उलटली होती. त्या संपाने कामगार संघटनांच्या चळवळीचा कणा मोडला होता. गिरणजमिनींचे नकाशे बदलू लागले होते, या शहरातील समृद्ध कामगार संस्कृती पुसली जात असल्याचे आम्हाला दिसत होते.

१९८२–८३ मधील डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली झालेला ऐतिहासिक गिरणी संप भारतीय औद्योगिक इतिहासातील सर्वात मोठ्या संघर्षांपैकी एक ठरला होता. पण त्यानंतर अनेक गिरण्या कायमच्या बंद पडत गेल्या. कारखान्यांची चक्रे थांबली. जमीन सोन्याच्या भावाने विकली जाऊ लागली. बांधकाम व्यावसायिकांनी त्या जागा ताब्यात घेतल्या. कामगारांनी उभारलेले शहर आता अर्थव्यवस्थेकडे वळू लागले होते.

**निसटणाऱ्या जगाचे साक्षीदार**

मोंटेरो आणि जयशंकर हे या शहराचे परिघाबाहेरचे निरीक्षणकर्ते नव्हते. सत्तरच्या दशकात ते स्वतः स्थलांतरित म्हणून मुंबईत आले होते. जयशंकर म्हणतात, या शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाशी आमची खोलवर नाळ जोडली गेली होती. कामगारवस्तींचे वैविध्य, त्यांची ऊर्जा आणि प्रतिकारशक्ती आम्हाला आकर्षित करत होती.

हरवलेल्या मुंबईचा शोध घेणाऱ्या या चित्रपटाचा प्रारंभबिंदू एका चित्रकाराच्या कॅनव्हासमध्ये होता, ते होते, चित्रकार सुधीर पटवर्धन. पटवर्धन यांच्या चित्रांमध्ये बसमधील गर्दी, बांधकाम मजुरांची धडपड, रेल्वेतील गच्च भरलेले डबे दिसतात. त्यांच्या चित्रांमध्ये चमकदार क्षितिजरेषा नाही; आहे ती कामगारांनी



*'साचा' हा लघुपट हरवत चाललेल्या मुंबईचे धगधगते कामगारकेंद्री रुप टिपतो. त्यात श्रमाचे काव्य रचणारे नारायण सुर्वे, कॅनव्हासवर श्रमाचा चेहरा चितारणारे सुधीर पटवर्धन आणि कापड गिरण्यांतून अखंड श्रमणारे हात लक्ष वेधून घेतात...*

भरलेली, श्रमांनी आकारलेली शहराची वास्तविक प्रतिमा. 'साचा'च्या दिग्दर्शकांना या चित्रांमध्ये आपल्या शहराचा आरसा दिसला असेल, तर त्यात जराही आश्चर्य नव्हते.

''कामगार जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या सुधीर पटवर्धन यांच्या चित्रांशी आमचे खोलवर नाते असल्याचे आम्हाला जाणवले. तिथूनच आमच्या चित्रपटाचा दृश्य आणि ध्वनी प्रवास सुरू झाला,'' मोंटेरो सांगतात.

**गिरणगावाचा कवी : नारायण सुर्वे**

कामगारकेंद्री मुंबईच्या जगण्याचा वेध घेणाऱ्या या चित्रपटाचा आत्मा निःसंशय नारायण सुर्वे यांच्या कवितांमध्ये आहे. मुळातच सुर्वे यांचे आयुष्य हीच एक संघर्षमय कथा आहे. लहानपणी अनाथ झालेल्या सुर्वे हे रस्त्यावरचे आयुष्य जगले, गिरण्यांत राबले आणि नंतर डाव्या विचारांशी, कामगार चळवळीशी जोडले गेले.

त्यांच्या कवितांमध्ये चाळींची भाषा आहे, गिरणीतील घाम आहे, संघर्षाची तप्तता आहे. मोंटेरो म्हणतात, ''सुर्वे यांची काव्य भाषा साधी आहे, पण ती तीक्ष्ण, धारदार आणि थेट आहे. त्यांच्या कवितांमध्ये संघर्ष आहे, उत्साह आहे, विनोद आहे आणि जगण्याचा उत्सवही आहे.''

सुर्वे यांच्या कवितांमधून दृश्यमान होणाऱ्या गिरण्या या केवळ श्रमाच्या जागा उरत नाहीत, तर मैत्री, प्रेम, संगीत, वाद-संवाद आणि राजकारणाने व्यापलेले बहुआयामी मानवी जगणे बनतात. जन्मशताब्दीच्या निमित्ताने या कवितांचा पुन्हा एकदा उच्चारव होणे म्हणजे, त्या शहराच्या विस्मृतीत गेलेल्या इतिहासाला आवाज पुरवणे आहे.

**गिरण्यांपासून गगनचुंबी इमारतींपर्यंत**

२००१ मध्ये 'साचा' तयार झाला, तेव्हा मुंबईचा चेहरामोहरा बदलणारे आणि गिरणी कामगारांना बेदखल करणारे बदल सुरू झाले होते. पुढील दोन दशकांत या बदलांनी प्रचंड वेग घेतला. या वेगातच मध्य मुंबईतील गिरणजमिनींवर उंच इमारती, आलिशान निवासी संकुले आणि मोठी व्यापारी केंद्रे उभी राहिली. जिथे कधीकाळी कामगार पायी चालत कामावर जात, त्या पायवाटांवर आता उंचचउंच भिंतींची तटबंदी असलेले गिरणी कामगारांच्या जगापासून फटकून असलेले बंदिस्त टॉवर्स उभे आहेत. यावर जयशंकर म्हणतात, ''या शहरातील कामगारांचे जीवन आणि संस्कृती ज्या प्रकारे पुसून टाकली गेली, ते पाहून आम्ही सून्न निस्तब्ध होतो.''

**स्मृती जपण्याचा प्रयत्न**

परंतु, मुंबईतील बदल हे केवळ आर्थिक वा सामाजिक नाहीत, ते पर्यावरणीय देखील आहेत. खाड्या बुजवणे, कांदळवनांची तोड, टेकड्यांचे सपाटीकरण या सगळ्यांमुळे शहराचा नैसर्गिक समतोल ढासळत चालला आहे. ''समुद्रकिनारे, खारफुटीची जंगले, जलस्रोत आणि हरित क्षेत्रे नष्ट होण्याचा वेग भयावह आहे,'' असे मोंटेरो म्हणतात.

खरे तर याच कारणांमुळे डायव्हर सिटी आणि गिरण मुंबई डिजिटल अभिलेख हे प्रकल्प महत्त्वाचे ठरतात. वेगाने बदलणाऱ्या शहरात विस्मृतीविरुद्ध लढा देण्याचा हा एक जोरकस प्रयत्न आहे. जयशंकर यांच्या मते, ''इतिहास पुसला जात असताना त्याची नोंद ठेवणे, ही एक सांस्कृतिक आणि राजकीय जबाबदारी आहे.''

**शहर अजूनही विणले जात आहे**


चार्ल्स कोरिया यांनी म्हटल्याप्रमाणे, मुंबई एकाच वेळी अद्भुतही आहे आणि भयावहही. 'साचा: द लूम' हा पट त्या दोन टोकांदरम्यान उभा आहे. हटकून आठवण करून देतो आहे की, शहर फक्त इमारतींनी आकारास येत नाही. ते लोकांनी, श्रमांनी आणि स्मृतींनी विणले जाते.

आणि त्या विणकामाचा आवाज अजूनही या शहरात कुठेतरी, कोणत्या तरी कोपऱ्यात ऐकू येतो आहे...

**योगेश पवार हे ज्येष्ठ स्वतंत्र संवादमाध्यम व्यावसायिक आहेत. राजकारण, समाजकारण हे अभ्यासाचे तसेच संगीत, चित्रपट, नाटक हे त्यांचे आस्वादनाचे विषय आहेत.**

**संपर्क : ९८२०० ७८९७६**


# इराण आणि इस्रायल : धर्मवेड्यांचे थैमान



डॉ. मोहन द्रविड

विश्वकारण





**भा**गवत पुराणात गजेंद्रमोक्षाची गोष्ट आहे. गजेंद्र हा हत्ती पाणी पिण्यासाठी नदीत उतरला असता त्याचा पाय मगरीने पकडला. त्याला काही तो पाय सोडवता येईना आणि मगरीला काही हत्तीला पाण्यात ओढून घेता येईना. अशी अनेक वर्षे जातात. तसाच प्रकार अमेरिका–इस्रायल आणि इराणमधील युद्धात चालला आहे. अमेरिकेने इराणमध्ये पाय टाकला आहे, तो तिला बाहेर काढता येत नाही आणि इराणला अमेरिकेला हरवता येत नाही. भागवत पुराणात खुद्द विष्णू येऊन गजेंद्रला मोक्ष देतात. प्रत्यक्षात हा तिढा सोडवायला कोणता विष्णू येणार आहे, हा आज जगापुढला मोठा प्रश्न आहे...

ज्यांना २५०० वर्षांची सलग परंपरा आहे, अशा संस्कृती जगात फार थोड्या आहेत. इराणी आणि यहुदी (ज्यू) या त्यांपैकी. सुरुवातीची पाचशे वर्षं त्यांचा एकमेकांशी घनिष्ट संबंध आला. इराण्यांची अनेक मोठी साम्राज्यं झाली. जाणता राजा असं ज्याला सर्वार्थानं म्हणता येईल, त्या इसवी सन पूर्व पाचव्या शतकातल्या सायरसपासून इराणी साम्राज्याला सुरुवात झाली. ती अलीकडे भारतातील मोंगल साम्राज्य धुळीला मिळवणाऱ्या नादीरशहापर्यंत. त्यापैकी सायरसचा गौरव हिब्रू बायबलमध्ये आहे.

यहुदींचं स्वतःचं बलवान राज्य केव्हाही नव्हतं. त्यामुळे गुलामगिरी त्यांच्या पाचवीला पुजलेली असे. त्यांना एकदा गुलामगिरीतून सोडवलं सायरसने–इसवी सन पूर्व सहावं शतक. बायबलमध्ये सायरसला, तो यहुदी नसूनही, देवाने पाठवलेला प्रेषित (Prophet) असं म्हटलं आहे. सायरसचा नातू सम्राट झर्कसीझ हा बायबलमध्ये उल्लेख असलेला शेवटचा इराणी सम्राट. याची बायको एस्टर यहुदी होती. तिच्या सांगण्यावरून झर्कसीझने ज्यूंना त्यांच्या होऊ घातलेल्या सर्वनाशापासून वाचवले. (पाहाः बायबलमधील The Book of Esther) तो प्रसंग ज्यू अजूनही साजरा करतात. त्या सणाचं नाव आहे, पुरीम.

यहुदींचं बलस्थान म्हणजे, त्यांचा धर्म. एकेश्वरी, मूर्तिपूजेचा द्वेष्टा, कायदानिष्ठ आणि हेकट असा धर्म. असल्या या धर्मासाठी त्यांनी साहजिकच अनन्वित हालअपेष्टा सोसल्या. त्याकरता त्यांचं जेरुसलेममधलं देऊळ दोनदा तोडलं गेलं – एकदा इसवीसन पूर्व सहाव्या शतकात बॅबिलोनियन लोकांकडून, तर एकदा, इसवी सन ७०मध्ये, रोमन सैनिकांकडून. दुसऱ्या वेळी ते पार देशोधडीला लागले. त्यानंतर त्यांनी इतिहासात पुन्हा प्रवेश केला, तो अठराशे वर्षांनंतर – पहिल्या महायुद्धाच्या सुमारास!

एवढ्या छळवादानंतरही यहुदींचा त्यांच्या धर्मावरील विश्वास ढळला नाही. उलट त्यांचा छळ करणाऱ्यांनीच कालांतराने त्यांचा धर्म स्वीकारला. आज जगातल्या निम्म्याहून अधिक लोकांनी तो धर्म वेगवेगळ्या नावांनी स्वीकारलेला आहे. पण यहुदींनी त्यांना आपलं कधी मानलं नाही. आपण मूळचे यहुदी देवाची खास माणसं आहोत आणि बाकीचे तोतये आहेत, हा हेका त्यांनी सोडला नाही. त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे, रोमन लोकांनी पाडलेलं देऊळ. ते मुसलमान खलिफा उमर यांनी सातव्या शतकात परत बांधलं. पण त्याबद्दल कृतज्ञता न बाळगता ते अरबांनी बांधलं असल्यामुळे अपवित्र असून ते पाडणं हे आपलं इतिकर्तव्य आहे, अशी यहुदींची भावना आहे. ते पाडण्यासाठी असंख्य अतिउत्साही आणि धर्मवेडे यहुदी फावडी, कुदळी घेऊन तयार आहेत. अर्थात मुसलमान कुणालाही त्या देवळाला हात लावून देणार नाहीत. आजच्या पश्चिम अशियातील संघर्षाच्या कधीही न सुटणाऱ्या अनेक भागांपैकी तो एक आहे.

**युगायुगाचे संघर्ष**

युगानयुगे चाललेले आणखी दोन धार्मिक तणाव म्हणजे मुसलमान–ख्रिस्ती आणि यहुदी–ख्रिस्ती. सर्वांचा केंद्रबिंदू अर्थातच जेरुसलेम हे सर्वांचं तीर्थक्षेत्र. ते ताब्यात घेण्यासाठी मुसलमान आणि ख्रिस्ती यांच्यांत दहा धर्मयुद्धं झाली. पहिलं युद्ध ख्रिस्त्यांनी जिंकलं आणि त्यांनी स्थानिक यहुदी लोकांची कत्तल केली. पुढची युद्धं मुसलमानांनी जिंकली आणि तो प्रदेश (पॅलेस्टाइन) त्यानंतर आजतागायत त्यांच्या ताब्यात राहिला–इस्रायलची स्थापना होईपर्यंत. यहुदी संख्येने कमी असल्याने ते धर्मयुद्धं करायच्या भानगडीत पडले नाहीत. (गेली ८० वर्ष हा त्याला अपवाद!) पण दोन हजार वर्षांच्या काळात ख्रिस्ती लोकांनी त्यांचे अतोनात हाल केले. त्याचा कळस केला, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मन लोकांनी.

मुसलमान धर्माचा उदय सातव्या शतकाच्या मध्यभागी अरबस्थानातला. तिथून तो वावटळीसारखा तिन्ही खंडांत पसरला. महम्मद पैगंबरांच्या मृत्यूनंतर काही वर्षांतच त्यांच्या मूठभर अनुयायांनी इराणच्या बलाढ्य साम्राज्याचा पराभव केला. हा विजय इस्लामच्या शिरपेचातील तुरा मानला जातो. मुसलमानांच्या दिग्विजयी मोहीमेची मुहूर्तमेढ इथे रोवली गेली. त्यांचं साम्राज्य मध्य पूर्वेत निघून उत्तर अफ्रिकामार्गे आयबिरियापर्यंत (स्पेन–पोर्तुगाल) पोचलं आणि तिथे सातशे वर्षं स्थिरावलं. तिथे त्यांनी विद्यापीठं काढली. प्राचीन ग्रीक गणित आणि विज्ञानांना पुनरुज्जीवन दिलं. त्यांत भर घातली. त्या काळाला इस्लामचं सुवर्णयुग मानतात.

त्यांच्या पाठोपाठ आणि त्यांच्या संरक्षणाखाली यहुदी स्पेनमध्ये गेले. ते आजचे सफार्डिक यहुदी. (हिब्रू भाषेत आयबिरिया या भागाला सफार्ड म्हणतात.) पंधराव्या शतकाच्या शेवटीशेवटी स्पेनमध्ये ख्रिस्ती राज्य परत आलं आणि आल्यानंतर त्यांनी पहिलं काम कोणतं केलं असेल, तर ख्रिस्तेतरांवर जुलूम, जबरदस्तीची बाटवाबाटवी आणि त्यांचं

हत्याकांड. इतिहासात हा काळ Inquisition अर्थात धर्मन्यायिक म्हणून ओळखला जातो. सोळाव्या शतकापासून जगाच्या इतिहासात आधुनिक युरोपीय पर्व सुरू झालं. ते आजतागायत.

**इराण – इस्रायलचा संघर्षप्रवण पट**

इराणमध्ये तोपर्यंत अनेक परकीय राज्ये येऊन गेली. इ.स. १५०१ साली इराणमध्ये सफाविद नावाचे स्थानिक साम्राज्य स्थापन झाले. त्याच काळात इराणच्या प्रजेनं आपला मूळचा सुन्नी पंथ सोडून शिया पंथ स्वीकारला. आज इराणमध्ये पारशी ६२ टक्के, शिया आझरबाइजानी १५ टक्के, सुन्नी कुर्दी १२ टक्के आणि बाकीचे इतर असं लोकसंख्येचं पृथःकरण आहे. तेव्हापासून मुस्लिम जगतात सुन्नी अरब आणि शिया इराणी असे दोन तट निर्माण झाले आहेत. आजच्या पश्चिम अशियातील संघर्षाच्या कधीही न सुटणाऱ्या अनेक भागांपैकी तो आणखी एक.

पहिल्या महायुद्धात (इ.स. १९१८) तुर्कस्तानी साम्राज्याचा पराभव झाला आणि त्यांच्या ताब्यात असलेला अरबस्तानमधला आणि आजूबाजूचा सर्व परिसर ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या ताब्यात आला. त्यातल्या पॅलेस्टाइनमधील एक तुकडा कापून तो ज्यूंना द्यायचा असा वायदा ब्रिटनने केला (बॅल्फोर घोषणा, १९१७). इ.स. १९२५ मध्ये रझा पहेलवी नावाच्या लष्करी अधिकाऱ्याने ब्रिटनच्या मदतीने इराणचं राज्य बळकावलं, आणि पहेलवीशहा राजघराणं चालू केलं. पाश्च्यात्य राष्ट्रांची इराणच्या राजकारणामध्ये लुडबूड इथून चालू झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रझा पहेलवीचं जर्मनीशी गुफ्तगू चालू झालं. तेव्हा रशिया आणि ब्रिटन या दोस्त राष्ट्रांनी त्याला गादीवरून खाली उतरवलं आणि त्याच्या महंमद रझा नावाच्या मुलाला सिंहासनावर बसवलं. त्याच काळात ब्रिटनने बॅल्फोर घोषणा जरी अंमलात आणली नाही, तरी पूर्व युरोपमधल्या ज्यूंनी त्यांच्या दहशतवादी टोळ्यांतर्फे पॅलेस्टाइनचा ताबा घ्यायला सुरुवात केली.

**अमेरिकी औदार्याचे दुष्परिणाम**

१९४८ साली इस्रायलने राज्य स्थापन केल्याची घोषणा केली. नुकत्याच निर्माण झालेल्या अमेरिका आणि रशिया या महासत्तांनी त्या घोषणेला पाठिंबा दिला. अरब राष्ट्रं आणि त्यांची तेलसंपत्ती आपल्या बाजूला ठेवायची, या दृष्टीने ब्रिटनने तटस्थाची भूमिका घेतली. इराणचा शहा हा पूर्णपणे अमेरिकेच्या कह्यात असल्याने त्याने इस्रायलला ताबडतोब पाठिंबा जाहीर केला. अर्थातच ते अरबांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखं होतं. अरब राष्ट्रांनी एकत्र येऊन इस्रायलवर हल्ला केला. पण त्यात ते हरले. पॅलेस्टाइनच्या असंख्य स्थानिक रहिवाशांना इस्रायलने निर्घृणपणे हाकलून लावलं. या घटनेला पॅलेस्टिनी लोक नक्बा – म्हणजे सत्यानाश – असं म्हणतात. ते गेली सत्तर वर्षं एक तर निर्वासितांसारखे वणवण फिरत आहेत, किंवा स्वतःच्याच देशात बंदिवासात राहत आहेत.

याउलट पाश्चात्य देशांतील (विशेषतः अमेरिकेतील) यहुदी समाज गर्भश्रीमंत आहे. साहजिकच सर्व राजकारणी त्यांच्या खिशात आहेत. अमेरिकेतील जनतेच्या पैशाचा ओघ इस्रायलकडे वळवणं, हे त्यांचं मुख्य काम. इस्रायलच्या जन्मापासून (इ.स. १९४८) ते २०१६ पर्यंत अमेरिकेने इस्रायलला ३०० अब्ज डॉलर दान केले. ते वर्षाला माणशी साधारण १२०० डॉलर इतके होतात. त्यांच्या सैन्याला देत असलेले वर्षाला २ अब्ज डॉलर हे वेगळे. ते कमी पडतात म्हणून की काय अध्यक्ष ओबामा यांनी २०१६ साली इस्रायलला वर्षाला ३.८ अब्ज डॉलर द्यायचा दहा वर्षांचा नवा करार केला. हे आकडे बघून एवढा छोटा देश, पण किती पराक्रमी, असं म्हणून गहिवरून येणाऱ्या आपल्या इथल्या लोकांना वास्तवाचा झटका बसेल. (या प्रमाणात भारताला पैसा मिळाला असता, तर भारत कुठल्या कुठे पोचला असता!) ते पॅलेस्टिनी लोकांची बळकावलेली जागा त्यांना परत करायला अजिबात तयार नाहीत. पश्चिम अशियातील संघर्षाच्या कधीही न सुटणाऱ्या अनेक तिढ्यांपैकी हा तिसरा.

एवढा तपशीलवार इतिहास देण्याची कारणं दोन. एक म्हणजे की इतिहासकाळात इराणी आणि इस्रायली लोकांचे संबंध शत्रुत्वाचे केव्हाच नव्हते. असलेच तर सलोख्याचे होते. इराणी लोकांनी ज्यूंना कठीण प्रसंगी वाचवलं. दुसरं कारण असं की हल्ली सर्व घटना धर्माच्या भिंगातून बघणाऱ्यांनी हे लक्षात घेतलं पाहिजे, की दोन्ही देशांच्या धर्मांवर एकमेकांची सावली पडली आहे. ज्यूंच्या धर्माचा उगम इराणमधील बंदिवासात झाला, तर इस्लामचा उगम ज्यू धर्मात आहे. दुर्दैवाने, दोन्ही समाज त्यांच्यावर दुसऱ्याने केलेले उपकार मान्य करत नाहीत.

**धर्मवेड्यांचा दावा**

या भरीस भर म्हणजे १९५० सालापासून अमेरिकेत झालेली धार्मिक प्रतिक्रांती. ती चीन आणि रशियामधील समाजवादी

नास्तिक तत्त्वज्ञान आणि भारतासारख्या नवस्वतंत्र आणि बिगरगोऱ्या देशातील साम्राज्यवादविरोधी तत्त्वज्ञान यावरील प्रतिगामी प्रतिक्रिया होती. त्याचा प्रसार करणारे लोक स्वतःला पुनर्जन्मित ख्रिस्ती (Born-again Christian) किंवा मूलतत्त्ववादी (Evangelical) म्हणवून घेतात. त्यांच्या मते, जगाचा प्रलयकाळ जवळ आला आहे, आणि येशू ख्रिस्त नवा अवतार घेणार आहे. (हे ते गेली दोन हजार वर्ष म्हणत आले आहेत, हे क्षणभर विसरून जायचं!) इस्रायलची १९४८ साली झालेली प्रतिष्ठापना ही त्यातली पहिली पायरी आहे, असं ते मानतात. (शेवटची पायरी म्हणजे येशू सगळ्या यहुदींचं भस्म करणार. पण ही पायरी सर्व ज्यू सोयिस्करपणे विसरतात.) या धर्मवेड्यांनी इस्रायलला पोटाशी धरलं.

हळूहळू यहुदींनी आपले पाय पसरायला सुरुवात केली. आता त्यांनी जवळजवळ सर्व पॅलेस्टाइन बळकावला आहे. जो थोडाफार भाग शिल्लक आहे तो आहे दोन लहान तुकड्यांत. एक आहे, गाझा. ही समुद्रकाठची ४० किमी x १० किमी आकाराची अरुंद पट्टी. दुसरा जॉर्डन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील भाग. (याला नुसतंच पश्चिम किनारा West Bank म्हणतात.) याच्यात जेरुसलेम गावाचा पूर्व भाग येतो. (जेरुसलेमचा पश्चिम भाग इस्रायलने १९४८ सालीच बळकावला आहे.) या भागातच खलिफा उमरने बांधलेली अल-आक्सा मशीद येते. हा प्रश्न कायमचा सोडवायचा असा विचार इस्रायलमधल्या अनेक जहाल लोकांच्या मनात आहे. तो सोडवायचा मार्ग देवाने ॲमलेकच्या वंशजांशी झालेल्या झगड्यात दाखवला आहे. कोणतीही दयामाया न ठेवता बायकामुलं, म्हातारे-कोतारे, गुरंढोरं सर्वांना कापून काढ, अशी देवाची आज्ञा आहे.

इस्रायलच्या सैन्याने देवाच्या आज्ञेचे पालन करून गाझा जवळजवळ निर्मनुष्य केला आहे. ते पाहून दिल्लीचा नाश करणाऱ्या तैमुर लंगालासुद्धा लाज वाटली असती. (दोघांत आणखी एक साम्य म्हणजे, दोघंही देवाच्या आज्ञेचे पालन करत होते!) गेल्या पंचवीस वर्षांत पश्चिम किनारा हा पॅलेस्टाइन लोकांच्या ताब्यातला दुसरा उर्वरित भाग आक्रमक ज्यू वसाहतवाद्यांनी - मुख्यतः अमेरिकन ज्यूंनी- पोखरून, व्यापून टाकला आहे. गेली अनेक वर्षं दररोज एकेका गल्लीत घुसून तिथल्या रहिवाशांना त्यांच्या बायका मुलांसकट हाकलणं चाललं आहे. यहुदी आता मोठं स्वप्न पाहताहेत- विशाल इस्रायल! त्यांच्या म्हणण्याप्रमाणे बायबलमध्ये देवाने त्यांना लेबनॉन आणि सिरिया दिलेला आहे. त्यांच्यावर इस्रायल अप्रत्यक्षपणे राज्य करतो. काहींचं म्हणणं इराणचाही काही भाग देवाच्या देणगीत (Gift Deed) येतो. इराणचे तीन-चार तुकडे करून आपण एक भाग इस्रायलमध्ये विलीन करायचा आणि बाकीच्यांवर राज्य करायचं, अशी इस्रायलची महत्त्वाकांक्षा आहे.

**अमेरिकेचा विखारी फणा आणि इराणची गटबांधणी**

इराणमध्ये शहाने १९५२ साली निवडणुका घेतल्या. लोकांमध्ये प्रामुख्याने तीन विचारधारा होत्या. एक सनातनी धर्मवादी, दुसरी निधर्मी समाजवादी (मुख्यतः कम्युनिस्ट) आणि तिसरी पाश्चात्यधार्जिणी. निवडणुकीनंतर समाजवादी विचारसरणीचा आणि आझरबाइजानी वंशाचा महंमद मोसदेघ पंतप्रधान झाला. त्याने त्याच्या निवडणुकीतल्या जाहिरनाम्याप्रमाणे ब्रिटिश पेट्रोलियम या कंपनीचं राष्ट्रीयीकरण केलं. त्याबरोबर ब्रिटन-अमेरिकेचं डोकं फिरलं. त्यांनी शहाशी हातमिळवणी करून मोसदेघला काढून टाकला (Operation Ajax). ब्रिटिश पेट्रोलियम या कंपनीचं नव्वद टक्के उत्पन्न ब्रिटन आणि अमेरिकेकडे ठेवून घेतलं आणि शहाच्या अनिर्बंध आणि कालांतराने झालेल्या जुलमी सत्तेला प्रोत्साहन दिलं. इराणच्या गरीब दक्षिण भागातील प्रदेशात राहणाऱ्या रोहोल्ला खोमेनी नावाच्या धर्मगुरूने निषेधाचा आवाज उठवला. (त्यालाच पुढे आयातुल्ला अशी पदवी मिळाली.) त्याने शहाला डुक्कर म्हटलं. शहाने त्याला शेणात वळवळणाऱ्या किड्याची उपमा दिली आणि देशाबाहेर हाकलून दिलं. १९७९ साली क्रांती झाली. शहाचा निषेध करायला लाखो लोक इराणची राजधानी तेहरान इथे जमा झाले. आयातुल्ला खोमेनीने सत्ता बळकावली.

खोमेनीचं पहिल्यापासून शहाची बाजू उचलून धरणाऱ्या अमेरिकेशी वितुष्ट होतं. अमेरिकेने इराण आणि इराक यांच्यामध्ये दुष्मनी लावून दिली आणि इराकला शस्त्रास्त्रं पुरवली. ते युद्ध ८ वर्षं चाललं आणि त्यात दहा लाख लोकांनी प्राण गमावले. त्यानंतर अमेरिकेने सूडबुद्धीने इराकबरोबर युद्ध काढलं आणि इराकला हरवलं. त्याचा एक परिणाम म्हणजे, पॅलेस्तिनी जनतेला आता इराणशिवाय कुणी वाली राहिला नाही. सगळी अरब राष्ट्रं इंग्लंड-अमेरिकेने शोधून काढलेल्या तेलावर बूड टेकून बसली आहेत. स्वतः काडीचीही कामगिरी न




*सामंजस्यापेक्षा हिंसेचा इतिहासच बहुदा राज्यकर्त्यांना वर्चस्व आणि सत्तेची हमी देत असतो. असेच सध्या इस्रायल आणि इराणच्या संदर्भाने घडते आहे. इथे इस्रायल वर्चस्व राखण्यासाठी तर इराण अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी हिंसेचा मार्ग अवलंबित आहे...*

बजावता पोट फुटेपर्यंत पैसा कमावल्याचं हे जगाच्या इतिहासातील एकमेव उदाहरण असेल. त्यांना पॅलेस्टाइनचा प्रश्न डोळ्यासमोरही नको होता. त्यांच्या दृष्टीने क्षुल्लक असलेल्या या प्रश्नासाठी त्यांना इस्रायल, अमेरिका, युरोप यांच्याबरोबरचे राजकीय आणि व्यापारी संबंध बिघडवायची इच्छा नव्हती. ते पाहिल्यावर शिया असूनही इराणने सुन्नी पॅलेस्तिनींना जवळ केलं.

पॅलेस्टाइनमध्ये चाललेल्या युद्धाचा वणवा आजूबाजूच्या जॉर्डन, लेबनॉन, सिरिया या देशांत पसरला. मुळातच या सर्व देशांच्या सीमा अनैसर्गिक होत्या. ब्रिटिश आणि फ्रेंच साम्राज्यावाद्यांनी आपल्या सोयीप्रमाणे आखल्या होत्या. जनतेत शिया आणि त्यातले असंख्य पंथ, सुन्नी आणि त्यातले असंख्य पंथ, ख्रिस्ती आणि त्यातले असंख्य पंथ, नवीन आलेले पॅलेस्तिनी अशी खिचडी होती. असलं वातावरण यादवी युद्धाला पोषक. या गोष्टीचा फायदा इस्रायलने उचलला नसता तरच आश्चर्य. या सर्व देशांत अमेरिकेप्रमाणे इस्रायलने हस्तक्षेप केला आहे आणि आजही तिथे इस्रायलच्या फौजा आहेत. इराक आणि सिरिया या देशांत तिथल्या सरकारने हाकलून लावायचे ठराव केले असले, तरी अमेरिका तिथे ठाण मांडून आहे.

इस्रायल आणि अमेरिका यांना विरोध करायला इराणने स्वतःचे गट तयार केले आहेत. पॅलेस्टाइनमध्ये हमास, लेबनॉनमध्ये हेजबोल्ला, येमनमध्ये होथी. हे गट लष्करी तर आहेतच, पण राजकीय पक्षही आहेत. पॅलेस्टाइन आणि लेबनॉनमध्ये ते सार्वभौम सरकारमध्येही आहेत. अर्ध्या येमनमधलं सरकारही त्यांचं आहे. आयसिस, दाएश, अल-कायदा आणि त्यांचे विविध धर्मवेडे अवतार ही या संघर्षातील तिसरी बाजू. यांना कधी अमेरिकेची, तर कधी इस्रायलची, तर कधी दोघांची फूस असते. हमासला एके काळी इस्रायल पोसत, असे असं इस्रायलच्या पंतप्रधानांनीच कबूल केलं आहे.

**दांडगटांची अरेरावी**

अमेरिकेच्या राज्यकर्त्या वर्गामध्ये ॲमलेकच्या धर्तीवर इराणला समूळ नष्ट करू इच्छिणारा एक मोठा गट आहे. त्याला इस्रायलचा आणि इस्रायलचं उपांग असलेल्या अमेरिकेतल्या आयपॅक (AIPAC: American Israeli Political Action Committee) या संस्थेची फूस आहे. आज अमेरिकेतील राज्यांतल्या आणि केंद्रातल्या प्रत्येक राजकारण्याला आयपॅकचा पैसा किंवा दहशत यापैकी एकाची निवड करावी लागते. (आज ज्यूंचा समाज हा जगातील कोणत्याही समाजाच्या अनेक पटीने श्रीमंत आहे.) एकदोन अपवाद सोडले तर सर्व जण पहिल्याची निवड करतात! त्यामुळे इस्रायलसंबंधीचा कोणताही ठराव एकमताने इस्रायलच्या बाजूने संमत होतो. असं असूनही आपणच परिस्थितीचे बळी आहोत, असा अविर्भाव इस्रायल आणत असतो.

याउलट इराणबरोबर सामोपचाराने वागावे असं म्हणणारा एक छोटा गट अमेरिकेत होता. (आता नाही.) त्यात अध्यक्ष ओबामा होते. पण त्यांचासुद्धा - आणि तेसुद्धा ओबामा अध्यक्षपदी असताना- सरळसरळ अपमान करायला इस्रायलने मागेपुढे पाहिले नाही. या सर्व गोंधळात भर पडली आहे, ती अण्वस्त्रांची. जगातील सर्व देशांना अणुशक्तीचा लाभ तर मिळाला पाहिजे, पण अण्वस्त्रांच्या प्रसार होता कामा नये, या दृष्टीने यूनोने १९६८ साली प्रसारबंदी करार (Non-Proliferation Treaty: NPT) केला. त्यात अणुशक्ती वापरायची योजना असणाऱ्यांवर अनेक प्रकारची बंधनं होती. त्यांच्यावर तपासणीसाठी आंतरराष्ट्रीय अभिकरण (IAEA) ही संस्था तयार केली.

त्या सर्वांना धाब्यावर बसवून भारत आणि पाकिस्तानप्रमाणे इस्रायलने चोरून (आणि उत्तर कोरियाने उघडउघड) अण्वस्त्रं बनवली. आमच्यावर अण्वस्त्रांचा हल्ला झाला नाही, तर आम्ही अण्वस्त्रं वापरणार नाही (No First Use), असं आश्वासन इस्रायल सोडून सर्व राष्ट्रांनी दिलं आहे. असं

असूनही इराणने अणुशक्तीचा साधा प्रकल्पही उभा करता कामा नये, असा इस्रायलचा हट्ट आहे. (इस्लाममध्ये अण्वस्त्रांना बंदी आहे, असं भूतपूर्व आयातोल्लाचं म्हणणं होतं.) अमेरिका, युरोप, रशिया आणि चीनने इराणवर लक्ष ठेवून त्यांना अणुशक्तीचा प्रकल्प उभा करण्याची योजना ओबामांनी २०१५ साली आखली होती (JCPOL). त्यावर यूनोतील सुरक्षा–समितील पाच सभासद अधिक जर्मनी (P5 +1) यांनी सह्या केल्या होत्या. पण ट्रम्प राज्यावर आल्यानंतर त्यांनी ती उधळून लावली. (ट्रम्प यांचा जावई एका ज्यू धर्मीय माफियाचा मुलगा आहे.) त्यानंतर राज्यावर आलेल्या बायडनना ती योजना परत सुरू करता आली असती. पण तेही आयपॅकच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे त्यांनी तो प्रश्न लोंबताच ठेवला.

**पिंपाला जळती काडी...**

अशा या स्फोटक द्रव्याने भरलेल्या पिंपाला जळती काडी कुणी लावली असेल ती ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने. हमासने केलेल्या धाडशी आणि अनपेक्षित हल्ल्याने इस्रायलच काय, पण जग हादरलं. सर्वप्रथम म्हणजे, विसरून गेलेला पॅलेस्टाइनचा प्रश्न पुन्हा सगळ्यांच्या डोळ्यासमोर आला आहे. हमासचे सैनिक किंवा गेले सहा महिने अडकून पडलेले इस्रायलचे नागरिक बाजूलाच राहिले, निष्पाप बालकांना मारायची, हॉस्पिटल बेचिराख करायची मोहीम सध्या इस्रायलने हाती घेतली आहे. इस्रायलने बेफामपणे दहशतवादाचा आश्रय घ्यायचं ठरवलं आहे. त्यांच्या मोसाद या गुप्तचर संघटनेने इराणमधल्या शास्त्रज्ञांची घरं शोधून काढून त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर बाँबहल्ला करून त्यांना नष्ट केलं.

हा सर्व भाग युद्ध आणि विनाश यांच्या छायेत आहे. २०२४ साली इस्रायलने सिरियामधल्या इराणच्या दूतावासावर चोरून हल्ला करून तेथील इराणी लष्करी अधिकारी मारले. त्याला उत्तर म्हणून इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रं सोडली. २०२५ सालच्या जून महिन्यात इस्रायलने इराणशी वाटाघाटी करत असता युद्ध चालू केलं. ते बारा दिवस टिकलं. इराणच्या मते, तो सरळसरळ विश्वासघात होता. त्यात अमेरिकेने इस्रायलबरोबर सहभाग घेतला. त्यांच्या अणुप्रकल्पावर प्रचंड मोठे बाँब टाकले. पण हे प्रकल्प डोंगराच्या अनेक मीटर खाली लपवून ठेवले असल्याने सुरक्षित राहिले. त्यानंतर युद्धबंदी जाहीर झाली.

तोच प्रकार २०२६ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झाला. यावेळी इस्रायलने इराणच्या वरिष्ठ नेत्यांना मारण्यापासून सुरुवात केली. अशा कृतीचा फायदा झालाच, तर फार मर्यादित होईल. कारण त्याजागी येणारा माणूस पहिल्यापेक्षा अधिक कर्तबगार आणि जहाल असू शकतो. त्यानंतर लहान मुलींच्या शाळेवर जालीम बाँब टाकण्यात आला. त्यात १६० मुली अक्षरशः भस्मसात झाल्या. जून महिन्यातील लढाईमुळे इराणला भरपूर अनुभव आला होता. मुख्य म्हणजे हल्लीचं युद्ध हे मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक झालं आहे. विमानांऐवजी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांवर भर दिला जात आहे. दोन्ही मानवरहित तर असतातच आणि त्यांच्यावर लांबून नियंत्रण ठेवता येतं. त्यांचा मार्ग, वेग आणि दिशा सुरक्षित अंतरावरून ठरवले जातात. त्याचप्रमाणे तुमच्यावर हल्ला करणाऱ्या विमानं, ड्रोन आणि क्षेपणास्त्रं यांचा मागही इलेक्ट्रॉनिक यंत्रणेद्वारा काढला जातो आणि त्यानुसार तुमचा संरक्षणव्यूह त्यांच्यावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रं सोडतो.

**प्रगत शस्त्रास्त्रांचा बेदम वापर**

इस्रायल हा प्रगत आणि प्रथमजगतातील देश (First World Country) असल्यामुळे असल्या शास्त्रांत तो इतर अशियाई देशांच्या काही योजने पुढे होता. त्याने हवाई संरक्षणासाठी तीन कवचे (Iron Dome, David's Sling, Arrow) तयार केली आहेत. येणारी क्षेपणास्त्रं जमिनीवर पोचायच्या आधीच त्यांच्यावर आपली क्षेपणास्त्रं सोडून त्यांचा वाटेतच खातमा करायचा, हे तत्त्व. अमेरिकेचं स्टारलिंक येणाऱ्या क्षेपणास्त्रांची जागा पक्की करतं आणि इस्रायलचं क्षेपणास्त्र GPS द्वारा ते शोधून त्याला नष्ट करतं.

या प्रणालीला शह देण्याकरता २०२५ सालच्या जून महिन्यात इराणने रशिया आणि चीनची मदत घेतली. रशियाने त्याच्या उपग्रहांच्या साखळीने स्टारलिंकची जागा घेतली आणि चीनच्या बायडूने GPSची. अस्त्रांची वाहतूक सुलभ व्हावी या उद्देशाने रशिया आणि चीन यांनी आपल्या दोन देशांमधली सीमा उघडी ठेवली आहे. इराण स्वतः उच्च दर्जाचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रं (शहाब–३, खुर्रमशार–४, खैबर, वगैरे) बनवतो. काहींचा पल्ला २५०० किमी इतका लांब आहे. इराण हायपरसॉनिक क्षेपणास्त्रं बनवतो (फत्ते–२ आणि फत्ते–३). यांचा वेग ताशी १२,००० किमी इतका असतो आणि म्हणून तो अमेरिकेच्या कोणत्याच आंतरछेदकावर (interceptor)

मिळत नाही.

चीन आणि रशिया सोडून या वेगाची क्षेपणास्त्रं कुणालाच बनवता येत नाहीत. २०२५ सालच्या युद्धानंतर चीनने इराणला अत्याधुनिक अशी डाँगफेंग १७ (किंवा DF-17) हायपरसॉनिक क्षेपणास्त्रं दिली आहेत. या सर्वांच्या संयोगामुळेच इराण इस्रायलशी बरोबरीची टक्कर देऊ शकत आहे. या तीन देशांची मिळून उत्पादनशक्ती अमेरिकेच्या दहापटीपेक्षा जास्त असल्याने इराणचा भाता जवळजवळ अक्षय आहे. या ठेवीचा फायदा जेवढं युद्ध लांबेल तेवढा इराणला जास्त होईल.

**फुकाच्या गमजा**

इराणविरुद्धचे युद्ध एका वीक-एंडमध्ये संपवू अशा गमजा ट्रम्प मारत होते. पण इराण त्यांच्या अपेक्षेपेक्षा कठीण गेला. सुरुवातीचे काही दिवस त्याने मार सहन केला. मग प्रतिहल्ल्याला सुरुवात केली. काही दिवसांनंतर इराणने युद्धाची व्याप्ती वाढवली. त्या भागातले अरबी देश गेली तीस वर्षं अमेरिकेची अंगवस्त्रं आहेत. तिथे अमेरिकन सैन्यांचे महाकाय तळ आहेत. इराणने त्यांच्यावर हल्ला चढवला आणि त्यांना जायबंदी केलं. अमेरिकेने इराणची अनेक शहरं बेचिराख केल्याचा बदला म्हणून इराणने दुबाईसारख्या दागिन्यांनी मढलेल्या वारांगनांचं वस्त्रहरण केलं. तिथल्या उच्च वित्तव्यवसायातील आणि तंत्रज्ञान व्यवसायातील कचेऱ्या उघड्यानागड्या झाल्या.


दोन्ही पक्षांनी विरुद्ध बाजूची नैसर्गिक वायूच्या निर्मिती क्षेत्रांची नासधूस केली आहे. त्यामुळे नैसर्गिक वायूची टंचाई तर होणार आहेच पण, शिवाय नैसर्गिक वायूपासून बनणाऱ्या खतं, अमेनिया, युरिया, सल्फर यासारख्या पदार्थांचीसुद्धा टंचाई होणार आहे. पर्शियन आखातातून जाणाऱ्या जहाजांची इराणने पुनःपुन्हा कोंडी केली आहे. (इथून जगाला १७ टक्के नॅफ्थाचा पुरवठा होतो, तर ३० टक्के प्लॅस्टिक रेझिनचा, ४५ टक्के सल्फरचा, ३३ टक्के हिलियम वायूचा, २५ टक्के अमेनिया/युरियाचा.) भारत तिथून येणाऱ्या इंधनावर तर अवलंबून असतोच, पण सौदी अरेबिया, ओमान, कतार या प्रांतांत बनणाऱ्या डाय-अमोनियम फॉस्फेटसारख्या (DAP) खतांवर आणि युरियावरही अवलंबून आहे. भारत, पाकिस्तान, बांगलादेश या देशांतील खत बनवायचे कारखाने बंद झाल्याची बातमी आहे. हिलियम या वायूची कथा आणखी वेगळी आहे. त्याचे साठे अमेरिका आणि रशियाच्या बाहेर फक्त कतारमध्येच आहेत आणि त्यांचा पुरवठा बंद झाला आहे. सेमी कंडक्टर बनवायला हिलियम लागतो, आणि त्याचा फक्त एका आठवड्याचा साठा शिल्लक आहे.

पर्शियन आखातात इराणच्या किनाऱ्यापासून ३० कि. मी. अंतरावर खर्ग नावाचं २० चौ. कि.मी. आकाराचं इराणच्या मालकीचं बेट आहे. इराणहून बाहेर जाणारा माल आधी या बेटावर उतरवला जातो. विशेषतः इराणचं ९० ते ९५ टक्के तेल इथे उतरतं. या बेटावर फौज उतरवून ते बळकावण्याचा अमेरिकेचा विचार आहे. पण मैदानी युद्ध अमेरिकेने अनेक वर्षांत केलेलं नाही. त्यामुळे अमेरिकेला ते कितपत जमेल याची शंका आहे. आज अमेरिकेत राजकीय दुफळी एवढ्या प्रमाणात पसरली आहे आणि हे युद्ध सुरू व्हायच्या आधीच लोकांत इतकं अप्रिय आहे, की अमेरिकेचं सैन्य बंड करणारच नाही याची खात्री देता नाही. नौदलाच्या जेरल्ड फोर्ड या नावेवर लागलेली आग, त्यामागची कारणं या सगळ्यांचा विचार केला, की असं बंड होणारच नाही, असं छातीठोकपणे सांगता येत नाही.

या वर्षातल्या आठ मार्च या दिवशी प्रसिद्ध इतिहासकार आणि ऑक्स्फर्डमधील प्राध्यापक वालिद खलिदी यांचे वयाच्या १०१व्या वर्षी निधन झाले. त्यांचा जन्म १९२५ सालचा पॅलेस्टाइनमधला. आपल्या मायभूमीचा दुर्दैवी इतिहास त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला आणि 'ऑल दॅट रिमेन्स' या शीर्षकाच्या म्हणजेच, पॅलेस्टाइनमध्ये जे काही उरलं आहे, अशा आशयाच्या पुस्तकांत तो जगापुढे सादर केला. आता, असा शिल्लक इराण घडवण्याची खुमखुमी आलेली आहे.


**डॉ. मोहन द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक 'रोहन प्रकाशन'ने प्रसिद्ध केले आहे.**
**संपर्क : ९८२०५ ६३१३०**

# तो काळ जागल्यांचा!



रवि आमले

पाळतशाहीच्या पाऊलखुणा – ५




युद्धे क्रांतिकारी असतात. राजकारण, अर्थकारण हे तर झालेच, पण ती समाज बदलवतात. वैचारिक आस उलटेपालटे करतात. अनेक उदाहरणे आहेत त्याची. महायुद्धे घ्या. नाझिझम, फॅसिझम, कम्युनिझम यांस सुगीचे दिवस पहिल्या महायुद्धानंतर आले. दुसऱ्या महायुद्धाने जग वैचारिकतेच्या दोन ध्रुवांवर नेऊन ठेवले. अमेरिकेचा कल उजवीकडे वळला. तेथे 'रेड स्केअर' – साम्यवादाचे भय – आधीपासून होतेच. ते या महायुद्धाने गडद केले आणि तेथे 'मॅकार्थिझम' अवतरला...

प्रचंड असत्य, अपमाहिती, खोटे आरोप यांची राळ उडवायची. समोरील व्यक्तीचे चारित्र्यहनन करायचे. त्यास देशद्रोही ठरवायचे. समाजकंटक, धर्मशत्रू ठरवायचे, हे एकीकडे आणि दुसरीकडे लोकांसमोर सातत्याने एखादा शत्रू उभा करायचा. त्याच्यापासून आपल्याला, आपल्या राष्ट्राला, धर्माला धोका आहे, असे सांगायचे. त्यातून द्वेष आणि भयाचे वातावरण उभे करायचे. त्यामधून तयार होणाऱ्या भयग्रस्त, हिंस्र, उन्मादी झुंडींद्वारे समाजात दहशतीचे वातावरण निर्माण करायचे. हा 'मॅकार्थिझम'. तो अतिरेकी उजवा. सध्या देशोदेशी दिसणारा 'ट्रम्पिझम' ही त्याची सुधारून विकृत केलेली आवृत्ती.

**डाव्यांवर डोळा**

अशा काळात सरकारी पाळतशाहीला नेहमीच ऊत येतो. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या अमेरिकेत जे. एडगर हूव्हर यांच्या 'एफबीआय'ने स्वतःची पाळतशाही प्रस्थापित केली होती. 'डावे तेवढे देशद्रोही' या कथनावर ती अमेरिका चालत होती. सर्वसामान्य शिक्षक, कामगार यांच्यापासून चार्ली चॅप्लीनसारखे बडे कलाकार आणि रॉबर्ट जे. ओपेनहायमर यांच्यासारखे वैज्ञानिक यांच्यापर्यंत असंख्य लोकांवर 'एफबीआय'ची पाळत होती. त्यांचे दूरध्वनी चोरून ऐकणे, तारा फोडणे, त्यांच्या हालचालींवर पाळत ठेवणे, त्यांचे नातेवाईक आणि इष्ट मित्र परिवाराला त्यांच्याविरोधात साक्ष द्यायला लावणे, असे प्रकार सर्रास केले जात असत. पूर्व जर्मनीतली स्तासी, सोव्हिएत रशियातील गेस्टापो आणि अमेरिकेतील एफबीआय, तसेच 'हाऊस कमिटी ऑन अन-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज' नामक संसदीय समिती, या सर्वांचे रूप सारखेच भीषण होते. व्हिएतनाम युद्ध सुरू झाले आणि हे मॅकार्थीचे भूत उतरले.

याच काळात अमेरिकेची वैचारिक कूस बदलत गेली. 'मायबाप सरकार' ही अमेरिकेची संस्कृती कधीच नव्हती. तेथील मतदार कधीच 'लाभार्थी' नव्हते. सरकारला, लोकप्रतिनिधींना बिनदिक्कत प्रश्न विचारणे हा देशद्रोह नसतो, एवढी अक्कल असलेला देश तो. आपली गैरकृत्ये, भ्रष्ट आचार लपवण्यासाठी सत्ताधारी अनेकदा 'राष्ट्रीय सुरक्षा' नावाचा बुरखा घालतात, ही जाणीव असल्याने तेथील लोक सरकारला प्रश्न विचारण्यास आणि सरकारची लपवाछपवी चव्हाट्यावर आणण्यास कचरले नाहीत.

**एल्सबर्ग खटल्याचा सांगावा**

साठ-सत्तरचे ते दशक म्हणजे, तर अशा 'जागल्यां'च्या प्रभावाचा काळ म्हणावा लागेल. व्हिएतनाम युद्ध लढले जात असतानाच्या काळातच तेथे 'पेंटॅगॉन पेपर्स', 'वॉटरगेट' अशी प्रकरणे झाली. पेंटॅगॉन पेपर्स हा तर व्हिएतनाम युद्धाविषयीचा गोपनीय अहवाल. पण त्यातून आतापर्यंतच्या सरकारांनी अमेरिकी जनतेची कशी फसवणूक केली आहे, हे लक्षात येताच, तो अहवाल तयार करण्यात महत्त्वाचा सहभाग असलेले अर्थशास्त्रज्ञ आणि संरक्षण अभ्यासक डॉ. डॅनिएल एल्सबर्ग यांनी तो अहवाल फोडला. ज्यांचा सद्सद्विवेक, ज्यांचे 'जमीर' जागे असते अशी मंडळी करतात तसे. पेरी फेलवॉक हे त्यातलेच एक. अमेरिकी सरकारच्या पाळतखोरीचे रहस्योद्घाटन करणारा हा एडवर्ड स्नोडेनेचा पूर्वसुरी, एक आद्य 'जागल्या'.

'नॅशनल सिक्युरिटी एजन्सी' – एनएसए – या अमेरिकेच्या सर्वांत मोठ्या आणि प्रभावी हेरसंस्थेत वरिष्ठ विश्लेषक म्हणून काम करीत होते ते. त्या साडेतीन वर्षांत तुर्कीए, पश्चिम जर्मनी आणि व्हिएतनाममधील एनएसएच्या 'लिसनिंग पोस्ट'मधील कामाचा अनुभव त्यांच्या गाठीशी होता. या काळात एनएसए म्हणजे नेमके काय, हे त्यांच्या लक्षात आले. 'एनएसएमधील अनेक लोक या ना त्या प्रकारच्या बेकायदेशीर गोष्टींत सहभागी आहेत,' ही संस्था 'अश्लील पातळीवरची भ्रष्टाचारी' आहे, हे त्यांना समजत गेले. वयाच्या पंचविशीत त्यांनी एजन्सीचा राजीनामा दिला. याच काळात बाहेर व्हिएतनाम युद्धाच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर चळवळी सुरू होत्या. 'न्यू यॉर्क टाइम्स'चे पत्रकार नील शिहान यांनी 'पेंटॅगॉन पेपर्स'वरील वृत्तमालिका सुरू केली होती. हे पेपर्स फोडणारे डॉ. डॅनिएल एल्सबर्ग यांनी स्वतःहून न्यायालयात येऊन स्वतःस अटक करून घेतली होती. त्यांच्याविरोधात राष्ट्रीय गुपिते फोडल्याप्रकरणी खटला सुरू झाला होता. त्यांना किमान ११५ वर्षांसाठी तुरुंगात पाठवण्याची निक्सन प्रशासनाची धडपड होती. त्या प्रयत्नांपायी या प्रशासनाने जे केले, त्यातून पुन्हा एकदा सरकारचा पाळतखोर चेहरा समोर आला होता.

**सरकारपुरस्कृत घरफोडी**

सत्ताधाऱ्यांना ज्या व्यक्तीपासून 'धोका' वाटतो, तिला नेस्तनाबूत करण्यासाठी सरकार 'राष्ट्रीय सुरक्षा' या अस्त्राचा कसा वापर करते, त्याकरीता सुरक्षा यंत्रणांचा कसा वापर करते, 'सर्व्हेलन्स' साधनांचा कसा वापर करते, हे समजून घ्यायचे असेल, तर एल्सबर्ग खटला पाहावा. त्याच्याशी निगडित

असलेले 'फिल्डिंग ब्रेक-इन' प्रकरण पाहावे.

म्हणाल तर साधी घरफोडी होती ती. रात्रीचा एकचा सुमार होता. लॉस एंजेलिसमधील 'बेव्हर्ली हिल्स' या उच्चभ्रू भागातील त्या इमारतीपासून काही अंतरावर एक कार थांबली. तिघे जण उतरले. सकाळीच ते त्या इमारतीची 'रेकी' करून गेले होते. सराईतपणे ते आवारात शिरले. तयारीने आले होते ते. सोबत 'मास्किंग टेप' आणि 'ग्लास कटर' आणला होता. खालच्या मजल्यावरील खिडकीची काच कापून त्यांनी इमारतीत प्रवेश केला. जिन्याने वरच्या मजल्यावर गेले. तिथं अनेक कार्यालये. त्यातील एकाच्या दरवाजाचे कुलूप त्यांनी फोडले. डॉ. लुईस जे. फिल्डिंग नामक मानसोपचार तज्ज्ञाचे ऑफिस होते ते. तेथील एका कपाटात ठेवलेली सुटकेस त्यांनी बाहेर काढली. त्यांचीच होती ती. त्या दिवशी रात्री नऊ वाजता ते त्या कार्यालयात आले होते. तिथे सफाई काम करणाऱ्या एका स्पॅनिश महिलेला पटवून ती बॅग तिथे ठेवायला लावली होती त्यांनी.

बॅगेत ३५ मिमीचा कॅमेरा, फिल्मरोल, स्पॉट लाइट असे साहित्य होते. दोघांनी त्याची मांडामांड केली. तेवढ्यात एकाने तिथल्या फाइलींचे कपाट फोडले. त्यातली कोणती फाइल हवी आहे, याची कल्पना त्यांना आधीच देण्यात आली होती. थोड्या शोधानंतर फाइल सापडली. पण त्यात त्यांना हवे होते, ते कागद काही मिळाले नाहीत. तरीही त्यांनी त्या फाइलची छायाचित्रे घेतली. मग त्यांनी त्या फाइली अस्ताव्यस्त फेकून दिल्या. तेथील अन्य कपाटे क्रो-बारने फोडली. त्यातील सामान बाहेर भिरकावून दिलं. औषधाच्या गोळ्या सापडल्या. त्याही इतस्ततः टाकल्या. एकूण चित्र असे उभे केले, की जणू कोणी भुरटे चोर 'ड्रग्ज'साठी घुसले होते.

यामुळे पोलिसांनीही ती घरफोडी फार काही गांभीर्याने घेतली नाही. कालांतराने बेव्हर्ली हिल्समधल्या अन्य एका प्रकरणात पोलिसांच्या हाती एक भुरटा चोर लागला. अशा वेळी जगभरातले पोलिस अनेकदा जे करतात, तेच त्यांनी केले. 'यूसीएल लॉ जर्नल'मधील या प्रकरणाविषयीच्या लेखात तत्कालीन डेप्युटी डिस्ट्रिक्ट टर्नी स्टीफन ट्रॉट सांगतात, पोलिसांनी त्या भागातल्या सगळ्या घरफोड्यांचे खापर त्या चोराच्या माथ्यावर फोडले. खरे घरफोडे मोकळेच राहिले.

हे प्रकरण असेच निकाली राहिले असते. पण तसे व्हायचे नव्हते. यानंतर १७ जून १९७२ रोजी अशीच एक घरफोडी झाली. ती झाली वॉशिंग्टन डीसीमध्ये 'वॉटरगेट' नामक इमारत संकुलातील डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'राष्ट्रीय समिती'च्या मुख्यालयात. पण त्यातले घरफोडे रंगेहाथ पकडले गेले. छान बिझनेस सूटात, हातात सर्जिकल मोजे घालून घुसले होते ते. त्यांच्याकडून पोलिसांनी वॉकीटॉकी, पेनाएवढी टीअरगॅस गन, कुलुपे उघडण्याची हत्यारे जप्त केली. याशिवाय त्यांच्याकडे होते, दोन ३५ मिमी कॅमेरे, ४० फिल्मरोल आणि टेलिफोनबरोबरच खोलीतील सर्व संभाषण ऐकू शकणारी अशी अत्याधुनिक 'सर्व्हेलन्स' साधने. डेमोक्रॅटिक पक्षाच्या त्या मुख्यालयातील बोलणे ऐकायचे, त्यातून काही भलते-सलते हाती लागले तर त्याचा उपयोग निवडणूक प्रचारात करायचा, या हेतूने तेथे 'बगिंग' साधने बसवण्यासाठी त्यांचा तो सारा खटाटोप होता.

**'वॉटरगेट'च्या दणक्याने पाळतखोर सटपटले**

सत्ताधारी सत्ता टिकवण्यासाठी कोणत्या थराला जाऊ शकतात, याची असंख्य उदाहरणे जगभरात आहेत. त्यातले हे एक. 'वॉटरगेट प्रकरण' म्हणून ते गाजले. त्यावरून पुढे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना जावे लागले. सर्वज्ञात इतिहास आहे तो. येथे प्रश्न हा, या की वॉटरगेट संकुलापासून चार हजार ४०० किमी अंतरावर आणि ९ महिन्यांच्या अंतराने घडलेल्या बेव्हर्ली हिल प्रकरणाशी याचा काय संबंध?

संबंध आहे. वॉटरगेट प्रकरणाच्या खटल्याने त्या रात्री मानसोपचार तज्ज्ञाच्या कार्यालयात घडलेल्या घरफोडीच्या घटनेलाही वेगळी कलाटणी मिळाली. 'वॉटरगेट' खटल्यातून उघडकीस आले, की त्या पाच जणांमधील दोघांचा बेव्हर्ली हिल्समधील घरफोडीतही सहभाग होता. त्यांच्यावरच हे काम सोपवले होते, 'व्हाइट हाऊस'मधील 'स्पेशल इन्व्हेस्टिगेटिव्ह युनिट'ने. हे युनिट स्थापण्याची कल्पना होती, 'व्हाइट हाऊस स्पेशल कौन्सिल' चार्ल्स कॉल्सन यांची. हा निक्सन यांचा - माफिया डॉनचे 'कॉन्सिलिअरी' असतात, तसा - उजवा हात. एगिल क्रो हे त्या युनिटचे कारभारी. हेन्री किसिंजर यांचे माजी सहायक डेव्हिड यंग, माजी एफबीआय एजंट जी. गॉर्डन लिडी, तसेच माजी सीआए अधिकारी आणि हेरकादंबरीकार ई. हॉवर्ड हंट हे या गटाचे प्रमुख सदस्य. 'प्लंबर्स' म्हणून ओळखले जाई त्यांना. सत्ताधारी निक्सन प्रशासनास बाधक असलेल्या माहितीची गळती रोखणारे ते प्लंबर्स. फक्त या वेळी, म्हणजे



*प्रगल्भ लोकशाही देश असलेल्या अमेरिकेत विरोधकांना संपवण्याचे कारस्थान रचणारी अंत्यस्थ यंत्रणा सदा कार्यरत असते. पेंटगॉन पेपर्स प्रकरणात तिचा सहभाग पट्टीच्या खलनायकांनाही लाजवणारा होता...*

१९७१च्या त्या काळात माहिती आधीच फुटली होती. साधी नव्हती ती. 'पेंटॅगॉन'चे व्हिएतनाम युद्धासंबंधीचे गोपनीय अहवाल होते, ते.

१३ जून १९७१पासून 'न्यू यॉर्क टाइम्स'ने ती मालिका सुरू केली आणि निक्सन प्रशासन हादरले. ४७ खंड मिळून सात हजार कागदपत्रे ती. त्यातले कोणते कागद बाहेर येतात, त्याची चिंता त्यांना लागून राहिली. ती प्रसिद्ध होऊ नयेत, यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक केले. त्याचवेळी आणखी गळती होऊ नये, यासाठी व्हाइट हाऊसमधील 'प्लंबर्स' कामाला लागले. संशयाची सुई एल्सबर्ग यांच्यावर येऊन थांबली. ते भूमिगत झाले होते. आपल्याकडील सर्व महत्त्वाची कागदपत्रे विविध वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनी निर्णय घेतला, की आता न्यायालयात शरण जायचे. त्यांना अटक झाली. राष्ट्रीय गुपिते फोडल्याबद्दल खटला सुरू झाला.

अशा प्रकरणांमध्ये सरकारचा एक हातखंडा प्रयोग दिसतो. तो म्हणजे, समोरील व्यक्तीच्या चारित्र्यावर, नैतिकतेवर, हेतूंवर शंका निर्माण करणे. सर्वत्र हा प्रकार दिसतो. याचे आपल्याकडचे ताजे उदाहरण म्हणजे, सोनम वांगचूक. लडाखमधील पर्यावरण आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे काम चालवलेल्या वांगचूक यांनी सरकारविरोधात आंदोलन करताच, त्यांना अटक करण्यात आली आणि अटकेनंतर पहिल्यांदा सरकारच्या पाठीराख्यांनी काय सुरू केले, तर त्यांची बदनामी. ते 'डीप स्टेट'चे एजंट आहेत, देशद्रोही आहेत, अशा आरोपांची चिखलफेक करण्यात आली. पेंटॅगॉन पेपर्स खटल्यातही हेच करण्यात आले. माजी सीआए अधिकारी हॉवर्ड हंट यांनी कॉल्सन यांना पाठवलेला एक 'मेमो' या संदर्भात लक्षणीय आहे. त्या मेमोचा विषय होता – 'न्यूट्रलायझेशन ऑफ एल्सबर्ग' – एल्सबर्ग यांना संपवणे, प्रभावहीन करणे.

'सिक्रेट्स' या आपल्या आत्मकथनात एल्सबर्ग यांनी हा मेमो उद्धृत केला आहे. त्यात हंट यांनी लिहिले होते – 'एल्सबर्गवर एक फाइल तयार करण्यासाठीची एक प्राथमिक कार्ययोजना मी प्रस्तावित करीत आहे. एल्सबर्गविषयी उपलब्ध असलेली सर्व प्रकारची उघड, गोपनीय आणि बदनामी करणारी माहिती या फाइलमध्ये असेल. त्याची समाजातली प्रतिमा आणि विश्वासार्हता नष्ट करण्यासाठी हे आवश्यक प्राथमिक साधन आहे.' ही माहिती कशी गोळा करायची? हंट यांनी बरेच उपाय सुचवले होते. त्यातला एक होता – एल्सबर्ग यांचे गुप्तपणे मानसिक मूल्यांकन वा चाचणी करण्याची विनंती सीआयएला करणे. आणि दुसरा उपाय होता – त्यांच्या मानसोपचार तज्ज्ञाने त्यांचे जे विश्लेषण केले आहे ती फाइल मिळवणे. बेव्हर्ली हिल्समधील घरफोडी करण्यात आली होती, ती त्यासाठी. केवळ मानसोपचार तज्ज्ञाच्या कार्यालयातून एल्सबर्ग यांच्याविषयीची फाइल पळवण्यापुरताच हा विषय मर्यादित नव्हता. एफबीआयकडून एल्सबर्ग यांचे दूरध्वनी संभाषणही चोरून ऐकले जात होते, 'टॅप' केले जात होते. न्यायालयासमोर ही माहिती आली आणि हा सगळा खटलाच फिरला. या सरकारी गैरकृत्यांमुळे न्यायालयाने एल्सबर्ग यांच्यावरील तो खटला निकाली काढला.

पेरी फेलवॉक हे तेव्हा पंचविशीतले तरूण होते. व्हिएतनाममध्ये हेरगिरी केलेल्या फेलवॉक यांना त्या युद्धाचे खरे स्वरूप चांगलेच माहीत होते. आता एल्सबर्ग यांनी फोडलेले 'पेंटॅगॉन पेपर्स' त्यांच्यासमोर होते आणि प्रशासनाप्रमाणेच देशातील 'इंटेलिजन्स कम्युनिटी'ही कसा भ्रष्ट आचार करते, हेही ते जाणून होते. त्यांनी ठरवले, की ही माहिती लोकांसमोर आणायची. एनएसएचा पर्दाफाश करायचा. त्यातून समोर आले, जागल्यांच्या त्या काळातील एक अत्यंत स्फोटक प्रकरण...

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार–संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉः भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**

**संपर्कः** ravi.amale@icloud.com

# जॉन बर्ट्रांण्ड गुरडन : नियमांना खणखणीत अपवाद




सायली परांजपे





**वै**ज्ञानिक म्हणजे कोणी केस विस्कटलेला, चेहऱ्यावर कायम चिंताक्रांत भाव असलेला आणि मुख्य म्हणजे, प्रयोगशाळेत स्वत:ला कोंडून घेत जगापासून अलिप्त राहणारा, अगम्य भाषेत बोलणारा आणि अतर्क्यपणे वागणारा... अशा सर्व समजांना छेद देणारे होते, डॉ. जॉन बर्ट्रांण्ड गुरडन. बहुरंगी–बहुढंगी व्यक्तिमत्त्वाचे. साहित्य आणि साहसी खेळात रमणारे... स्क्वॉश खेळात तर राष्ट्रीय विजेते ठरलेले... शाळेत असताना तळाच्या क्रमांकाचे, एखाद्यास लाजिरवाणे वाटावे असे प्रगतिपुस्तक असलेले... पण याच गुरडन यांनी वैज्ञानिक संशोधनात विलक्षण झेप घेत सजीवांच्या विकासाला आवश्यक विशेष पेशींमधल्या जनुकीय माहितीचा शोध लावला, त्यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार दिला गेला... ऑक्टोबर २०२५ मध्ये मृत्यू पावलेल्या गुरडन यांच्या आयुष्याचा वेध घेणारा लेख अलीकडेच 'द लॅन्सेट'ने प्रकाशित केला. त्यावर आधारित हे टिपण...

**वै**ज्ञानिक म्हटला म्हणजे तो बुद्धिमान असणारच असे गृहीत धरणाऱ्या जगात स्वत:चे वर्णन 'नॉन-इंटलेक्चुअल' अर्थात अबौद्धिक किंवा विचारशून्य असे करणारा वैज्ञानिक तसा अपवादात्मकच म्हटला पाहिजे. अर्थात वैज्ञानिक या संकल्पनेत गृहितकांना फाटा देणे आणि नियमांना अपवाद ठरणे अभिप्रेत असल्याने हा खरे तर विरोधाभास नाही. गृहितके किंवा नियम आहेत, तसे न स्वीकारता त्याकडे नवीन दृष्टीने बघणारेच नवे काही शोधू शकतात. जॉन बर्ट्राण्ड गुरडन या नियमाला तरी अपवाद नक्कीच नव्हते.


SCIENCE REPORT Summer HALF, 1949.

NAME GURDON Division D22 Subject Biology.

Place 15/15 17/18 15/18 Marks 231/550

It has been a disastrous half. His work has been far from satisfactory. His prepared stuff has been badly learnt, and several of his test pieces have been torn over; one of such pieces of prepared work scored 2 marks out of a possible 50. His other work has been equally bad, and several times he has been in trouble, because he will not listen, but will insist on doing his work in his own way. I believe he has ideas about becoming a Scientist; on his present showing this is quite ridiculous, if he can't learn simple Biological facts he would have no chance of doing the work of a Specialist, and it would be sheer waste of time, both on his part, and of those who have to teach him.

*शालेय जीवनात शिक्षकांनी 'ढ' ठरवून, याचे काही खरे नाही असे मत नोंदवत तळाचा क्रमांक अधोरेखित करणारे गुण दिले. हाच कागद गुरडन यांना प्रेरणा देत राहिला... म्हणूनच तो फ्रेमच्या रूपात सतत त्यांच्या सोबतही राहिला...*

७ ऑक्टोबर २०२५ रोजी युनायटेड किंगडममधील हार्डिंगहॅम येथे वयाच्या ९२व्या वर्षी गुरडन यांचे निधन झाले. 'द लॅन्सेट'ने ११ एप्रिल २०२६ रोजी प्रकाशित (खंड ४०७) अंकात त्यांच्या बहुरंगी-बहुढंगी आयुष्याचा पट मांडला आहे. हा लेख लिहिला होता, तल्हा बुरकी यांनी. हे इथे आवर्जून नमूद केले पाहिजे की, पहिल्या काही विकासात्मक जैववैज्ञानिकांमध्ये त्यांची गणना केली जाते. त्यातही लक्षणीय बाब म्हणजे, त्यांची कामगिरी केवळ विज्ञान क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती. ते नोबेल पुरस्कारप्राप्त वैज्ञानिकही होते आणि स्क्वाशचे (दुहेरी) राष्ट्रीय विजेतेही. स्किइंग आणि आइस स्केटिंगमध्ये तर ते विलक्षण तरबेज होते.


परिपक्व सामान्य पेशींपासून आदीपेशी किंवा मूलपेशी (स्टेम सेल्स) सर्वप्रथम तयार करणारे वैज्ञानिक म्हणून प्रसिद्ध असणारे आणि त्यासाठीच नोबेल पुरस्काराने गौरवले गेलेले गुरडन यांच्या दीर्घ आयुष्याचा पट मांडायला गेले, तर त्यांचे आयुष्य जेवढे दीर्घ होते, तेवढेच सखोलही होते आणि विस्तृत, बहुआयामीही होते, हे लक्षात येते.

२०१२ साली शरीरविज्ञान/वैद्यक विभागात नोबेल पुरस्कार (विभागून) प्राप्त करणाऱ्या गुरडन यांचे एकंदर आयुष्यच 'अपवादाने नियम सिद्ध होतो' या उक्तीचा प्रत्यय देणारे होते. दोन ऑक्टोबर (भारताच्या आणि संपूर्ण जगाच्याही दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस) १९३३ रोजी युनायटेड किंगडम मधल्या डिपनहॉल येथे जन्मलेल्या गुरडन यांच्या बुद्धिमत्तेची (त्यांना पुढेही मान्यच नसलेल्या) चमक लहानपणी वगैरे तर अजिबातच दिसत नव्हती. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, या म्हणीला गुरडन सणसणीत अपवाद होते. १९४९ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी एटन कॉलेजमध्ये शिकत असताना गुरडन यांनी संपूर्ण वर्ष जीवशास्त्र विषयात कमीतकमी गुण मिळवण्याचा पराक्रम साधला होता. २५० विद्यार्थ्यांमध्ये वर्षभर तळाला राहणे, हे लक्षणीय यश वाटत असल्याचे त्यानंतर साठेक वर्षांनी 'द गार्डियन'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले होते.

**तळाचा विद्यार्थी ते हाडाचा संशोधक**

अर्थात, गुरडन यांच्या शिक्षकांचे मत काहीसे वेगळे होते. 'जॉन गुरडनची कामगिरी अजिबात समाधानकारक नसल्याचे' प्राध्यापकांनी प्रगतिपुस्तकात नमूद केले होते. त्यांनी पुढे जे काही लिहिले होते, त्यात खोल अर्थ दडलेला होता. 'गुरडन अनेकदा अडचणीत सापडतो, कारण तो कुणाचेही ऐकत नाही आणि स्वत:ला वाटेल तेच करण्याचा त्याचा आग्रह असतो. त्याच्या डोक्यात वैज्ञानिक वगैरे होण्याचे विचार आहेत, पण सध्याची त्याची कामगिरी बघता ते हास्यास्पदच वाटतात.' प्राध्यापकांना गुरडन यांचे विचार हास्यास्पद वाटत असले, तरी परीक्षेतले गुण वगैरे बिनमहत्त्वाच्या ऐहिक गोष्टी धाब्यावर बसवून स्वत:ला वाटेल तेच करत राहण्याची गुरडन यांची वृत्तीच त्यांना पुढे संशोधनात खोलवर घेऊन गेली यात वाद नाही. कधीही एखादा प्रयोग अयशस्वी ठरला, तर एटन कॉलेजमधील प्राध्यापकांचा तो शेरा आपल्याला आठवत होता आणि नाही तरी आपण एवढे पात्र कुठे आहोत, असा विचार निराशा टाळण्यात उपयोगी पडत होता, असे गुरडन यांनी वारंवार नमूद केले होते.

एटन कॉलेजमधील त्या तळाच्या स्थानापासून नोबेल पुरस्कारापर्यंतचा गुरडन यांचा प्रवास सरळसोट अजिबात नव्हता. त्यांनी आधी काय केले, तर अभिजात साहित्याचा अभ्यास केला, मग प्राणीशास्त्राकडे मोर्चा वळवला. म्हणजे,



*हार मानायची नाही. चुकीची गृहीतके मांडायची नाहीत, प्रत्यक्ष प्रयोग करून वैज्ञानिक सत्य शोधायचे, या वृत्तीची झलक गुरडन यांच्या पुस्तकात पाहायला मिळते...*

सहसा साहित्याकडून विज्ञानाकडे निदान आपल्याकडे तरी कोणी वाट वाकडी करून जात नाही, पण गुरडन गेले. ऑक्सफर्ड विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर बेडकाच्या प्रजातींतील न्युक्लिअर ट्रान्सप्लाण्टेशन हा विषय त्यांनी डी.फिल.साठी घेतला. डेव्हलपमेंटल बायोलॉजीत म्हणजेच विकासात्मक जैवविज्ञानात त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली. अमेरिकेत कॅलटेकमध्ये पोस्ट डॉक्टरल अभ्यास पूर्ण केल्यानंतर ते ब्रिटनमध्ये परत आले. त्यानंतर ते ऑक्सफर्ड विद्यापीठ सोडून केम्ब्रिज विद्यापीठाच्या मेडिकल रिसर्च कौन्सिल लॅबोरेटरी ऑफ मॉलिक्युलर बायोलॉजी या विभागात काम करू लागले. त्यांनी संशोधनाचे काम याच प्रयोगशाळेतून पुढे सुरु ठेवले. १९८३ साली ते केम्ब्रिज विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करू लागले. तिथपासून ते पुढे सुमारे ५० वर्षे ते केम्ब्रिजमध्ये कार्यरत होते.

**पथदर्शी संशोधन**

गुरडन यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीला म्हणजे १९५०च्या दशकात पेशी विभेदन ही अपरिवर्तनीय प्रक्रिया असल्याचे मानले जात होते. विकास घडवून आणणारी जनुकीय माहिती विशेषीकृत पेशींनी गमावलेली असते, असे तेव्हा गृहीत धरलेले होते. मात्र गृहितके मान्य करून पुढे जाण्याचा गुरडन यांचा स्वभावच नव्हता. ते प्रत्येक गृहितकावर प्रश्न उपस्थित करु लागले. हे गृहीतक तपासून बघण्यासाठी त्यांनी अतिनील किरणांचा वापर करून बेडकाच्या अफलित अंड्याच्या पेशीतून केंद्रक बाहेर काढला. मग त्यांनी टॅडपोलच्या अर्थात छोट्या बेडकाच्या परिपक्व आतड्यातील पेशीत हा केंद्रक प्रत्यारोपित केला. त्या अंड्याचा विकास फलीत होण्याजोग्या भृणात झाला, म्हणजेच टॅडपोलचा क्लोन तयार झाला. एक नवीन जीव निर्माण करण्यासाठी आवश्यक ती सर्व जनुकीय माहिती आतड्याच्या पेशीत सुरक्षित होती, हे यातून सिद्ध झाले. त्यातून अनेक प्राण्यांचे क्लोन तयार करण्यात आले. २००६ मध्ये जपानी वैज्ञानिक शिन्या यामानका यांनी याच पार्श्वभूमीचा आधार घेऊन परिपक्व पेशांचे रिप्रोग्रामिंग करून त्यातून बहुसंभवी (प्लुरीपोटेण्ट) मूळपेशी करण्याचे तंत्र विकसित केले. गुरडन यांना २०१२ मध्ये यामानका यांच्यासोबतच विभागून नोबेल पुरस्कार दिला गेला.

**सन्मानाचा टप्पा**

१९९१ मध्ये गुरडन यांनी त्यांचे दीर्घकाळापासूनचे सहयोगी व एकेकाळचे पीएचडीचे विद्यार्थी रॉन लास्की यांच्यासमवेत वेलकम ट्रस्ट/कॅन्सर संशोधन मोहीम संस्था स्थापन केली. २००४ साली याच संस्थेचे नाव गुरडन यांच्या सन्मानार्थ बदलण्यात आले. त्यावेळी गुरडन यांनी ऐंशी वर्षांचा टप्पा ओलांडला असला तरी ते प्रयोगशाळेतील कामासाठी अद्याप वेळ राखून ठेवत होते. संशोधनाचे काम सुरू असेल तेव्हा ते कुणालाही भेटायचे नाहीत. त्यांच्या हातातील प्रकल्पावर ते पूर्ण लक्ष केंद्रित करायचे, आपण जे काही करतो, ते उत्तम झाले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता, असे लास्की यांनी आवर्जून सांगितले. सध्या लास्की केम्ब्रिज विद्यापीठातील ॲनिमल एम्ब्रायोलॉजी विभागात एमेरिटस प्रोफेसर आहेत.

१९७०च्या आणि १९८०च्या दशकात गुरडन यांनी अनेक परीक्षणे लिहिली, प्रयोगांचे अहवाल व अन्य विज्ञानावर आधारित निबंध प्रसिद्ध केले. गुरडन यांचे राजकीय विचार 'मध्यममार्गी' होते, तर धर्माबाबतचे विचार अज्ञेयवादी होते. आपण उदारमतवादी म्हणवले जाऊ शकतो, असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते.

सोबत काम करणाऱ्या लोकांना गुरडन खूप मदत करायचे, पण स्वत: जगापासून अलिप्त होत, प्रयोग करताना त्यांना

होणारा आनंद विलक्षण असायचा, असे गुरडन इन्स्टिट्यूटचे संचालक  डॉ. बेन सायमन्स यांनी नमूद केले. गुरडन सर्वांना मदत तर करायचेच पण त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव त्याहून सुखद व्हायचा, तो त्यांच्या विनोदबुद्धीमुळे असेही त्यांनी आवर्जून सांगितले. तर, मला ठावूक नाही, जॉनच्या प्रयोगशाळेच्या मांडवाखालून किती संशोधक गेले, पण मला एवढे ठावूक आहे की, गेलेला प्रत्येक जण जॉनबद्दल प्रचंड कृतज्ञता जपून होता. त्यात मी एक नक्कीच आहे, असे अनुभवाधारित निरीक्षण लास्की यांनी नोंदवले.

गुरडन स्वत:ला नॉन-इंटलेक्चुअल वगैरे म्हणत असले तरी अफाट बुद्धिमत्ता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा भाग होता. मात्र विद्वत्तेचा अविर्भाव, बडेजाव त्यांनी कायमच टाळला. त्यांना वाचनाची तशी आवड नव्हती. त्याऐवजी मोकळा वेळ ते स्किइंग, आइस स्केटिंग वगैरे गोष्टींत घालवायचे.

एटन कॉलेजमधील प्राध्यापकांनी दिलेला शेरा तर त्यांच्या आयुष्यात खूपच महत्त्वाचा होता. 'गुरडन यांनी नोबेल पुरस्काराचा उल्लेख केला नसेल, एवढ्या वेळा त्या प्रगती पुस्तकाचा उल्लेख करायचे,' असेही डॉ. सायमन्स यांनी आवर्जून सांगितले. गुरडन यांनी त्यांच्या ऑफिसमध्ये अन्य कोणत्याही पुरस्काराचे मानपत्र किंवा तत्सम काही लावण्याआधी त्या प्रगती पुस्तकाचा कागद फ्रेम करून लावला होता. कदाचित, तेच त्यांच्या एकंदर चाकोरीबाह्य जगण्याचे प्रतीकही होते.

**लेखिका, अनुवादिका असलेल्या सायली परांजपे यांची 'राया' (अनुवादित), 'शहीद भगतसिंग', 'क्रांतिज्योती सावित्राबाई फुले', 'सम्राट अशोक', ही लघुचरित्रपर पुस्तके प्रकाशित आहेत. सायली या 'समतावादी मुक्त संवाद पत्रिके'च्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्या आहेत.**
**संपर्क :** sayalee.paranjape@gmail.com

## सांख्यिकी आणि नवीन ज्ञान

डार्विनची पत्रे हा एक खजिना आहे. एसा ग्रे (१८१०-१८८८) या अमेरिकी वनस्पती वैज्ञानिकास डार्विनने २९ नोव्हेंबर १८५७ रोजी उत्क्रांतीबाबतचे पत्र लिहिले होते. त्यातील एका महत्त्वाच्या विधानाचा आशय- 'माझी उत्क्रांतीची थिअरी थोड्याच तथ्यांवर - 'फ्यु फॅक्ट्सवर' आधारित आहे. ती खरं तर आनुमानिक तर्कावर उभी आहे.'


माझ्या ओळखीचे एक सद्‌गृहस्थ आहेत, त्यांना जैवविज्ञानातील किस्से वजा माहिती दिली, म्हणजे ते लगेच म्हणतात, हे 'स्टॅटिस्टिकली सिग्निफिकन्ट-सांख्यिकीय दृष्टीने लक्षणीय आहे का? हे तपासून पाहिले पाहिजे.' परंतु, नवीन ज्ञानाची निर्मिती ही 'सांख्यिकी'वर अवलंबून असतेच असे नाही. नवीन ज्ञानाच्या निर्मितीसाठी सखोल विचार आणि प्रज्ञेची भरारी लागते. उत्क्रांतीच्या विचाराने अनेक ज्ञानदालने उघडली, तरीही विज्ञानात ती एक थिअरी आहे, असेच मानले जाते. कारण विज्ञानाची कवाडे भरारी करता नेहमीच खुली असतात.

विचारांचे चक्र लोकशाहीकडे गेले. कारण लोकशाहीत सगळेच बहुमतावर, बहुसंख्येवर अवलंबून असते. कार्ल पॉपर (१९०२-१९९४) हे तत्त्वज्ञ होतेच आणि विज्ञानाचेही तत्त्वज्ञ होते. त्यांच्या 'द ओपन सोसायटी अँड इट्स एनिमीज' या पुस्तकातील नोंदी बघितल्या. विज्ञान आणि राजकारण यांचे संमिलन साधणारे हे लेखन आहे. त्याच्यातील एका ठळक विधानाचा आशय असाः ''बहुमत नेहमीच बरोबर असते म्हणून आपण लोकशाहीवादी नसतो, तर आपल्याला ठाऊक असते की, लोकशाहीतील परंपरा 'कमीत कमी वाईट'-'लीस्ट इव्हिल' असतात म्हणून आपण लोकशाही स्वीकारतो.'' भारताच्या संविधानकर्त्यांनी असा विचार केला असावा. समाजात असे काही धुरीण असतात, जे निवडणुकीच्या रिंगणात उतरत नाहीत, पण त्यांचे विचार कायदे करताना उपयोगात येतील म्हणून अशांना राष्ट्रपतींच्या वतीने राज्यसभेवर नियुक्त केले जाते. लोकशाहीत असे अनेक 'चेक्स आणि बॅलन्सेस' नियंत्रण आणि संतुलनाचे मार्ग असतात.

**- टिपक**

# पाठराखण

## बुकहुंदडकी





पंकज भोसले हा एक विलक्षण आणि अघोरी वाचक आहे, त्याचा प्रत्यय त्याच्या बुकहुंदडकी या पुस्तकातून येत राहतो. दुर्मीळ पुस्तकांचा चिकाटीने शोध घेणारे, त्यापायी तहानभूक विसरून पिशें होणारे, हजारो पुस्तकांचा संग्रह असलेले आणि दिसामाजी यांच्या फडशा पाडणारे वाचक मराठीत अनेक आहेत; पण त्याहून पंकजचं वेगळेपण असं की, कुठूनतरी हाती आलेल्या एखाद्या छोट्याशा संदर्भधाग्याचं बोट पकडून एखाद्या लेखकाचा शोध घेत जाताना तो त्या लेखकाची समग्र पुस्तकं, आपल्या पुस्तकांविषयी, लेखनप्रक्रियेविषयी लेखकाने कुठे कुठे केलेल्या नोंदी, त्याच्याविषयी इतरांनी दुनियेच्या कानाकोपऱ्यातल्या मासिका–वर्तमानपत्रांतून कधीकाळी लिहिलेलं, असं सगळंच शोधून वाचतो. ते वाचताना सापडलेल्या अन्य धाग्यावरून त्या लेखकाचं वाचन, त्याचे स्वभावविशेष, लेखनप्रक्रिया, लेखन–वाचनाशी निगडित सवयी, आवडीनिवडी अशा असंख्य गोष्टी उभ्या करतो. एखादा शतकापूर्वीचा अलक्षित लेखक असो वा आधुनिक काळातील वाचकप्रिय सुपरिचित, पंकज भोसले त्याला इतक्या विविध परिप्रेक्ष्यांतून आपल्यासमोर आणतो की आपण थक्क होऊन जातो. आपण स्वत:ला अट्टल वाचक समजत असलो, तरीही पंकजने दाखवलेल्या परिमितींबाबत आपण अद्याप अज्ञानी होतो, हे मनोमन कबूल करावं लागतं.

बुकहुंदडकी या वैशिष्ट्यपूर्ण आणि अर्थवाही शीर्षकाच्या पुस्तकातील दि. बा. मोकाशी, जी. ए. कुलकर्णी, भानू शिरधनकर, चंद्रकांत खोत, भाऊ पाध्ये, नारायण धारप यांसारख्या लेखकांवरील किंवा मराठीतील अश्लील पुस्तकांचे लेखन वा प्रकाशन करणाऱ्यांविषयीची टिपणे वाचनाता पंकजने दाखवलेल्या या लेखकांच्या पुस्तकांतील आपल्या नजरेतून निसटलेल्या जागा, त्यांचे वाचनानुभव आणि निर्मितीप्रक्रियेचा वेध, शैलीविशेष आणि तुलनात्मक निरीक्षणांच्या नोंदी, त्या अनुषंगाने समोर येणारे विविध वाङ्मयीन कालखंडातील वाचनधारणा प्रभावित करणारे आणि आपली मानसिकता अधोरेखित करणारे घटक हे सारंच अद्‌भुत आहे; अचंबित करणारं आहे. लोकप्रिय साहित्य व त्याच्या निर्मात्यांकडे गांभीर्याने पाहात दिलेले असंख्य तपशील हेही या पुस्तकाचं एक वैशिष्ट्य आहे. लेखक आणि त्यांची पुस्तकांची दुनिया यांविषयी मराठीत लिहिल्या गेलेल्या पुस्तकांमध्ये महत्त्वाचं ठरणारं हे पुस्तक आहे...

**– प्रवीण दशरथ बांदेकर**

बुकहुंदडकी
लेखक : पंकज भोसले
प्रकाशक : शब्द पब्लिकेशन
मूल्य : ६९५ रुपये

# क्रीडा महासत्तेचे बहुमोल धडे



गजानन जोशी

**शोधक नजर**




*बीजिंग स्पोर्ट्‌र्स युनिव्हर्सिटीचे स्टेडियम आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चीनचा झेंडा फडकवणारे खेळाडू...*

**भारत आणि चीन हेच दोन देश अशिया खंडामध्ये खूप प्रगत मानले जातात. परंतु, तंत्रज्ञान, विज्ञान, पायाभूत सुविधा, शिक्षण, संशोधन, आरोग्य, अर्थकारण, ग्रामीण विकास, वीज निर्मिती, शाश्वत ऊर्जा आदी क्षेत्रांत चीन जसा अग्रेसर आहे, तसाच तो आता क्रीडा क्षेत्रांतही फार पुढे दिसत आहे. वस्तुतः भारत हा सुद्धा खेळाची आवड असलेल्यांचा देश आहे. परंतु त्या प्रमाणात भारतात सोयी–सवलती आणि प्रोत्साहन मिळत आहे का? नसेल तर का? कोणत्या बाबतीत आपण पाठीमागे आहोत? काय करता येईल?**

**ची**न आणि चीनमधील क्रीडा संस्कृती या विषयांतर्गत आजपर्यंत मांडलेले विचार, मत आणि माहिती हे सारे एक जाणकार सजग भारतीय म्हणून जसे आकलन झाले तसे मी मांडले आहेत. एक तज्ज्ञ म्हणून माझी कुवत नाही, त्यामुळे हे तज्ज्ञाचे विचार अजिबात नाहीत. मित्र रेन आणि मैत्रीण जेन या दोघांसोबतच माझा आणखी मित्र चीनमध्ये आहे, त्याने देखील चीन आणि तिथली खेळ संस्कृती याबद्दल वेळोवेळी माहितीसंपृक्त मार्गदर्शन केल्यामुळे मला हे सगळे लिहिता आले. या माझ्या मित्राने चीन मधल्याच एका स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमधून रोविंग या खेळामध्ये, होय, तुम्ही योग्य तेच वाचताहात, चक्क रोविंग या खेळामध्ये डॉक्टरेट (पीएच.डी.) मिळवली आहे. संपूर्ण जगभर या खेळाच्या निमित्ताने सध्या त्याचे भ्रमण सुरु असते.

आजच्या घडीला भारत आणि चीन हेच दोन देश अशिया खंडामध्ये खूप प्रगत मानले जातात. मात्र वस्तुस्थिती ही आहे की, चीन फार पुढे आहे, बहुतेक सर्व बाबतीत, ज्यामध्ये तंत्रज्ञान, विज्ञान, पायाभूत सुविधा, शिक्षण, संशोधन, आरोग्य, अर्थकारण, ग्रामीण विकास, वीज निर्मिती, शाश्वत ऊर्जा (सौर ऊर्जा इ.) आणि खूप काही. आता यामध्ये क्रीडा हा देखील एक विषय आहे, ज्यामध्ये चीन फारच पुढे दिसत आहे.

भारतामध्ये देखील खूप मोठ्या प्रमाणात खेळांची आवड आहे. परंतु त्याप्रमाणात सोयी-सवलती आणि प्रोत्साहन मिळत आहे का? नसेल तर का नाही? कोणत्या बाबतीत आपण पाठीमागे आहोत? काय करता येईल?

**चीनची आंतरराष्ट्रीय भरारी**

वरील प्रश्न समजून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या घटना आणि काळाचे आकलन गरजेचे आहे.

१) आशियाई खेळांची सुरुवात १९५१, भारतामध्ये (नवी दिल्ली) भारताचा सहभाग, परंतु चीनचा नाही. (अंतर्गत राजकीय/सामाजिक परिस्थिती)

२) चीनने अमेरिकेतल्या लॉस एंजेलीसमध्ये १९८४ ऑलिम्पिक्सपासून उन्हाळी ऑलिम्पिक्स स्पर्धांमध्ये खऱ्या अर्थाने भाग घेण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी आंतरराष्ट्रीय आणि अंतर्गत विवादामुळे त्यांचा फक्त प्रतिकात्मक सहभाग नोंदवला. भारताने मात्र त्यापूर्वी कित्येक दशकांपासून या स्पर्धेत कायम भाग घेतलेला आहे.

३) चीनने पहिला सहभाग नोंदवला, आशियाई स्पर्धेमध्ये, सन १९७४ साली. बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीची स्थापना आधीच्या जुन्या नावाने १९५३ साली झाली आणि १९९३ पासून आताच्या बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी या नावाने ती ओळखली जाऊ लागली.

४) आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये चीन १९७४ मध्ये तृतीय क्रमांक, १९७८ मध्ये द्वितीय क्रमांक आणि सन १९८२ पासून सलग प्रथम क्रमांक. तर भारत बऱ्याच वेळेला सहाव्या ते आठव्या क्रमांकावर आणि २०२२ मध्ये मात्र आपण चौथ्या क्रमांकावर पोहोचलो आहोत.

५) वरील क्रमवारी मध्ये पदकांची संख्या जर बघितली, तर साधारणपणे २०० ते ३०० पदकांचा फरक भारत आणि चीन यांच्या एकूण पदकांमध्ये आहे. चीन २०० ते ३०० जास्त पदक घेऊन प्रत्येक आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताच्या खूप पुढे आहे.

६) चीनने ऑलिम्पिकमध्ये पुरुष आणि स्त्रिया या खेळाडूंचे प्रमाण एकतर समान किंवा स्त्रियांच्या संदर्भाने जास्त ठेवले आहे किंवा त्यांच्याकडून ते तसे झाले आहे. भारताचे मात्र स्त्री खेळाडूंचे प्रमाण सध्याच्या काही वर्षांमध्ये पुरुष खेळाडूंच्या तुलनेत फक्त ४० टक्के ते ५० टक्के आहे. परंतु १९७६ पर्यंत ते १ ते २ टक्के होते, तर काही वर्षी स्त्रियांचा सहभाग नाहीच, अशी परिस्थिती.

७) चीनने १९८४ साली प्रथमच उन्हाळी ऑलिम्पिक्स मध्ये भाग घेतला तेव्हा एकूण खेळाडू होते, २१५ (१३२ पुरुष, ८३ स्त्रिया) आणि २०२४ मधील उन्हाळी ऑलिम्पिक्समध्ये एकूण खेळाडूंची संख्या होती, ४०५ (१३६ पुरुष, २६९ स्त्रिया), भारताच्या संदर्भाने हीच संख्या १९८४ मध्ये होती, ४८ (४२ पुरुष, ०६ स्त्रिया) तर २०२४ मध्ये एकूण खेळाडू होते, ११७ (७० पुरुष, ४७ स्त्रिया)

८) बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमध्ये किती विविध विषयांचे विभाग आहेत, हे आपण बघितले. खेळाकडे नुसता एक खेळ म्हणून नाही किंवा खेळाडूकडे नुसतेच खेळाडू म्हणून नाही, तर त्याही पलीकडे जाऊन किती विविध पैलूंचा अभ्यास आणि प्रशिक्षण दिले जाते हे आपण बघितले. आपल्याकडे अशा तऱ्हेने सुविधा आहेत का?

९) चीनमध्ये खेळांसाठी खूप मोठ्या प्रमाणात तरतुदी अर्थसंकल्पामध्ये केल्या जातात. भारताच्या जवळ जवळ आठ पटीने या अर्थसंकल्पीय तरतुदी आहेत. बऱ्याच वेळेला चीनच्या कोणत्याही बातमीकडे आपल्याला संशयाने



*ऑलिम्पिकसारख्या अतिभव्य स्पर्धा केवळ पैशांच्या बळावर नव्हे, तर खोलवर मुळे रुजलेल्या क्रीडा संस्कृतीच्या बळावर भरवता येतात आणि त्यात अव्वल स्थानही पटकावता येते, हा धडा चीनने जगाला दिला आहे...*

पाहण्याची सवय झाली आहे. काही बाबतीत ते खरेही आहे. परंतु चीनमधील खेळासाठी सोयी-सुविधा-सवलती-पायाभूत सुविधा बघितल्यावर हे खरेच वाटते. आपण यावर कधी विश्वास ठेवणार आणि कधी विचार करणार?

१०) चीनमध्ये ज्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात खेळ संस्कृती रूजविली गेली आहे आणि खेळांसाठी पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात पुरविण्यात आल्या आहेत, त्यामुळे स्पोर्ट्स इकॉनॉमी ही चीनमध्ये एक मोठ्या प्रमाणात आकर्षणाचे कारण बनली आहे. आपल्याकडे स्पोर्ट्स इकॉनॉमी हा घटक महत्त्वाचा समजला जातो का? एका वृत्तपत्राच्या बातमीनुसार चीनने सन २०३० पर्यंत स्पोर्ट्स इकॉनॉमीचे जवळ जवळ ९०० बिलियन अमेरिकन डॉलर्स इतके लक्ष्य साध्य करण्याचे ठरवले आहे. चीनमध्ये लहाणपणापासूनच आपल्या आवडीचे विषय शिकण्याची मुभा, त्यासाठी घरातून मनापासून मिळणारा पाठिंबा, सरकारकडून तेवढ्याच सकारात्मक पद्धतीने साधनसुविधांचा पुरवठा, अतिशय समर्पितपणे आणि विचार करून ध्येय निश्चिती आणि आखणी, शिक्षण-प्रशिक्षणाचे तेवढेच अनुभवी शिक्षक-प्रशिक्षक, वैज्ञानिक अंगाने प्रत्येक खेळ-खेळाडू यांची निवड आणि संपूर्ण झोकून देऊन प्रयत्न करणे, याला दुसरा पर्यायच ठेवलेला नसतो. जेव्हा एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन, पाठबळ, शिक्षण, सुविधा मिळतात, तेव्हा दंडुका घेऊन खेळाडूंच्या मागे लागण्याची गरजच नाही उरत. असे उत्साही आणि पूर्णपणे कौशल्य मिळवलेले तरबेज खेळाडू पदके मिळवणारच.

**भारत कुठे?**

आज आपल्याकडे किती मोठ्या प्रमाणात तरुणांची संख्या आपली ताकद आणि वेळ फुकट घालवीत आहे? त्यांच्या मेंदूला आणि हाताला काम नसल्यामुळे मग त्यांची ऊर्जा ही नको त्या आणि समाजाला उपयोगी नसणाऱ्या आणि दुर्दैवाने समाज विघातक गोष्टींकडे आपसूक वळणारच. या तरुणांच्या संख्येमध्ये, एक मोठा वर्ग चांगल्या खेळाडूंचा असू शकतो. ज्यांना योग्य सुविधा आणि मार्गदर्शन मिळाले, तर देशासाठी आणि समाजासाठी त्याचा फायदाच होणार आहे.

चीनचे क्रीडा मंत्री स्वत: बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमधून खेळांमध्ये पदवीधारक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या खेळांचा अर्थसंकल्प आणि स्पोर्ट्स इकॉनॉमी या संदर्भात काम सुरू आहे. आपल्याकडे याबाबतीत काय परिस्थिती आहे? मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान यांनी कधी तरी आपल्याकडे क्रीडा विभाग घेतला आहे का, नसेल तर का नाही? आपण क्रीडा विभागाला खऱ्या अर्थाने महत्त्व देऊन प्राधान्यक्रम वरचा ठेवणार का?

एक शेवटचा मुद्दा सांगून माझं चीन आणि चिनी क्रीडा संस्कृती या संदर्भातील लिखाण थांबवत आहे. चीनच्या बीजिंग स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमध्ये चॅम्पियन (चॅम्पियन रोड) रस्ता याच्याबद्दल मी मागील महिन्यात प्रकाशित लेखात सांगितले आहे. सोयी-सुविधा आणि अतिशय प्रगतीशील धोरण आणि शिक्षण, प्रशिक्षण याबरोबरच 'चॅम्पियन रोड' ही अतिशय महत्त्वाची बाब तेथे इतर विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचे प्रेरणा स्थान आहे. आपल्याकडे सुद्धा अशा तऱ्हेने ज्या काही क्रीडा प्रशिक्षण संस्था आणि संकुल आहेत, तेथे याची अंमलबजावणी केली तर एक वेगळी स्फूर्ती-चैत्यन्याची लाट तयार होईल. परंतु फक्त खेळापुरतेच मर्यादित न राहता असे चॅम्पियन रोड प्रत्येक मोठ्या शैक्षणिक संस्था/कॉलेज/विद्यापीठे जसे कला-वाणिज्य-विज्ञान-अभियांत्रिकी-फाइन आर्ट्स आणि प्रत्येक शैक्षणिक संस्थांमध्ये बांधला गेला पाहिजे, असे माझे प्रामाणिक मत आहे. कदाचित चॅम्पियनच्या ऐवजी आपण त्याला दुसरे नाव देऊया. परंतु निदान अशा तऱ्हेचा रस्ता

जरी आपण बांधायचे ठरविले, तरी एक महत्त्वाचे पाऊल सकारात्मक पद्धतीने टाकल्याचे श्रेय आपल्या सगळ्यांना मिळेल आणि आपोआपच पुढची यशस्वी वाटचाल वेगाने होण्यास मदत होईल. असे चॅम्पियन रोड विद्यार्थ्यांना नक्कीच उत्तेजना देत राहतील आणि देशाच्या सकारात्मक भरभराटीला चालना मिळेल.

चीन हा देश काय आहे? त्यांची सरकारे काय करतात याबद्दल जरी आपण साशंक असलो, तरी खेळाच्या बाबतीत जागतिक पटलावर त्यांनी आपले नेतृत्व कायम सिद्ध करून दाखविले आहे. आपण काय शिकणार? आपले खेळाडू काय शिकणार? त्याही पेक्षा आपण समाज आणि सरकार म्हणून काय शिकणार, हा यातला महत्त्वाचा मुद्दा आहे.

चीन आणि चिनी क्रीडा संस्कृती यानंतर चीनमधील पायाभूत सुविधा विशेषतः वीज निर्मिती-सौर ऊर्जा तसेच औद्योगिक वातावरण-तेथील वैज्ञानिक आणि शास्त्रीय वेगवान प्रगती तसेच या अनुषंगाने आलेले इतर अनुभव याबद्दल लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे. ते अनुभव तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. इथे हेतू तुलना करण्याचा वा आपले वैगुण्य जाहीर करण्याचा नाही तर प्रगतीच्या अचूक दिशेचे भान आपल्याला यावे हा आहे.



*पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देईल यासाठी केवळ पुरस्कारांची खैरात आणि धनदांडग्यांचे प्रायोजकत्व उपयोगी ठरत नाही. त्यासाठी सतत प्रेरणा देणारा, जेत्याची भावना मनात रुजवणारा एखादा 'चॅम्पियन रोड' भारतातल्या विद्यापीठात का असू नये?*

**श्रीमती जेन आणि श्री. रेन यांनी केलेल्या अथक मदतीमुळे नि समयोचित मार्गदर्शनामुळे मला चीनच्या क्रीडासंस्कृतीवर इतक्या विस्तृतपणे लिहिणे शक्य झाले. दोघांचेही विशेष आभार!**


**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती अभ्यासक, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**

**संपर्क :** joshigajanan@hotmail.com

**अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...**

# रसिक बलमा

## हेमंत कर्णिक




**किंमत रु. ४००/-**

**तिच्या मनात आलं, सेक्स पुरुषाला कळत नाही. तो आपला वीर्य सोडून मोकळा होतो आणि हुश्श! झालं सेक्स. मुळात मराठीत धड शब्द नाही. संभोग, शरीरसंबंध, जुगणे, झवणे, सेक्स. काय बेकार शब्द आहेत! भाषेवर बऱ्यापैकी बायकांची मालकी असते. पण या एका बाबतीत बायका चिडीचूप. मग बाई म्हणून आपण कुठला शब्द वापरू? तिला चटकन शब्द सुचला: समर्पण. तो तिला आवडला. त्यात त्या अनुभवाची किंचितशी झाक आहे, असं तिला वाटलं. पण समर्पण हा शब्द बाहेर इतर संदर्भांत जेव्हा वापरला जातो, तेव्हा त्याला भलभलता अर्थ चिकटतो की. नारीची एकदम सीता होऊन जाते. रामाला समर्पित! हॅट!**

अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई-६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# खुल्लम खुल्ला प्यार करेंगे...!



प्रा.श्रीनिवास हेमाडे

**गोष्ट प्रेमाची** **लेखांक – ५**



प्रत्येकाची प्रेमाची व्याख्या वेगळी असल्याने ती मान्य करूनही 'प्रेम म्हणजे काय?' हा प्रश्न खुलाच राहतो. म्हणून 'प्रेम म्हणजे काय? हा कायमचा खुला प्रश्न बनतो. प्रेम तात्त्विकदृष्ट्या आणि व्यवहारत: कायमचे 'खुले प्रकरण' उर्फ 'खुल्लम खुल्ला प्रकरण' आहे...

'मूरची अंतर्दृष्टी चांगुलपणाचे दर्शन घडवणारी!' असे शीर्षक असलेल्या प्रस्तुत लेखाच्या पूर्वार्धात आपण असे पाहिले, की *''प्रेम करणे चांगले की वाईट?''* अर्थात **''प्रेमात पडणे चांगले की वाईट?''** हा प्रश्न बदलून ''प्रेम चांगले की वाईट?'' असा बदलला तर, पहिला प्रश्न प्रेम करणे ही एक 'कृती' (action) आहे, असे सुचवतो. तर दुसरा प्रश्न प्रेम ही एक 'संकल्पना' (concept) असे स्पष्ट करतो. कृतीमागील संकल्पना स्पष्ट झाली, की कृती साकारण्याची दिशा स्पष्ट होते, ती करावी की नाही हे उमजते. त्यातून ''प्रेमासाठी जगावे की मरावे?'' हा नवाच प्रश्न निर्माण होतो. तो ''व्यक्तिगत प्रेमापासून ते राष्ट्रप्रेमापर्यंत आणि नंतर मानवजातीच्या प्रेमासाठी जगावे की मरावे?'' असा व्यापक बनतो. त्यासाठी चांगलेपणा आणि प्रेम यांचे अंतर्निहित तात्त्विक नाते पाहणे आवश्यक ठरते.

**नैसर्गिकतेचा तर्कदोष**

मूरच्या मते, 'चांगले' (good) या प्रतवारीची अर्थात 'चांगले' या पदाची (term) व्याख्या करता येत नाही; ती करण्याचा प्रयत्न केलाच, तर जो तर्कशास्त्रीय प्रमाद घडतो, त्याला मूर **'नैसर्गिकतेचा (प्राकृतिकतेचा) तर्कदोष'** (naturalistic fallacy) म्हणतो. मूर येथे 'नैसर्गिक' (प्रकृति) हा शब्द का वापरतो? त्याच्या मते, निसर्ग म्हणजे, 'नैसर्गिक विज्ञानांचा विषय असणाऱ्या किंवा होऊ शकणाऱ्या वस्तूंचा संच आणि मानसशास्त्राचा विषय होऊ शकणाऱ्या मानसिक प्रक्रियांचा (जसे की आत्म निरीक्षण, भावना, वासना इत्यादी) संच.' साहजिकच या नैसर्गिक वस्तूंच्या ज्या गुणांचे (लाल, पिवळा, गोड, आंबट, घन, द्रवरूप इत्यादी) आपल्याला इंद्रिय संवेदनांद्वारे किंवा आत्म-निरीक्षणाद्वारे (introspection आनंद, क्रोध, निराशा इत्यादी) ज्ञान होते, त्यांना मूर 'नैसर्गिक गुण' (natural property) म्हणतो. हे गुणधर्म घेऊनच कोणत्याही वस्तूची व्याख्या केली जाते.

'चांगला' ही अशी तऱ्हेची नैसर्गिक वस्तू नाही किंवा मानसिक अवस्थाही नाही; 'चांगुलपणा' हा नैसर्गिक गुण नाही, म्हणून तो ज्ञानेंद्रियांचा अथवा वैज्ञानिक अभ्यासाचा विषय होऊ शकत नाही. 'चांगलेपणा'चे ज्ञान आपल्याला अंतःप्रज्ञेद्वारा होते व अंतःप्रज्ञान 'अ-नैसर्गिक' (अप्राकृतिक) आहे. 'चांगुलपणा' ही अव्याख्येय, अविश्लेष्य, सरल अन् साक्षात अंतःप्रज्ञेला प्रतीत होणारी केवळ 'प्रातिभ दर्शना'चाच विषय होणारी संकल्पना आहे. परिणामी, जे तत्त्ववेत्ते 'चांगुलपणा' चे नैसर्गिक गुणांच्या परिभाषेत विश्लेषण करतात, अर्थात 'चांगले' या मानवी पदाचे नैसर्गिक गुण व्यक्त करणाऱ्या पदांच्या साहाय्याने व्याख्या करतात, तेव्हा त्यांच्या हातून जो तर्कदोष घडतो. त्यास मूर **'नैसर्गिकतेच तर्कदोष'** असे नाव देतो.

मूरच्या मते, या व्याख्येचा प्रयत्न दोन प्रकारच्या तत्त्ववेत्त्यांनी केला, म्हणून या तर्क-दोषाचेही दोन प्रकार होतात. १) निसर्गवादी (natural) आणि २) सद्वस्तुमीमांसावादी (metaphysical). उपयुक्ततावादी जॉन स्टुअर्ट मिल्ल आणि उत्क्रांतिवादी हर्बर्ट स्पेन्सर यांच्याकडून निसर्गवादी तर्कदोष घडला. सद्वस्तुमीमांसावादी तर्कदोष कान्ट, हेगेल, फ्रान्सिस हर्बर्ट ब्रॅडले आणि स्पिनोझा या अतीत सद्वस्तुमीमांसावादी अथवा चैतन्यवादी तत्त्ववेत्त्यांकडून घडला.

हे कसे घडले? उदाहरणार्थ; मिल्लने अधिकाधिक लोकांचे अधिकाधिक सुख म्हणजे ''चांगले'' (*Good* means whatever leads to the greatest happiness of the greatest number) अशी व्याख्या केली. ती मान्य केली, 'सुखद नसलेल्या अनेक गोष्टी चांगल्या असतात, हे लक्षात घ्यावे लागते; जसे की इंजेक्शन घेणे, शस्त्रक्रिया करवून घेणे सुखद नसते, पण (*'चांगल्या प्रकृती'* साठी) ते चांगले असते. भजी, वडा, गुलाबजाम, पुरण पोळी इत्यादी सुखद आहे. पण भजी खूप खाणे, मधुमेहीने गुलाबजाम, पुरण पोळी खाणे चांगले आहे का? सुखद पदार्थ खूप खाल्ला किंवा प्यायला गेला, सुखद कृती जास्त प्रमाणात केली अन् त्या प्रमाणात खूप सुखद भावना अनुभवली, तरी देखील *ती सुखद कृती चांगली आहे का?* तेव्हा ''सुखद म्हणजे, चांगले'' हे समीकरण किंवा व्याख्या संदिग्ध, चुकीची बनते. म्हणून एखादी गोष्ट सुखद असू शकते, पण ती गोष्ट चांगली आहे का? असा प्रश्न नेहमीच उपस्थित होऊ शकतो. उत्क्रांतिवादी हर्बर्ट स्पेन्सरच्या मते, चांगले म्हणजे अधिक उत्क्रांत. मानवी समाजाची सतत उक्रांती घडून येत असते आणि अधिक उत्क्रांत असे वर्तन म्हणजेच अधिक चांगले वर्तन' ही स्पेन्सरची भूमिका आहे. पण 'क्ष' या प्रथेपेक्षा 'य' प्रथा उत्क्रांत मानली, तरी ती 'क्ष' पेक्षा चांगली आहे का? हा प्रश्न येतोच. कान्टच्या मते, एका अतीत सद्वस्तुकडून किंवा निसर्गाकडून आदर्श वर्तनाचे आदेश येतात, हेगेल कान्टचाच पाठपुरावा करतो; तर स्पिनोझाच्या मते,

विश्वाचे ज्ञान असणे हा चांगुलपणा अंगी बनविण्याचा मार्ग आहे. विश्वाचे अंतिम स्वरूप म्हणजे ईश्वर. म्हणून ईश्वराचे ज्ञान म्हणजे चांगुलपणाचे ज्ञान आणि ईश्वरेच्छित आदेशित कृती (ईश्वरेच्छा बलियसी) हीचं चांगली कृती. पण ईश्वराच्या सर्वच इच्छा चांगल्या आहेत का? असतात का? वैदिक तत्त्वचिंतक निंबार्काचार्यांच्या मते, ''जग ही ईश्वराची लीला आहे'' तर जर्मन तत्त्ववेत्ता लायब्निजच्या मते, ''विद्यमान जग ईश्वराला शक्य झालेले सर्वोत्तम जग आहे'' (best possible world). हे दावे ईश्वराच्या चांगुलपणाचे दावे आहेत. पण पूर, दुष्काळ, महामारी, वर्णजाती- लिंगभेद व्यवस्था, अराजक, भ्रष्ट लोकशाही, हुकूमशाही, शोषक भांडवलशाही इत्यादींनी भरलेले जग चांगले कसे? वर्णभेद, जातिभेद, लिंगभेद यांचा पाया असणारे शोषित जग व विविध प्रकारची दुःखे किंवा त्रिविध दुःखे ही ईश्वराची लीला कशी असू शकते? असा प्रश्न उपस्थित होतोच!

थोडक्यात, निसर्गवादी तत्त्ववेत्त्यांप्रमाणे अशा सद्वस्तुचिंतक मंडळींनी त्यांच्या प्रत्येकाच्या संकल्पनेनुसारच्या अभौतिक-अनैसर्गिक तत्त्वाच्या (सद्वस्तु, चेतना, ईश्वर) आधारे व्याख्या केली, जी नेहमीच आक्षेपार्ह ठरते. त्यांनी कितीही चांगलेपणा म्हणजे काय? याची व्याख्या केली, तर 'ती अंतिम न ठरता 'चांगलेपणा इतरत्रही सापडतोच'. अशा रीतीने 'चांगले'ची एखाद्या अ-मानवी अन् अ-नैसर्गिक तत्त्वाच्या परिभाषेत व्याख्या करण्याचा प्रयत्न केला की नैसर्गिकतेचा तर्कदोष' घडतोच, असे मूर दाखवून देतो. मूरच्या मते, चांगलेपणाची कोणतीही कशीही व्याख्या करणे, हेच मूलतः चूक अन् तर्कदोषयुक्त आहे. कारण 'चांगले' हा गुणधर्म नसून ती अव्याख्येय संकल्पना आहे.

थोडक्यात, दोन मुद्दे आहेत. पहिला, मूरच्या मते, 'चांगला' या अव्याख्येय संकल्पनेची व्याख्या करणे हेच मुळात तर्कदोषग्रस्त आहे. दुसरा मुद्दा, केलीच व्याख्या तर ती नैसर्गिक किंवा अतिभौतिक गुणधर्मांच्या आधारे करणे हाच 'नैसर्गिकतेचा तर्कदोष' आहे. वेगळ्या भाषेत *''जे अव्याख्येय आहे त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न करणे हाच खरा तर्कदोष आहे. आपण त्याला काय म्हणतो याला महत्त्व नाही. जेव्हा असा दोष आढळेल, तेव्हा तो ओळखता मात्र आला पाहिजे.''*

**खुला प्रश्न युक्तिवाद**

समजा, 'नैसर्गिकतेचा तर्कदोष' बाजूला सारला व दुसरा युक्तिवाद केला तरी 'चांगले म्हणजे काय?' हा प्रश्न खुलाच राहातो, असे मूर लक्षात आणून देतो. त्या युक्तिवादाला *'खुला प्रश्न युक्तिवाद'* (The Open Question Argument-OQA) म्हटले जाते. समजा, (१) एक तर 'चांगलेपणा हा काहीच नाही' असा गुणधर्म आहे अथवा (२) चांगलेपणा हे एखाद्या संकीर्ण (Complex) संकल्पनेचे नाव आहे; तर...

आता, ''चांगलेपणा हा काहीच नाही' असे तर काहीही नाही. कारण चांगलेपणाचे सुखद, वांच्छनीय (जो जे वांच्छिल तो ते लाहो), अधिक उत्क्रांत इत्यादि गुणधर्म आपण सांगू पाहतो. त्या गुणधर्माच्या आधारे आपण व्याख्याही करू पाहतो. त्यामुळे 'चांगलेपणा' हा गुणधर्म 'काहीही नाही', असे नसून (निश्चित)'काहीतरी' आहेच आहे' असा निष्कर्ष निघतो. पण पुढे 'ते जे काही आहे ते काय आहे? असा प्रश्न येतोच.

समजा, 'चांगलेपणा' ही एखादी संकीर्ण अथवा संबंधात्मक संकल्पना आहे, असे मानले, तर ''ते जे काही संकीर्ण मानले ते चांगले कशावरून?'' असाही प्रश्न येतोच. उदाहरणार्थ; 'चांगले म्हणजे ज्याची आपण इच्छा करतो ते', असे मानले तर 'पण ज्याची आपण इच्छा करतो ते खरोखर चांगले असते काय?' हा प्रश्न उपस्थित होतो. कारण माणसे ज्यांची इच्छा करतात, त्यांपैकी किती तरी गोष्ट वाईट असतात! (निदान स्वतःच्या बाबतीत नसले तरी इतरांच्या बाबतीत आपण हे सहज मान्य करू, अर्थात माझी इच्छा चांगलीच आहे, पण त्याची/तिची इच्छा चांगली नाही!) तेव्हा 'व्यक्ती ज्याची इच्छा करते ते चांगले' अशी व्याख्या अचूक नाही.

मग, येथे ''चांगले म्हणजे ज्याची इच्छा करण्याची आपण इच्छा करतो ते,'' असे उलट म्हटले तरी ''ज्याची इच्छा करण्याची आपण इच्छा करतो, ते खरोखर चांगले असते काय?'' असाही प्रश्न विचारता येतो. त्यावर 'हो' म्हटले तर पुन्हा ''मग ते तरी खरोखरच कशावरून चांगले?'' हा प्रश्न येतोच.

मारुतीच्या शेपटीप्रमाणे आपली संकल्पना कितीही लांबविली तरी ''ते चांगले कशावरून?'' हा प्रश्न पुन्हा पुन्हा उपस्थित होतोच. ''कशावरून'' हा प्रश्न मिटत नाही, तो 'खुला'च (open) राहतो.

आता लक्षात येईल, की 'चांगले'ची कशीही व्याख्या केली, तरी ''चांगले म्हणजे काय?'' हा प्रश्न मिटत नाही, तो

प्रश्न कायमच *'खुला'* राहत असल्यामुळे मूरने निष्कर्ष काढला, की 'कोणत्याही नैसर्गिक गुणधर्माची कशीही रचना केली तरी, त्या नैसर्गिक गुणधर्माहून 'चांगलेपणा' हा गुणधर्म अलग उरतो. अर्थात, 'चांगलेपणा' हा अभौतिक आणि अमिश्र असा गुणधर्म असला पाहिजे. त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न करताना एखाद्या भौतिक-सुख, दुःख, वेदना-संवेदना, घर, गाडी, सोनेनाणे इत्यादि भौतिक वस्तूशी समीकरण करण्याने तर्कदोष निर्माण होतो. कितीही प्रयत्न केला, तरी ''चांगले म्हणजे काय?'' हा प्रश्न कायमचा 'खुला'च राहतो.

**आंतरिक मूल्य**

आता, जगात कोणत्या गोष्टी स्वतःहून चांगल्या असतात? हा अन्य प्रश्न उद्भवतो. या प्रश्नाच्या उत्तरासाठी जर ''त्या गोष्टी निखळपणे स्वतःहून अस्तित्वात असतील तर त्यांना कोणते मूल्य असेल किंवा असू शकेल अथवा असलेच पाहिजे?'' या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. मूरच्या मते, चांगुलपणा हे एक 'आंतरिक मूल्य' (Intrinsic Value) आहे, ते बहिर्गत मूल्य (extrinsic value) नाही, ते कोणत्याही बाह्य घटकावर अवलंबून नाही.

''कोणत्या गोष्टींच्या ठिकाणी आंतरिक चांगलेपणा अर्थात आंतरिक मूल्य आहे?'' आणि ते किती आहे? हे ठरविण्यासाठी मूर एक पद्धत सांगतो. ती अशी : ''दुसरे काहीही नसताना आणि केवळ त्या एकट्याच असल्या तरी ज्यांचे अस्तित्वात असणे चांगले आहे' असे आपण म्हणू त्या गोष्टी आंतरिकरीत्या चांगल्या असतात. त्यांच्या चांगलेपणाचा कमीजास्तपणा ठरविण्यास सुद्धा त्यांच्या एक-एकटेपणातच तुलना केली पाहिजे.''

मूरच्या मते, 'चांगले' ही अशी 'जाणीव' (the consciousness) आहे की जिस इतर कोणत्याही जाणिवेपेक्षा जास्त मूल्य असते. ज्यांची आपण कल्पना करू शकू अशा अत्यंत चांगल्या गोष्टी म्हणजे, *जाणिवेच्या काही अवस्था* असतात. या जाणिवांची ठळक उदाहरणे म्हणजे, 'व्यक्तिगत स्नेह' आणि कलानिर्मितींतील आणि निसर्गातील सौंदर्याचा आस्वाद (personal affection and the appreciation of what is beautiful in Art or Nature, are good in themselves). यांचे मूल्य बाह्य गोष्टींवर तर कधीच अवलंबून नसते, या गोष्टी स्वतः होऊन चांगल्या आहेत.' त्यांना 'स्वगत'- स्वयं मूल्य' (intrinsic value) असते. 'स्वयंमूल्य हे साध्य असते. म्हणून 'प्रेम' आणि सौंदर्यानुभव यांना 'साध्यमूल्ये' मानले पाहिजे. या मूल्यांमध्ये सर्व उच्च चांगुलपणाचा अंतर्भाव होतो. प्रेम व सौंदर्य हे सर्व सद्गुणांचा आणि कर्तव्यांचा आधार असतात.

ज्या कोणत्या गोष्टींना आंतरिक मूल्य असते, त्यांची उदाहरणे आणि त्यांचे विश्लेषण देताना मूर 'प्रेम' या संकल्पनेचा विचार करतो. तो थेट Love अशा शब्द वापरून उदाहरण देत नाही. प्रेमाला तो 'व्यक्तिगत स्नेह' (personal affection) म्हणतो. व्यक्तिगत प्रेम अथवा समूह प्रेम ही स्वतःहून अस्तित्वात (मानवी वर्तनात) असणारी 'आंतरिक मूल्यवान' गोष्ट आहे. (परस्परांविषयी प्रेम हे वास्तवात येणारे प्रेमप्रकरण म्हणजे लोकशाहीचे मूल सूत्र. म्हणून लोकशाहीचा पुरस्कार अनिवार्य ठरतो.) अर्थात मूर केवळ affection हाच शब्दप्रयोग करतो असे नव्हे, तर Love संज्ञा देखील उपयोगात आणतो. विश्लेषणाच्या ओघात जे कसे शक्य नाही आणि जे कोणत्या अर्थाने भ्रम ठरते, हे स्पष्ट करताना Love of God अशी संकल्पना मांडतो.

**मूर आणि प्रेम संकल्पना**

''चांगले म्हणजे काय?'' या प्रश्नाशी मानवजात प्राचीन काळापासून झगडते आहे. त्याला मूरने तात्त्विक प्रतिसाद दिला. त्याचे विश्लेषण 'प्रेम म्हणजे काय?' या आपल्या प्रश्नाला लागू करता येईल. कारण त्याच्या मते, आंतरिक मूल्यवान असलेली चांगली गोष्ट म्हणजे प्रेम. ही अशी जाणीव आहे, की जी निखळपणे स्वतःहून अस्तित्वात असते, जिचे असणे अन्य कशावरही अवलंबून नसते. जगात दुसरे काहीही नसले आणि केवळ ती जाणीव एकटी असली तरी तिचे अस्तित्वात असणे चांगले आहे' असे आपण म्हणू शकतो. सॉक्रेटिस, ''मी असा विचार करत नाही की, जे मला माहीत नाही, ते मला माहीत आहे'' (I do not think, that I Know what I do not know) असे निदर्शनास आणून देत असला तरी तो अनेक ठिकाणी निःसंदिग्धपणे सांगतो, की ''मला एकच गोष्ट निश्चितपणे माहीत आहे, ती म्हणजे प्रेम.'' गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, गांधीजी, रसेल किंवा साने गुरुजी 'जगाला प्रेम अर्पावे' हे निःसंशयपणे उच्च रवात कथन करतात.

मूरच्या विश्लेषणाचा आधार घेता 'प्रेम' या गोष्टीकडे कसे पाहता येईल?

१. ज्या गोष्टी केवळ स्व-रुपामुळे स्वतःहून असल्याच





*प्रेमाच्या संदर्भाने 'चांगुलपणा'ची व्याख्या करताना उपयुक्ततावादी मिल्ल आणि उत्कांतीवादी स्पेन्सर यांच्याकडून निसर्गवादी तर्कदोष घडला...*

पाहिजेत, अशी प्रेम ही एक मूलभूत गोष्ट आहे. म्हणून प्रेम ही एक आंतरिक मूल्यवान गोष्ट आहे.

२. 'प्रेम' ही एक अव्याख्येय संकल्पना आहे.

३. प्रेम हा सरल, साधा, निरवयवी, अमिश्र, अविश्लेष्य अभौतिक गुणधर्म आहे.

४. प्रेमाचे ज्ञान इंद्रिय संवदेनांना होत नाही. ते अभौतिक सहजबुद्धिच्या प्रगत रुपाला अर्थात प्रतिभेला होते. प्रेम हे 'प्रातिभ दर्शना' चे 'दृश्य' आहे.

५. 'प्रेम' ही अशी 'जाणीव' (the consciousness) आहे, की जिस इतर कोणत्याही जाणिवेपेक्षा जास्त मूल्य आहे. प्रेम ही *जाणिवेच्या काही उच्च अवस्था* असते.

६. प्रेमाची व्याख्या करण्याचा कोणताही प्रयत्न केवळ प्रेमविषयक ''नैसर्गिकतेचा तर्कदोष'' घडवतो. ''प्रेम म्हणजे, अमुकतमुक'' म्हणताना प्रेमाची तुलना कायमच कोणत्यातरी भौतिक वस्तूशी केली जाते. 'प्रेम म्हणजे प्रेम असते/तुमचे आमचे सेम असते' पासून 'प्रेम ही दिव्य शक्ती आहे किंवा प्रेम म्हणजे ईश्वराचे रूप आहे', इत्यादि साऱ्या व्याख्या हा तर्कदोष घडवून माणसाची दिशाभूल करतात. या व्याख्या मानवी भावनांना तरल बनवतात, पण प्रेमाचे स्वरूप स्पष्ट करण्यास समर्थ नसतात.

७. प्रेमाची कोणतीही कशीही व्याख्या केली, तरी त्या व्याख्येच्या नंतरही आपण ''प्रेम म्हणजे काय?'' किंवा त्या घटकाखेरीज अन्य घटकात प्रेम आहे काय? असा प्रश्न नेहमी विचारू शकतो. उदाहरणार्थ; प्रेम म्हणजे त्याग, प्रेम म्हणजे स्वीकार, प्रेम म्हणजे सर्व काही आणि प्रेम म्हणजे काहीच नाही! कुणासाठी प्रेम म्हणजे, एकत्र असणं, तर कुणासाठी प्रेम म्हणजे स्वातंत्र्य देणं तर कधी 'प्रेम म्हणजे जिवाशिवाचे मिलन'. 'प्रेम म्हणजे ईश्वर करतो, ते प्रेम' असे म्हटले की 'नास्तिक माणसे प्रेम करत नाहीत का?' असा प्रश्न उपस्थित होतो. ईश्वर केवळ आस्तिक लोकांवरच प्रेम करतो का? निधर्मी लोक प्रेमळ नसतात का? मग केवळ स्व-धर्मीय लोकांवरच प्रेम करावे का? राज्यकर्त्याने केवळ स्व धर्मी व स्वजातीय लोकांवर प्रेम करावे की सर्व धर्म जातीजामातीवर प्रेम करणे, हे त्याच कर्तव्य बनते का? असे शेकडो प्रश्न निर्माण होतात.

८. प्रत्येकाची प्रेमाची व्याख्या वेगळी असल्याने ती प्रत्येक मान्य करूनही 'प्रेम म्हणजे काय?' हा प्रश्न खुलाच राहातो. म्हणून 'प्रेम म्हणजे काय? हा कायमचा खुला प्रश्न बनतो. प्रेम तात्त्विकदृष्ट्या आणि व्यवहारत: कायमचे 'खुले प्रकरण' उर्फ 'खुल्लम खुल्ला प्रकरण' आहे. **(उत्तरार्ध)**



**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६,** wiselove2026@gmail.com




## मुखपृष्ठाविषयी :

**बॉबी कार्लाइल ही अमेरिकी शिल्पकार. 'सेल्फ मेड मॅन' हे तिचे सर्वात प्रसिद्ध कास्य शिल्प. या शिल्पात दगडातून स्वत:ला आणि भविष्याला कोरत गेलेला पुरुष साकारला आहे. जरी तो दिसायला पुरुष असला तरी ते प्रतीक आहे, अवघ्या मानव जातीचे. या शिल्पासाठी सहा पुरुष मॉडेल उपयोगात आणले गेले. शिल्पाचा चेहरा तिच्या मुलाचा आणि शरीराचे अवयव इतर परिचित पुरुषांचे असे मिळून हा स्वयंभू माणूस साकारला...**

# जैन दर्शन : एक अर्धनास्तिक दर्शन



जगदीश काबरे

नास्तिक दर्शन



**जै**न दर्शन हे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानांपैकी एक असून, ते जीवन, नैतिकता आणि आत्मिक मुक्ती यावर आधारित आहे. जैन धर्म आणि दर्शनाची मुळे इसवी सन पूर्व सहाव्या शतकापर्यंत जातात, जेव्हा भगवान महावीर यांनी या तत्त्वज्ञानाला एक सुसंगत स्वरूप प्रदान केले. जैन दर्शनाचे मध्यवर्ती तत्त्व म्हणजे अहिंसा (हिंसेपासून पूर्णपणे अलिप्त राहणे), सत्य, अस्तेय (चोरी न करणे), ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह (संग्रह न करणे). या लेखात जैन दर्शनाच्या मूलभूत तत्त्वांचा, त्याच्या सिद्धांतांचा, नैतिक आचारसंहितेचा आणि आधुनिक काळातील त्याच्या प्रासंगिकतेचा सविस्तर आढावा घेणार आहोत...

जैन धर्म हा भारतातील सर्वात प्राचीन धर्मांपैकी एक आहे. याची उत्पत्ती वैदिक कालखंडात झाली. याला श्रमण परंपरेचा एक भाग मानले जाते. जैन परंपरेनुसार, एकूण २४ तीर्थंकरांनी या धर्माचे तत्त्वज्ञान पुढे नेले. भगवान ऋषभनाथ हे पहिले तीर्थंकर मानले जातात, तर भगवान महावीर हे २४ वे आणि अंतिम तीर्थंकर होते. महावीर यांनी जैन दर्शनाला व्यवस्थित स्वरूप दिले आणि त्याचे प्रसारण केले. महावीरांचा जन्म इसवी सन पूर्व ५९९ मध्ये बिहारमधील वैशाली येथे झाला. त्यांनी वयाच्या ३० व्या वर्षी गृहस्थाश्रमाचा त्याग केला आणि १२ वर्षांच्या कठोर तपश्चर्येनंतर कैवल्य (सर्वज्ञान) प्राप्त केले. त्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जैन तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी समर्पित केले. त्यांच्या उपदेशांमुळे जैन धर्माचा प्रसार भारतभर झाला.

कालांतराने त्याचे दोन प्रमुख संप्रदाय उदयास आले: दिगंबर आणि श्वेतांबर. त्या दोघांमध्ये सैद्धांतिक मतभेद आहेत, पण फारच थोडे. जवळजवळ नाहीतच म्हटले तरी चालेल. मुख्य फरक असा की, श्वेतांबरपंथीय जैन, साक्षात महावीराची वचने ग्रथित आहेत, या विश्वासाने जे मूल धर्मग्रंथ म्हणून मानतात, ते दिगंबरपंथीयांना मूल ग्रंथ म्हणून मान्य नाहीत. त्यांत सांगितलेली तत्त्वे व आचार त्यांना मान्य आहेत. पण ते महावीराच्या तोंडचे शब्द नव्हेत एवढेच, त्यांचे म्हणणे. आणखीही किरकोळ फरक आहेत. साधूने वस्त्रांचा संपूर्ण त्याग केला पाहिजे, दिशा एवढेच त्याचे आवरण राहिले पाहिजे, असा दिगंबरांचा आग्रह आहे. याउलट, साधूने श्वेत वस्त्रे वापरण्यास श्वेतांबरांची अनुमती आहे. स्त्रीला स्त्रीजन्मातून थेट मोक्षावस्थेस पोचता येणार नाही आणि केवल-ज्ञान प्राप्त झालेल्या पुरुषाने इतरांसारखे अन्नग्रहण करण्याची गरज नाही, असे दिगंबरांचे म्हणणे आहे. पण या दोन्हीही गोष्टी श्वेतांबरांना मान्य नाहीत. तात्त्विक दृष्टिकोनातून या फरकांना फारसे महत्त्व दिले जात नाही.

**मूलभूत सिद्धांतांचा आधार**

ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकाच्या अखेरीस पाटलीपुत्र येथे जैनांच्या मूळ धार्मिक वाङ्मयाचे संहितीकरण करण्याचा पहिला प्रयत्न झाला. पण त्याचे आजचे स्वरूप ख्रिस्तोत्तर सुमारे ४५४ या वर्षी गुजरातेतील वलभी नगरीत भरलेल्या धर्मसभेत निश्चित करण्यात आले. मूळ धर्मग्रंथांची संख्या पंचाऐंशी भरते. त्यामध्ये एकेचाळीस सूत्रग्रंथ, सुमारे एकतीस प्रकीर्णक, बारा नियुक्ति अथवा भाष्यग्रंथ आणि एक महाभाष्य आहे. यात जे वाङ्मय संग्रहीत आहे ते महावीराच्या अथवा इतर केवलींच्या तोंडचे शब्द होत, असे मानावयास दिगंबर जैन तयार नसतात. कारण, महावीराचा काळ आणि धर्मग्रंथांचे प्रथम लेखन झाले, तो काळ यांमध्ये पुष्कळ अंतर आहे. म्हणून स्मरणावर भिस्त ठेवूनच हे ग्रंथ तयार झाले असले पाहिजेत. तरीही या ग्रंथांना धर्ममूल अथवा आगम म्हणून दिगंबरांची मान्यता आहे. हे ग्रंथ अर्धमागधी भाषेत आहेत. पुढे निर्माण झालेले तत्त्वज्ञानविषयक वाङ्मय जरी प्रायः संस्कृत भाषेमध्ये लिहिले असले, तरी त्याचा आधार वर उल्लेख केलेले आगम ग्रंथच होत.

जैन दर्शनाची रचना काही मूलभूत सिद्धांतांवर आधारित आहे. ते विश्व, आत्मा आणि कर्म यांच्या परस्परसंबंधांवर प्रकाश टाकतात. यापैकी काही प्रमुख सिद्धांत खालीलप्रमाणे आहेत :

१. अनेकांतवाद : अनेकांतवाद हा जैन दर्शनाचा एक महत्त्वाचा सिद्धांत आहे, जो सत्याच्या बहुआयामी स्वरूपावर जोर देतो. यानुसार, सत्य एकच नसून, ते वेगवेगळ्या दृष्टिकोनांनुसार बदलू शकते. हा सिद्धांत सांगतो, की कोणताही एक दृष्टिकोन पूर्ण सत्य व्यक्त करू शकत नाही. उदाहरणार्थ, एखाद्या वस्तूचे वर्णन करताना ती एकाच वेळी अनेक गुणधर्मांनी युक्त असू शकते. अनेकांतवाद संवाद आणि सहिष्णुतेला प्रोत्साहन देतो, कारण तो वेगवेगळ्या मतांचा आदर करण्यास शिकवतो.

२. स्याद्वाद : स्याद्वाद हा अनेकांतवादाचा पूरक सिद्धांत आहे. यानुसार, प्रत्येक विधान सापेक्ष आहे आणि ते विशिष्ट परिस्थिती किंवा दृष्टिकोनावर अवलंबून आहे. स्याद्वाद सात प्रकारच्या विधानांचा (सप्तभंगी) उल्लेख करतो, ज्यामुळे सत्याचे विविध पैलू समजण्यास मदत होते. हा सिद्धांत तर्कशुद्ध विचार आणि संशयवादी दृष्टिकोनाला प्रोत्साहन देतो.

३. कर्म सिद्धांत : जैन दर्शनात कर्म हा एक महत्त्वाचा संकल्पनात्मक आधार आहे. यानुसार, प्रत्येक कृती (शारीरिक, मानसिक किंवा वाचिक) कर्म निर्माण करते, जे आत्म्याशी संलग्न होते. हे कर्म आत्म्याच्या पुनर्जन्म आणि दुखाच्या चक्रात बांधून ठेवते. कर्म दोन प्रकारची असतात -पापकर्म आणि पुण्यकर्म. जैन दर्शनाचे अंतिम ध्येय कर्मांचा नाश करून आत्म्याला मुक्त करणे, म्हणजे कैवल्य प्राप्त करणे होय. नेहमीच्या भाषेत यालाच मोक्ष प्राप्त करणे असे म्हणतात.

४. आत्मा आणि जीव : जैन दर्शनानुसार, प्रत्येक जीवामध्ये आत्मा असतो, जो अनादी आणि अनंत आहे. आत्मा हा शुद्ध, सर्वज्ञ आणि आनंदमय आहे, परंतु कर्मांमुळे तो अज्ञान आणि

दु:खाच्या बंधनात अडकतो. जैन दर्शनात जीवांना पाच स्तरांमध्ये वर्गीकृत केले आहे: एकेंद्रिय (ज्यांना फक्त स्पर्शाची जाणीव आहे, उदा. वनस्पती), द्वींद्रिय (ज्यांना स्पर्श आणि चव जाणवते, उदा. गांडूळ, शिंपले, कीटक), त्रींद्रिय (ज्यांना स्पर्श, चव आणि गंधही तीन इंद्रिय असतात उदा. मुंग्या, वाळवी, काही प्रकारचे कीटक), चतुरिंद्रिय (ज्यांना स्पर्श, चव, गंध आणि दृष्टी असते, उदा. माशी, मधमाशी, कोळी, डास आणि काही जलचर प्राणी) आणि पंचेंद्रिय (ज्यांना स्पर्श, चव, गंध, दृष्टी आणि श्रवण अशा सर्व पाचही इंद्रियांची जाणीव आहे, उदा. मानव आणि इतर प्राणी). जैन तत्त्वज्ञानात या सर्व जीवांबद्दल अत्यंतिक करुणा व अहिंसेचा विचार आहे. कारण जरी त्यांच्याकडे कमी इंद्रिये असली, तरी ते संवेदनशील, जिवंत प्राणी आहेत. म्हणूनच जैन साधक पाण्यातील लहान जीव, धूळीतले सूक्ष्म जीव किंवा अन्नातील जंतू यांच्यापासूनही जीव हिंसा टाळण्याचा प्रयत्न करतात.

५. वस्तुमीमांसा : गुण आणि पर्याय या दोन्हींतील फरक जैन दर्शनात नीट स्पष्ट केलेला नाही. तरीही साधारणत: तो फरक असा सांगता येईल की, गुण हा द्रव्याच्या अंगभूत असतो. त्याला सोडून तो कधीच राहात नाही. फुलाचे रंग, गंध, मृदु स्पर्श इत्यादी कोणतेही गुण फूल या द्रव्यापासून वेगळे काढता येणार नाहीत. पण हे गुण स्थिर नसतात, सारखे बदलत असतात. सकाळी जे फूल शुभ्र टवटवीत आणि सुगंधी होते, ते दुपारी काळपट दिसते, त्याच्या वासात फरक पडतो आणि ते कोमेजून जाते. संध्याकाळपर्यंत तर अजिबात वाळूनच जाते. त्याचे गुण बदलल्यामुळे अवस्थांतर होते. या अवस्था म्हणजेच पदार्थाचे पर्याय होत. अवस्था बदलल्या तरी फूल हे द्रव्य तेच राहते. तेव्हा द्रव्य हा पदार्थ दोन रीतींनी प्राप्त होतो. म्हणून पदार्थात अ) अनेक गुणांचा एकत्वाने प्रत्यय येतो. आ) अनेक अवस्थाभेद होऊनही त्यांच्यातील नित्यत्वाचा प्रत्यय येतो. यावरून असे दिसेल की, गुण आणि पर्याय (अवस्था) हे दोन्हीही द्रव्याच्या आश्रयाने असतात. पण गुण हे द्रव्याला धरून असतात तर पर्याय हे येऊन जाऊन असतात. कधीकधी पर्याय याचा अर्थ 'एखाद्या वस्तूचा असा धर्म की, जो त्या वस्तूला सोडून इतरत्रही राहतो', असाही केला जातो.

जैन दर्शनात नैतिकतेवर विशेष जोर दिला आहे. यामध्ये पाच महाव्रतांचा समावेश आहे, जे साधू-साध्वींसाठी बंधनकारक आहेत, तर सामान्य लोकांसाठी याच तत्त्वांचे मृदू स्वरूप (अणुव्रत) आहे. ही पंचतत्त्वे खालीलप्रमाणे आहेत–

अहिंसा : सर्व प्रकारच्या जीवांना इजा न करणे. जैन दर्शनात अहिंसा ही सर्वोच्च नैतिकता आहे. यामुळे केवळ शारीरिक हिंसेपासूनच नव्हे, तर मानसिक आणि वाचिक हिंसेपासूनही दूर राहावे लागते. (पण आजचे जैन साधू हे या सगळ्या प्रकारच्या हिंसा करू लागलेले आहेत.)

सत्य : नेहमी सत्य बोलणे, परंतु ते सत्य कोणालाही दुखवणारे नसावे.(आजचे किती जैन या पद्धतीने सत्य बोलतात?)

अस्तेय : दुसऱ्याची वस्तू परवानगीशिवाय न घेणे.


ब्रह्मचर्य : इंद्रिय संयम आणि लैंगिक शुद्धता.

अपरिग्रह : भौतिक वस्तूंचा संग्रह न करणे आणि त्यापासून अलिप्त राहणे.

या तत्त्वांमुळे जैन व्यक्तीला आत्मशुद्धी आणि सामाजिक समरसतेकडे प्रवृत्त केले जाते. आधुनिक काळात जैन दर्शनाची प्रासंगिकता अनेक दृष्टींनी वाढली आहे. अहिंसेचा सिद्धांत हा हिंसाचार आणि युद्धांनी ग्रस्त जगात शांततेचा संदेश देतो. अनेकांतवाद आणि स्याद्वाद यामुळे वैचारिक सहिष्णुता आणि संवादाला प्रोत्साहन मिळते, जे आजच्या बहुसांस्कृतिक समाजात अत्यंत आवश्यक आहे. तसेच, अपरिग्रहाचा सिद्धांत उपभोक्तावादी संस्कृतीच्या अतिरेकाला आवर घालण्यासाठी उपयुक्त आहे. बहुत आजच्या जैन साधूंपासून सामान्य जैनांनीसुद्धा परखड आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

**मोल ध्यानाचे**

जैन आगमांमध्ये विश्वरचना, जीवशास्त्र आणि गणित याबाबतचे विचार आढळतात. जैन दर्शनाचे अंतिम ध्येय मोक्ष ज्याला कैवल्य म्हणतात ते आहे, ज्यामध्ये आत्मा सर्व कर्मांपासून मुक्त होऊन शुद्ध अवस्थेत पोहोचतो. यासाठी तप, ध्यान आणि सम्यक् दर्शन (योग्य दृष्टिकोन), सम्यक् ज्ञान (योग्य ज्ञान) आणि सम्यक् चारित्र (योग्य आचरण) यांचा समावेश होतो. जैन दर्शनात ध्यानाला विशेष महत्त्व आहे, जे मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणासाठी आवश्यक मानले जाते. 'जैन आगम' हे जैन धर्माचे मूलभूत ग्रंथ आहेत, ज्यामध्ये भगवान महावीरांच्या उपदेशांचा समावेश आहे. याशिवाय, तत्त्वार्थसूत्र (उमास्वामी रचित), समयसार (आचार्य कुंदकुंद), आणि प्रवचनसार (आचार्य कुंदकुंद) हे जैन दर्शनातील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. हे ग्रंथ जैन तत्त्वज्ञानाच्या गहन पैलूंवर



प्रकाश टाकतात.

जैन दर्शनाची तुलना बौद्ध आणि वैदिक दर्शनांशी केली जाते. बौद्ध धर्माप्रमाणे जैन दर्शनही श्रमण परंपरेचा भाग आहे. हे दर्शन कर्म, पुनर्जन्म आणि मोक्ष यांवर विश्वास ठेवते. तथापि, बौद्ध धर्मात अनात्मवाद (आत्म्याचा अभाव) स्वीकारला जातो, तर जैन दर्शन आत्म्याच्या शाश्वत स्वरूपावर जोर देते. वैदिक दर्शनाशी तुलना करता, जैन दर्शन यज्ञ आणि कर्मकांडांना नाकारते, पण आत्मा आणि मोक्ष वेगळ्या अर्थाने स्वीकारते. ते वैयक्तिक प्रयत्नांवर अधिक भर देते.

जैन दर्शनावर काही टीकाही झाल्या आहेत. काहींच्या मते, अहिंसेचा अतिरेकी दृष्टिकोन आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत नाही. तसेच, जैन धर्मातील काही प्रथा, जसे की सल्लेखना (उपवासाद्वारे स्वेच्छेने मृत्यू स्वीकारणे), यावर नैतिक प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. तरीही, जैन दर्शनाने या टीकांना तर्कशुद्ध उत्तर देऊन आपली प्रासंगिकता टिकवून ठेवली आहे. ईश्वरवादी नेयायिक वगैरे म्हणतात की, जग हे एक कार्य आहे आणि कार्याला सहेतुक कारण म्हणजेच कर्ता हा पाहिजे. तोच ईश्वर. यावर जैनांचा आक्षेप असा की, जग हे कार्य आहे असे म्हणून, जे अद्याप सिद्ध करावयाचे आहे, तेच तुम्ही गृहीत धरीत आहात. जगाचे कारण उपलब्ध झाल्यावरच जग हे कार्य ठरणार. त्याशिवाय तुम्ही जगास कार्य म्हणणार ते कशाच्या आधारावर? तरीही समजू की, जगास अशरीरी कर्ता आहे. आता, त्याच्याने कर्तृत्व व्हावयाचे असेल तर त्याने नुसते असून उपयोगी नाही, तर स्वतःची इच्छाशक्ती वापरली पाहिजे. ('उपादानगोचरापरोक्षज्ञानचिकीर्षाकृतिमत्त्वं कर्तृत्वम्' अशी तुमचीच व्याख्या आहे.)

इच्छाशक्ती म्हटली की तीत विकार आलेच, तिच्यात परिणाम घडत राहणार, ती मंद-तीव्र होणार, तिच्यात निरनिराळ्या आकांक्षा उत्पन्न होणार आणि विलीन होणार. मग ईश्वराचे नित्यत्व कुठे उरले? ईश्वर तर नित्य असला पाहिजे. हेही जाऊ द्या. पण त्या बुद्धिमान ईश्वराने जग कशासाठी निर्माण केले हे तर सांगाल? केवळ लहर म्हणून? तर विश्वात एवढी सुसंबद्धता कशी? ईश्वर करुणेने प्रेरित झाला होता, मग जगात दुःख कसे? दुःख कर्माच्या नियमांनी उत्पन्न होते, असे म्हणता, मग ईश्वरावर कर्मनियमांचे बंधन आले. तो स्वतंत्र नव्हे. केवळ लीला म्हणून जग ईश्वराने उत्पन्न केले, असे म्हणता, असे असेल तर ईश्वर पोरकट ठरेल. मग असा पोरखेळ करणारा ईश्वर न मानलेलाच बरा.

सृष्टी उत्पन्न करणे हा ईश्वराचा स्वभाव आहे असे म्हणावयाचे आहे काय? मग ईश्वराची भर कशाला पाहिजे आहे? सर्जन हा जगाचाच स्वभाव आहे असे मानले म्हणजे भागेल. इतक्यातूनही समजू की, जग निर्माण करण्यासाठी ईश्वर हा कर्ता लागतो. पण तो एकच आहे हे कशावरून? अनेक ईश्वर एकमेकांशी भांडतील असे जर तुम्ही म्हणाल, तर अहो, साध्या मुंग्या आणि मधमाशाही गुण्यागोविंदाने एकत्र काम करतात. मग सर्व शुभगुणांचा आश्रय जो ईश्वर त्याच्याकडून एवढ्याही समंजसपणाची अपेक्षा करू नये काय? ज्यात एवढ्या आपत्ती आहेत अशी ईश्वराची कल्पना कराच कशाला? स्वयंचलित कर्माचा नियम आणि नित्य पुद्गलांचा समुदाय एवढ्या गोष्टी मानल्याने काम भागते.

थोडक्यात, काय तर जैन दर्शन हे केवळ एक तत्त्वज्ञान नसून, एक जीवनपद्धती आहे, जी व्यक्तीला नैतिक, आध्यात्मिक आणि सामाजिकदृष्ट्या समृद्ध करते. जैन दर्शन ईश्वराला नाकारत असले तरीसुद्धा अतिरेकी अहिंसा, अनेकांतवाद, स्याद्वाद आणि कर्म सिद्धांत, आत्मा स्वीकारल्यामुळे जैन दर्शन हे एक अर्धनास्तिक दर्शन ठरते.

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.**
**संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

# मेल्टिंग पॉट की सॅलड बोल?


आशय गुणे

बरसाती मजला



*वर्चस्ववादी दिल्ली एकरुपतेची मागणी करते... मारिओ मिरांडांचे चित्र मुंबईच्या विविधतेतले वास्तव सौंदर्य रेखाटते...*

दिल्ली आणि मुंबई या दोन शहरांमधील फरक समजून घेण्यासाठी मेल्टिंग पॉट (melting pot) विरुद्ध सॅलड बोल (salad bowl) या चर्चेचा आधार घेता येतो. विविध संस्कृतींचे एकत्रीकरण दर्शवणारे हे दोन समाजशास्त्रीय दृष्टिकोन आहेत. पहिला दृष्टिकोन सांगतो, की लोकं आपापली संस्कृती घेऊन एके ठिकाणी येतात आणि एका समान संस्कृतीत मिसळून जातात. याच दृष्टिकोनाचे सर्वात प्रचलित उदाहरण अमेरिका. दुसरा दृष्टिकोन सांगतो, की विविध संस्कृती या सॅलडसारख्या असतात, त्या एकत्र असूनही आपली स्वतंत्र ओळख टिकवतात. याचे उदाहरण, भारत! या अनुषंगाने दिल्ली आणि मुंबई हे अनुक्रमे मेल्टिंग पॉट आणि सॅलड बोल आहेत, असं माझं मत झालं आहे...

साधारण सकाळचे ११ वाजले होते. दिल्लीत येऊन दोन महिने ही झाले नव्हते आणि इथे आल्यावर अनुभवण्याच्या यादीतील पहिली नोंद अधोरेखित झाली होती, ती म्हणजे, जश्न-ए-रेख्ता. या कार्यक्रमाचे अनेक व्हिडियो बघितल्या नंतर आणि त्याच्याबद्दल सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया वाचल्यानंतर माझी उत्सुकता नक्कीच बळावली होती. मात्र प्रत्यक्ष कार्यक्रमाने जरा निराशाच केली. पण त्याबद्दल लिहिणे हा एक स्वतंत्र विषय ठरेल. मात्र कार्यक्रमाचा उद्देश, तो ऐकताना श्रोत्यांकडून अपेक्षित वर्तनवृत्ती आणि एका विशेष कार्यक्रमाच्या प्रसंगी माझ्या मागे बसलेल्या काही प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया याचा एकमेव परिपाक होता – विरोधाभास! उर्दू शेरो-शायरीचे नजाकतदार, अदबशीर सादरीकरण करणाऱ्या अस्सल मराठमोळ्या 'सुखन'चा रेख्तामध्ये कार्यक्रम सुरूच होणार होता आणि संबंधित कलाकार त्यांच्याबरोबर आलेल्या व्यक्तीबरोबर, जी प्रेक्षकांमध्ये उभी होती, ध्वनियंत्रणेची तपासणी करीत होते. सगळाच समूह मराठी असल्यामुळे संवाद मराठीत सुरू होता, त्यात ध्वनी-प्रणाली चालू असल्यामुळे त्यांचा संवाद प्रेक्षकांमध्ये घुमत होता. पाच मिनिटंही झाली नाहीत, तर मागून वैतागलेला आवाज आला, ''ये कौनसी भाषा में बोल रहे हैं, क्या पता!''

रेख्ता हा उर्दू साहित्याशी निगडित असला तरीही मुख्यतः भाषा साजरी करणारा कार्यक्रम आहे, तिथे येणाऱ्या प्रेक्षकाला काही एक निश्चित अपेक्षा आहेत, तरीही कानावर पडणाऱ्या वेगळ्या नि अपरिचित भाषेबद्दल उत्सुकता न वाटता, या प्रश्नात तिरस्कार किंवा तिटकारा अगदी प्रकर्षाने जाणवत होता.

**भाषिक अनभिज्ञता आणि अनास्था**

हा प्रसंग घडण्याच्या जवळजवळ दोन आठवडे आधी, नव्हेंबरमध्ये, माझी 'थंडीसाठीची खरेदी' या विषयावर तेव्हाच्या नोकरीतील काही सहकारी मंडळींशी चर्चा झाली होती. या चर्चेच्या एक दिवस आधी इथल्या लाजपत नगर मार्केटमध्ये पांघरुणांची चौकशी करायला गेलो होतो. तिथे कानावर सतत 'ऊन' हा शब्द पडत होता, त्याचा अर्थ मला माहिती नव्हता, हे मी सहकाऱ्यांना सांगत होतो. पण काही वेळातच ऊन म्हणजे लोकर हे समजलं, परंतु सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य काही जाईना.

''असं कसं? मुंबईत ऊन नाही?'' ही सुरुवात. आणि 'हो, पण मला हा शब्द माहिती नाही' असं मी सांगितल्यावर खरी तक्रार समोर आली.

''पण हा तर प्रचलित शब्द आहे.''

''नाही, आमच्या भाषेत ऊन म्हणजे सनलाइट,'' मी म्हणालो.

''पण हिंदी तर राष्ट्रभाषा आहे, एवढं माहिती असायला हवं!''

त्यावर साहजिकच, असहमती दर्शवणारे मत नोंदविलं आणि देशात कोणतीही भाषा राष्ट्रभाषा नाही, हे नम्रपणे सांगितले. मात्र, त्यांच्या चेहऱ्यावर असहमती आणि काही प्रमाणात त्रासिक भाव स्पष्ट दिसत होते.

हा कार्यालयातला प्रसंग आणि 'जश्न-ए-रेख्ता' या भाषे संबंधित कार्यक्रमात एका दुसऱ्या भाषेकडे तुच्छतेने पाहणे यात मला काही गुणात्मक फरक जाणवत नाही. त्यातही जाणवलंच, त्यात तर एक सत्ताधीश असल्याची भावना आणि कुणीही असहमती दर्शवली की सहजपणे केलेले दुर्लक्ष! याच वृत्तीमुळे देशात स्थानिक विरुद्ध स्थलांतरित हा वाद होतो, आणि देशभरात घडणाऱ्या या भांडणांमध्ये दहापैकी नऊ वेळेस स्थलांतरितांचे प्रतिनिधित्व हिंदी भाषकच करीत असतात.

आमच्या ऑफिसमध्ये देखील कर्नाटकच्या सहकाऱ्यांशी बोलताना 'ते बिलकुल हिंदीत बोलत नाहीत' अशी तक्रार एका मूळच्या बिहारच्या, पण नोकरीनिमित्त दिल्लीत स्थायिक झालेल्या एका महिलेने केली. माझं ऑफिस म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या क्षेत्रात काम करणारी एनजीओ. आता 'ग्रासरूट्स'वर काम करताना हिंदी भाषिक नसलेल्या राज्यातील लोकांना ते त्यांच्या भाषेत प्रगती करीत आहेत की नाही याची पाहणी करायची, का तिथल्या लोकांना हिंदी जरा देखील येत नाही, याची तक्रार करायची?

**त्यांची धाव बाकरवडीपर्यंत...**

मूळच्या लखनौच्या असणाऱ्या पण नोकरीनिमित्त दिल्लीत स्थायिक झालेल्या ऑफिसमधील आणखी एका मुलीने अशीच एक चर्चा एकदा 'लंच टाइम'ला सुरु केली. ''आय एम सॉरी टू से, आशय, पर मेरा महाराष्ट्र का एक्स्पीरियंस थोडा अलग हैं,'' ही सुरुवात. ही मुलगी पुण्यात शिकायला होती आणि पुण्याची आणि एकूण महाराष्ट्राची ओळख केवळ बाकरवडीपुरती मर्यादित होती, याची मला कल्पना होती. पण म्हटलं, काय म्हणते आहे ऐकून घेऊया. म्हणून म्हटलं,

''कहिये!''

''मुझे महाराष्ट्र के लोग फ्रेंडली नही लगे, बस अपने ही दुनिया में बिझी लगे. ऐसा लगता हैं की वह काम से काम रखते हैं और हमारी तरह वेल कमिंग नहीं होते,'' असं ती पुढे म्हणाली. उत्तरेत लोक लगेच संवाद साधतात आणि लगेचच सर्वांचे स्वागत

करतात, असं तिचं एकूण म्हणणं होतं.

''अच्छा, लेकिन एक बात बताइये,'' मी अगदी उत्तरेतील शैलीत भूमिका मांडायला सुरुवात केली. ''अगर महाराष्ट्र और दक्षिण के लोग फ्रेंडली नहीं हैं, तो फिर जो शहर बसे हैं वह सब, दिल्ली छोड के, वहाँ कैसे बसे हैं?'' माझ्या या प्रश्नांची तिला अजिबात अपेक्षा नव्हती आणि त्याचे उत्तर तिच्याकडे असणे शक्यच नव्हते. तिला दिलेले उत्तर इथे लिहितो आणि याच उत्तराच्या माध्यमातून भाषा या मुद्द्यावर असलेले माझे आकलनही स्पष्ट करतो.

**भाषिक प्रभावाचे परिणाम**

देशात एखाद्या हिंदी भाषिक घरात वाढलेल्या मुलाला किंवा मुलीला ते घरात बोलतात ही भाषा देशात कुठेही बोलता येते. हा फायदा इतर कोणत्याही भाषेतील मुला-मुलींना मिळत नाही. शिवाय नोकरी निमित्त स्थलांतर हे हिंदी भाषिक प्रदेशातून हिंदी न बोलणाऱ्या प्रदेशांमध्ये होते. ही बाब जरी सर्वांना माहिती असली, तरीही त्याच्या अधिक खोलात कुणी जात नाही. देशातील सर्वमान्य भाषा ही हिंदी असल्यामुळे एखादा हिंदी भाषक बंगलोरला अगदी पेट्रोल भरायला गेला, तरी तिथे तो स्वतःच्या भाषेत हवं तेवढ्या पेट्रोलची मागणी करू शकतो. मात्र मराठी किंवा कानडी व्यक्ती दिल्लीत आला की त्यांच्या भाषेत कोणताही व्यवहार करू शकत नाही.

परिणामी, दोन्हीकडे एकाच भाषेचे वर्चस्व स्थापन होते. याचा पुढला परिणाम असा की हिंदी भाषेत वाढलेल्या कोणत्याही व्यक्तीला स्वतःमध्ये कोणताही बदल करावा लागत नाही. मात्र हिंदी भाषिक नसलेल्या राज्यात सतत बदल घडत असतात आणि इथल्या लोकांना सतत या बदलांना सामोरं जावं लागतं. या बदलांमधील पहिला बदल म्हणजे रोजच्या भाषेत पडणारा फरक. आता माझंच उदाहरण द्यायचं तर, मी मुंबईत घरी मराठीत बोलतो, बाहेर पडलो की रस्त्यावरच्या भाषेत हिंदीचा समावेश होतो आणि ऑफिसमध्ये इंग्लिश. हिंदी भाषिकांसाठी घरचीच भाषा ही रस्त्यावरची आणि ऑफिसमधली भाषा होते. अशा परिस्थितीत तू (म्हणजे ती मुलगी) जेव्हा महाराष्ट्रात जातेस, तेव्हा घरी बोलतेस तीच भाषा तिकडे बोलतेस. महाराष्ट्रातील किंवा दक्षिणेतील जी मंडळी तुला स्वागतशील वाटत नाहीत, त्यांना तुझी भाषा येत नाही. आणि देशात प्रामुख्याने अशीच माणसं आहेत ज्यांना इंग्लिश येत नाही. अशा वेळेस त्यांची भाषा सोडल्यास त्यांना जी भाषा थोडीफार येते ती म्हणजे हिंदी, आणि त्यामुळे त्यांचा प्रतिसाद तुटक वाटतो. इथे बसलेल्या लोकांमध्ये मी एकटा हिंदीभाषिक नाहीये. मात्र मला हिंदी येते म्हणून आणि आली नाही, तरी इंग्लिश येते म्हणून मी इथे येऊन नोकरी करू शकत आहे. उद्या जर तू मुंबईत आलीस आणि दहा मराठी बोलणाऱ्या लोकांमध्ये बसलीस, तर तुला समजावं म्हणून सर्वांना हिंदीत बोलावे लागेल. जर उद्या संभाषणाची भाषा बदलली तर तुम्ही देखील असेच जपून बोलाल आणि इतरांचा तुम्ही स्वागतशील नाहीत, असा गैरसमज होत राहणार.

हे एवढं सगळं सांगितल्यानंतर ऑफिसमध्ये जरा शांतता पसरली. मात्र माझं म्हणणं एका व्यक्तीला सोडून इतर कुणालाही पटलं नव्हतं, हे अगदी स्पष्टपणे जाणवत होतं. आणि हा अपवाद होती, एक पंजाबी भाषक व्यक्ती. पंजाबी भाषेची असलेली स्वतंत्र लिपी, तिथे वाढणारा हिंदीचा प्रभाव, त्यामुळे ठिकठिकाणी देवनागरीत लिहिल्या जाणाऱ्या सूचना आणि स्थानिकांकडून त्या न समजण्याबद्दल केली जाणारी तक्रार हे सारे तिने सांगितले आणि माझ्या बोलण्याशी सहमती दर्शवली.

ही चर्चा ऐकताना मला पंजाब आणि हरियाणा ही दोन राज्य स्थापन होताना झालेला भाषिक वाद आठवला. १९६६ या वर्षी हरियाणा हे पंजाब (तेव्हाचे पूर्व पंजाब) पासून वेगळे झाले व त्याला आधार होता भाषेचा! या वेगळ्या राज्याची सीमारेषा ठरवताना पंजाबकडून अकाली दल आणि हरियाणाकडून आर्य समाज आणि जनसंघ यांनी अनुक्रमे पंजाबी आणि हिंदी भाषेचा आग्रह धरला. तुमची मातृभाषा कोणती असं जनमत घेताना या दोन्ही समूहांनी संबंधित गावातील लोकांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून सर्वाधिक गावं आपल्या राज्यात येतील आणि आपल्या प्रदेशाच्या सीमा या दुसऱ्या राज्यापेक्षा मोठ्या असतील. त्या दिवशी माझ्या बाजूने बोलणाऱ्या त्या पंजाबी व्यक्तीला कदाचित हा इतिहास तिच्या आजी-आजोबांकडून सांगितला गेला असावा. मात्र ऑफिसमधील उत्तरप्रदेश किंवा बिहार मधील लोकांना असा संघर्ष होऊ शकतो याची देखील कल्पना नसावी.

**मर्यादित दृष्टिकोन**

हिंदी भाषकांची वृत्ती आणि जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा प्रचंड सीमित असतो, असं म्हणायला वाव आहे, तो याच उदाहरणांमुळे. आता 'छठ पूजा' या सणाचे उदाहरण घेऊया. दिल्लीत छठ पूजेदरम्यान अनेक ठिकाणी मोठ्या आवाजात




*धर्म, जात, भाषा, श्रद्धा, पूजापद्धती यात एकसुरी आग्रहापेक्षा व्यक्तिगत मोकळिकीची भावना देशाची राजधानी नसूनही दिल्लीच्या तुलनेत मुंबईला आगळावेगळा आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देते...*

चालणारे सार्वजनिक कार्यक्रम दिसले. हा सण आणि एकूण बिहारी मजुरांचं महत्त्व (छठच्या वेळेस अनेक कामं लांबतात, कारण अनेक मजूर बिहारला सण साजरा करायला जातात) आणि अर्थात 'वोट बँक' या कारणांमुळे मागच्या वर्षी दिल्ली सरकारने 'छठ पूजा' ही अधिकृत सुट्टी जाहीर केली. महाराष्ट्रातही गेल्या काही वर्षात छठ पूजेला एक तर प्रचंड विरोध होतो किंवा काही राजकीय पक्ष हा सण साजरा करण्यासाठी विशेष जागेची सोय करून देताहेत. थोडक्यात, बिहारी संस्कृती ही सतत चर्चेत असते, आणि हेच त्यांच्या व एकूण हिंदी भाषिकांच्या सीमित दृष्टिकोन असण्याचे कारण आहे.

अर्थात 'हिंदी भाषक' हा एकजिनसी समूह नाही. त्यातही अनेक श्रेणी आहेत. दिल्लीचंच उदाहरण द्यायचं, तर इथे एका बाजूने हरियाणा या हिंदी राज्याचा प्रभाव आहे तर दुसरीकडून उत्तरप्रदेशचा. दोघांची हिंदी तर भिन्न आहेच, पण हरियाणाची मंडळी दिल्लीत गर्दी करण्यासाठी व तिला अस्वच्छ ठेवण्यासाठी उत्तरप्रदेशातून येणाऱ्या लोकांना जबाबदार धरतात. या प्रतिक्रिया अनेकदा रॅपिडो, उबर, ओला यांच्या रिक्षा व टॅक्सी चालकांकडून ऐकल्या आहेत. उत्तरप्रदेशचे लोक आपण मागास आहोत हे मान्य करीत बिहारी मंडळी आपल्याहून अधिक मागास आहेत, हे सांगण्यात पुढाकार घेतात. आणि आपण या प्रदेशातील आहोत, असा एक अपराधी भावदेखील या लोकांमध्ये असतो, अगदी उच्चपदस्थ असले तरीही.

दिल्लीत ज्या कंपनीत काम करण्यासाठी आलो, तिथल्या एका उच्चपदस्थ व्यक्तीशी माझा परिचय करून देण्यात आला. तिने देखील मुंबईत काही वर्ष काम केलं असल्यामुळे लोकल ट्रेन, गर्दी, मुंबईचा पावसाळा अशा थोड्या संदर्भांची देवाणघेवाण लगेच पार पडली. तुम्ही कुठले, असं विचारल्यावर उत्तर आलं, बिहार. आणि काही सेकंदात पुढे ती म्हणाली, बिहार, आणि माझं लग्न उत्तर प्रदेशच्या व्यक्तीशी झालंय. हे ऐकून मी मान डोलावली, तर पुढल्या सेकंदात एक जोडवाक्य आलं, 'worst combination possible', आणि ती थोडं हसली. मला मात्र इतकं अवघडल्यासारखं कधीच झालं नव्हतं.

एवढे विरोधाभास आणि अंतर्विरोध असूनही हिंदी ही ओळख आणि त्याच्याभोवती असलेले भाषक आणि सांस्कृतिक प्रवाह हे सर्वांना माहिती असतील, हे गृहीत धरणारं आणखी एक गंमतीशीर उदाहरणं इथे मांडतो आणि पुढचं चिंतन सुरू ठेवतो. एकदा असंच लंच टाइमला ऑफिसमधील आधी उल्लेख केलेली बिहारची महिला ही उत्तर प्रदेशच्या मुलीला भोजपुरी संस्कृती या विषयावर काहीतरी सांगत होती. संवाद स्पष्ट ऐकू येत नसला, तरी प्राचीन, बहुत ही advanced culture असे शब्द कानावर पडत होते. आणि अचानक ती माझ्याकडे वळली आणि विचारलं, ''आपको तो भोजपुरी समझताही होगा ना?''

हा प्रश्न विचारण्याऐवजी माझ्या वतीने थेट जाहीर का नाही केलं? मग मी देखील फक्त 'नहीं' असं न म्हणता त्याला बिलकुल हा शब्द मुद्दाम जोडून माझं अज्ञान कबूल केलं आणि कमालीची निराशा आणि आश्चर्य ओढून घेतलं! शिवाय, ''आपको अहिराणी समझती हैं क्या?'' असा प्रतिप्रश्न विचारून तिला क्लीन बोल्ड केलं.

ही सारी उदाहरणं आठवताना मुंबई आणि दिल्ली या दोन्ही शहरांची तुलना करण्याचा मोह होतोच. दोन्ही शहरं कॉस्मोपॉलिटन आहेत, दोन्ही शहरांमध्ये स्थलांतरितांचे समूह येतात आणि दोन्ही शहरांमध्ये अनेक प्रकारच्या छोट्या-मोठ्या संस्कृती नांदतात. मात्र या दोन शहरांमधील फरक समजून घेण्यासाठी मेल्टिंग पॉट (melting pot) विरुद्ध सॅलड बोल (salad bowl) या चर्चेचा आधार घ्यावा लागेल. विविध संस्कृतींचे एकत्रीकरण दर्शवणारे हे दोन समाजशास्त्रीय दृष्टिकोन आहेत. पहिला दृष्टिकोन सांगतो की लोकं आपापली संस्कृती घेऊन एके ठिकाणी येतात आणि एका समान संस्कृतीत

मिसळून जातात. याच दृष्टिकोनाचे सर्वात प्रचलित उदाहरण अमेरिका. दुसरा दृष्टिकोन सांगतो, की विविध संस्कृती या सॅलडसारख्या असतात – त्या एकत्र असूनही आपली स्वतंत्र ओळख टिकवतात. याचे उदाहरण भारत. दिल्ली आणि मुंबई हे अनुक्रमे मेल्टिंग पॉट आणि सॅलड बोल आहेत, असं माझं मत झालं आहे. दिल्लीतही देशातील जवळजवळ सर्व भाषिक संस्कृतींचा सहभाग आहे. परंतु ते हिंदीच्या प्रवाहात एक होतात. मुंबईत मात्र तसं नाही. मुंबईत लोकांना एकमेकांच्या भाषा येतात, समजतात – विशेषतः मराठी आणि गुजराती भाषा. मुंबईत हिंदी विकसित झाली,ती देखील बंबैय्या, ज्यात अनेक भाषांमधील शब्दांचा समावेश आहे.

**वाटचालीची दिशा एकसाची**

हे दोन समाजशास्त्रीय दृष्टिकोन देशपातळीवर मांडताना असं जाणवतं, की देशाची वाटचाल सॅलड बोलपासून 'मेल्टिंग पॉट'कडे सुरु आहे. कारण बहुतांश उत्तर भारत हा हिंदी पट्टा म्हणून घोषित झाला आहे. तिथे एका भाषेमुळे एकजिनसीपणा निर्माण झाला आहे. दक्षिणेत आणि उर्वरित भारतात भाषांची विविधता आहे, मात्र तिथे याच हिंदी भाषकांचे स्थलांतर होतंय. हे स्थलांतर घडत असताना हिंदीचा मेल्टिंग पॉट तयार होतो आहे. आणि आपली मातृभाषा जर देशात कुठेही बोलली जात असेल तर आपण इतरांना ते आपल्यासारखेच आहेत अशी खात्री वाटून गृहीत का नाही धरणार? दिल्लीतील मंडळी ही याच कारणामुळे सीमित दृष्टिकोन बाळगून असतात.




*मुंबईतली इराण्यांची हॉटेल्स 'सॅलेड बोल'चा जिवंत अनुभव देतात. इथले पदार्थ विविध भाषा आणि जातिधर्मांचे प्रतिनिधित्व करतात...*

त्यांच्यातील बहुतेकांना इतर भागातील इतिहास, भाषा, संस्कृती, चालीरिती माहिती नसतात, हे सगळं जाणून घ्यायची इच्छा देखील नसते. आणि म्हणूनच हिंदी प्रदेशातील लोकं स्वागतशील आणि आतिथ्यशील असून देखील सगळी शहरं मात्र भारताच्या दक्षिणेतच विकसित झाली आहेत. आहे की नाही गंमत...

**आशय गुणे हे दिल्ली-मुंबई स्थित कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग-ए टेम्पेस्टुअस टेन्यूर-सहलेखक सुजय शास्त्री- हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com

**आ वा ह न**

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

सप्रेम नमस्कार,

तुमच्या पाठबळाच्या जोरावर '**समतावादी मुक्त-संवाद पत्रिके**'ने (पूर्वाश्रमीचे 'मुक्त-संवाद') साडेसहा वर्षांचा टप्पा गाठला आहे. पुढची वाटचाल अशीच सुकर होण्यासाठी आपल्या मदतनिधीची आम्हाला आशा आहे. मदतनिधी जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**खातेदार संस्थेचे नाव :** SAMATAWADI MUKTSANVAD PATRIKA
**बँक, शाखा :** SARASWAT BANK, MAHIM
**खाते क्रमांक :** 610000000035417
**आयएफएससी क्रमांक :** SRCB0000007

**'समतावादी मुक्त-संवाद पत्रिके'चा अंक मर्यादित संख्येने छापील आणि पीडीएफ अशा दोन प्रकाराने प्रकाशित होतो. हा अंक वाचकांसाठी विनामूल्य असून, अंकाच्या पीडीएफसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा अथवा व्हॉट्सअॅपद्वारे संदेश पाठवावा. संपर्क : ९६१९८२३६७२/८५५१८५०४६२**

# वॅन गॉफ : एक सर्जन शोध



डॉ. आनंद जोशी

ज्ञान रंग



*जपानी चित्रशैलीतले आमंड ब्लासम्स आणि ते साकारणारा मनस्वी व्हॅन गॉफ...*

खिडकीतून बाहेर बघितले आणि टंकित हात थबकला. बाहेरच्या झुडुपावर चढलेली आईस्क्रीम वेल बहरली होती. गुलाबी इवलीशी फुले, झुडुपाची हिरवी पाने, काही कोवळी; काही थोडी जून. हिरव्याच्या अनेक छटा गुलाबी इवल्यांसह नुकत्याच उगवलेल्या सूर्याच्या कोवळ्या किरणात खुलून दिसत होत्या. रंगसंगती पाहून वाटले, निसर्गाच्या आविष्कारात सुद्धा एक पोत असतो. रंगांचे ते ताणेबाणे, तंतू-ओतू, उभे-आडवे, पाहून माझ्या नजरेने 'क्लिक' केले आणि ते 'सृष्टीचे पेंटिंग' माझ्या स्मृतीत बंदिस्त झाले. अवकाशातील आकाराला रंगाने आणि रंगाला आकाराने असे काही कवटाळले होते, ते एकमेकांपासून निराळे करणे कठीण. ही रंगकला मी पाहिली आणि रंगकलेचा नुकताच वाचलेला इतिहास डोळ्यांपुढे आला आणि थबकलेला हात परत टंकित झाला...

रंग कलेला इतिहास आहे. क्लॉड मॉने (१८४०-१९४६) आणि जॉर्ज सुराह् (१८५९-१८९१) या फ्रेंच रंगवंतांनी रंगावर नाजूक प्रयोग केले. रंगाबाबतचे ज्ञान लाजाळू असते, ते या रंग कलाकारांनी हुडकून काढले. हे प्रयोग प्रभावी होते. निसर्गातील 'रंजक ऊर्जा' माणसाच्या 'सायकी'शी बोलते. ती कॅनव्हासवर एकत्रित केली पाहिजे, असे चित्रकारांना वाटू लागले. या निसर्गातील रंजक उर्जेचा शोध घेण्यासाठी पॉल सिनिॲक (१८६३-१९३५), हेन्री मातिस (१८६९-१९५४), पॉल गॉहगन (१८४८-१९०३) आणि वॅन गॉफ, डच उच्चार : वान हॉह् (१८५३-१८९०), जणू एकामागोमाग एक साउथ ऑफ फ्रान्सला येऊन गेले होते.

वॅन गॉफला निसर्गातील रंगाचे वेड. या वेडापायी तो साउथ ऑफ फ्रान्सला आला आणि अवघ्या तीन-चार वर्षात त्याने हे रंगाकार कॅन्व्हासवर अजरामर केले आणि स्वत:च स्वत:च्या छातीत गोळी मारून जगाचा निरोप घेतला. त्यावेळी त्याचे वय होते, ३७ आणि साल १८९०.

**शेतकरी कामकरी**

विन्सेंट वॅन गॉफचा जन्म १८५३ सालचा. हॉलंडमधील एका धर्मोपदेशकाच्या कुटुंबातला. सहा भावंडात तो सगळ्यात मोठा. तो हट्टी, अशांत, स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागणारा, रागीट, स्वभावाचा मुलगा असे त्याची नॅनी म्हणत असे. त्याच्या आईचे आणि त्याचे फारसे पटत नसे. वयाच्या १४व्या वर्षी त्याने शाळा सोडली. १८७६ ते १८८० या काळात धार्मिक कथा सांगत उपदेश करत, तो इंग्लंड आणि बेल्जियम येथील गावातून फिरत होता. तेथे त्यांनी खाणकामगार, शेतकरी कामकरी बायका-पुरुष बघितले. तो सुद्धा गरिबीचे जीवन काढत होता. त्याच सुमारास ज्याँ फ्रॅंसवा मिलट (१८१४-१८७५) याची शेतकरी जीवनावरची पेंटिंग्ज त्याने पाहिली. तीन बायका ओणव्याने शेतात काम करत आहेत, मिलटचे The gleaners (१८५७) हे पेंटिंग वॅन गॉफने पाहिले होते. यात नाट्य काहीही नाही, साधे ग्रामीण चित्रण. तरीही वॅन गॉफ प्रभावित झाला. त्याने पेंटर होण्याचा निर्णय घेतला. दृश्यकलेचाच नव्हे, तर कोणत्याही ज्ञानशाखेचा इतिहास हा सामाजिक बदलाचा इतिहास असतो. 'प्रतिष्ठित पेंटिंग हे प्रतिष्ठित माणसे दर्शविणारे असले पाहिजे, तर त्याला प्रतिष्ठा मिळते', असे युरोपमधील कलेच्या 'अकादमीत' शिकवले जायचे. १८४८ ते १८४९ या खंडात युरोपमध्ये सामान्यांची स्थिती हलाखीची होती, असमानता तर होतीच, उदारमतवादाच्या झुळुका येऊ लागल्या होत्या, लोकांना बदल हवा होता. सिसिली आणि फ्रान्स येथे सुरु झालेली क्रांतीची छोटी लहर जर्मनी, इटली, ऑस्ट्रियन एम्पायर येथे पसरली.

त्याच काळात १८४८ मध्ये फ्रान्सच्या बार्बिझन खेडेगावात काही चित्रकार जमले होते. त्यांनी ठरविले आता निसर्गाकडे आणि चिखलात काम करणाऱ्यांकडे स्वच्छ नवनजरेने बघायचे आणि त्यांचे जीवन कॅनव्हासवर रंगवायचे. या समूहात चित्रकार मिलट होता. त्याने जी पेंटिंग्ज केली, ती त्या काळाची प्रातिनिधिक समाजचित्रे म्हणून आजही युरोपातील चित्रसंग्रहालयात पाहावयास मिळतात. या चित्रांचा वॅन गॉफवर खोल परिणाम झाला होता. ही त्याची मीमांसा आहे.

मिलटचे १८५७ सालचे चित्र आणि एकंदरीत मिलटची चित्रकला पाहून वॅन गॉफने चित्रकार होण्याचा निर्णय घेतला. यातला १८५७ हा आकडा पहिल्याबरोबर मी चरकलो, 'काल' असा काही विक्राळ हसला, मला आपल्याकडे ब्रिटिशांविरोधात झालेले १८५७चे बंडच दिसू लागले, पण तो विचार बाजूला सारला आणि १८५७च्या आसपास येथील 'कला शेतात' काय फुलत होते, हा सुंदर विचार मनात आला. प्रत्येक खंडात काहीतरी सुरेख असतेच. याच काळात भारतात पाश्चात्य पद्धतीच्या कलाशाळा स्थापन झाल्या, मद्रास १८५०, कलकत्ता १८५४, जे जे स्कूल ऑफ आर्ट मुंबई १८५७. 'स्त्री चित्रकार (१८५७-१९५०)' लेखिका साधना बहुळकर, राजहंस प्रकाशन, आवृत्ती पहिली नोव्हेंबर २०२१ यात लिहिले आहे, 'जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील जुन्या कार्यालयीन दप्तरात तेव्हाच्या विद्यार्थिनींची काही ना काही नावे मिळतील. एका बॅचला साधारण किती विद्यार्थिनी असायच्या याचा अंदाज घ्यावा. त्यासाठी जे. जे. स्कूलचे सध्याचे डीन श्री. विश्वनाथ साबळेसरांना दोनदा फोन. एक-दोन कार्यक्रमांना ते भेटले. त्याही वेळेला माझा अभ्यासाचा विषय व त्यासाठी काही रेकॉर्ड बघणे आहे, हे सांगितले. पूर्वसंमतीसाठी पत्र देऊ का? अशीही विचारणा केली. परंतु पूर्वीच्या विद्यार्थ्यांचे हजेरीपट, ॲडमिशन फीचे काही रेकॉर्ड किंवा रिझल्ट्स हे काहीच उपलब्ध नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले' असे असून सुद्धा लेखिकेने मेहनती संशोधनाने माहितीपूर्ण पुस्तक सिद्ध केले आहे. त्यानंतर भारतीय परिस्थिती पर्यावरणानुसार दृश्यकला इथे विकसित होत गेली. पूर्वरेखेवरचा हा लेखन प्रवास मनोहारी असतो. मी पुन्हा

वर्तमानात येऊन पोचलो.

**वॅन गॉफचे पुनरुजीवन**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विन्सेंट वॅन गॉफच्या पुनरुजीवनाला झळाळी आली. तो मृत्यूनंतर पाश्चात्य संस्कृतीतील कलाक्षेत्राचा एक हिरो बनला. हे शक्य झाले कारण वॅन गॉफची 'कागदपत्रे, अगदी चिठ्ठ्यासुद्धा' पाश्चात्य जगात ठिकठिकाणी जपून ठेवल्या होत्या. त्या अभ्यासकांना सहज मिळत होत्या. म्हणून त्याच्या जीवनावर नाटके, कादंबऱ्या, लिहिल्या गेल्या, चित्रपटही निघाले. कोणत्याही चित्रकारावर इतकी पुस्तके लिहिली गेली नसतील. त्याच्या चित्रांच्या जितक्या कौशल्यपूर्ण नकला केल्या गेल्या आहेत आणि कलेच्या बाजारात विकल्या गेल्या आहेत, तितक्या दुसऱ्या कोणा चित्रवंतांच्या झाल्या नसतील. त्याच्या चित्रांची लाखो पिक्चर पोस्टकार्ड्स झाली आहेत. त्याच्या हयातीत दुर्लक्षित राहिलेला हा चित्रकार आज 'रोमँटिक आर्टिस्ट' मानला जातो. त्याच्या मनोविकृती, त्याचे आत्मघातकी जीवन आणि मृत्यू जणू त्याचे जीवनातील अपयश हे त्याच्या यशस्वी पुनरुजीवनाचे कारण ठरले आहे. यातून तज्ज्ञांना वाट पुसत, त्याच्या कलेचा रसरंग आणि वॅन गॉफ एक 'केस-स्टडी' या दोन्ही अंगांनी केलेला हा लेखन प्रयत्न.

**अस्थिरतेच्या अवकाशात**

वयाच्या १६व्या वर्षी तो गॉपिल या चित्र विक्रेत्या कंपनीत नोकरीला लागला. तेथे त्याने चार वर्षे काम केले. तेथून त्याची या कंपनीच्या लंडन शाखेत बदली झाली. ही कंपनी फ्रेंच असल्यामुळे त्याला पॅरिसच्या शाखेत काम मिळाले. 'चित्रं विकणे हा एक फ्रॉड आहे' असे मत त्याने ऑफिसमध्ये उघडपणे सांगितल्यामुळे त्याला नोकरीतून तडकाफडकी काढून टाकण्यात आले.

विन्सेंट ब्रसेल्सला गेला, त्याने हातात पेन्सिल घेतली आणि तो निरनिराळ्या सामान्य माणसांची रेखाटने करू लागला. त्याचा धाकटा भाऊ थिओ त्याची काळजी घेत होता. सगळे बरे चालले होते, पण एक दिवशी त्याचे आणि त्याच्या बापाचे कडाक्याचे भांडण झाले. विन्सेंटने घर सोडले आणि तो द हॉग या शहरी आली. वर्षभर चित्रे काढत होता. एक दिवस अचानक देवीचे व्रण असलेल्या वेश्येबरोबर राहण्याचा त्याने निर्णय घेतला. तिला एक मूल होते. हा निर्णय त्याने कणवेतून घेतला होता. तो पर्यंत त्याने २५ ऑईल पेंटिंग्ज, ३०० रेखाटने आणि काही वॉटर कलर्स केली. पण तेथील चित्रकारांशी त्याच्या भांडाभांड्या, वादविवाद झाले. तो गावी परतला आई-वडील दोघे आजारी होते. १८८५ला वडील वारले. विन्सेंट आजारी पडला. इतर शारीरिक-मानसिक आजारांसोबतच गुप्तरोगाचे निदान झाले होते. त्यातच तो खंगत गेला. अखेरीस अगदी अशक्त अवस्थेत तो पॅरिसला थिओकडे आला.

पण वॅन गॉफचा आर्टिस्ट म्हणून जन्म केव्हा, कसा झाला?

**साल २०१५**

वॅन गॉफचा लेख टंकत होतो, तेव्हा एक विलक्षण अनुभव आला. त्याच्याबद्दल लिहिताना त्याच्या पुनरुजीवनातून विन्सेंट उलगडत जातो हे समजले. अगदी सिनेमातल्या फ्लॅशबॅकप्रमाणे प्रकाश पडतो, त्याच्या जीवनावर. २०१५ साली 'मोन्स या बेल्जियममधील शहराची 'युरोपीयन कॅपिटल ऑफ कल्चर' म्हणून निवड झाली. २०१५ हे वॅन गॉफच्या मृत्यूचे १२५ वे वर्ष आहे, हे 'मोन्स'च्या नागरिकांच्या लक्षात आले. मोन्स शहराजवळ क्युसमस हे कोळशाचे खाणगाव आहे. पूर्वी जेव्हा हे गाव कोळशाच्या काळ्या काजळीने माखले होते तेव्हा १८७८ साली २५ वर्षाचा विन्सेंट येथे येऊन राहिला होता. सुवार्तिक ख्रिस्तीधर्माचा प्रसार करणारा उपदेशक म्हणून त्या गावात तो आला होता. त्याला चर्चचा आदरणीय पाद्री होण्याची मनिषा होती, पण तशी संधी त्याला मिळाली नाही. तो आसपासच्या जगाशी स्वत:ला जोडू पाहात होता, संपर्क संवाद करू पाहत होता. ते त्याला जमत नव्हते. पण शेतकरी, कामकरी तसेच खाणकामगार यांच्याशी मात्र त्याचे नाते झटकन जुळले. काहींशी तर त्याची मैत्री झाली. सह-अनुभूती (एम्पथी) आणि सहानुभूती (सिम्पथी) या भावना नात्यात होत्या. मग त्यांनी त्यांची रेखाटने करण्यास सुरुवात केली. त्याला कलाशिक्षण नव्हते. तो स्वशिक्षित होता. स्वत:ला घडवण्यासाठी तो ब्रेटन आणि मिलट यांच्या चित्रासारखी चित्रे काढू लागला. या दोन्ही चित्रकारांच्या शैलीबद्दल आणि त्यांनी निवडलेल्या तळागाळातील चित्रविषयाबाबत त्याला विलक्षण आदर होता. त्यांची चित्र-नक्कल करणे, हा त्याच्यासाठी चित्रकलेच्या शिक्षणाचा रियाज होता. त्याची 'द डिगर्स' 'द सोअर' ही त्या काळातील चित्रे त्याची नैसर्गिक प्रतिभा आणि खोल भावनिक बुध्यांक दर्शवतात.

**चित्रकार गॉफचा जन्मला...**

वॅन गॉफने रंगांचे जाडथर, उठावदार पोत, तेजस्वी आणि तीव्र रंग वापरून खेड्यातली कामकरी माणसांचे रोजचे

ठसठोंबस जीवन कॅन्व्हासवर सजीव केले. १८८० साली क्युसमस या गावी त्याने चित्रकार होण्याचा निर्णय घेतला. तो त्याच्या जीवनातील स्पष्टतेचा क्षण होता. २०१५ साली १२५ व्या स्मरणवर्षाच्या निमित्ताने भरलेल्या 'वॅन गॉफ द बर्थ ऑफ ॲन आर्टिस्ट' या प्रदर्शनात त्याची ही चित्रे मांडली होती आणि त्या गावातून विन्सेंटने त्याचा भाऊ थिओ याला जी पत्रे लिहिली, त्या सात पत्रांचा व्यवहार प्रदर्शनार्थ ठेवला होता. एका पत्रात विन्सेंटने लिहिले आहे, 'इथे माझे रक्ताभिसरण पुन्हा सुरू झाले आहे, काही महिन्यापूर्वी अशी माझी स्थिती नव्हती.' १८८८ साली थिओने त्याच्या बहिणीला लिहिले, 'विन्सेंटचा जगाबद्दलचा दृष्टिकोन स्वच्छ आणि स्पष्ट आहे, हे एक आश्चर्य आहे. त्याला आणखी काही वर्षे आहेत, त्यात तो निश्चितच नाव कमवेल.' पण पुढे फक्त दोनच वर्षे शिल्लक होती. माझ्याकडे एका जुन्या पुस्तकाच्या दुकानात मिळालेले, छोटेखानी वॅन गॉफचे रंगीत सचित्र चरित्र आहे, त्याची रंगीत पाने उलटताना हा पट डोळ्यापुढे उभा राहतो.

**नाद जपानी कलेचा**

जपान दोनशे वर्षे पाश्चात्य देशांपासून कुलुपबंद होता. १८५४ मध्ये अमेरिकेने जपानला व्यापार-उदिमाकरता दरवाजे उघडण्याची सक्ती केली. याचा युरोप अमेरिकेतील दृश्यकलेतील आविष्कारावर परिणाम झाला. जपानी कलेने युरोपीय बाजार अक्षरशः तुडुंबला. युरोपीय दर्शकांना Ukiyoe- उकीयोए म्हणजेच 'तरंगत्या जगाची चित्रे' ही कला प्रथमच पाहायला मिळाली. जापानी लँडस्केप्स, रस्त्यावरची दृश्ये, लोककथा, आणि निसर्ग विषय दाखवणारी तेजस्वी जिवंत रंगीत 'वूडब्लॉक प्रिंट्स' थोड्याच काळात लोकप्रिय झाली. उकीयोए ही जपानी कलाशैली १६०३-१८६८ काळात बहरली. जपानी 'काष्ठ छपाई' ही कला सातव्या शतकात चीनमधून जपानमध्ये आली. यात कलाकार आधी लाकडावर चित्र कोरतो, नंतर वॉटर कलर वापरून छपाई करतो. यात कलाकार आणि छपाईकार या दोघांचे कौशल्य उपयोगी ठरते. पॅरिस येथील इम्प्रेशनिस्ट मॅने, मोने, डुगाह्, यांनी या जपानी प्रिंट्सचा अभ्यास केला, पण वॅन गॉफला त्यातील सौंदर्य जसे शोषून घेता आले, तसे कोणालाच आले नाही. २०१८ मध्ये 'वॅन गॉफ आणि जपान' हे प्रदर्शन ॲमस्टरडॅम येथे भरले होते. त्याच्याकडे ६६० जपानी प्रिंट्स होती. त्यातील बरीच त्याने त्याच्या स्टुडियोच्या भिंतीवर लावली होती. वॅन गॉफने स्वत: ६० जपानी पेंटिंग केली होती. या सगळ्याचे ते प्रदर्शन होते. त्यात विन्सेंट आणि थिओ यांचा जपानी चित्रांबाबतचा पत्रव्यवहार दर्शकांकरता हेतूपुरस्सर ठेवला होता. विन्सेंटने थिओला एका पत्रात लिहिले आहे, 'माझे सगळे चित्रकाम काही प्रमाणात जपानी कलेवर आधारित आहे.'

पॅरिस येथे वॅन गॉफला जपानी कलेचा नाद आणि ध्यास लागला. तो घेऊनच विन्सेंट दक्षिण फ्रान्समधील अर्लिस या गावी गेला. विन्सेंट एका पत्रात थिओला लिहितो, 'येथे सुद्धा मी जपानी नजरेतून पाहतो.' या काळातील त्याच्या पेंटिंगमध्ये ब्रशचे फटकारे उत्तीर्व होते, रंगांची घुमड होती आणि त्या बरोबरच उकीयोएमधील नितांत आणि रमणीय प्रशांतताही होती. 'सनफ्लॉवर्स' (१८८८), 'द नाइट कॅफे' (१८८८), या चित्रात त्याचा जपानी डोळा दिसतो, असे कला समीक्षक म्हणतात.

**सुंदरीचे चित्र**

विन्सेंटने १८८७ मध्ये Courtesan हे जपानी पेंटिंग केले. पॅरिस इलस्ट्रे या मासिकाच्या मुखपृष्ठावर Keisai Eisen (१७९०-१८४८) या सुप्रसिद्ध उकीयोए कलाकाराचे 'bijin-ga' - 'सुंदर स्त्रीचे चित्र' हे प्रिंट वापरले होते. त्यावरून कोर्टेझान हे पेंटिंग केले होते. उकीयोए शैलीतील हे व्यक्तिचित्र आहे. चित्राभोवतीच्या महिरपीत 'लिली पॉंड' आणि बेडूक आणि बगळे आहेत. बेडूक आणि बगळे यांच्या फ्रेंच शब्दाचा 'स्लँग' अर्थ वेश्या असा होतो. ती जपानी 'गेशा' असेल का? ते दर्शकाने ठरवावे.

पाश्चात्य व्यक्तीचित्रापेक्षा हे खूप वेगळे होते. २०१८ सालच्या 'वॅन गॉफचा जपानी प्रभाव' या प्रदर्शनाचे ते एक आकर्षण होते.

**पुलावरचा अवचित पाऊस**

हिरोशिगी (१७७७-१८५८) हा उकीयोए शैलीतला सुप्रसिद्ध कालाकार. त्याने १८५७ मध्ये 'Sudden shower over Shin-Ohashi bridge and Atake' हे चित्र काढले होते. सुमिदा नदीवरचा पूल आणि आटेक गोदीवर अचानक आलेला ढगफुटी पाऊस, याने लोकांची उडालेली धांदल या चित्राचे प्रिंट पाहून वॅन गॉफ प्रभावित झाला. त्यावरून विन्सेंटने 'द ब्रिज इन द रेन' हे उकीयोए पेंटिंग केले. यात त्याने त्याच्या रंग कुंचल्याने ढगांचे पुंजके दाखवले, पुलाखाली फेसाळलेला हिरवट दर्या आणि वरून पडणारा पाउस उभ्या बारीक पातळ रेषात चित्रित केला आहे. पेंटिंगच्या महिरपीमध्ये कांजी या



*व्हॅन गॉफने मानवी प्रेरणांचा अथक शोध घेतला. त्याच शोधात त्याने 'द सोअर' आणि 'द डिगर्स' ही दोन जगप्रसिद्ध चित्रे साकारली...*

चिनी व्यक्तिरेखांची आरास केली आहे. मी एक सामान्य वाचक, दर्शक, पण कविता, चित्रकलेचा लोभी. चित्र आणि कविता मला समसमान भासतात. मग कधी कविता वाचता वाचता चित्र डोळ्यांपुढे तरळते, कधी चित्र नजरले, तर कविता आठवते.

हे पेंटिंग पाहिल्यानंतर 'पावसाच्या गर्भतळी' (प्रकाशक शब्दमल्हार प्रथम आवृत्ती ७ जून २०२५) या कविता संग्रहातील कवी स्वानंद बेदरकर यांच्या पावसाच्या रेषा आठवल्या...

*चित्रात रेघांनी दाखवलेल्या पावसाने*
*ओला होत नाही कागद*
*वा*
*रंगही पसरत नाही इतस्ततः...*

*...असे काहीच होत नाही*
*तरी भरत जातो*
*कलाकृतीतला पाऊस*
*प्रत्येकाच्या डोळ्यांत...*

'चित्रकार नेहमीच कवी असतात. आकार आणि रंग यांचे संतुलन साधत, नजरेला सुखदायी, असा सुंदर आकृतीबंध पेंटिंगमध्ये करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो' (इ. एच. गॉम्ब्रिच १९०९-२००१ सुप्रसिद्ध कलाइतिहासकार) या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ आणि आतील मांडणी चित्रवंत चंद्रमोहन कुलकर्णी यांनी केली आहे, हे सूचक आहे.

**बदामी बहर**

होकुसाई (१७६०-१८४९) या उकीयोए कलाकाराचे 'बुलफिंच आणि विपिंग चेरी ब्लॉसम' हे प्रिंट वॅन गॉफने कला विक्रेत्याकडे पाहिले होते. खूप महाग असल्याने तो ते विकत घेऊ शकला नाही. पण या प्रिंटने त्याच्या मनावर खोल परिणाम केला. १८९० मध्ये तो दक्षिण फ्रान्स येथील 'सेंट रेमी असायलम' मध्ये भारती झाला होता. तेथे त्याला त्याचा भाऊ थिओला मुलगा झाल्याचे कळले. पुतण्याचा जन्म साजरा करण्यासाठी त्याने सृजनाचे, नवजीवनाचे प्रतीक म्हणून 'आमंड ब्लॉसम्स' (१८९०) बदामाच्या फुलांचा बहर हे उकीयोए-ए होकुसाई शैलीतील पेंटिंग केले. निळ्या पार्श्वभूमीवर रंगवलेला नाजूक फुलोरा चित्रात कोणतीही सावली नसलेला, हा रंगकलेचा अभिजात नमुना आहे. वॉलपेपर, सोफा, फर्निचर, गादिकाम या वरील आवरणे, कॅन्व्हास बॅग्ज यावर चित्राच्या असंख्य प्रिंट्स जगभर लोकप्रिय झाल्या आहेत. आजही या पेंटिंगच्या प्रतिकृती वारेमाप विकल्या जातात. विन्सेंट असा घराघरांत पोहोचला आहे.

चेरी ब्लॉसम क्षणिकतेचे प्रतीक मानले जाते, पण बदामाचा फुलोरा हे नवजीवनाचे नाजूक प्रतीक म्हणून विन्सेंटने हे पेंटिंग केले. त्याची उकीयोए शैलीतील पेंटिंग्ज या नकला नव्हत्या, कारण प्रत्येक चित्रात वॅन गॉफ होता.

**निर्वाणाची अंतःप्रेरणा?**

वॅन गॉफने १८८८ मध्ये दक्षिण फ्रान्समध्ये असताना सेल्फ पोर्टेट काढले होते. त्यात त्याने डोक्यावरचे केस आणि भुवया बारीक करून घेतल्या होत्या. त्या स्वचित्राबाबत तो थिओला लिहितो, 'या स्वचित्राला राखाडी आणि फिकट हिरव्या रंगाची पार्श्वभूमी आहे. जपानी बौद्ध भिक्षुसारखे हे माझे चित्र आहे.' त्याला निर्वाणाची जाणीव झाली होती का? असा विचार स्पर्शून गेला. टंकत वेळ कसा गेला हे कळले नाही. शब्दमर्यादेला पोहोचलो होतो. बाहेर आकाशाकडे नजर टाकली, विन्सेंटचे 'स्टारी नाइट' कोणीतरी रंगविले होते, का ते मी मनोमय नजरत होतो?


**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**

**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# गाणं कुठं सुरू आहे का?



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



**संगीत ही फार सावकाशपणे बदलत जाणारी कला आहे, असं मानलं जातं. भाषेचा आश्रय घेतलेल्या कला उदा: साहित्यात त्यामानाने जलद बदल होतात. दृश्यकलांवर सुद्धा परिवर्तनाचा परिणाम दिसतो. संगीत ही एक वेगळी भाषा आहे. अनेक शतके आपल्याला एकाच प्रकारचे संगीत ऐकू येते. सध्याच्या काळात संगीतावरचं तंत्रज्ञानाचं आक्रमण टाळता न येण्यासारखं अफाट आहे. याचे धक्के एकवेळ आपण सहनही करू, पण त्या अनुषंगाने होत असलेली पडझड रोखता येणं अशक्य आहे. चांगली माणसं ऐकली न जाणं, त्यांचं गायन–वादन बंद पडणं क्लेषकारक आहे...**

एकदा पं. भीमसेनजींचं बरोड्यात गाणं होतं. त्यावेळी ही इतकी दिग्गज गायक मंडळी देखील फार तामझामचा आग्रह धरत नसत. तर ते बरोडा स्टेशनवर उतरून कार्यक्रम स्थळी टांग्यातून निघाले. त्यावेळी आजच्यासारखी रस्त्यावर गर्दी वगैरे नसायची. कार्यक्रमात गायल्या जाणाऱ्या रागाचा रियाज म्हणून पंडितजींनी काही ताना घ्यायला सुरुवात केली आणि थोड्या वेळाने थांबले. ते ऐकून टांगेवाला म्हणाला, पंडितजी इतना बढिया पुरिया चल रहा था, रूक क्यो गये? ते ऐकून पंडितजी अवाक् झाले. म्हणाले, ''आपकी संगीतकी समझदारी तो अच्छी दिख रही है, आप भी कुछ गाना वगैरे सिखते हो क्या?'' तर तो नम्रपणे म्हणाला, ''नहीं, नहीं मैं फैयाझ खाँसाहब के बगलमेही रहता हूं और सुबह शाम उनका रियाज सुनता रहता हूं शायद इसी वजहसे थोडा बहोत समझ लेता हूं.'' त्यावेळी फैयाझ खाँसाहेबांचा 'आवाज चांगला नाही' असं बरेच लोक म्हणत असतानाही त्यांची गायकी नावाजली जायची, कारण यांच्या तबकड्या बाजारात सहज उपलब्ध होत्या.

**लोकानुनयी रागदारी**

या पार्श्वभूमीवर खुर्जा घराण्याचे अल्ताफ हुसेनखाँ म्हणून एक गायक होते. खुर्जा हे उत्तर हिंदुस्थानी घराणं आहे. चार-दोन अभ्यासकांशिवाय कोणीही त्या ऐकायला तयार नसतं. लोकांना असलं गाणं-संगीत पचायला जड जातं. अ‍ॅज म्युझिक गेट्स मोअर अँड मोअर वॉटर्ड डाऊन, पचत नाही म्हणून हे पातळ (सौम्य) होत असावं. लोकांना कळावं, आवडावं म्हणून सोपं, सोप्पं असं करत जाणारे गायक अशा रीतीने लोकानुनयी होत जातात. श्रोत्यांना शरण जातात. काहीजण त्याला मग धर्माची, भक्तिमार्गाची वगैरे डूब देतात. उगीचच संस्कृत कवनं काढून ती रागांच्या चालीत म्हणतात. व्यक्तिशः मला असं वाटतं की, पं. जसराज हे त्याचं मोठं उदाहरण आहे.

मी यांच्या बिहागच्या अपार प्रेमात होतो. त्यांना प्रत्यक्ष ऐकण्याची अनेकदा संधी मिळाली होती. नंतर नंतर त्यांना स्टेजवर दहा-पंधरा जणांना सोबत घेऊन गाताना बघून कधी एकदा उठून जातो, असंच व्हायचं. लोकांना कदाचित राग येईल. पण ज्या लोकांनी पूर्वीची भीमसेनी गायकी ऐकली होती, त्यांनाही भीमसेन जोशींच्या बदलत गेलेल्या गाण्याबद्दल आक्षेप होते. पूर्वीच्या काळी असं होत असे की, एक गायक शिष्य दोन-चार वेगवेगळ्या गुरूंकडे शिकत असे. म्हणजे 'माझ्या घराण्यातलं शिकवून झालं. आता तू दुसरीकडे जा.' असं गुरूच सांगे. शिष्य स्वतःचं सर्जन करत. तेवढी कुशाग्रता, तेवढी बुद्धी, स्वतःला विकसित करणं इथे आवश्यक असतं. एकतर आता हे करायला लोकांना वेळही नाही आणि मुळात त्यांची तयारीही नाही. श्रुती आणि इतर बारकाव्यांचा वापर वेगाने नष्ट होत चालला आहे. जाड, भद्दे, ढोबळ असं करण्याकडे कल वाढतोय.

गुलाम अलीच्या गझला खूप नाट्यात्म असतात. म्हणजे, एकदम नाटकीपणा आणला जातो. गाण्यातील व वादनातील कसरत आता महत्त्वाची झाली आहे. कदाचित ही कसरतबाजी तारुण्य, जोश, जीवनाचा उत्सव इत्यादींशी संबंधित आहे; म्हणून याची पकड असेल. परस्परसंबंधच असे आहेत, की सावकाश गाणं, मोठ्या गमकेच्या ताना गाणं हे सगळं गरीब, म्हातारे, खेड्यात राहणारे थोडक्यात, मागासलेपणाशी जुळलेलं आहे.

**संगीत कलेचे परिवर्तन पर्व**

संगीत ही फार सावकाशपणे बदलत जाणारी कला आहे, असं मानलं जातं. भाषेचा आश्रय घेतलेल्या कला उदाः साहित्यात त्यामानाने जलद बदल होतात. दृश्यकलांवर सुद्धा परिवर्तनाचा परिणाम दिसतो. संगीत ही एक वेगळी भाषा आहे. अनेक शतके आपल्याला एकाच प्रकारचे संगीत ऐकू येते. विसाव्या शतकात भारतीय भाषांवर आणि पर्यायाने साहित्यकृतींवर इंग्रजीचा खूप परिणाम झालेला दिसतो. पाश्चात्त्य संगीताचा भारतीय संगीतावर त्यामानाने खूप कमी परिणाम झालेला दिसतो. इंग्रजांची सत्ता आपल्या देशावर होती. त्यांची परंपरा तपासली, तर असे दिसते की ते काही संगीतवेडे खचितच नव्हते. त्यामुळे साहित्याच्या तुलनेत त्यांनी आपल्याकडील संगीतात फारशी चबढब केलेली दिसत नाही. सुप्रसिद्ध इतिहासकार श्री. के. एन. पण्णीकर यांनी युरोपीय प्रभावांचा एकंदर कालखंड हा १४९७ ते १९४७ असा ४५० वर्षांचा धरला आहे. इतक्या वर्षांचा हा कालखंड असूनही भारतीय संगीत म्हणजे देशी संगीत अचल राहिले. पाश्चात्त्य किंवा युरोपीय संस्कृती आपल्या मानाने उच्च/नीच असं ठरवण्याची गरज नाही. एक गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे की, सुरुवातीचा हा काळ (१४९८ साली वास्को-द-गामा भारतीय किनाऱ्याला लागला) पोर्तुगीज संस्कृतीचा काळ होता. इंग्रज, डच आणि फ्रेंच हे पोर्तुगीजांच्या मानाने गौण होते. जेसुईट (Jesuit) परंपरेचा कर्मठ वारसा सांगणाऱ्या या पोर्तुगीज मंडळींचे संगीत चर्चशी नाते सांगणारे होते. त्यांच्या वाद्यांच्या



*पं. मिलिंद रायकर यांनी किशोरी अमोणकरांचे शिष्यत्व स्वीकारून सूर आणि स्वरांचा झंकार अचूक हेरला... त्यांच्या मैफलींनी कायमच अलौकिक आनंदाची अनुभूती दिली...*

माध्यमातून त्यांनी ते रुजवायचा थोडाफार प्रयत्न केला. आपल्या भारतीय मंडळींनी ती वाद्यं घेतली आणि थोड्याच काळात आत्मसात केली. ही एक फार वैशिष्ट्यपूर्ण परंपरा किंवा गुणधर्म आपल्यात म्हणजे भारतीयांत आहे. प्रतिपक्षाच्या योजना स्वीकारून थोड्याच काळात सरळ सरळ जिंकायच्या अन् त्यांचं भारतीयीकरण करून टाकायचं!

संगीतातलं एक मजेदार उदाहरण म्हणजे, पोर्तुगीजांनी आणलेला की-बोर्ड. चर्चमधील उपासनेसाठी आणलेलं हे वाद्य भारतीयांना सर्वस्वी अपरिचित अशा यंत्रसंस्कृतीतून आलं. मोठ्या अवजड ऑर्गनमध्ये नाना प्रकारच्या सुधारणा होत गेल्या अन् आज अशी परिस्थिती आहे की, हार्मोनियम फक्त भारतातच मिळू शकतो. म्हणजे दुसऱ्यांचा उद्देश असफल करायचा असला किंवा हाणून पाडायचा असला; तर त्यांना आपल्यात सामील करून घेणं हा आपला स्थायीभावच आहे, असं अनेक ठिकाणी जाणवतं.

**बहर सुरांचा**

आमचा मुलगा स्वप्निलला जेव्हा व्हायोलिन शिकायची इच्छा झाली, तेव्हा आम्ही पं. मिलिंद रायकरांना जाऊन भेटलो. ते जुन्या गुरू-शिष्य परंपरेत शिकलेले. त्यांना आम्ही किशोरीताईंच्या कार्यक्रमात संगत करताना दुरून बघायचो. त्यांनी स्वप्निलला स्वीकारलंच नव्हे, तर अपार मायेनं शिकवलं. या काळात त्याचं नातं घट्ट होत गेलं. गुरूंची कृपा लाभल्याने इतर अध्ययन करतानाही त्याचा फायदाच झाला. रायकरसरांनी मात्र फार कष्टाने ही विद्या शिकली. सुरूवातीला गोव्यात त्यांचे वडील आणि इतर गुरूकडे शिकल्यानंतर पं. दातार गुरूजींनी त्यांना शिकवलं. मग किशोरीताईंबरोबर त्यांचे सूर जुळले, पण त्यांच्याकडे शिकणं सोपं नव्हतं. एकदा हे सलग दोन-तीन दिवस जाऊ शकले नाहीत, तर ताईंनी यांना चक्क घरातच दोन तास एका कोपऱ्यात उभं करून ठेवल्याची आठवण स्वतः रायकर सर सांगतात.

एकदा असेच भर पावसाचे दिवस. सगळीकडेच पाणी भरलेलं. हे ताईंना फोन करून सांगतात, की आज सगळीकडे पाणी भरलंय, मी घरीच रियाज करतो. त्यावर ताई म्हणतात, असा एकट्याने तुझा रियाज होणार नाही, तू टॅक्सीने ये, मी टॅक्सीचे पैसे देते. हे अगदी गुडघाभर पाण्यातून वाट काढत कसेबसे भर पावसात भिजलेल्या अवस्थेत ताईंकडे पोचले. त्यांना पाहताच ताईंनी लगबगीनं डोकं पुसायला टॉवेल आणून दिला. म्हणाल्या, अरे एवढ्या पावसात येण्याची काय जरूर होती आणि परत घरी पाठवून दिलं. अशी कठोरपणे परीक्षा घेणे आणि तितकीच माया लावणारी ताई गुरू म्हणून लाभणं हे भाग्यच.

अर्थातच ताईंच्या बरोबरचा रियाजही कडकच असायचा. एकदा एक पलटा यांना शिकवला. म्हणाल्या ५०० वेळा वाजव. यांनी तो हातावर नीट चढवला आणि ताईंना वाजवून वगैरे दाखवला, ताई म्हणाल्या वा, छान जमतंय आता अजून ५०० वेळा परत वाजव म्हणजे, पक्का होऊन जाईल. याच किशोरीताईंनी आम्हाला इतका आनंद त्यांच्या गाण्यातून दिलाय, की विचारता सोय नाही. त्यांच्या अनेक मैफलीत जातीने हजर राहून त्यांचं गाणं ऐकण्याचं भाग्य आम्हाला लाभलंय. आम्ही त्यांच्या इतके प्रेमात पडलो, की ताई गेल्यावर पहिला स्मृती महोत्सव मी डोंबिवलीत केला आणि सलग सात वर्षं पारही पाडला.

ताईंच्या पुस्तकात एक उल्लेख वाचला होता, ताई म्हणतात, की कुर्डी गावातल्या नदीच्या किनाऱ्यावर एकदा असेच बसलेल्या असताना वरून एक फुल वाहत्या नदीत पडलं, टप्पा खाऊन पुढे गेलं आणि त्याक्षणी मला लय काय असते, ते समजलं. मी त्या झाडाचा अधिक शोध घेतला. ते बॅरिंग्टोनिया रासिमोसा म्हणजे समुद्री तिवराचाच प्रकार आहे, हे कळल्यावर मी सोसायटीच्या आवारात ते झाड लावले, गेली १३ वर्षं जपलेय, आता हंगामात झाडावर सुरेख लालचुटुक फुलांचे तुरे लटकताना

बघतो. ताईंना गाण्यातून आठवत होतोच, पण जाता-येता झाडाकडे बघून त्यांची स्मृती मनात ताजी होते.

**झंकारल्या तारा**

एकदा पं. मिलिंद रायकरांच्या गुरू पौर्णिमेच्या कार्यक्रमात व्हायोलिन वाजवताना बरोड्याचे आमचे संगीतप्रेमी मित्र आमच्या मुलावर म्हणजेच स्वप्निलवर लट्टू झाले. ते स्वतः अनेक ओरिजनल व्हायोलिनचा संग्रह हौस म्हणून बाळगून होते. त्यांना त्यातल्या तांत्रिक अंगाची बारकाईने माहिती होती. छोट्या मोठ्या दुरूस्ती करून ते जुनी व्हायोलिन इतरांनाही देतात. तर त्यांनी स्वप्निलला एक व्हायोलिन भेट केलेलं होतं. या ओरिजनल व्हायोलिनची खासियत म्हणजे, ही मेपलच्या झाडाच्या लाकडांपासून बनवली जातात आणि जितकी जुनी होतात तितकी सुरेल वाजायला लागतात. सर्वात महाग आणि सुरेल ही जर्मन व्हायोलिन असतात.

डोंबिवलीत एकदा 'महाराष्ट्र टाइम्स'चे ज्येष्ठ पत्रकार अशोक जैन आले होते, त्यांनी संपादक गोविंदराव तळवलकरांचा व्यासंग किती थोर आहे याची आठवण सांगितली होती. माजी पंतप्रधान इंदिरा गांधींच्या अंत्यसंस्काराच्या वेळी दूरदर्शनवर थेट प्रक्षेपण सुरू होते. स्वतः अशोक जैन म.टा.चे दिल्लीतले प्रतिनिधी होते. ते तिथून माहिती देत होते. ट्रंक कॅालचाच जमाना होता. संध्याकाळी हॅाटेलवरून यांनी मुंबईत गोविंदरावांना फोन लावला. हे काही बोलण्याअगोदरच गोविंदरावांनी सांगितले की अंत्यसंस्काराच्या वेळी पार्श्वभूमीवर जी धून वाजत होती, ती हँडेलची होती का? जैन हैराण! एक तर हेंडेल का हँडेल हेच मुदलात माहिती नाही, तर इतर माहिती कशी काढणार. त्यात माजी पंतप्रधानांची हत्या झालेली त्यामुळे वातावरणात एक वेगळा तणाव. अंत्यसंस्काराच्या व्यवस्थेत सगळी उच्च पातळीवरची खबरदारी आणि व्यवस्थापन सहभागी, त्यामुळे माहिती कशी मिळवावी हा मोठाच पेच.

अशोक जैनना कुणीतरी सांगितले, की सैन्यदलाच्या जवानांनी ती धून वाजवली होती. हे चाचपडायला लागले, एकेक करत अगदी वरच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला गेला, तेव्हा त्या अधिकाऱ्याने सांगितले, की हो ती धून हँडेलचीच होती. दुसऱ्या दिवशीच्या फक्त 'महाराष्ट्र टाइम्स'च्या अग्रलेखात ही नोंद होती, की माजी पंतप्रधान इंदिरा गांधीजींच्या अंत्यसंस्काराच्या वेळी पार्श्वभूमीवर जर्मन संगीतकार हँडेलची धून वाजवली जात होती. अशोक जैन नंतर म्हणाले, की खूप वर्षांनंतर मला जर्मनीला जाण्याचा योग आला, तिथे एका संग्रहालयाच्या बाहेर हँडेलचा पुतळा बघितला आणि त्यांच्या थोरपणाची जाणीव झाली. हँडेल हा प्रसिद्ध जर्मन व्हायोलिन वादक याने पहिल्या किंग जॉर्जच्या विनंतीवरून थेम्स नदीच्या किनाऱ्यावर झालेल्या पहिल्याच (१७ जुलै १७१७) कार्यक्रमात आपलं वॅाटर म्युझिक सादर केलं होतं. यात त्यांनी पाण्याचा एखादा थेंब पाण्यावर पडला की कसा आवाज येतो आणि पाण्याचा धबधबा पाण्यावर कोसळताना कसा आवाज येतो याचं ध्वनिबिंब व्हायोलिनवर अचूक टिपलं होतं.

**गंध सुरांचा**

तर सध्याच्या काळात संगीतावरचं तंत्रज्ञानाचं आक्रमण टाळता न येण्यासारखं अफाट आहे. याचे धक्के एकवेळ आपण सहनही करू, पण त्या अनुषंगाने होत असलेली पडझड रोखता येणं अशक्य आहे. चांगली माणसं ऐकली न जाणं, त्यांचं गायन-वादन बंद पडणं क्लेषकारक आहे. वाल्मिकी रामायणाचा मल्याळम अनुवाद करणारे श्रेष्ठ आणि जाणते कवी नारायण मेनन (१६ ऑक्टोबर १८७८-१३ मार्च १९५८) यांनी एक सुरेख घटना नोंदवून ठेवली आहे. दक्षिणेत टायगर वरदाचारी नावाचे विद्वान गायक होते आणि वीणा धन्नमल नावाची गायिका. ही स्वतः देवदासी होती, पण हाताने वीणा वाजवत नितांत सुंदर गायची म्हणून तिला वीणा धन्नमल म्हणायचे. तर ही कुठलाही राग तीन मिनिटांपेक्षा जास्त गायची नाही, तिला जेव्हा विचारलं गेलं की असं का? तर ती म्हणाली मला या पेक्षा अधिक गाण्याची जरुरच वाटत नाही. तर वरदाचारी दोन तासांपेक्षा कमी गायचे नाहीत. त्यांना ऐकणाऱ्या रसिकांना वाटायचं, की हा माणूस जेव्हा दोन तास निवांत गातोय, तेव्हा हा सहा तासही गाऊ शकतो, कारण यांच्याकडे सांगण्यासारखं बरंच आहे.

काही लोक यांच्याजवळ जाऊन म्हणाले, की वीणा धन्नमल तर तीनच मिनिटे गातात आणि तुम्ही तासंतास गाता असं का? तेव्हा विद्वान वरदाचारी म्हणाले की मी माझ्या जवळच्या हजारो एकर पसरलेल्या गुलाबाच्या ताटव्यांमधून तुम्हाला फिरवून आणतो आणि वीणा मात्र या सगळ्या गुलाबांना एकत्र करून त्याचा अर्क काढून त्याचं अत्तरच तुमच्यावर शिंपडते. तात्पर्य, राग हा कितीही वेळ गायला जाऊ शकतो.

पाश्चात्त्य देशातही एरिक साटी (१८६६ ते १९२५) नावाचा



*किशोरी अमोणकर हे आदर्शवत संगीतमग्न आणि संगीतनिष्ठ व्यक्तिमत्व होते. कठोर सांगीतिक तपश्चर्येमुळे त्यांचे अवघे जगणे तेजोमय बनले होते...*

एक कंपोजर होता. त्याची एक संपूर्ण चार मूव्हमेंट्स, पार्ट्स असलेली सिंफनी साडेचार मिनिटांची आहे. बेथोवेनसारख्याची नाइंथ सिंफनी साठ मिनिटांची आहे. सिंफनीची लांबी किती असावी, याबाबत पाश्चात्त्यांकडे जास्त ताठरपणा आहे. आपल्याकडे रागाच्या बाबतीत त्यामानाने पुष्कळ स्वातंत्र्य आहे, कालसापेक्षता आहे.

**शोध गाण्याचा...**

'पंचम निषाद'चे शशी व्यास एका मुलाखतीत म्हणाले होते, की आजकाल रसिकांची तक्रार असते, की तासाभराचाच वेळ प्रत्येकाला दिला जातो किंवा कधी कधी अनेक मोठ्या कलाकारांना एकत्रच मंचावर बसवलं जातं. यात स्वतंत्र घराण्याच्या गाण्याचा आनंदच घेता येत नाही, तेव्हा शशीजी म्हणाले, की आजकाल तीन-तीन तास गाणारे गायकच कुठे आहेत, तुम्ही दाखवा मला, मी उद्या त्यांच्यासाठी कार्यक्रम आयोजित करतो. जशी जीवनाची गती, त्याप्रमाणे संगीताची गती ठरणार आहे. आजकाल घड्याळ आपल्या मनगटावर नाही, तर मानगुटीवर बसले आहे. पूर्वीसारखी पुनरावृत्ती आता चालत नाही. पुनरावृत्तीतून जी जाणीव व्हायची, एक वेगळा अर्थ दर वेळी मिळत राहायचा, तो संबोध आज संगीतातून घेण्याची कुवत ऐकणाऱ्याचीही नाही, त्याच्या इतर कामांमुळे हे एका बाजूनं झालं. दुसऱ्या बाजूनं जे त्याला शिकायचंय, ऐकायचंय, जो संबोध त्याला घ्यायचाय, तो घेणारा अत्यंत ग्रहणशील असल्यामुळे तो जास्त वेगानं घेऊ शकतो. त्यामुळे वेळेचं प्रमाण आज बदललं आहे.

भातखंड्यांचं १९३७ सालचं पुस्तक आहे. त्यात ते म्हणतात, 'आजकाल गायक गायला लागला की, समोरचे प्रेक्षकच हातातील घड्याळाकडे बघतात!' १९३७ साली ही परिस्थिती होती. हान्स आयझलर (१८९८-१९६२) म्हणून एक मोठा कंपोझर होता, जर्मनीमध्ये. त्याने एके ठिकाणी म्हटलंय, 'जुनंच संगीत नव्या वाद्यावर वाजवण्यात अर्थ नाही, जुन्या वाद्यांवर नवं संगीत वाजवणं हेच विशेष म्हटलं पाहिजे.' कारण संगीत म्हणजे विचार आहे, वैचारिक, बौद्धिक प्रक्रिया आहे. जर तुम्ही खरोखरच बुद्धीने काही करत असाल, तर त्यात संगीतातला काही नवा विचार करता येणं आवश्यक आहे. एकंदरीतच संगीताचं जागतिकीकरण अस्वस्थ करणारं आहे गाणं आत सुरू आहे इथपासून आताशा, गाणं कुठं सुरू आहे का? या प्रश्नापर्यंत आपण सारे येऊन ठेपलो आहोत.

आमेन!

**गणेश मनोहर कुलकर्णी हे 'रूळानुबंध' या राज्य पुरस्कार प्राप्त ललितलेखक आणि कला आस्वादक आहेत.**
**संपर्क : ९८१९९५७८५२**

# अस्वस्थतेचा हुंकार!




डॉ. नेहा सावंत

काव्यगत संवाद



स्त्रीत्वाचे नवे भान देणाऱ्या कवयित्री नीरजा...




कवयित्री इंदिरा संत, शांता शेळके, संजीवनी, पद्मा इत्यादी कवयित्रींनी मोलाचे योगदान दिले आहे. या कवयित्रींनी स्त्रीची दुःखे, स्त्रीचे अनुभव कवितेतून रेखाटले आहेत, परंतु त्यांनी स्त्रीचे आत्मभान, स्त्रीचे शोषण, पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीचे दुय्यमत्व अशा जाणिवा अल्प प्रमाणात रेखाटलेल्या दिसतात. १९७० च्या काळातील प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, मल्लिका अमरशेख इत्यादी कवयित्रींची कविता अधिक आत्मपर असलेली दिसते. पार्श्वभूमीवर कवयित्री नीरजा स्त्री मनाचा हुंकार, तिचे आत्मभान, पुरुषप्रधान व्यवस्थेतील तिचे दुय्यमत्व, शोषण याविषयी मनात दडलेली अस्वस्थता, चीड सहजतेने मांडतात...

## मुकाट पडलेल्या गळ्यासाठी

*त्या काय काय मागत असतात तुझ्याकडे*
*नवसाचा पदर पसरून.*
*तू पाहत असतेस असहायपणे त्यांच्या मठ्ठ भक्तिभावाकडे*
*तुला काहीच करता येत नाही त्यांच्यासाठी*
*त्यांच्या कपाळभर मळवटासाठी*
*त्यांच्या पदरातल्या चिमण्या लायांसाठी,*
*नसतं कोणतंच औषध तुझ्याकडे*
*त्यांच्या आयुष्याला पडलेल्या हजारो भेगांसाठी.*
*तुला प्रश्न पडलेला*
*तुझ्या कपाळभर चढलेल्या मळवटाचं काय करायचं याचा.*
*तुझ्या पायावर नतमस्तक होणारे भक्त*
*कधी अंगावर चढतील या भयानं*
*डोळा लागत नाही तुझा दिवसाढवळ्याही.*
*रात्र रात्र तू चाचपत असतेस*
*पुजाऱ्यानं सकाळी नेसवलेलं वस्त्र,*
*त्यातून फिरणारा त्याचा स्पर्श जाणवत राहतो तुला.*
*अंगावरच्या दागिन्यांमुळे नसता घोर लागलाय जिवाला*
*कधी दरोडा पडेल आणि त्याच्याबरोबर अब्रूही जाईल*
*या काळजीनं काळवंडली आहेस तू.*
*शेंदूर लावून दगड केलाय तुझा कायमचा.*
*आता हालताही येत नाही*
*आणि हाणताही येत नाही कुणाच्या डोक्यावर.*
*मोठे टपोरे डोळे आहेत तुझे मोत्याच्या दाण्यासारखे*
*पण दिसत नाही काहीच आजूबाजूचं.*
*तुझ्या उग्र चेहऱ्याच्या आत दडलेलं भय*
*जाणवत राहतं फक्त तुलाच.*
*तुझ्या पायावर डोकं ठेवून*
*बायका सांगू पाहतात तुला पुनःपुन्हा*
*त्यांच्या आयुष्यावर पडलेल्या*
*त्यांच्या भल्यामोठ्या सावलीविषयी*
*तेव्हा तुलाही कुजबुजावंसं वाटतं त्यांच्या कानात मैत्रिणीसारखं*
*फोडावासा वाटतो टाहो*
*तुझ्या हरवलेल्या सावलीविषयी सांगताना.*
*गळ्यात अडकलेला उमाळा युगानुयुगे*
*करावासा वाटतो मोकळा.*
*पण तू निमूट बसतेस नाकातली नथ सांभाळत.*
*स्वीकारतेस खणानारळाच्या ओट्या*
*आणि मागत राहतेस*
*एखादा शब्द त्यांच्याकडून*
*तुझ्या मुकाट पडलेल्या गळ्यासाठी*

**मा**झ्या प्राध्यापकी पेशाच्या नवलाईचे दिवस होते ते. नुकतंच शिकवायला लागल्यामुळे एक वेगळाच उत्साह अंगात शिरलेला होता. रेल्वेच्या प्रवासातही सतत वाचन करण्याची सवय लागलेली होती. दुपारी घरी परतताना लोकलला विशेष गर्दीही नसायची, त्यामुळे वाचनही निवांत होत असे. एक दिवस प्रवासात माझ्या विभागप्रमुखांनी ट्रेनमध्ये शिरल्यावर एका व्यक्तीची ओळख करून दिली, ही नीरजा, मी आश्चर्याने उद्‌गारले, कवयित्री नीरजा? तोपर्यंत त्या दहिसरला राहतात किंवा त्याही प्राध्यापिका आहेत, हे मला माहीत नव्हतं. नंतर मग विरार ट्रेनने प्रवास करताना, कोणत्या ना कोणत्या चर्चासत्रात त्यांची नेहमीच भेट होत राहिली आणि छान स्नेहही जुळला.

हसतमुख चेहरा, परीट घडीची छान चापून चोपून नेसलेली साडी, कुरळ्या केसांचा पोनीटेल आणि चेहऱ्याला व्यापून उरणारं प्रसन्न हास्य, ही छबी मनावर कोरली गेली. पुढे मग मराठी वाङ्मय मंडळात अनेकदा काव्यवाचनासाठी त्यांना बोलावलं गेलं. महाविद्यालयीन अभ्यासक्रमात त्यांची कविता अभ्यासाला असल्यामुळे 'साहित्यिक तुमच्या भेटीला' या उपक्रमात अनेकदा त्या येत गेल्या. त्यांचं कविता सादरीकरण मनावर गारूड करायचं. यातूनच एक कवयित्री, उत्कट अशा जाणिवेने जगणारी संवेदनशील स्त्री अशी त्यांची ओळख मला घडत गेली. त्यांच्या अनेक कवितांपैकी 'मुकाट पडलेल्या गळ्यासाठी' ही माझी आवडती कविता आहे.

**कवितेची पार्श्वभूमी**

कवयित्री नीरजा यांची कविता आधीच्या स्त्री लिखित काव्यपरंपरेत अनेक अंगांनी वेगळी ठरते. आधीच्या परंपरेत कवयित्री इंदिरा संत, शांता शेळके, संजीवनी, पद्मा इत्यादी

कवयित्रींनी मोलाचे योगदान दिले आहे. या कवयित्रींनी स्त्रीची दुःखे, स्त्रीचे अनुभव कवितेतून रेखाटले आहेत, परंतु त्यांनी स्त्रीचे आत्मभान, स्त्रीचे शोषण, पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीचे दुय्यमत्व अशा जाणिवा अल्प प्रमाणात रेखाटलेल्या दिसतात. या कवयित्रींच्या बहुतांशी कविता स्मरणरंजनपर किंवा आठवणी कथन करणाऱ्या अशा दिसतात. तसेच १९७० च्या काळातील प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, मल्लिका अमरशेख इत्यादी कवयित्रींची कविता अधिक आत्मपर असलेली दिसते. स्त्रीचा आत्मस्वर, स्त्रीच्या मनाचे तुटलेपण, एकाकीपण स्त्री–पुरुष नातेसंबंध, प्रेमानुभव यावर व्यक्तिगत जाणिवेतून भाष्य करताना दिसतात. या पार्श्वभूमीवर कवयित्री नीरजा स्त्री मनाचा हुंकार, तिचे आत्मभान, पुरुषप्रधान व्यवस्थेतील तिचे दुय्यमत्व, शोषण याविषयी मनात दडलेली अस्वस्थता, चीड सहजतेने मांडतात. कवयित्री नीरजांची कविता तरल, रोमँटिक प्रेमानुभवात फारशी रमलेली दिसत नाही, याचा अर्थ, त्यांनी कवितेतून प्रेमानुभव टिपलाच नाही असे नाही, तो व्यक्त करण्याची त्यांची शैली पारंपरिक प्रेमकवितेहून वेगळी असलेली दिसते.

कवयित्री नीरजा काव्य करू लागल्या, तो काळ स्त्रीमुक्ती विचारांनी भारलेला होता. पुरुषसत्ताक परंपरेविरुद्ध बंड हे स्त्री लिखित साहित्यातून विशेषतः कवितेतून व्यक्त होऊ लागले होते. स्त्रीचे आत्मभान, स्त्रीची अस्मिता, तिची शारीरिक, मानसिक जाणीव, स्त्री–पुरुष संबंधातील ताण इत्यादी जाणिवा विविध रूपातून कवितेतून व्यक्त होऊ लागल्या होत्या. इतकेच नाही तर सामाजिक आणि राजकीय पातळीवरही अनेक घडामोडी घडत होत्या; जसे की युद्ध, दहशतवाद, दंगली, जागतिकीकरण या साऱ्यातून कवयित्री नीरजांची वैचारिक पार्श्वभूमी घडत होती. आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा त्या अन्वय लावू पाहत होत्या. या साऱ्यांना आपल्या कवितेतून त्या उद्‌गार देत होत्या. समाजातील स्त्रीला मिळणारी दुय्यम वागवणूक त्यांना अस्वस्थ करीत होती. त्या अस्वस्थतेला अतिशय परखड आणि क्वचित आक्रमक शब्दांतून त्या व्यक्त करीत होत्या. याचाच अर्थ, नीरजांची कविता ही पूर्वसुरींच्या आणि समकालीन कवींच्या संस्कारातून घडत होतीच, पण तिने स्वतःची वेगळी आणि स्वतंत्र अशी वाट निवडलेली होती. म्हणूनच कवी वसंत आबाजी डहाके नीरजांच्या कवितेविषयी अगदी नेमक्या शब्दात म्हणतात– 'स्त्री' ही नीरजा यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. ती तिच्या दैहिक, मानसिक, आत्मिक अनुभूतींसह जशी साकार होते, तशीच ती समाजाच्या 'स्त्री' विषयक धारणेसह, तिच्या संरचित रूपांसह अभिव्यक्त होते. समाजव्यवस्था आणि स्त्री यांच्यामधल्या ताणांनी या कवितांमधले जग आंदोलित होत असलेले आढळते. 'मनाच्या पाटीवरचं पारंपरिक चित्र' आणि वास्तव यातल्या अंतरांनी घडत आलेला स्त्रीनिष्ठ इतिहास या कवितांतून उलगडत जातो. अशा प्रकारच्या इतिहासाची रचना करणे हे नीरजा यांच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य आहे...

कवी डहाके यांच्या या निरीक्षणाचा प्रत्यय 'मुकाट पडलेल्या गळ्यासाठी'ही कविता वाचताना येतो.

**आत्मभानाचे आमंत्रण**

'मुकाट पडलेल्या गळ्यासाठी' ही कविता म्हणजे कवितागत 'मी'ने कवितागत 'तू'शी संवाद साधलेला आहे. कवितागत 'मी'ही या कवितेतील संवादक आहे, तर कवितागत 'तू'ही देवीची पार्थिव मूर्ती आहे. या कवितेत स्त्रीचे तीन स्तर दिसत आहेत. पहिला स्तर धार्मिक कर्मकांडात न गुंतणाऱ्या, आत्मभान आलेल्या स्त्रीचा, दुसरा स्तर पारंपरिक जगणं जगणाऱ्या, पुरुषांच्या गुलाम झालेल्या, मुलाबाळांसाठी नवस करणाऱ्या स्त्रियांचा आणि तिसरा स्तर पार्थिव रूपात बंदिस्त झालेल्या मुर्तीरूपातील देवीचा. आत्मभान आलेली स्त्री ही मूर्तिरूपातील देवीला जागृत करते, ही जाणीवच एक प्रकारचा सूक्ष्म अंतर्विरोध सूचित करते. जी स्वतः दात्री आहे, कल्याणकर्ती आहे, तिलाच आत्मभान नसावे किंवा तिचाच आवाज गळ्यात कोंडलेला असावा, हा एक विलक्षण विरोधाभास कवयित्रीला अस्वस्थ करतो. कवितागत 'मी' ही एकूणच समाजातील स्त्रियांची भावस्थिती ओळखून कवितागत 'तू'शी म्हणजेच पार्थिव मूर्तीशी संवाद साधते. कवितागत 'मी' ही कवितागत 'तू'चे आत्मभान जागृत करण्याचा प्रयत्न करताना दिसते. आत्मभान आलेली कवितागत 'मी' परंपरेने जखडलेल्या, पुरुषप्रधान व्यवस्थेने प्रतिष्ठापित केलेल्या 'तू'ला समज देत आहे. मुळात ही कविता देवळातील पार्थिव, दगडी मूर्तीलाच उद्देशून लिहिली आहे. परंतु मूर्तीलाच देवी मानणाऱ्या तथाकथित स्त्री पुरूष भक्तांच्या परिप्रेक्ष्यातून या कवितेतील भाव, विचार व्यक्त केले आहेत. येथे कवयित्री तू हे संबोधन सावधगिरीने, पण सजगपणे वापरते. यामागे ती कोणतेही आध्यात्मिक, पारलौकिक वलय न देता वस्तुनिष्ठपणे हे संबोधन वापरते. तू म्हणजे जागृत दैवत –देवी की पार्थिव मूर्ती

याचे स्पष्टीकरण देत नाही, किंवा तसा उल्लेखही करीत नाही. ती ते वाचकांवर सोपवते. तसेच ती कोणत्याही देवीचा स्पष्ट नामोल्लेखही करत नाही. कवयित्रीच्या समोर असलेली पार्थिव मूर्ती ही सगळ्या देवींचे प्रतिनिधित्व करतेय. कवितागत 'मी' या देवधर्माच्या कर्मकांडात अडकणारी नाही हे अधोरेखित होत जाते. देवाधर्माविषयी सर्वसामान्य स्त्री–पुरुषांचा असणारा श्रद्धाभाव नीरजांना नेहमीच कुतूहलाचा विषय वाटतो. मात्र देवीला मानणाऱ्या भाविकांच्या भावना न दुखवता एक स्त्री म्हणून, एक माणूस म्हणून देवीच्याही भावना असू शकतात, हे इतरांच्या दृष्टीस आणून देते. म्हणूनच ती म्हणते –

*त्या काय काय मागत असतात तुझ्याकडे*
*नवसाचा पदर पसरून.*
*तू पाहत असतेस असहायपणे त्यांच्या मठ्ठ भक्तिभावाकडे*
*तुला काहीच करता येत नाही त्यांच्यासाठी*
*त्यांच्या कपाळभर मळवटासाठी*
*त्यांच्या पदरातल्या चिमण्या लायांसाठी,*
*नसतं कोणतंच औषध तुझ्याकडे*
*त्यांच्या आयुष्याला पडलेल्या हजारो भेगांसाठी.*

मळवट ही पारंपरिकतेची, स्त्री सौभाग्याची प्रतिमा म्हणून येथे योजली आहे. पार्थिव मूर्ती रूपातील देवीकडे सर्वसामान्य स्त्रिया आपल्या सौभाग्यासाठी, आपल्या लेकराबाळांसाठी सतत काहीतरी आशीर्वाद मागत असतात, परंतु स्वतःसाठी काहीच मागत नाहीत. कारण आपल्या संसारासाठी (नवरा, मुले) यांच्यातच त्या स्वतःचे समाधान शोधत असतात. अशा स्त्रियांच्या मळवटासाठी आपण काहीही करू शकत नाही, याची जाणीव त्या पार्थिव मूर्तीरूपातील देवीला असते. अशा वेळी या सामान्य स्त्रियांनीच देवीच्या कपाळावर भरलेल्या मळवटाचे काय करायचे, हेच त्या मूर्ती रूपातील देवीला कळत नाही. कारण ही देवीही सवाष्णच मानली जाते. म्हणूनच त्या देवीच्या मनातील शंका ओळखून कवितेतील 'मी' म्हणते –

*तुला प्रश्न पडलेला*
*तुझ्या कपाळभर चढलेल्या मळवटाचं काय करायचं याचा...*

सर्वसामान्य स्त्रीच्या व्यथा वेदना देवीपर्यंत पोहोचत असतात, मात्र त्या वेदना दूर करण्यास ती असमर्थ असते, कारण ती स्वतः एक स्त्रीच आहे, याचे भान तिला आहे. येथे सर्वसामान्य स्त्रीच्या आयुष्यातील व्यथा वेदनांना उद्देशून आयुष्याला पडलेल्या हजारो भेगा ही संयुक्तिक प्रतिमा योजलेली दिसते. तसेच येथे वंश सातत्याची, स्त्रीच्या निर्मितीशीलतेची प्रतिमा म्हणून 'पदरातील लाया' हा संदर्भ आलेला दिसतो. सर्वसामान्य स्त्रियांच्या लहानग्या लेकरांसाठी लेकरांसाठी फुलाफळांची सतत वापरली जाणारी प्रतिमा न योजता योजलेली लायांची प्रतिमा नावीन्यपूर्ण म्हणायला हवी. या मागे स्त्रियांचा देवीविषयीचा श्रद्धाभाव, देवीचा गाभारा याच्याशी निगडित असणाऱ्या प्रसादात असणाऱ्या लाया म्हणजेच देवीचा कृपाप्रसाद आणि तिच्या कृपाप्रसादाच्या लाया म्हणजे, आपल्या पदरात पडलेली लेकरे आहेत, असा विश्वास त्या याचक स्त्रियांना वाटत असावा, या अर्थाने ही प्रतिमा सार्थ ठरलेली वाटते. अर्थात हे व्यक्त करताना नीरजांची शैली काहीशी औपरोधिक झालेली दिसते.

**अंतर्मनातील स्त्रीजाणिवांचा आविष्कार**

या कवितेतील पार्थिव रूपातील देवी ही स्वतःच संभ्रमित झालेली आहे. धर्माच्या नावावर दंगली घडतात, माणसे हिंसक होतात, अशावेळी सर्वसामान्य माणूस भयभीत होतो, अगतिक होत जातो. अविचाराने तो आपला राग मूर्तींवर काढतो. मूर्त्यांचा विध्वंस करतो. या जाणिवेने त्या पार्थिव रूपातील देवीची झोप उडते. येथे कवयित्रीने त्या पार्थिव रूपातील देवीचे मानुषीकरण केलेले दिसते. सर्व सामान्य माणसांप्रमाणे तिलाही भावना, संवेदना आहेत असे तिला वाटते. (यातून नीरजांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो.) हे सांगताना कवयित्री म्हणते –

*तुझ्या पायावर नतमस्तक होणारे भक्त*
*कधी अंगावर चढतील या भयानं*
*डोळा लागत नाही तुझा दिवसाढवळ्याही*

वरील ओळींतून शक्तीचे प्रतीक असलेली, दात्री असणारी देवीही सामान्य माणसासारखी भयभीत झालेली दिसते. येथे समाजातील धर्माच्या नावावर होणाऱ्या राजकारणाचा संदर्भ कवयित्री अप्रत्यक्षपणे सूचित करते. आध्यात्मिक किंवा पारलौकिक जगातील देवीला देखील सामान्य स्त्रीच्या दैहिक जाणिवा असतात, असा विचार मांडू पहातेय. येथे कवितागत मी ही परकाया, परमनप्रवेशातून तिच्या अंतर्मनातील स्त्रीजाणिवा समजून घेताना दिसते. कवयित्री नीरजांनी मांडलेला हा विचार विलक्षण नावीन्य असलेला आहे. येथे पुरुषाचाही स्त्रीविषयक लैंगिक भाव नकळतपणे सुचवू पाहते. म्हणूनच ती म्हणते –

*रात्र रात्र तू चाचपत असतेस*
*पुजाऱ्यानं सकाळी नेसवलेलं वस्त्र,*
*त्यातून फिरणारा त्याचा स्पर्श जाणवत राहतो तुला.*

देवळातील दिनचर्येचा भाग म्हणून देवीची पूजा, देवीचे स्नान, देवीची आरास, तिचे वस्त्रप्रावरण, रंगलेपन या साऱ्या गोष्टी पुजारी रूपातल्या पुरुषाकडेच असतात. अशा वेळी पूजेचा भाग म्हणून तिला साडी नेसवताना, तिच्या पार्थिव अवयवांना झालेले स्पर्श कवयित्रीला अस्वस्थ करतात. कारण ती देवी जरी पार्थिव मूर्ती असली तरी तिच्या शरीराचे उभार, आकार हे स्त्रीचेच असल्यामुळे तिला तो पुरुष स्पर्श कसा वाटत असेल, या जाणिवेतून नीरजांनी आपली तगमग येथे व्यक्त केलेली दिसते. परंतु देवी मूर्ती रूपातील असल्यामुळे विरोध करू शकत नाही, ही तिची असमर्थता कवयित्रीला अधिक बेचैन करते. एरवी पुराणात राक्षसांचा संहार करणारी देवी इथे मात्र पार्थिव रूपात, हे नकोसे स्पर्श रोजच सहन करीत राहते. म्हणूनच कवितागत 'मी' त्या देवीला उद्देशून म्हणते –

*शेंदूर लावून दगड केलाय तुझा कायमचा.*
*आता हालता ही येत नाही*
*आणि हाणताही येत नाही कुणाच्या डोक्यावर.*

ओळींतून भक्त म्हणविणाऱ्या लोकांनी केलेले तिचे विद्रुपीकरण अधोरेखित करतानाच, त्या मूर्तिरुप देवीची असमर्थता आणि अगतिकता हालता येत नाही आणि हाणताही येत नाही या शब्दबंधातून व्यक्त केलेली दिसते.

एकीकडे देवीला वस्त्र नेसविण्याच्या निमित्ताने झालेल्या पुजाऱ्याच्या स्पर्शाने जणू देवीची शारीर विटंबना होतेय, या जाणिवेने अस्वस्थ होणारी कवितागत 'मी' त्या देवीच्या अंगावरील दागिने चोरीला जातील की काय, ही वस्तुस्थितीची जाणीव करून देते. दागिने चोरणारे चोरही शेवटी पुरुषरूपातीलच असावेत, असे तिला वाटत राहते. दागिन्यांसाठी दरोडा टाकण्याच्या प्रसंगी कुठे जातो, त्यांच्यातील भक्तिभाव? की दरोडा घालणारे पुरुष रूपातील दरोडेखोर, स्त्री रूपातील देवीला नगण्य समजतात? अशावेळी मोठमोठ्या राक्षसांचा संहार करणारी देवी या दरोडेखोरांचा संहार करू शकली नाही, तर त्या देवीलाच कमीपणा येईल या जाणिवेने कवितागत मी बेचैन होतेय, तर दुसरीकडे तिच्या अंगावरील दागिने काढताना पुन्हा तिला होणारा स्पर्श म्हणजे, तिच्या अब्रुवर पुन्हा एकदा होणारा हल्ला, हा विचारच तिला असह्य होतोय. मनातून जरी त्यांचा संहार करण्याची, प्रतिकार करण्याची इच्छा असली तरी या भक्तांनी तिला शेंदूर फासून, दगड बनवून बंदिस्त केल्यामुळे, भीतीने जणू त्या देवीच्या भावनाही थिजून गेल्याची जाणीव कवयित्री करून देते.

**हरवलेल्या सावलीचे वैषम्य**

देवळाच्या गाभाऱ्यात असणाऱ्या काळ्या दगडी मूर्तीचे (देवीचे) डोळे नेहमीच उग्र भासतात. भक्तांकडे ती डोळे वटारून, रागाने पहातेय असे वाटते. पण कवयित्रीला ते मोत्याच्या दाण्यासारखे टपोरे वाटतात. त्या डोळ्यांना आजूबाजूला काय चाललं आहे ते दिसत नाही. एक स्त्री म्हणून वाटणारी असुरक्षितता देवीलाही जाणवत राहते. त्या उग्र चेहऱ्याच्या आत दडलेलं भय फक्त त्या पार्थिव मूर्तीलाच जाणवत राहते, म्हणूनच काळजीपोटी, भीतीपोटी ती काळवंडून गेली आहे, असे 'मी'ला वाटते. इथेही देवीची हतबलता अधोरेखित केलेली दिसते.

या देवीपाशी आपलं गाऱ्हाणं सांगायला येणाऱ्या स्त्रिया तिच्या पायांवर डोकं ठेवून मोठ्या विश्वासाने त्यांच्या आयुष्यावर पडलेल्या मोठ्या काळ्या सावलीविषयी बोलत असतात. अर्थात ही भली मोठी सावली म्हणजे, पुरूषप्रधान व्यवस्थेचीच सावली, जी त्यांच्या नवऱ्याच्या किंवा कुटुंबातील पुरुषांच्या रूपात वावरतेय. अशावेळी कवितागत 'मी'ला देवीविषयी एक वेगळीच जाणीव होते.ती म्हणते –

*बायका सांगू पाहतात तुला पुनःपुन्हा*
*त्यांच्या आयुष्यावर पडलेल्या*
*त्यांच्या भल्यामोठ्या सावलीविषयी*
*तेव्हा तुलाही कुजबुजावंसं वाटतं त्यांच्या कानात मैत्रिणीसारखं*
*फोडावासा वाटतो टाहो*
*तुझ्या हरवलेल्या सावलीविषयी सांगताना.*

या स्त्रियांच्या सोबतीस नवरारुपी पुरुषाची त्यांच्या जीवनाला व्यापून राहिलेली सावली तरी असते. पण या मूर्ती रूपातील देवीची सावली तर हरवलेलीच आहे, मग तिने हे दुःख कुणापाशी व्यक्त करायचं? असा प्रश्न कवितागत मी ला पडलेला आहे. कारण बऱ्याच देवळात दैवतरूपी पती पत्नींची जोडी खेटून उभी दिसते. उदा. राम सीता, विठ्ठल रखुमाई, शंकर पार्वती इ. परंतु देवीच्या देवळात देवी सौभाग्यालांकरांनी सजलेली असते, पण तिच्या शेजारी तिचा सहचर कुठे असतो?

महाकाली, अंबाबाई, महालक्ष्मी या युगानुयुगे एकट्याच उभ्या असतात. (येथे अरुण कोलटकर यांच्या वामांगी या कवितेची आठवण होते.) याचा अर्थ युगानुयुगे तिच्या वाट्याला आलेले एकटेपण, एकाकीपण तिने काय कुणापाशी सांगायचे? अशा वेळी तिच्या दर्शनासाठी आलेल्या स्त्रियांचा मूर्तीरूपातील देवीलाच मोठा आधार वाटतो, असा एक विरोधाभास येथे व्यक्त केलेला दिसतो.

येथे कवयित्री नकळत समस्त स्त्रीवर्गाच्या स्वभावाकडे निर्देश करते. स्त्रिया मग त्या कोणत्याही स्तरातील, वर्गातील किंवा जातीधर्मातील असल्या तरी आपल्या मनातील दुःख सांगताना एकाच पातळीवर येऊन मोकळ्या होतात, तशी मूर्तीरूपातील देवीही आपल्या मनातील एकटेपणाची व्यथा भक्त रूपातील स्त्रियांना सांगू पाहते. त्या स्त्रिया जशा आपली व्यथा सांगताना आपला दाटून आलेला गळा मोकळा करतात, तसाच या देवीलाही आपला गळा, उमाळा मोकळा करावासा वाटतो. पण तेही स्वातंत्र्य तिला नसल्याची जाणीव होते. परंपरेने आखून दिलेल्या देवीपणाच्या भूमिकेत शिरून ती आपली नथ (इभ्रत) सांभाळत खणानारळाच्या ओट्या सवाष्णीच्या भूमिकेतून स्वीकारत राहते. आपल्या मुकाट पडलेल्या गळ्यासाठी, हरवलेल्या आवाजासाठी त्यांच्याकडूनच उसन्या शब्दांचे दान मागत राहते. ही शोकपूर्ण जाणीव कवयित्री करून देते.

या कवितेचा आरंभ आणि कवितेचा शेवट यातील विरोध कवितेचा परिणाम विलक्षण गहिरा करतात. कवितेच्या प्रारंभी भक्त रूपातील स्त्रिया पाषाणरुपी देवीकडे पदर पसरून मागणे मागत असतात. परंतु  म्हणूनच तिला त्यांची भक्ती मठ्ठ वाटते. पण कवितेच्या शेवटी मात्र आपल्या पायाशी आलेल्या, गाऱ्हाणं मांडणाऱ्या स्त्रिया तिला मैत्रिणी वाटू लागतात, आणि तीच त्यांच्याकडे आपल्या दुःखाला व्यक्त करण्यासाठी उसना शब्द मागू पाहते. इथे देवीची आणि त्यांचीही व्यक्तिनिबद्धता गळून पडतेय आणि स्त्री म्हणून सगळ्या एकाच पातळीवर आल्याचे (समाधान) ती व्यक्त करते. खूप वेगळा दृष्टिकोन देणारी असल्याने ही कविता महत्त्वाची वाटते. येथे कवयित्री पार्थिव मूर्ती रूपातील देवीच्या अंतरंगात  शिरून तिचे मन, तिच्या व्यथा समजून घेण्याचा प्रयत्न करतेय, ही जाणीवच विलक्षण आहे. येथे कवयित्री आध्यात्मिक परिप्रेक्ष्यातून न पाहता वस्तुनिष्ठपणे, वास्तववादी दृष्टीने त्या पार्थिव मूर्तीकडे पाहते. देवीची असमर्थता, हतबलता एका स्त्रीच्या दृष्टीतून मांडते, अशी मांडणी जितकी आगळी तितकीच ती धाडसाचीही आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**शीर्षकाची समर्पकता**

कवितेला दिलेले 'मुकाट पडलेल्या गळ्यासाठी' हे शीर्षक अतिशय समर्पक ठरते. येथे गळा ही प्रतिमा साहचर्य प्रतिमा आहे. गळ्यातील आवाज आणि गळ्यातील सौभाग्यालंकार अशा दोन्ही अर्थाने या प्रतिमेकडे पाहता येते. मूर्ती रूपातील देवी असहाय असून तिला तिचा स्वतःचा आवाजच नाही, किंबहुना, आपल्याकडे याचक म्हणून आलेल्या स्त्रियांसाठी ती आवाज उठवू शकत नाही, ही तिची हतबलता या शीर्षकातून व्यक्त होते. दुसरीकडे ज्याच्या नावाचे सौभाग्य लेणं गळ्यात मिरवायचे, त्याची सावलीसुद्धा शेजारी उभी नाहीये, त्याचा आधार नाहीये. अशावेळी ते अलंकार काय कामाचे? केवळ दागिन्यांनी भरलेला गळा असूनही तो रिताच वाटतोय, त्या गळ्यात हुंदकेच दाटले आहेत. येथे मुकाट हा शब्द निमूट गप्प बसलेल्या वृत्तीसाठी योजलेला दिसतो. मूर्तीरुपी देवीचा आवाज दबला गेला आहे, म्हणून कवयित्री नीरजा आपला आवाजच तिला देत आहे, खरेतर तिच्याच नव्हे, तर एकूणच स्त्री वर्गाच्या मुकाट पडलेल्या गळ्यातून आपला खणखणीत आवाज देत आहे, याचा प्रत्यय ही कविता वाचताना येतो, हे या कवितेचे वेगळेपण विशेषत्त्वाने नोंदवावेसे वाटते.

**संदर्भ –**

**१. नीरजा – निरर्थकाचे पक्षी, पॉप्युलर प्रकाशन , मुंबई**

**२. नीरजा – वसंत आबाजी डहाके ; दोन शब्द – स्त्रीगणेशा, ग्रंथाली, मुंबई**

**३. ढेरे अरूणा (संपा.)– स्त्री–लिखित मराठी कविता (१९५० ते २०१०) पद्मगंधा प्रकाशन, पुणे**

**४. डॉ.कणेकर प्रतिभा – स्त्रीची सर्जनशीलता आणि नीरजाची कविता, कविता–रती दिवाळी अंक २०१५**

**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रात त्या सक्रिय राहिल्या आहेत.**

**संपर्क** : nehasawant603@gmail.com

# वेश्याद्वार मृत्तिका



अनुवाद : सुमती जोशी

**मूळ कथा: इंद्रनील सान्याल**

**बंग नाद**



लघुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकाळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक-लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

**वी**स वर्षांचा विधान मल्लिक आईला विचारू लागला, ''आई, यंदा नवरात्रीची पूजा ऑक्टोबरच्या तीन तारखेला येतेय. पाऊस पडायची दाट शक्यता आहे. नाट्यमंदिराच्या बाहेर उभारलेल्या शामियान्यावर ताडपत्री पसरायला लागेल का?'' विधान हा आडियादह येथील सोन्याचे विख्यात व्यावसायिक विश्वनाथ मल्लिक यांचा एकुलता एक मुलगा.

आज सप्टेंबरची तेरा तारीख. केरळावरून येणारे मौसुमी वारे अजून बंगालपर्यंत आले नव्हते. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला पाऊस पडणार, हे सगळ्यांना माहीत होतं.

विधानची आई, पंचेचाळिशी गाठलेल्या आलोका मल्लिक एक भलीमोठी वही घेऊन हिशेब जुळवत बसल्या होत्या. सासूसासरे देवाघरी गेल्यापासून दुर्गापूजेची जबाबदारी त्यांनाच घ्यावी लागली होती.

कृष्ण कन्हैयाच्या कृपेने मल्लिक यांच्या घरी पैशांचा अभाव नव्हता. उणीव होती ती, मनुष्यबळाची. विसाव्या वर्षी जेव्हा आलोका या घराची सून झाली, तेव्हा सासरे, मोठे दीर, धाकटे दीर, दोघी नणंदा आणि ढीगभर नोकर या सगळ्यांची सतत उठबस चालू असे. त्यानंतर मात्र काळाच्या नियमानुसार मोठे दीर, धाकटे दीर, दोघी नणंदा आपापल्या कुटुंबासहित अनुक्रमे मुंबई, दिल्ली, अमेरिका आणि उत्तर बंगालमध्ये निघून गेल्या. आता घरातल्या कुटुंबाच्या सदस्यांची संख्या तीन. साहजिकच ढीगभर नोकरांची गरज उरली नाही. उरला फक्त सुबोध मंडल. तोच सर्वेसर्वा!

जाडजूड वहीतून डोकं वर काढून आलोका म्हणाल्या, ''गेली काही वर्षे पूजेच्या सुमारास पाऊस पडायची फॅशनच झालीय. पुरोहित महाशयांना सांगून पूजा डिसेंबर अखेरीस ढकलायला हवी.''

आलोकाचं बोलणं ऐकून विधान हसत हसत म्हणाला, ''आपले पुरोहित रमेनकाका तुझं बोलणं ऐकून कानात बोटं घालून बसतील. संपूर्ण घर शेणाने सारवून पवित्र करून घेतील. प्रायश्चित्त घ्यायला आणखी काय करतील कोणास ठाऊक! त्यांच्यासारखे शास्त्रानुसार वागणारे पुरोहित हाताच्या बोटावर मोजता येतील, इतकेच आहेत.''

विधानला धमकावत आलोका म्हणाल्या, ''रमेन आचार्यांच्या बाबतीत एकही अवाक्षर काढू नकोस. त्यांच्या बाबांनीच आपल्या घरातली पहिली दुर्गापूजा केली होती. माझा विवाह, तुझं उष्टावण, सासू सासऱ्यांचा तेरावा आणि त्यांची वर्षश्राद्धं – हे सारं रमेनदांच्या हातून झालाय. दुर्गापूजेपासून दर गुरुवारच्या राधारमणजींच्या पूजेपर्यंतची सर्व कार्य तेच पार पाडतात.''

विधान गप्प बसला. त्याचे बाबा, पन्नास वर्षांचे विश्वनाथ मल्लिक बऊबाजारातल्या दुकानातून परत आल्यावर स्नान करून अंगभर पावडर माखून, सँडो गंजी आणि लुंगी नेसून आरामखुर्चीवर बसले होते. सुबोध येऊन स्कॉचची बाटली आणि माशांचे काप देऊन गेला. मद्याचे दोन पेग रिचवल्यावर रात्री दहाच्या सुमारास विश्वनाथ जेवत असत. लहानसा घोट घेत विश्वनाथ म्हणाले, ''रमेनदा आलेयत. त्यांना काही सांगायचंय का?''

दीर्घदेही, नाकेले, गोरेपान रमेन आचार्य हे मल्लिक यांच्या घराचे कुलपुरोहित. ते घरात आले, खुर्चीवर बसले, व्हिस्कीच्या ग्लासवर नजर टाकून कपाळाला आठ्या घालत म्हणाले, ''पूजेची एक महत्त्वाची सामुग्री मिळत नाहीय. मी वेड्यासारखा शोध घेतोय.''

विधान विचारू लागला, ''काय मिळत नाहीय?''

रमेन म्हणाले, ''दहा प्रकारच्या मृत्तिकांपैकी एक प्रकारची मृत्तिका मिळत नाहीय.''

''दशमृत्तिका ही काय भानगड आहे?''

''तुम्ही आजकालची पोरं. तुम्हाला यातलं काही माहीत नसतं. पूजेसाठी या मृत्तिका का लागतात माहितेय का तुला?''

''नाही.''

बोटं मोजत रमेन म्हणाले, ''गज आणि वराह मृत्तिका, बैल आणि पर्वतशृंग मृत्तिका, नदीच्या दोन्ही तीरावरची मृत्तिका, राजद्वार आणि वेश्याद्वार मृत्तिका, वाळवी आणि यज्ञशाळा मृत्तिका – या आहेत दहा मृत्तिका. समाजातल्या सगळ्या स्तरातल्या माणसांच्या अंशग्रहणाचा विचार डोक्यात ठेवूनच हे उपचार तयार केले आहेत. सध्याच्या भाषेत त्याला म्हणता येईल, इन्क्लुजिव्हनेस. कोणालाही आपल्याला खड्ड्यासारखं वगळलाय, असं वाटायला नको.''

विधान हसत हसत म्हणाला, ''माती द्यायला कोण राजी नाहीय, हत्ती, डुक्कर की वाळवीचे किडे?''

एक उसासा टाकून रमेन म्हणाले, ''वेश्याद्वारची मृत्तिका मिळत नाहीय.''

विधान म्हणाला, ''मला एक गोष्ट समजत नाहीय. दशक्रमा भांडारात जी पूजेची सामग्री देतात, त्यात सगळ्या गोष्टी असतात. त्यात काळजी करण्यासारखं काय आहे?''

गंभीर आवाजात रमेन म्हणाले, ''ते जे मातीचं डिखूळ देतात त्यात सगळ्या प्रकारची माती नसते. मी स्वत:च्या हातांनी पूजेची सामग्री तयार करतो. पण यंदा वेश्याद्वार मृत्तिका मिळत नाहीय. वेश्यावस्तीतल्या महिलांची युनियन म्हणते, ते माती देणार नाहीत. विभिन्न मुलखात जिथे जिथे वेश्यावस्ती आहे, तिथल्या वेश्यासुद्धा हातात झाडू घेऊन उभ्या आहेत. कोणाकडूनही माती मिळत नाहीय. अशा स्थितीत करणार काय?''

विश्वनाथ इतका वेळ पुरोहित आणि मुलगा यांच्यातला संवाद ऐकत होते. आता ते म्हणाले, ''काळजी करू नका. आपल्यापाशी भरपूर वेळ आहे. सगळं ठाकठीक होऊन जाईल.''

**दोन**

चतुर्थीच्या दिवशी संध्याकाळी पाचाच्या सुमारास मल्लिक यांच्या घरी येऊन रमेन आचार्य यांनी जाहीर केलं, ''यंदा मी पूजा करणार नाही. तुम्ही दुसरे पुरोहित शोधा.''

घरभर माणसं. दिल्ली, मुंबई, अमेरिका, उत्तर बंगाल, सगळीकडचे नातेवाईक आले होते. देवघरातल्या पडद्याच्या आडोशाला एक गवती प्रतिमा ठेवलेली होती. डेकोरेटरची माणसं आज संध्याकाळपर्यंत मंडप बांधून तयार ठेवणार होते. ढोल-ताशे वाजवणारे आले होते, आचारी मिठाई बनवायची तयारी करू लागले होते. अशा वेळी हे काय बोलणं झालं?

विश्वनाथ आणि आलोका ताबडतोब रमेनला बेडरूममध्ये घेऊन गेले. आलोका विचारू लागल्या, ''अडचण दूर झाली नाही का?''

मान हलवत रमेन म्हणाले, ''माझ्याच्याने झाली नाही. बाजारात अनेक जुजबी कामं करणारे पुरोहित भेटतील. अंग-रंग-चंग मंत्र वाचून पूजा उरकून टाकतील. मी पूजा केली तर निष्ठेने करीन. हिंदू शास्त्रानुसार पूजा करीन. तशी पूजा यंदा करता येणार नाही. तुम्ही मला सोडून द्या.''

सुबोध चहा घेऊन आला. तो विचारू लागला, ''काय अडचण आहे पुरोहित महाशय? मला सांगा.''

रमेन म्हणाले, ''तू म्हणजे मल्लिक घराचा नारायण. जमलं तर तूच करू शकशील.''

चाळीशीचा सुबोध तिथेच जमिनीवर बसला. त्याचे बाबा याच घरी बाजारहाट मास्टर होते. त्यावेळी घर होतं लक्ष्मीकांतपूर लाइनवरच्या गोचारण स्टेशनापाशी. सुबोध बारावी झाला, तेव्हा त्याच्या बाबांनी या घरी नोकर म्हणून त्याची वर्णी लावली. गावी राहून सुबोध बिघडत चालला होता. त्या वयात अनेक मुलींवर प्रेम करत होता. एकदा नदीकाठी अंधारात एका मुलीबरोबर अश्लील चाळे करताना दिसल्यावर गावकऱ्यांनी त्याला बेदम पिटलं होतं. त्यानंतर सुबोधच्या बाबांनी आणखी धोका पत्करला नाही.

बाबा बऱ्याच आधी देवाघरी गेले होते. पत्नी प्रतिमा आणि मुलगा सुबीर यांच्या बरोबर मल्लिक यांच्या घराच्या विरुद्ध बाजूच्या एका घरी तो भाडेकरू म्हणून राहत होता. बाबांचा मृत्यू झाल्यावर गावाशी असलेला संपर्क संपुष्टात आला होता. मुलगा सुबीर आठवीत होता. प्रतिमा फॉलबिडिंग करून देत असे. प्रतिमाला मल्लिक यांच्या घरी यायची परवानगी असली तरी सुबीरला तो तिथे येऊ देत नसे. आपले बाबा मोठ्या घरचे नोकर आहेत, अशी ओळख त्याला नको होती.

रमेन म्हणाले, ''वेश्याद्वार मृत्तिका मिळत नाहीय. तू मिळवून आणून देऊ शकशील का?''

सुबोध मान खाली घालून विचार करू लागला. रमेन म्हणाले, ''मी कितीतरी पाड्यांवर फिरून आलो. एकही महिला तयार झाली नाही. त्यांच्या युनियनने बंदी घातलीय. लपत छपत माती घ्यायला गेलो, तर शिव्याशाप देऊ लागतात. तुला जमलं तर बघ. मी नजीकच्या भविष्यात म्हणजे पंचमीच्या दिवशी सकाळी सात वाजायच्या सुमारास येईन. तोपर्यंत मिळाली तर ठीक, नाहीतर दुसरा एखादा पुरोहित पूजा करेल.''

रमेन घरातून बाहेर पडले. आलोका सुबोधकडे पाहू लागल्या. आणखी कोणाला समजो वा न समजो, पण सुबोधची चालचलन आलोकाला माहीत होती. त्या म्हणाल्या, ''हे काम तुझ्याशिवाय कोणी करू शकणार नाही. ती माती तू मिळवून आण.''

सुबोध म्हणाला, ''पैसे लागतील.''

आलोका गंभीर होत विचारू लागली, ''पैसे कशासाठी?''

बायकोच्या अज्ञानापुढे हतबल होत विश्वनाथ म्हणाले, ''वेश्या कोणाला म्हणतात, माहितेय का तुला? ज्या पैशाच्या बदल्यात आपला देह सोपवतात. सुबोधला सगळ्यात आधी अशा कोणाकडेतरी जावं लागेल. होय ना सुबोध?''

घृणा वाटल्यामुळे आलोकांनी तोंड वाकडं केलं. त्यांनी पदराच्या पुरचुंडीतून दोन हजाराची नोट बाहेर काढली आणि ती सुबोधकडे फेकून त्या म्हणाल्या, ''उद्या सकाळी सात वाजता तू ती माती घेऊन घरी हजर हो. ठीक आहे ना?''

नोट उचलून घेऊन सुबोध तिथून बाहेर पडला. बाहेर पडल्याबरोबर त्याला विधानने गाठलं. तो हळूच म्हणाला, ''तू



*सर्व रेखाचित्रे : सागर शिंदे (७०३०९९००८१)*

जर बागेतली मूठभर माती आणून रमेन काकांच्या हातात देऊन म्हणालास, ही वेश्याद्वारची मृत्तिका आहे, तर त्यांना काही समजेल का?''

विधानचा जन्म झाला तेव्हा सुबोधचं वय होतं, वीस वर्षं. त्याने त्याला अंगाखांद्यावर खेळवून मोठा केला होता. अपत्यस्नेह होता त्याच्याप्रत. सुबोध म्लान हसून म्हणाला, ''मी भित्रा माणूस. इकडची तिकडची मातीची डिखळं आणून पुरोहित महाशयांच्या हाती दिली तर मला नरकात सुद्धा जागा मिळणार नाही. मला वेश्या घरातलीच माती आणावी लागेल.''

मल्लिक यांच्या घरातून बाहेर पडून सुबोधने श्याम बाजाराचा रस्ता पकडला. नशीब चांगलं म्हणून आज गुरुवार होता. प्रतिमा आणि सुबीर ट्युशनसाठी बेहालाला गेले होते.

**तीन**

गेली पंधरा वर्षे सुबोध सोनागाछीतल्या (कोलकातामधल्या वेश्यावस्तीचं नाव) मितालीकडे बरेचदा जात असे. मिताली जेव्हा रांगाबेलियाहून सध्याच्या मोनालिसा बिल्डिंगमध्ये आली तेव्हापासून तो तिला ओळखत होता. सुरुवातीला तिच्याकडे जायची क्षमता नव्हती. नवीन मुलींचे दर नेहमीच जास्त असतात. वर्षभरात मितालीसाठी येणारे कस्टमर्स जरा कमी झाले. मग एके दिवशी सुबोध मितालीकडे गेला.

सुबोधची शारीरिक भूक कमी वयापासूनच जरा जास्त होती. गावच्या लोकांच्या हातचा मार खाल्ल्यानंतर सुबोधचे बाबा मुलाला कोलकात्याला घेऊन आले होते. लहान वयातच त्याचं लग्न करून दिलं होतं आणि हे कामही मिळवून दिलं होतं. पण तसं केलं असलं तरी वाघाला रक्तापासून दूर ठेवता येईल का?

प्रतिमाशी लग्न लावून दिल्यावर बाबा देवाघरी गेले. आठवडाभर सुबोध सर्कसमधल्या वाघासारखा राहत असे. रिंग मास्टरच्या चाबुकाच्या आवाजाने मागच्या दोन पायांवर बसून समोरच्या दोन पायांनी सगळ्यांना नमस्कार करत असे. पेटत्या रिंगमधून उडी घेऊन बाहेर पडत असे. परंतु गुरुवारी संध्याकाळी मात्र तो जंगलचा राजा! शिकार शोधायला बाहेर पडत असे.

गुरुवार निवडण्याची विशेष कारणं होती. त्या दिवशी संध्याकाळी मल्लिक यांच्या घरी रमेन राधारमणची पूजा करत. घरात विश्वनाथ, आलोका आणि सुबोध यांच्याशिवाय आणखी कोणी नसे. त्याच संध्याकाळी सुबीरला घेऊन प्रतिमा ट्युशनसाठी बेहाला येथे जात असे. सोनागाछीतलं काम उरकून घरी येऊन फ्रेश झाल्यावर बऱ्याच वेळाने आई आणि मुलगा घरी परत येत. बेहालाहून आडियादहला परत येणं, खायचं काम आहे का?

प्रत्येक आठवड्यातल्या गुरुवारी नियमित आल्यामुळे मितालीचा उत्कर्ष सुबोधने स्वत:च्या डोळ्यांनी पाहिला होता. गावातल्या किशोरवयीन मुलीची लैंगिक व्यवसाय करणारी तरुणी व्हायच्या पायऱ्या सगळ्याच ओलांडतात. पण मिताली या सगळ्याबरोबर एक प्रभावी प्रमुख झाली होती. तिने वेश्याव्यवसाय करणाऱ्यांची स्वत:ची युनियन तयार केली. नेता, पोलीस, फ्लेश ट्रेडर्स – सगळ्यांनी युनियन तयार करायला विरोध करून अडथळे आणायचा प्रयत्न केला होता पण मितालीने कोणाचं काही ऐकलं नाही. तिने तयार केला 'हमलोक ट्रस्ट'.

सोनागाछीच्या लहानशा ऑफिसमध्ये मुलींची नियमित तपासणी केली जाई. कंडोम वापरण्याविषयी जागरुकता निर्माण व्हावी म्हणून नियमित सभा घेतल्या जात. आणखी अनेक प्रकारची कामं करत असत. ते सगळं सुबोधला माहीत नव्हतं. हमलोक ट्रस्टने तीन वर्षांपूर्वी जाहीर केलं होतं, हा व्यवसाय करणाऱ्यांकडे समाज वाईट नजरेने बघतो. समाजातल्या महत्त्वाच्या उत्सवात लोक इथली माती न्यायला येतात. समाज जोपर्यंत मोकळ्या मनाने वेश्यांच्या अस्तित्वाचा स्वीकार करणार नाही, तोपर्यंत त्या वेश्याद्वार मृत्तिका देणार नाहीत. हे सुबोधला तीन वर्षांपूर्वीपासूनच माहीत होतं. माती मिळाली नाही तर इतक्या खाजगी आणि सार्वजनिक पूजा आजवर कशा पार पडल्या असतील? या वर्षी हा विषय वर्तमानपत्रात चर्चेला

आल्यामुळे इतका गोंधळ उडालाय. आज मिताली रिकामी होती. सुबोध मितालीपाशी बसला. अनेक वर्षांपूर्वीपासून परिचय असल्यामुळे त्याला मोकळं वाटत होतं. दोघांसाठी त्याने चायनीज फूडची ऑर्डर दिली. मितालीसाठी व्होडका. सुबोध मद्यपान करत नसे. बायका सोडल्या, तर त्याला इतर कोणतंही व्यसन नव्हतं.

दार बंद गेल्यावर गप्पा सुरु झाल्या. सुबोध मितालीला एका मागोमाग एक पेग तयार करून देऊ लागला. स्वत:सुद्धा शेजवान चिकन आणि मिक्स्ड चायनीज खाऊ लागला. अड्डा जमला. सगळं यथासांग पार पडलं. रात्री साडे दहाच्या सुमारास सुबोध म्हणाला, ''आता मी निघतो. आज जरा जास्तच उशीर झाला.''

ग्लासमध्ये आणखी एक पेग ओतून जडावलेल्या आवाजात मिताली म्हणाली, ''सावकाश जा.''

मोनालिसा बिल्डिंगमधून बाहेर पडल्यावर खिशातून एक कंगवा बाहेर काढून सुबोधने उगीचच केस सारखे केले. पटकन आजूबाजूला बघून घेतलं. रस्त्यावर बरेच लोक होते. त्याच्याकडे कोणाचं लक्ष नव्हतं. जो तो आपापल्या व्यापात व्यग्र. सुबोधने खाली वाकून मूठभर माती आपल्या रुमालात बांधून घेतली आणि तो रस्त्यावरच्या गर्दीत मिसळून जायचा प्रयत्न करू लागला...

दुसऱ्या मजल्यावरून मिताली किंचाळू लागली, ''धरा साल्याला! मला समजत नाही, असं वाटलं का तुला? मल्लिक यांच्या घरचा नोकर आहेस तू, दुर्गा पूजेसाठी वेश्याद्वारमृत्तिका चोरतोयस काय? मारा साल्याला! मारा!'' तिच्या आवाजात नशेचा मागमूस नव्हता.

सुबोध घाबरून गेला. धावत पळून जायचा प्रयत्न करू लागला. मोनालिसा बिल्डिंगच्या दोन रखवालदारांनी त्याची गच्ची आवळली. त्याच्या पोटात ते आलटून पालटून ठोसे देऊ लागले. हातातून माती भरलेला रुमाल खेचून घेऊ लागले. पोटातल्या असह्य वेदनांमुळे सुबोध बेशुद्ध पडला.

**चार**

शुक्रवारी सकाळी सुबोधला जेव्हा जाग आली तेव्हा त्याचं सारं अंग ठणकत होतं. दोघा रखवालदारांनी मिळून काल रात्री त्याची चांगलीच धुलाई केली होती. सुबोध शुद्धीवर आला तेव्हा, तो ग्रे स्ट्रीटच्या फूटपाथवर पडलेला होता. शर्ट फाटला होता, ओठ सुजले होते, गाल काळेनिळे झाले होते. फक्त रक्त ओघळत नसल्यामुळे तो बचावला होता. सुबोध टॅक्सीने घरी आला. प्रतिमा काल रात्रीविषयी काही बोलली नाही. तिने वेदनाशामक गोळी देऊन त्याला झोपवून ठेवलं. आज तिने त्याला जाब विचारला असता.

पण सुबोधने विचार केला, ते मॅनेज करता येईल. स्वत: मालकीणबाई त्याची बाजू घेऊन बोलल्या की बायको काही बोलू शकली नसती. स्वत:च्या घराची त्याला अजिबात काळजी वाटत नव्हती. काळजी होती मल्लिक यांच्या घराची. सकाळी सात वाजता वेश्याद्वार मृत्तिका घेऊन गेला नसता, तर रागवारागवी सुरु झाली असती. त्याचा विचार मनात आल्यावर सुबोधच्या पोटात कालवाकालव होऊ लागली.

सुबोध झटकन बिछान्यावरून उठला. खोटं बोलून माणसाला वेळ निभावून नेता आली असती, पण परमेश्वरापाशी निभाव लागला नसता. आता त्याने करावं तरी काय?

दात घासता घासता सुबोधला विश्वनाथ यांचं बोलणं आठवलं. – वेश्या कोणाला म्हणतात, माहितेय का? जे पैशाच्या बदल्यात देह सोपवतात. सुबोधला आठवण झाली विधानची. त्याच्यावर त्याचं सुबीरइतकंच प्रेम होतं. विधानसुद्धा सुबीरप्रमाणे त्याचंच अपत्य. विश्वनाथ यांच्यात आलोकाबरोबर मिलित होऊन अपत्याला जन्म द्यायची क्षमता कधीही नव्हती. सुबोध हाच आलोकाचा सदासर्वकाळ भरवसा. अर्थात तेही पैशाच्या बदल्यात.

स्नान उरकून स्वच्छ कपडे घालून सुबोध घरातून बाहेर पडला. स्वतःच्या घरासमोर उभं राहून दुर्गा मातेला मनोमन नमस्कार करून मूठभर माती उचलून घेऊन तो मल्लिक यांच्या घराकडे चालू लागला...

**तळटीप – नवरात्रात दुर्गा मातेची मूर्ती शाडूपासून तयार करत नाहीत. ती करतात गंगेच्या मातीपासून आणि त्यात या दहा प्रकारच्या माती मिसळल्याशिवाय ती मूर्ती पूर्ण होत नाही. या धार्मिकतेवर ही गोष्ट बेतलेली आहे.**

**इंद्रनील सान्याल यांनी लिहिलेल्या वेश्याद्वार मृत्तिका या बंगाली कथेचा भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

ईमेल : sumatijoshi154@gmail.com

# आयुर्वेदिक औषध हे अन्नद्रव्य नव्हे!



डॉ. श्रीराम सावरीकर

आयु:रंग



आयुर्वेदिक औषधांमधील टॉक्सिक मेटल्स संबंधांतील भीती अत्यंत अज्ञानमूलक आहे. ही भीती बाळगणारे लोक आयुर्वेदिक औषधांना अन्नद्रव्य समजून अन्नद्रव्यासाठीच्या टॉक्सिक मेटल्सच्या स्वीकारार्ह मर्यादेचे निर्धारित प्रमाण आयुर्वेदिक औषधांना लागू करीत आहेत. असे करणे अत्यंत चुकीचे आहे. कारण अन्नद्रव्य व औषधी द्रव्य यांचे निकष पूर्णतः वेगळे आहेत. या लोकांनी आयुर्वेदिक औषधांचा प्रथम औषध म्हणून स्वीकार करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांनी या स्वीकारार्ह मर्यादा द्रव्यातील भेसळीच्या मर्यादा निर्धारित करणाऱ्या आहेत, हेही ध्यानात घेणे आवश्यक आहे...

औषधी वनस्पती निसर्ग निर्मित असतात. दैनंदिन वापरासाठी त्या निसर्गातून जमा करताना, त्यांचा साठा करताना, हाताळताना त्यामध्ये कचरा, माती इत्यादिच्या संपर्कातून कॅडमियम, लेड, अर्सेनिक, पारा यासारखे टक्सिक मेटल्स निसर्गतःच मिसळले जात असतात. म्हणूनच निसर्गात मिळणाऱ्या वनस्पतीतील त्यांची उपस्थिती पूर्णपणे टाळता येत नाही. परंतु विविध उपायांनी त्यातील प्रमाण मर्यादित करता येते. म्हणूनच जेव्हा आयुर्वेदिक औषधामध्ये टॉक्सिक मेटल्स औषध म्हणून नव्हे, तर भेसळ म्हणून उपस्थित असतात, तेव्हा मात्र त्यांना औषधासाठी निर्धारित भेसळीच्या स्वीकारार्ह मर्यादा लागू असतात. अन्नद्रव्ये आणि औषधामधील हेवी/टॉक्सिक मेटल्सच्या भेसळीची नैसर्गिक अनिवार्यता ध्यानात घेऊन मानवी शरीरासाठी त्यांच्या सुरक्षित प्रमाणाच्या स्वीकारार्ह मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. या मर्यादा अन्नद्रव्ये आणि औषधी द्रव्यांसाठी वेगवेगळ्या आहेत. लेड, मर्क्युरी, कॅडमियम, अर्सेनिक यासारख्या धातूंच्या अन्न पदार्थ आणि औषधी द्रव्यामधील स्वीकारार्ह मर्यादा वेगवेगळ्या ठरवण्यात आल्या आहेत. अन्न द्रव्य हे मोठ्या प्रमाणांत म्हणजे ग्रॅम्समध्ये आणि सामान्यतः नित्य किंवा वारंवार दीर्घकाल सेवन केले जात असते. त्यांच्या अशा नित्य व दीर्घकालीन सेवनामुळे त्यातील हेवी मेटल्स शरीरांत हळूहळू साचत जात असतात. त्यांचे शरीरातील प्रमाण वाढत ते घातक पातळी गाठताच त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात. त्यामुळे त्यांतील हेवी/टॉक्सिक मेटल्सच्या नैसर्गिक भेसळीची स्वीकार्य मर्यादा अत्यंत कमी असते.

औषध हे काही नित्य सेवनाचे द्रव्य नाही. ते केवळ डॉक्टर/वैद्याच्या निर्देशनाने त्याच्या देखरेखीखाली त्याने निर्देशित केलेल्या प्रमाणांत म्हणजे मि.ग्रॅ.मध्ये व मर्यादित कालावधीसाठी म्हणजे सामान्यतः अधिकात अधिक ७ दिवस पर्यंतच सेवन केले जात असते. ते असे योग्य पद्धतीने व योग्य प्रमाणात घेतल्यास त्यातील हेवी मेटल्स शरीरात घातक परिणाम करण्याच्या पातळीपर्यंत साठत जाण्याची शक्यता नसते. म्हणूनच त्यातील हेवी मेटल्सची स्वीकारार्ह मर्यादा अन्न पदार्थातील हेवी मेटल्सच्या स्वीकारार्ह मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक असते. म्हणजे अन्न द्रव्यांतील हेवी/टॉक्सिक मेटल्सच्या नैसर्गिक भेसळीची स्वीकारार्ह मर्यादा पीपीएम या मानकांत तर औषधांतील स्वीकारार्ह मर्यादा मायक्रो ग्रॅम्सच्या मानकांत दर्शवली जात असते. अन्न वा औषध द्रव्यातील संबंधित टॉक्सिक मेटल्सचे प्रमाण संबंधित निर्धारित स्वीकारार्ह मर्यादेच्या बाहेर असेल, तर ते द्रव्य शरीरास हानीकारक ठरू शकते.

औषधी द्रव्याच्या अल्पकालीन व अल्पमात्रेतील सेवनामुळे हेवी/टॉक्सिक मेटल्सचे शरीरावर होणारे दुष्परिणाम हे तत्कालिक असतात. औषध बंद करताच ते दुष्परिणाम आपोआप दूर होतात. अन्नद्रव्यांच्या बाबतीत मात्र तसे होत नाही. त्यांच्या अतिमात्रेतील व दीर्घकालीन सेवनामुळे हेवी/टॉक्सिक मेटल्सचे होणारे दुष्परिणाम दीर्घकालिक व काही वेळा कधीही दूर न होणारे असू शकतात.

**आयुर्वेदिक औषधामधील हेवी मेटल्सचे औषधी परिणाम**

वनस्पती द्रव्यांमध्ये टॉक्सिक मेटल्स हे नेहमीच नैसर्गिक भेसळीच्या परिणामी मिसळले जात असतात. परंतु इतर औषधांबाबत असे असतेच असे नाही. अनेकदा विशेषतः आयुर्वेद चिकित्सेमध्ये त्यांच्या औषधी परिणामांचा फायदा मिळवण्यासाठी हेवी/टॉक्सिक मेटल्स स्वतंत्रपणे वा औषधात जाणीवपूर्वक मिसळले जात असतात. त्यांना भेसळीच्या प्रमाणाच्या मर्यादा लागू होत नाहीत. अशा औषधांच्या मात्रा (डोज) विचारात घेतल्या जात असतात. असे डोज ठरवणे हे डॉक्टरचे काम आहे.

इंटरनॅशनल कौन्सिल फॉर हार्मनायझेशन ऑफ टेक्निकल रिक्वायरमेन्ट्स फॉर फार्मास्युटिकल्स फॉर ह्युमन युज (आयसीएच) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जेव्हा एखाद्या औषधामध्ये टॉक्सिक मेटल्स त्याच्या औषधी गुणधर्मांचा फायदा मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक मिसळले जात असतात तेव्हा त्यांच्या प्रमाणांना सामान्य स्वीकारार्ह मर्यादा लागू होत नाहीत. आयसीएचच्या स्वीकारार्ह मर्यादा या औषधातील टॉक्सिक इलेमेंन्ट्सच्या भेसळीसाठी लागू आहेत. अमेरिकन अन्न व औषध प्रशासन, युरोपियन मेडिसिन एजन्सी यासारख्या संस्थांनी आयसीएचच्या या मार्गदर्शक सूचना स्वीकारल्या आहेत वरील गोष्टी विचारांत घेऊन वैज्ञानिक परिभाषेमध्ये अन्न पदार्थातील हेवी मेटल्सचे स्वीकारार्ह प्रमाणास हेवी मेटल लिमिट्स संबोधले जाते, तर औषधी द्रव्यातील प्रमाणास परमिटेड डेली एक्स्पोजर (पीडीई) संबोधले जाते. या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय अधिकारी संस्थांनी ही स्वीकारार्ह

प्रमाणे ठरवून दिली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

| टॉक्सिक मेटल | अन्न पदार्थातील स्वीकार्य प्रमाण पीपीएम | औषधातील स्वीकार्य प्रमाण पीडीई |
|---|---|---|
| कॅड्मियम | ०.३ पीपीएम | ५ मायक्रोग्रॅम्स प्रतिदिन |
| लेड (शिसे) | १० पीपीएम | ५ मायक्रोग्रॅम्स प्रतिदिन |
| अर्सेनिक | ३ पीपीएम | १५ मायक्रोग्रॅम्स प्रतिदिन |
| मर्क्युरी | १ पीपीएम | ३० मायक्रोग्रॅम्स प्रतिदिन |

संदर्भ :

१. आयसीएचक्यु ३ डी गाइड लाइन्स ऑन इलेमेन्टल इम्प्युरिटीज

२. इंटरनॅशनल कौन्सिल फॉर हार्मनायझेशन ऑफ टेक्निकल रिक्वायरमेन्ट्स फॉर फार्मास्युटिकल्स फॉर ह्युमन युज (आयसीएच)

३. युएस फूड अँड ड्रग ॲडमिस्ट्रेशन (एफडीए) अँड द ययुरोपियन मेडिसिन्स एजन्सी (इएमए)

**औषधाचे सेवन वैद्याच्या/डॉक्टरच्या निगराणीखाली होणे आवश्यक**

वैद्याच्या निगराणीखाली हेवी मेटल्सयुक्त औषध सेवन केल्यास ते योग्य कारणासाठी, योग्य प्रमाणात व योग्य कालावधीपर्यंतच सेवन केल्यामुळे त्याचे दुष्परिणाम होत नाहीत. शिवाय या कालावधीत औषधाच्या होणाऱ्या बऱ्या-वाईट परिणामावर वैद्याचे लक्ष असतेच. त्यामुळे असे कोणतेही दुष्परिणाम तो घडू देत नाही आणि एखाद्या वेळी घडण्याची शक्यता दिसलीच, तर सबंधित औषध वेळीच थांबवून त्यावर योग्य ती उपाय योजनाही वैद्य करतातच. पण या उलट वैद्याच्या सल्ल्याशिवाय स्वतःच्या मनानेच घरगुती उपाय म्हणून वा फूड सप्लिमेन्ट्स म्हणून आयुर्वेदिक औषधे घेतली, तर ती चुकीच्या कारणासाठी, शरीरास हानीकारक प्रमाणात व दीर्घ कालावधीपर्यंत घेतली जातात. अशा वेळी कोणत्याही तज्ज्ञ वैद्याची त्या रूग्णावर निगराणी नसल्यामुळे त्या औषधाचे दुष्परिणाम लक्षात न येता ते शरीरास घातक ठरणाऱ्या घटना घडतात. त्यात आयुर्वेदिक औषधामध्ये टॉक्सिक मेटल्स असतात. असे म्हणून त्यावर सर्व दोष कसा ढकलता येईल? याचा सारासार विचार सुज्ञांनी करावयास हवा.

म्हणूनच आयुर्वेदिक औषधाला घरगुती उपचार वा फूड सप्लमेंन्ट्स, न्युट्रास्युटिकल्स संबोधून स्वतःच्या मनाला वाटेल, तसे ते सेवन करणे घातक आहे. कोणतेही आयुर्वेदिक औषध तज्ज्ञ वैद्याच्या सल्ल्याशिवाय सेवन करणे धोकादायक आहे. आयुर्वेदिक औषध सेवनाच्या दुरुपयोगाने झालेल्या दुष्परिणामांच्या काही निवडक प्रकरणांचे दाखले देऊन वैज्ञानिक निकषांकडे दुर्लक्ष करून स्वयंघोषित वैज्ञानिकांसहित सर्वांनी समाज माध्यमे आणि संशोधन पत्रिकांच्या माधमातून आयुर्वेदाच्या नावाने खडे फोडणे, हे तर अज्ञानाचे लक्षण आहे. आयुर्वेदिक औषध हे अन्नद्रव्य नव्हे, ते औषध आहे. ते कुणी अन्नासारखे सेवन करीत असेल आणि त्यामुळे दुष्परिणाम होत असतील, तर दोष औषधाचा की ते सेवन करणाऱ्याचा?

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, आयुर्वेद प्राध्यापक तसेच गुजरात आयुर्वेद विद्यापीठाचे माजी कुलगुरू, भारत सरकारचे माजी आयुर्वेद सल्लागार आणि भारत सरकारच्या आयुर्वेद फार्माकोपिया समितीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची रसचंडांशु – हिन्दी टीका, शारंगधर संहिता – इंग्रजी टीका – तीन खंड, अर्वाचीन आयुर्वेदायन, आयुर्वेद – फाउंडेशन ऑफ हेल्दी लाइफ, इंग्रजी, वैद्यकीय सांख्यिकी शास्त्र – हिंदी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे. संपर्क :** sssavrikar@gmail.com



# गौरवशाली नि प्रभावशाली व्यक्तींची सूची – एक सामूहिक प्रयत्न

## आवाहन

**समाजाला आकार नि दिशा देणाऱ्या व्यक्तींची सूची तयार करायची... परंतु या उपक्रमाचे वेगळेपण ते काय? निकष कोणते असावे? मूल्य मापनाचे मापदंड कोणते? हा प्रयत्न नेमके काय सुचवू पाहतो आहे, काय साध्य करू पाहतोय? 'आजचा सुधारक'ने 'समतावादी मुक्त संवाद पत्रिका' मासिकाच्या सहयोगाने केलेल्या आवाहनाचा हा तपशील...**

प्रत्येक समाजामधून संत, समाजसुधारक, राजकीय नेते, लेखक, कलाकार, शास्त्रज्ञ, विवेकवादी, व्यावसायिक, कार्यकर्ते, खेळाडू, उद्योजक अशा व्यक्ती वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या प्रकारे समाजाला आकार, दिशा देत असतात. यापैकी काहींनी कायदे घडवले आहेत, काहींनी समाजोपयोगी संस्था उभारल्या–वाढवल्या, काहींनी साहित्याद्वारे समाजातील प्रश्न चव्हाट्यावर आणले, काहींनी अन्यायाला थेट आव्हान दिले, काही केवळ स्वप्नरंजनात डुंबले. काहींनी प्रस्थापित समजुती तेवढ्या अधिक घट्ट केल्या; तर काहींनी अहितकारक, घातक समजुतींच्या विरोधात आंदोलनाचा/क्रांतीचा मार्ग स्वीकारला.

आपण या सगळ्याकडे कशा नजरेने पाहतो? इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांनी १९१३ मध्ये ''महाराष्ट्रातील बुद्धिमान, प्रतिभावान आणि कर्त्या लोकांची मोजदाद'' करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा निकष स्पष्ट होता : 'थेट सामाजिक उपयुक्तता' पुढे अनेकांनी याद्या केल्या. अलीकडेच, म्हणजे २०१७ मध्ये राजन मांडवगणे यांनी नवी यादीदेखील सुचवली.

अशा प्रयत्नांमधून एक गोष्ट स्पष्ट होते, की अशा प्रकारचे परीक्षण सातत्याने होत राहिले तर आधीच्या सूचीतील प्रभृतींच्या आठवणींना, त्यांच्या कार्याला पुन्हा उजाळा मिळेल, तसेच अनेक नव्या लोकांचा, त्यांच्या कार्याचा परिचय लोकांना, समाजाला होत राहील. राजवाडे, मांडवगणे यांचे हेच प्रयत्न पुढे न्यायचे तर काही मर्यादा आपण ओलांडू शकतो का? आणि त्या अनुषंगाने एक नवी सूची तयार करू शकतो का? या विचारातून पुढे आलेले हे आवाहन आहे.

**हे आवाहन वेगळे कसे?**

महाराष्ट्राभरातून अशा व्यक्तींची एक प्रातिनिधिक सूची तयार करायची, तर त्यासाठी सामूहिक सहयोगाची जोड हवी. संतांपासून विवेकवाद्यांपर्यंत, कलाकारांपासून प्रशासकांपर्यंत, उद्योजकांपासून वैज्ञानिकांपर्यंत अशी ही समावेशक सूची असावी. ही सूची अंतिम नसून अशा प्रकारच्या प्रयोगाचा आरंभमात्र ठरावी, एवढेच. या टप्प्यात महाराष्ट्राचे सध्याचे भौगोलिक क्षेत्र विचारांत घ्यावे, तसेच महाराष्ट्रीय मनांवर प्रभाव पाडणारे (महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्राबाहेरील असले तरी, उदाहरणार्थ, कुमार गंधर्व, जी.ए.कुळकर्णी इत्यादि) क्षेत्रही विचारात घेतले जावे.

या सूचीसाठी आम्ही साधारण १३ निकष ठरवले आहेत. कुणाला यापेक्षा अधिक काही सुचू शकतील, त्याचेही स्वागत असेल. ''कोण महान'' यापेक्षा ''कशामुळे महत्त्वाचा वा विवाद्य'' हे स्पष्ट करू पाहणारी ही चौकट आहे.

**आम्हाला सुचलेले १३ निकष**

१. प्रभावी संवाद आणि सांस्कृतिक जाळे – आपले विचार किंवा कला लोकांपर्यंत पोहोचवल्या का? अधिकाधिक लोकांशी नाते जोडले का?

२. संस्था/व्यवस्था उभारणे, टिकवणे किंवा वृद्धिंगत करणे – शाळा, दवाखाने, वाचनालय, प्रयोगशाळा, कायदे, धोरणे, संस्था अशा शाश्वत, टिकाऊ व्यवस्था/रचना उभ्या केल्या का?

३. विषमतेविरोधात थेट भूमिका – जात, लिंग, वर्ग, धर्माधारित असमानता आणि तज्जन्य अन्याय कमी करण्यात त्यांची प्रत्यक्ष भूमिका होती/आहे का?

४. राजकीय/नागरी हस्तक्षेप – राजकारण, प्रशासन, किंवा सार्वजनिक चळवळींत त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला का?

५. शाश्वतता – त्यांनी सुरू केलेल्या संस्था/उपक्रम त्यांच्यानंतरही कार्यरत वा सुरू आहेत का?

६. नैतिकता – जनमानसावर प्रभाव असूनही त्यांनी स्वतः नैतिक मर्यादा पाळल्या का? जसे, सत्ता/लोकप्रियतेचा गैरवापर टाळला का?

७. चिकित्सक विवेक/विवेचक बुद्धी–प्रस्थापित मान्यतांना प्रश्न विचारण्याची, तर्कशुद्ध विचार करण्याची, अंधश्रद्धेला आव्हान देण्याची भूमिका त्यांनी घेतली का? त्यासाठी सत्तेला, सत्ताधाऱ्यांना किंवा धोरणकर्त्यांना आव्हान दिले का?

८. परिणामांचा आवाका/विस्तार – परिणामांचा विचार करता त्यांचे काम किती मोठ्या समाजघटकांपर्यंत/प्रदेशांपर्यंत पोहोचले?

९. उचललेली जोखीम – आपल्या भूमिकेसाठी त्यांनी विरोध, संकट, नुकसान, अशी किंमत मोजली का?

१०. ज्ञानविस्तार व नवी दृष्टी – सामाजिक, राजकीय किंवा वैज्ञानिक संशोधनक्षेत्रात काही भरीव कामगिरी केली आहे का? ज्ञान मिळवण्याचे नवे मार्ग उपलब्ध केले का? त्यामुळे समाजाची विचार करण्याची/समजून घेण्याची चौकट अधिक विस्तृत झाली का?

११. आमूलाग्र बदल – लोकांच्या रोजच्या भाषेत, वर्तनात, सवयींमध्ये त्यांचे विचार रूजले आहेत का? त्यामुळे विचारप्रक्रियेत दृश्य फरक पडला का?

१२. थेट सामाजिक उपयुक्तता – त्यांच्या आयुष्यातच समाजाला त्यांच्या कार्याचा, विचारांचा, धडपडीचा थेट फायदा झाला का?

१३. ऐतिहासिक प्रभाव – ते नसते तर इतिहासाची दिशा लक्षणीय प्रकारे वेगळी झाली असती का?

या निकषांमधून सक्रिय योगदान, तटस्थ योगदान यासोबतच संभाव्य नकारात्मक परिणामांचाही विचार करण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत.

**पण इतकेच नाही**

हे मूल्यमापन करताना अनेक प्रश्न विचारण्याचे धाडसही करायला हवे. कोणत्याही व्यक्तीचे मूल्यमापन करताना, तिने समाजाला पुढे नेले की मागे रोखले – हा प्रश्न टाळता येत नाही. जसे,

- ✻ त्यांनी उभारलेल्या संस्था टिकल्या का? – त्या सर्वसमावेशक होत्या का?
- ✻ त्यांनी लोकांना अज्ञानातून ज्ञानाकडे नेले का? – की समाजाच्या अंधश्रद्धा बळकट केल्या?
- ✻ त्यांनी धर्म, जात, लिंग, वर्गभेद कमी केले का? – की ते अधिक घट्ट केले?
- ✻ त्यांनी प्रश्न विचारायला शिकवले का? – की न विचारताच मान्य करायला?
- ✻ त्यांनी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला का? – की नियंत्रणाचा?

मात्र अशा प्रकारच्या मूल्यमापनात, दीर्घकालीन परिणाम, सामाजिक दिशा आणि ऐतिहासिक संदर्भ या तिन्हींचा विचार आवश्यक ठरतो. निव्वळ 'थेट सामाजिक उपयुक्तता' ही कसोटी अपुरी ठरू शकते. एखाद्या व्यक्तीचे काम तिच्या आयुष्यातच

समाजाला तत्काळ उपयोगी पडले का, हा प्रश्न महत्त्वाचा असला तरी तो अंतिम निकष ठरू शकत नाही. कारण काही विचार आणि शोधांचे परिणाम अनेक दशकांनंतर समाजावर उमटतात.

जसे, न्यूटन किंवा आइनस्टाइन यांच्या कार्यामुळे तत्कालीन समाजात काही तत्काळ बदल झाले नव्हते. राजवाड्यांच्या निकषांवर त्या काळात न्यूटन वा आइनस्टाइन अपयशीच गणले गेले असते. परंतु आजच्या आपल्या अवकाशमोहिमा, उपग्रह, इंटरनेट, आधुनिक तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रगती – या सर्वांचा पाया त्यांच्या संशोधनात आहे. दीर्घकालीन सामाजिक समृद्धीत त्यांच्या योगदानाइतके मोलाचे योगदान फार थोड्यांचे आहे. म्हणूनच 'थेट सामाजिक उपयुक्तता' हा एक महत्त्वाचा निकष असला, तरी तो सर्व प्रकारच्या योगदानांचे मूल्यमापन करण्यासाठी पुरेसा नाही. तत्काळ समाजोपयोग आणि दीर्घकालीन ज्ञानविस्तार यांच्यातील फरक आपण ओळखला पाहिजे.

**निकष आणि मूल्यदृष्टी**

वरील निकषांकडे पाहण्याची 'लेन्स' (मूल्यदृष्टी) बदलली, तर निष्कर्षही बदलतील. सामाजिक न्यायाला अग्रक्रम दिल्यास एक चित्र उभे राहील. ज्ञानवर्धनाला दिल्यास दुसरे. राजवाड्यांच्या थेट समाजोपयोग निकषाला दिल्यास तिसरेच. मतभेद अपरिहार्य आहेत – आणि तेच अपेक्षित आहेत. वाद व्यक्तींबाबत नसून मूल्यांबाबत व्हावेत आणि ती मूल्ये उघडपणे मांडली जावीत, हीच इच्छा आहे.

**हा प्रयत्न काय नाही**

ही क्रमवारी नाही.

ही अंतिम यादी नाही.

हा शिक्कामोर्तब नाही.

**हा प्रयत्न काय आहे**

हा प्रयत्न म्हणजे चर्चा सुरू करण्याची निव्वळ एक चौकट आहे. आणि ती खुली आहे – बदलण्यासाठी, आव्हान देण्या/स्वीकारण्यासाठी आणि पुनर्विचारासाठी.

महाराष्ट्राची वैचारिक परंपरा केवळ स्मरणाची नाही; ती परीक्षणाची आहे. राजवाड्यांनी, राजन मांडवगणेंनी (कुणी आणखीही कुणी) वेगवेगळ्या काळात ही गणना केली. आज ती पुन्हा, पण थोडी अधिक व्यापक करावी, असे वाटते. केवळ प्रसिद्ध नावेच नव्हे, तर स्थानिक पातळीवर दीर्घकाळ काम केलेल्या व्यक्तींची नावेही आम्हांला महत्त्वाची वाटतात, महानतेच्या पलीकडे जाऊन, महत्त्वाच्या मितींचा विचार करत.

**म्हणून आपणास आवाहन**

आपल्याकडून अशी नावे येणे अपेक्षित आहे. आपण ज्या व्यक्तींना 'महान' म्हणतो, त्या आपल्या समाजाला खरोखर पुढे घेऊन गेल्या, की आपण त्यांच्यामागे विचार न करताच चालत राहिलो –

हा प्रश्न आपण स्वतःला आणि इतरांनाही अधूनमधून विचारत राहणे आवश्यक आहे.

✻ या यादीत टाकता येतील अशी नावे सुचवा. ✻ आमच्या निकषांवर टीका करा, बदल सुचवा, नवे निकष सुचवा. ✻ तुम्ही सुचवणाऱ्या व्यक्तीचे वरील १३ पैकी शक्य तितक्या अधिक निकषांनुसार विश्लेषण पाठवा. ✻ स्वत:ची एखादी मूल्यदृष्टी टाकून विश्लेषण करा.

ही यादी आपण सुधारकच्या ईमेल आयडीवर aajacha.sudharak@gmail.com,

mailto:aajacha.sudharak@gmail.com वर पाठवावी. आपल्या मनात काही प्रश्न किंवा शंका असल्यास याच ईमेल आयडीवर लिहून पाठवाव्या. आम्ही त्यांचे निरसन करण्याचा प्रयत्न करू.

**– आशिष महाबळ**



# UMANG
## special school
For autistic and slow learners

### LOcations

1 **Kandivali**
umang intervention centre, bandar pakhadi road, kandivali west, mumbai-400067.
contact: +91 89762 87060

2 **Bhayander**
bungalow number 8, indralok phase III, gopal patil road, bhayander east, mumbai- 401105
contact: 7506002345

3 **Vasai**
samiranand, next to mary vila, besides ribbons and balloons cake shop, vasai road, vasai
contact: 9921580294
7506048663

### Facilities

- Remedial education
- Functional and skills training
- NIOS & OBE board education
- Speech & Language therapy
- Occupational therapy
- Social skills training
- Psycho -Educational assessment
- Guidance & Counselling
- Sports training
- Pre - vocational & vocational training

umang-trust.org

umangtrust2000@gmail.com

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
PRGI NO-MAHMAR/2023/86554

